Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-035796

# सांगली स्टेट लेजिस्लेटिव्ह असेंब्ली.

## प्रेसिडेंट.

मे. एस्. बी. ढवळे I. C. S. ( Retired )

## सेक्रेटरी.

मे. केशव अनंत कवे B. A. ( Hons. ) LL. B.

## असेंब्ली स्टाफ.

मि. डी. व्ही. वष्ट. मि. एम्. व्ही. मुजुमदार.

## असेंब्ली रिपोर्टर्स.

मि. आर. एन्. कुलकर्णी.
मि. बी. एस्. देऊसकर.
मि. एस्. एन्. करमरकर.
मि. एम्. के. पटवर्धन.
मि. एल्. जी. मत्से.

## हाऊस कमिटी मेंबर्स.

मे. बॅ. ई. एम्. जोशी [ चेअरमन. ]
मे. अेस्. बी. फडके.
मे. एन्. एन्. पटवर्धन.
मे. के. अ. कवे ( सेक्रेटरी )
मे. के. बी. कुलकर्णी.
मे. बी. वाय्. लागू.

## स्टँडिंग फिनॅन्स कमिटी.

१ ना. व्ही. के. खाडिलकर, फिनॅन्स मेंबर ( चेअरमन )
२ ना. रा. सा. वा. ग. भावे, स्टेट इंजिनियर
३ ना. एच्. बी. कुलकर्णी, र. को. सो.
४ ना. के. बी. कुलकर्णी.
५ ना. एस्. बी. फडके.

मे. के. ए. कवे ( सेक्रेटरी )

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# सांगली संस्थान लेजिस्लेटिव्ह असेंब्ली.

## अधिवेशन तिसरें.

जादा अधिवेशन ]. [ सन १९४३ इ.

हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब सांगली हुजूरचे ले. जा. नं. ९१ ता. १९-१-४३ च्या नोटिफिकेशनअन्वयें सांगली संस्थान लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचें तिसरें अधिवेशन ( Emergency Session ), सांगली येथें दरबार हॉलमध्यें सोमवार ता. १५ माहे फेब्रुवारी सन १९४३ इ. रोजीं दुपारीं १२ वाजतां मे. एस्. बी. ढवळे, आय्. सी. अम्. ( रिटायर्ड ) प्रेसिडेंट एक्झिक्युटिव्ह कौन्सिल सांगली यांच्या अध्यक्षतेखालीं झालें.

असेंब्लीचे सभासद सदर तारखेस १२ वाजण्यापूर्वीच सभागृहांत आपापल्या स्थानीं उपस्थित होते. बरोबर १२ वाजतां प्रे. प्रेसिडेंटसाहेब सभागृहांत प्रविष्ट झाले व सर्व सभासदांनीं त्यांना आदरानें उत्थापन दिलें. नंतर मे. रा. ब. मा. ह. लिमये, लॉ मेंबर व सेकंड कौन्सिलर यांनीं मे. प्रेसिडेंटसाहेब यांना राजनिष्ठेची शपथ दिली व ती त्यांनीं घेतल्यानंतर खालील सभासदांचे शपथविधी झाले.

मे. रावसाहेब आर. अन्. कुलकर्णी, पो. सु.

मे. अन्. अम्. जोशी.

मे. रा पां. खराडे [ कुची तालुका ]

## सभेस खालील सभासद उपस्थित होते

### सरकारी सभासद.

१ मे. प्रेसिडेंट स्टेट एक्झिक्युटीव्ह कौन्सिल.

२ „ एस्. आर्. बेतमंगलकर.

३ „ मे. रा. ब. एम्. एच्. लिमये.

४ „ इ. एम्. जोशी.

५ „ मे. व्ही. के. खाडिलकर.

६ मे. टी. एम्. भट.

७ मे. रासा. आर्. एन्. कुलकर्णी (पो. सु.)

८ „ रावसाहेब व्ही. जी. भावे.

९ „ एच्. बी. कुलकर्णी.

१० „ एन्. एम्. जोशी.

### बिनअधिकारी, सरकार नियुक्त सभासद-

११ मे. डॉ: व्ही. एन्. देसाई.
१२ मे. हिंमत बहादूर एन्. व्ही. चव्हाण.
१३ मे. बी. वाय्. लागू.
१४ मे. एम् ए. अमीन.
१५ „ मे. एम्. एच्. काजी मंगळवेढें.

### लोकनियुक्त सभासद.

१६ मे. एम्. जी. फडके, सांगली
१७ „ डी. एम्. कुलकर्णी, सांगली.
१८ सौ. इंदिराबाई सठे, सांगली.
१९ मे. डी. जी. कांबळे, सांगली.
२० मे. सौ. राधाबाई सराफ, शहापूर.
२१ मे. एस्. जी. अनगोळकर, शहापूर.
२२ „ के. के. हंडे, शहापूर.
२३ „ बी. टी. पाचोरे, मिरजप्रांत.
२४ „ ए. ए. मुळे, मिरजप्रांत.
२५ „ एम्. के. पाटील, मिरजप्रांत.
२६ „ एफ् एम्. भोगशेट्टी, शिरहट्टी.
२७ „ एम्. एन्. गोडबोले, सांगली.
२८ „ एन्. एन. पटवर्धन, मंगळवेढें.
२९ „ एस्. जी. गाडगीळ, सांगली.
३० मे. व्ही. एम्. करंदीकर, कवठेमहांकाळ
३१ „ बी. एम्. कोरे, कवठे महांकाळ [मिनिस्टर].
३२ „ रा. पां. खराडे.
३३ „ बी. एम्. बठारे, मंगळवेढें.
३४ „ आर्. जी. करंदीकर मंगळवेढें.
३५ „ व्ही. बी. बेंडे, मंगळवेढें.
३६ „ के. जी. कुलकर्णी, तेरदळ.
३७ डॉ. बी. ए. बोगार, तेरदळ.
३८ मे. एन्. आर्. कुलकर्णी, शहापूर.
३९ „ जी. के. कुट्टे, शहापूर.
४० „ एम्. एफ्. डबाली, शिरहट्टी.
४१ „ जी. आर्. पाटील, शिरहट्टी.
४२ „ बी. डी. शिंदे, महेशवाडी.
४३ „ एस्. एल् दुवाकी, शहापूर.
४४ „ ए. एस्. राजमाने, सांगली.

ना. डि. ए. कच्छी यांनीं आपल्यास सदर अधिवेशनास हजर राहतां येत नसलेबद्दल तशी परवानगी मे. प्रेसिडेंटसाहेब यांचेकडे पत्रद्वारें मागितली होती. सदर पत्र मे. प्रेसिडेंटसाहेब यांनीं सभागृहास वांचून दाखविलें.

यानंतर प्रश्नोत्तरांस सुरवात झाली.

## प्रश्नोत्तरें.

### ना. सदाशिव गणेश फडके, सांगली.

प्र. नं. १—पब्लिक वर्क्सच्या कामगाऱ्या.

ना. स. ग. फडके:—१ (अ) सांगली संस्थान लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या माहे मे १९४२ च्या अंदाजपत्रकाच्या अधिवेशनाच्यावेळीं पब्लिक वर्क्सच्या कामगाऱ्यांची जी यादी

देण्यांत आली होती त्यांपैकीं किती कामगाऱ्या सुरू करण्यांत आल्या आहेत? (ब) त्यापैकीं सोंदीव खात्यापैकीं बऱ्याच कामगाऱ्यांना सुरवात केली नाहीं हें खरें आहे काय? (क) नस-ल्यास कारण कोणतें? (ड) कामगिऱ्यास ले. अॅसेंब्लीची मंजुरी मागतांना ना. मंत्र्यांना याची कल्पना आली नव्हती काय?

ना. रा. सा. वा. ग. भावे-(स्टे. इं.):(अ) एकंदर २३ कामगाऱ्या सुरू झाल्या आहेत, व १८ सुरू झालेल्या नाहींत. युद्धपरिस्थितीमुळें दर भरमसाट वाढल्यामुळें ह्या कामगाऱ्या हातीं घेणें अशक्य झालें आहे. (ब) पांच सोंदीव व बाकीच्या रस्त्यांव १३ अशा कामगाऱ्यांना सुरवात केलेली नाहीं. (क) कारण आतांच वर सांगितलें आहे. (ड) मालाचे दर इतके वाढतील अशी त्यावेळीं कल्पना नव्हती.

प्र. नं. २— ट्रेनिंग कॉलेजला मान्यता.

ना. स. ग. फडके:—२ [अ] सांगली येथील प्राथमिक शिक्षकांच्या ट्रेनिंग कॉलेजला मागितलेली परवानगी मिळाली आहे काय? (ब) आतांपर्यंत ती मिळाली नसल्यास या सालअखेरपर्यंत तरी मिळेल काय? [क] या कॉलेजनिमित्त सांगली दरबारला आतांपर्यंत किती खर्च आला? (ड) या कॉलेजांत आतापर्यंत किती शिक्षकांना शिक्षण मिळालें? (इ) या शिक्षकांना ते बाहेर शिक्षण घेण्यास पाठविले असतें तर किती खर्च आला असता?

ना. त्रि. मो. भट:—(अ) मान्यता मिळाली नाहीं; परवानगीचा प्रश्नच नव्हता. (ब) तसा संभव नाहीं. (क) आतांपर्यंत, ह्मणजे जानेवारी १९४३ अखेर १३२०३ रुपये. (ड) सन १९४१-४२ मध्यें स्टेटचे २९ व बाहेरचे १० शिकत होते. १९४२-४३ मध्यें स्टेटचे ९५ व बाहेरील १७ शिक्षण घेत होते. (इ) स्टेटच्या शिक्षकांचा पगार, फी वगैरे मिळून सुमारें १९-२० हजार रुपये खर्च आला असता.

ना. के. गो. कुलकर्णी:—मान्यता मिळविण्याचा योग्य मार्गानें प्रयत्न केला आहे काय?

ना. त्रि. मो. भट:—होय.

ना. आ. आ. मुळे:—यापुढें आता मान्यता मिळण्याची आशा नाहीं काय?

ना. त्रि. मो. भट:—तसा संभव नाहीं.

ना. स. ग. फडके:—गेल्या अधिवेशनामध्यें प्रश्न विचारण्यांत आल्या वेळीं "प्रयत्न चालू आहेत" असें उत्तर देण्यांत आलें होतें. पुढें त्याचा काय परिणाम झाला समजलें नाहीं.

ना. मिनिस्टर:—प्रश्नास उत्तर ह्मणून यासंबंधी खुलासा करतां येणेसारखा नाहीं. अंदाजपत्रकावरील चर्चेच्या वेळीं कोणी कपात-सूचना आणिल्यास यासंबंधीं खुलासा करणेस होणें जाणार आहे.

ना. के. गो. कुलकर्णी:—मान्यता मिळाली नाहीं याचा कांहीं परिणाम कॉलेजवर झाला आहे काय?

ना. त्रिं. मो. भट:—मुळींच नाहीं.

प्र. नं. ३— सांगली हायस्कूलच्या फीचें उत्पन्न.

ना. स. ग. फडके:—३ (अ) चालू सालीं सांगली हायस्कूलचें फीचें उत्पन्न दरमहा किती रुपये आहे? (ब) तें कमी झालें आहे अगर वाढलें आहे? (क) पहिल्या तीन इयत्तांच्या तुकड्या कमी केल्या असत्या तर तें वाढलें असतें कां कमी जाहलें असतें?

ना. त्रिं. मो. भट:—(अ) सरासरीनें एक हजार रुपये. (ब) सरासरीनें पाहिलें तर गतवर्षी इतकेंच. (क) तुकड्या कमी केल्या असत्या तर फीचें उत्पन्न कमी झालें असतें-हें उघडच आहे; तथापि त्यामुळें स्टाफ कमी होऊन खर्चांतहि बचत झाली असती.

ना. स. ग. फडके:—तौलनिकदृष्ट्या काय झालें असतें?

ना. त्रिं. मो. भट:—आतां सांगितलें त्यावरून तौलनिकदृष्ट्या माहिती मिळणार आहे.

ना. स. ग. फडके:—तुकड्या कमी केल्या असत्या तर किती बचत झाली असती?

ना. त्रिं. मो. भट:—नोटीस पाहिजे.

ना. स. ग. फडके:—I appeal to the Chair. आम्हांस योग्य ती माहिती मिळाली पाहिजे.

ना. मिनिस्टर:—हा हायपॉथेटिकल प्रश्न आहे. तथापि निश्चित आंकडे पाहिजे असतील तर उद्ईक माहिती काढून सांगणेंत येईल.

प्रश्न नंबर ४— आकस्मिक खर्च.

ना. स. ग. फडके:—४ (अ) सन १३९१ व सन १३९२ फसली सालीं अंदाजपत्रकांतील आकस्मिक खर्च या सदरांतील रकमा कांहीं खर्च पडल्या आहेत अगर कसें? (ब) असल्यास त्या कशाकरितां खर्च केल्या गेल्या आहेत? या खर्चें करण्याचें कांहीं विशिष्ट तत्व स्वीकारलें जातें काय? (ड) नसल्यास त्यावद्दल कांहीं निश्चित धोरण यापुढें स्वीकारलें जाईल काय?

ना. वि. का. खाडिलकर( फि. मे. ):—(अ) होय. पडल्या आहेत. (ब) आकस्मिक बाबींवर. यादी टेबलवर ठेविली आहे (वाचून दाखविली) (परिशिष्ट १)

प्रश्न नंबर ५— सांगली स्वस्त धान्याच्या दुकानची धान्य-विक्री.

ना. स. ग. फडके:—५ (अ) सांगली शहरांतील स्वस्त धान्याच्या दुकानास कोणीकोणी व किती भांडवल पुरविलें होतें? (ब) त्यांत आतापर्यंत दुकानास किती नफा झाला आहे? (क) या दुकानास व्यापाऱ्यांकडून किती धान्य पुरविलें गेलें व संस्थानच्या अधिका-

ऱ्यांकडून व त्यांच्या प्रत्यक्ष खटपटीनें किती धान्य पुरविलें गेलें ? (ड) खटपट सरकारी अधिकाऱ्यांची व नियंत्रण मात्र दुसऱ्याचें असा प्रकार हें दुकान चालविण्याच्या कामीं घडला काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—(अ) एकूण भांडवल ७१९७६ रु. कोणी किती रक्कम दिली त्याचें पत्रक टेबलावर ठेविलें आहे (परिशिष्ट २) (ब) दुकानचे हिशेब अद्याप पुरे होऊन बॅलन्सशीट पुरा झाला नाहीं (क) बहुतेक खरेदी सरकारनीं केली आहे, व त्यास व्यापाऱ्यांचीहि मदत झाली आहे. वट्ट धान्याचीं पोतीं १७३३० दुकानकडे आलीं. त्यांत जोंधळा १३१८७, तांदूळ १८४७, गहूं ३०७, हरभरेडाळ ८९२, तूरडाळ २०१, मूग ७५, बाजरी ८२१. (ड) नाहीं.

ना. स. ग. फडके:—प्रश्न विचारून पंधरा दिवस झाले. अद्यापहि नफ्याची माहिती काढतां आली नाहीं ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—माहिती विचारली आहे; पण बॅलन्सशीट अद्याप हातीं आलेला नसल्यानें आज माहिती सांगतां येत नाहीं.

ना. स. ग. फडके:—दुकान बंद झालें आहे ना ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—होय.

ना. स. ग. फडके:—तरीहि अद्याप बॅलन्स-शीट तयार झालेला नाहीं ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—दुकान बंद झालें असलें तरीहि अद्याप हिशोबी काम चालू आहे.

ना. स. ग. फडके:— नफा किती झाला हें अंदाजानें सुद्धां सांगतां येणार नाहीं काय?

ना. ह. ब. कुलकर्णी:—अजमासें १०,००० रुपये नफा झाला असेल ?

ना. ह. ना. पटवर्धन:—बराचसा जोंधळा मंगळवेढें तालुक्यांतून आणलेला असल्यानें ह्या नफ्यापैकीं कांहीं भाग मंगळवेढें तालुक्यास मिळेल काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—त्याबद्दल अद्याप कांहीं ठरलेलें नाहीं; शिवाय हा प्रश्न बोर्डाचा आहे.

ना. ह. ना. पटवर्धन:—बोर्डापुढें ही मागणी मांडली जाईल काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—बोर्ड या गोष्टीचा विचार करील त्यावेळीं तिकडे रिप्रिझेंटेशन करावें.

ना. श. ह. काजी:—भांडवल सांगलीचें कीं बाहेरचें ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—सांगलीचें.

ना. श. ग. गाडगीळ:—नफ्याची रक्कम धान्य खरेदीकरितां गुंतविली जाईल काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—तो प्रश्न बोर्डाच्या अधिकारांतील आहे.

ना. रा. ग. करंदीकर:—नफा घेण्याचें धोरण आगोदरच ठरलें होतें काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:— नाहीं. नफा मिळाल्यास तो घ्यावयाचा व तोटा आल्यास तोही सोसावयाचा असें ठरलें होतें.

ना. के. गो. कुलकर्णी:—हा नफा धर्मादाय कार्याकडे खर्च केला जावा असें लिहून गेलें आहे काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—नोटीस पाहिजे.

ना. स. ग. फडके:— ' संस्थानच्या अधिकाऱ्यांच्या मदतीनें ' याचा अर्थ समजला नाहीं.

ना. ह. ब. कुलकर्णी:— सल्ला देणें, परवाने देणें वगैरे गोष्टी अधिकाऱ्यांनीं केल्या असून कांहीं बाबतींत अधिकाऱ्यांनीं खरेदीही केलेली आहे.

ना. आ. आ. मुळे:— अधिकाऱ्यांनीं स्वतःचे जबाबदारीवर कांहीं धान्य खरेदी केलें आहे काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:— होय; परंतु ती खरेदी बोर्डाच्या सुचनेप्रमाणें केलेली आहे.

ना. स. ग. फडके:—तांदूळ, जोंधळा वगैरे कांहीं खरेदी त्यांनीं केली आहे काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:— होय. मंगळवेढें व शिरहट्टी येथून जोंधळा व शहापूराहून तांदूळ खरेदी केला आहे. याशिवाय गुडगेरी व सावनूर येथूनहि धान्य खरेदी केलें आहे.

ना. के. गो. कुलकर्णी:— जेथें धान्य खरेदी झालें तेथें तें काय दरानें खरेदी केलें व येथें विकलें तें काय दरानें ?

ना. ह. ब. कुलकर्णी:-- तशी प्रत्येक कलमाची माहिती आणवलेली नाहीं.

ನಾ. ದಬಾಡಿ:—ಯಾವ ಯಾವ ತಾಲೂಕಿನಿಂದ ಎಷ್ಟೆಷ್ಟು ಜೋಳದ ಚೀಲಗಳನ್ನು ತರಿಸಿದಿರಿ?

ना. एच्. बी. कुलकर्णी :—मजजवळ तालुकावार कोणतें धान्य किती आणवलें याची यादी आहे ती मी वाचून दाखवितो. ( यादी वाचून दाखवणेंत आली. )

ನಾ. ದಬಾಡಿ :—ಅಲ್ಲಿ ಅಲ್ಲಿ ಯಾವ ಯಾವ ದರದಂತೆ ಜೋಳ ತರಿಸಿದಿರಿ?

ना. एच्. बी. कुलकर्णी:—तें मी वाचून दाखवलेंच आहे; त्या त्या दरानें येथें धान्य आणवलें गेलें.

ನಾ. ದಬಾಡಿ:—ಶಿರಹಟ್ಟಿಯಲ್ಲಿ ಜೋಳ ೧೬ ಮತ್ತು ೧೭ ಮಾಪಟಿಗಳಂತೆ ಕೊಳ್ಳಲ್ಪಟ್ಟವು, ಆ ಜೋಳ ಇಲ್ಲಿ ಯಾವ ದರದಂತೆ ಕೊಡಲ್ಪಟ್ಟವು?

ना. ह. ब. कुलकर्णी :—शिरहट्टीस १६-१७ मापऱ्यांनीं जोंधळा खरेदी केला ही गोष्ट खरी. तो जोंधळा येथें इतर जोंधळ्याप्रमाणेंच विकला.

ನಾ. ದಬಾಡಿ :—ಶಿರಹಟ್ಟಿ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿ ಈ ಪ್ರಕಾರ ಅಂಗಡಿಗಳನ್ನು ತೆಗೆಯುವವರ ದೇಶಿಯಿಂದ ಹೇಡತ ಕೊಟ್ಟು ಆ ಪ್ರಕಾರ ಅಂಗಡಿಗಳು ಸುರವಾತ ಆವೆಯೋ ಹ್ಯಾಗೆ?

ना. ह. ब. कुलकर्णी :—शिरहट्टी गांवीं चीप ग्रेन् शॉप नांवाचें दुकान काढलें आहेष. परंतु शिरहट्टी तालुका धान्यानें केव्हांहि समृद्ध असतो; इतकेंच काय पण युद्ध चालू असून धान्याचा तुटवडा फार भासत आहे हे या गोष्टीचा त्या तालुक्यास पत्तादेखील नसेल इतका तो तालुका नेहमीं समृद्ध असतो. अशी स्वस्त धान्याचीं दुकानें काढलींच पाहिजेत अशी अडचण तेथें भासेल असें वाटत नाहीं.

ರಾ. ಪಟಾಲಿ:—ತಾಲೂಕಾ ಸಮೃದ್ಧವಿದೆ ಅಂತಾ ಹ್ಯಾಗೆ ಹೇಳುವಿ? ನೀವು ಆ ತಾಲೂಕಿಗೆ ಫೇರಿಗೆ ಹೋದಾಗ್ಗೆ ಶಿಲ್ಲಕ ಧಾನ್ಯದ ಬಗ್ಗೆ ಚೌಕಶಿ ಮಾಡಿರುವಿರಿ ಹ್ಯಾಗೆ?

ना. ह. ब. कुलकर्णी :—नक्की प्रत्येकाकडे किती धान्य शिल्लक आहे ही माहिती काढलेली नसली तरी तेथें धान्य इथल्यापेक्षां जास्त शिल्लक असावेसें वाटतें.

प्रश्न नंबर ६— मिरवणुकींना परवानगी.

ना. स. ग. फडके :—६ (अ) २-१०-४२ इसवी रोजीं, गांधीजन्मदिनानिमित्त काढलेल्या मिरवणुकीस पोलिस अगर मे. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांची परवानगी घेण्यांत आली होती काय? (ब) त्याचप्रमाणें ता. १८-१०-४२ इसवी रोजीं सकाळीं राष्ट्रसेवादलाची जी मिरवणूक काढण्यांत आली त्यास कोणाची परवानगी मागण्यांत आली होती काय? (क) नसल्यास त्याबद्दल सांगली दरबारनें काय कायदेशीर उपाययोजना केली? (ड) केली नसल्यास आतापर्यंत कां केली गेली नाहीं? (इ) कायदा हा विशिष्ट वर्गावर अगर समाजावर बंधनकारक आहे असें दरबारचें म्हणणें आहे काय? (फ) तें तसें नसल्यास कायदा हा सर्व लोकांकडून पाळला जाईल अशी दरबार व्यवस्था करील काय?

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णी [ पो. मु. ] :—(अ) नाहीं. (ब) परवानगी मागण्यांत आली नव्हती. (क) कांहीं केली नाहीं. (ड) हा दरबारच्या पॉलिसीचा प्रश्न आहे. (इ) नाहीं. (फ) प्रश्न उद्भवत नाहीं.

ना. स. ग. फडके :—कांहीं विशिष्ट वर्गावर बंधन घालावयाचें नाहीं अशी पॉलिसी ठरलेली आहे काय?

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णी :—मुळींच नाहीं. त्या त्या विशिष्ट प्रसंगाला उचित होईल असेंच धोरण आंखलें जातें.

प्र. नं. ७— जैन बोर्डिंग-प्रकरणीं श्री. पाटील वकील यांची मुलाखत.

ना. स. ग. फडके :—७ [अ] जैनबोर्डिंग प्रकरणीं जें शिष्टमंडळ हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब स्वारींची मुलाखत घेण्यास ता. ३-१०-४२ इ. रोजीं गेलें त्या शिष्टमंडळांत सरकारी वकील व पब्लिक प्रॉसिक्यूटर श्री. बी. बी. पाटील होते ना? (ब) त्या मुलाखतींत श्री. पाटील यांनीं विद्यमान सांगली संस्थान कार्यकारी मंडळ यावर अविश्वास प्रकट केला होता

काय ? (क) असल्यास त्याबद्दल त्यांच्यावर काय कायदेशीर इलाज केला आहे ? (ड) सरकारी वकील असतांना त्यांना असा अविश्वास प्रकट करतां येतो काय ? (इ) असें करणें त्यांना Incompatible with his duties as a Public Prosecutor होत नव्हतें काय ? (फ) माजी प्रॉसिक्यूटर व सरकारी वकील कै. ग. र. अभ्यंकर वकील यांना सन १९४२ सालीं असें करण्याबद्दल Dismiss करण्यांत आलें होतें ? त्याप्रमाणें श्री. पाटील यांना दरबारच्या या धोरणांत फरक झाला नसतांना Dismiss कां करण्यांत आलें नाहीं ?

ना. शा. रा. बेतमंगलकर ( दिवाणसाहेब ):—(अ) होय. (ब) होय. (क) ते (इ) श्री. पाटील यांची मुदत संपत आली असल्यानें जास्त स्टेप्स घ्याव्यात असें सरकारांस वाटलें नाहीं. (फ) मला जी माहिती मिळाली आहे तीवरून मी म्हणतो कीं, त्यावेळच्या circumstances व facts व आतांच्या circumstances व facts यांत फरक आहे.

ना. स. ग. फडके:—माझ्या (ड) चें उत्तर मिळालें नाहीं.

ना. शा. रा. बेतमंगलकर:—यापेक्षां मला अधिक कांहीं सांगतां येणार नाहीं.

ना. द. मा. कुलकर्णी:—श्री. पाटील यानीं " एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलवर अविश्वास प्रकट केला " असें सांगणेंत आलें तें सर्व लेखी आहे काय ?

ना. शा. रा. बेतमंगलकर:—होय.

ना. द. मा. कुलकर्णी:—तें सर्व टेबलावर ठेविलें जाईल काय ?

ना. शा. रा. बेतमंगलकर:—नाहीं. ते पेपर्स कॉन्फिडेन्शिअल आहेत.

ना. स. ग. फडके:—दोन वेळच्या Circumstances व facts मध्यें फरक असल्याचें सांगितलें. तो फरक काय आहे ?

ना. शा. रा. बेतमंगलकर:—त्या गोष्टी Seditious होत्या अशी माहिती लागते.

ना. स. ग. फडके:—Seditious म्हणजे want of confidence अशाच तऱ्हेच्या ना ?

ना. शा. रा. बेतमंगलकर:—मी सांगितली यापेक्षां अधिक माहिती मला सांगतां येत नाहीं.

ना. स. ग. फडके:—मी माझा प्रश्न नंबर ८ विचारत नाहीं.

ना. प्रेसिडेंट:—ठीक आहे. Next question.

## ना. महादेव हरी गोडबोले, सांगली.

**प्र. नं. १—आर्थिक-समिती-अहवाल.**

ना. म. ह. गोडबोले:—१ (अ) प्राध्यापक कर्वे-गाडगीळ आर्थिक-चौकशी-समितीच्या सूचना सांगली दरबारनें ( एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल ) स्वीकारल्या काय ? (ब) ह्या चौकशी-

समितीस प्रतिवृत्त छापण्यासुद्धां एकूण खर्च किती ? (क) समितीनें सुचविलेल्या योजनांपैकीं किती योजनांची प्रत्यक्ष सुरवात जाहली ? (ड) किती योजनांस यापुढें, पुढील अधिवेशना-पर्यंत सुरवात केली जाईल ?

ना. एन्. एम्. जोशी ( डे. ऑ. ):—[अ] दरबारतर्फे योजनांचा अभ्यास व विचार चालूं आहे. [ब] आजअखेर हातीं आलेल्या माहितीवरून ९९८३८७८४. [क] एकहि नाहीं. [ड] आतांच नक्की सांगतां येणार नाहीं.

ना. म. ह. गोडबोले:—अहवालांतील सूचना कृतींत आणण्याकरितांच आपली नेमणूक झाली आहे ना ?

ना. एन्. एम्. जोशी:—होय.

ना. म. ह. गोडबोले:—मग त्याप्रमाणें कांहीं गोष्टीस आरंभ झाला आहे काय ?

ना. एन्. एम्. जोशी:—योजनांचा अभ्यास व विचार सध्यां चालूं आहे; प्रत्यक्ष कृतीस अद्याप अवकाश आहे.

ना. आ. आ. मुळे:—सूचना कृतींत आणण्यासाठीं डिव्हेलपूमेंट ऑफिसरची नेमणूक झाली असतांना अद्याप कृतींत कांहीं उतरलें नाहीं. तरी नुसता पगार घेणें एवढेंच त्यांना काम आहे काय ?

ना. एन्. एम्. जोशी:—तसें नाहीं.

ना. स. ग. फडके:— अहवाल तयार करण्याच्या कामीं ज्या गृहस्थांचा संबंध आला होता त्यांनाच त्यांतील सूचना प्रत्यक्ष कृतींत उतरविण्याकरितां ह्मणून नेमणेंत आले होते ना ?

ना. एन्. एम्. जोशी:—होय.

ना. स. ग. फडके:—तर मग आतां विलंब कां ?

ना. एन्. एम्. जोशी:—त्याबाबतींत सरकारचा विचार चालूं आहे; तो पुरा झाल्यावर जरूर ती व्यवस्था होईल.

ना. स. ग. फडके:—अहवालांतील सूचना व सरकारचा विचार यामध्यें कांहीं फरक आहे काय ?

ना. एन्. एम्. जोशी:—डि. ऑ. चे विचार म्हणजे सरकारचे विचार नव्हेत; इतरांही पुष्कळ अधिकाऱ्यांचे विचारांचा त्यांत समावेश होतो.

ना. ह. ना. पटवर्धन:—डि. ऑ. कडे याखेरीज इतर दुसरी कांहीं कार्यें सोपविणेंत आलीं आहेत काय ?

ना. एन्. एम्. जोशी:—होय. सप्लाय डिपार्टमेंटचें काम त्यांचेकडेच सोपविणेंत आलें आहे.

ना. म. ह. गोडबोले:—म्हणजे तूर्त डि. ऑ. चें काम तहकूब आहे असें समजणेचें कीं काय ?

ना. एन्. एम्. जोशी:—नाहीं.

ना. म. ह. गोडबोले:—मग त्यांचा पगार डिव्हेलप्मेंट डिपार्टमेंटवर पडतो कीं सप्लाय डिपार्टमेंटवर ?

ना. एन्. एम्. जोशी:—सप्लाय डिपार्टमेंटवर.

ना. आ. आ. मुळे:—त्यांच्या नेमणुकीच्या वेळीं पगाराबाबत कांहीं निश्चित हुकूम झाले होते काय ?

ना. एन्. एम्. जोशी.:—होय. प्रथम डि. डि. वर पगार खर्च पडावयाचा होता, पण नंतर त्यांच्याकडे सप्लाय डिपार्टमेंट सोंपविण्यांत आल्यानें तो पगार त्याखात्यावर खर्च पडतो.

ना. स. ग. फडके:—मध्यंतरी कांहीं दिवस त्यांचा पगार तसलमातीमधून खर्च पडत होता काय ?

ना. एन्. एम्. जोशी.:—होय.

ना. प्रेसिडेंट:—प्रश्नाला वादविवादाचें स्वरूप येऊं नये. वाटल्यास ठरावाचे वेळीं याबाबत चर्चा करतां येईल व त्यावेळीं अधिक खुलासाही करतां येईल. पुढचा प्रश्न विचारावा. प्रश्न नंबर २—संस्थानांतील सामुदाईक व सशस्त्र दरवडे.

ना. म. ह. गोडबोले:—२ (अ) विधिमंडळाच्या गेल्या बैठकीनंतर सामुदाईक व सशस्त्र दरवडे संस्थानांत तालुकानिहाय किती पडले ? (ब) त्यांपैकीं किती गुन्ह्यांतील आरोपींचा तपास लागला ? (क) लोकांनीं वा पोलिसांनीं किती दरवडे परतवून लावले ? (ड) प्रजेच्या जीवित व वित्तरक्षणाकरितां दरबारनें काय काय नवीन उपक्रम केले ? (इ) पोलीस भरती, सिव्हिक गार्डस्, स्थानिक नागरिकांच्या संरक्षण योजनेस सहाय्य करणें इत्यादि अनेक रीतीनें काय काय प्रयत्न केले गेले ?

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णी:—(अ) सांगली शहर १, मिरजप्रांत २०, कुची ६ तेरदळ ४, शहापूर ८, शिरहट्टी १ व दोदवाड २. (ब) सांगली शहर ०, मिरजप्रांत ९, कुची १, तेरदळ २, शहापूर ६. (क) मिरजप्रांत ४, कुची १, (ड) (१) जादा पोलीस भरती, (२) मुख्य मुख्य ठिकाणीं सिव्हिक गार्डस्‌ची स्थापना व (३) खेडोपाडीं व्हिलेज गार्डस्‌ची स्थापना. (इ) ७३ पोलिसांची जास्त भरती केली आहे. सांगली शहर व तालुक्याच्या ठिकाणीं व तालुक्याच्या कांहीं मोठ्या गांवीं सिव्हिक गार्डस्‌ची स्थापना केली व त्याकरतां दरबारनें ९००० ची रक्कम मंजूर केली आहे. खेडोपाडीं व्हिलेज गार्डस् स्थापणेकरितां

दरबारनें २९००० ची रक्कम मंजूर केली आहे. स्थानिक नागरिकांना संरक्षणाकरितां योग्य माणसें मिळवून देण्यास मदत दिली, सल्लामसलत दिली. त्याचप्रमाणें मागणी आली असतां हत्यारें मिळवून देण्याची तजवीज केली जाते.

ना. ना. रं. कुलकर्णीः—ज्या ठिकाणच्या लोकांनीं दरोडेखोरांना परतऊन लावलें आहे अशांना कांहीं बक्षिसें उत्तेजनार्थ देणेंत आलीं आहेत काय ?

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णीः—एक दोन ठिकाणीं दिलीं असोन बाकीच्या ठिकाणी देण्याचा विचार चालू आहे.

ना. आ. आ. मुळेः—बक्षीस म्हणून बंदूक देण्यांत येईल काय ?

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णीः—विचार करणेंत येईल.

ना. ना. रं. कुलकर्णीः—जी पोलीस भरती करणेंत आली असल्याचें सांगणेत आलें ती भरती सांगली शहरापुरतीच आहे कीं शहापूर वगैरे इतर तालुक्यांकरितांही आहे.

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णीः—भरती जरी हेड्क्वार्टर्सला च होते तरी जरूरीच्या प्रसंगीं इतर तालुक्यांतही फोर्स पाठविला जातो. तालुकेवार वांटणी केलेली नसते.

ना. म. ह. गोडबोलेः—सिव्हिक गार्ड्‌सच्या ९००० पैकीं आतांपर्यंत कांहीं खर्च झाले आहेत काय ?

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णीः—२९०० पैकीं आतांपर्यंत खर्च झाले आहेत.

ना. के. गो. कुलकर्णीः—सांगलीप्रमाणें सि. गा. ची भरती इतर तालुक्यांतूनही केली आहे काय ?

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णीः—कांहीं ठिकाणीं केली आहे व कांहीं ठिकाणीं अद्याप केलेली नाहीं ?

ना. आ. आ. मुळेः—तालुकेवार भरतीचे आंकडे व तालुकेवार खर्चाचे आंकडे किती आहेत ?

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णीः—माहिती काढलेली नाहीं, काढून उद्यां हवीतर सांगेन.

ना. ना. रं. कुलकर्णीः— शहापुरास सि. गा. च्या duties बरोबर चालू आहेत काय ?

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णीः— जितक्या जरूर तितक्या duties ते करतात. इतराप्रमाणें परेड, ड्रिल वगैरेंची त्यांना सक्ती नसते. त्यांना हलकीं सलकीं कामेंहि सांगणेची नसतात. रात्रीं गस्तीस [round] जाणेची कामें त्यांना सांगितलीं जातात व तें तीं करतात.

प्र. नं. ३— सांगली वखार भागांतील गोळीबार

ना. म. ह. गोडबोलेः— (अ) सांगली शहरांत शांततारक्षण करण्याकरितां वखारभागांत रेल्वेचे मालधक्याजवळ गोळीबार करण्यांत आला काय ? (ब) तो करण्यास काय कारण

घडलें ? (क) गोळीबाराशिवाय अन्य मार्गांनीं शांतता राखणें शक्य नव्हतें काय ? (ड) गोळीबारांत किती गोळ्या झाडल्या ? (इ) किती लोकांना इजा झाली ? (फ) किती दुखणाइतांना औषधोपचार वगैरे वैद्यकीय मदत करण्यांत आली ? (ग) गोळीबारानें किती लोक दगावले ? (इ) ह्या गोळीबाराची चौकशी सांगली प्रजापरिषदेनें केली व त्याबद्दल ठराव केला तो दरबारचें नजरेस आला आहे काय ?

ना. शा. रा. बैतमंगलकरः—(अ) होय. (ब) ता. १९-८-४२ च्या प्रेसनोट-मध्यें सविस्तर कारणें दिलीं आहेत. (क) नव्हतें. (ड) सोळा गोळ्या. (इ) तीन (फ) तिघांसही वैद्यकीय मदत मिळालेली आहे. (ग) कोणी नाहीं. (ह) होय.

ना. म. ह. गोडबोलेः—प्रजापरिषदेच्या ठरावाबद्दल दरबारनें कांहीं विचार केला आहे काय ?

ना. शा. रा. बैतमंगलकरः—विचार चालू आहे.

प्रश्न नंबर ४—फॅक्टरी ॲक्ट व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन् ॲक्ट.

ना. म. ह. गोडबोले :—४ [अ] सांगली संस्थानांतील गिरणीकामगारांच्या हिताच्या दृष्टीनें फॅक्टरी ॲक्ट व वर्कमेन्स कॉम्पेंसेशन् ॲक्ट हे कायदे ( बिलस्वरूपी ठराव) या विधिमंडळानें संमत केल्यास किती वर्षे जाहलीं ? (ब) ते कायदे सत्वर लागू करणेंत येतील काय ? (क) नसल्यास तसें न करणे कारणेंस काय ? (ड) संस्थानांत मजूर संस्था नोंदीचा कायदा लागू करणेंत येईल काय ? (इ) गिरणीमजूर व गिरणीमालक यांच्यामध्यें सलोखा ठेवणें व मजूरवर्गाच्या गाऱ्हाण्यांचा विचार करण्याकरितां सरकारनें एखादे समितीची योजना केली होती काय ? (ल) कोल्हापूर संस्थानांत याबाबत नियम असल्याचें सांगली दरबारला माहित नाहीं काय ? (म) नसल्यास सरकार चौकशी करील काय ?

ना. ह. व. कुलकर्णी :—(अ) ४–९ वर्षे झालीं. (ब) व (क) अद्याप नक्की सांगतां येत नाहीं. परंतु कारखान्याचे मालक व मजूर यांच्यामध्यें सलोखा राहून फॅक्टरी ॲक्ट व वर्कमेन्स कॉंपेंसेशन् ॲक्ट याचे तत्वाप्रमाणें काम चालावें ह्मणोन सरकार एक समिती लौकरच नेमणार असोन त्यावर मालक, मजूर व सरकार यांचे प्रतिनिधी राहतील. (ड) त्याजबद्दल आज नक्की सांगतां येणार नाहीं. (इ) समितीची नेमणूक लौकरच होईल. (ल) व (म) समिति प्रत्यक्ष कामास लागेल त्या वेळीं जरूर पडल्यास कोल्हापूर व इतर ठिकाणांहून माहिती आणवून व फॅक्टरी ॲक्ट व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन् ॲक्ट व त्याखालील नियम विचारांत घेऊन समिती शिफारस करेल.

ना. म. ह. गोडबोले:—४-९ वर्षे ह्मणजे ४ कां ९? अगर ४ व ९ मिळून?

ना. ह. ब. कुलकर्णी:—पांच वर्षे झालीं असतील.

ना. सौ. इंदिराबाई साठ्ये:—पंधरा दिवस आगाऊ नोटीस देऊनमुद्दां नक्की माहिती कळतां येत नाहीं कां?

ना. ह. ब. कुलकर्णी:—सांगतां येईल. १९३८ चे अधिवेशनांत सदर ॲक्ट्स् पास झाले आहेत.

ना. स. ग. फडके:—We are entitled to have a definite reply.

ना. के. गो. कुलकर्णी:—समिती नेमण्याचा विचार किती दिवस चालू आहे?

ना. ह. ब. कुलकर्णी—चारपांच महिने झाले असतील.

ना. के. गो. कुलकर्णी:—मजुरांनीं आपला प्रतिनिधी नेमला आहे ना?

ना. ह. ब. कुलकर्णी—मजुरांनीं निवडला आहे, परंतु मालकांकडून कांहीं माहिती मागविली आहे; ती आल्यावर विचार होईल. गिरणीमालकांचें म्हणणें असें आहे कीं, आपल्या तर्फे दोन प्रतिनिधी नेमावेत. ह्याचा विचार झाला म्हणजे मग काय तें ठरेल.

ना. के. गो. कुलकर्णी:—हे कायदे लागू न करतां इतके दिवस पडून राहिले व आता समिती नेमण्याची भाषा ऐकूं येते आहे. तेव्हां ह्या कायद्यांना go back देण्याकरितांच ही समिती नेमण्यांत येणार आहे काय?

ना. ह. ब. कुलकर्णी:—नाहीं; तसें नाहीं. हल्लीं देखील ह्या कायद्यांतील तत्वाप्रमाणें अम्मल होतोच.

ना. के. गो. कुलकर्णी:—काम करीत असतांना अपघातानें एखाद्या मजुरास दुखापत झाली तर व कॉ. ॲक्टप्रमाणें त्यास relief दिला जातो काय?

ना. ह. ब. कुलकर्णी:—जातो व आतांपर्यंत एकदोन केसीसमध्ये compensation दि दिलें आहे.

ना. आ. आ. मुळे:—हे दोन्ही कायदे व त्याखालील नियम ब्रिटिश इंडियात लागू आहेत; तेव्हां तेच ह्या संस्थानांतहि लागू करण्यास काय हरकत आहे?

ना. ह. ब. कुलकर्णी:—facts सांगितल्या आहेत; हरकतीचा प्रश्न मताचा आहे.

ना. आ. आ. मुळे:—ही समिती किती लोकांची नेमली जाणार आहे.

ना. ह. ब. कुलकर्णी:—तीन; १ सरकारतर्फे १ गिरणीमालकांतर्फे व १ मजुरांतर्फे.

ना. म. ह. गोडबोले:—तीघांचीच समिती नेमवयाची असें नक्की ठरलें आहे काय?

ना. ह. ब. कुलकर्णी:—होय; सध्यां तसेंच ठविलेलें आहे.

ना. के. गो. कुलकर्णीः—ह्या समितीवर ह्या असेंब्लीचा voice असूं नये असें सरकारांस वाटतें काय ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—वाटण्याचा प्रश्न नाहीं ब्रिटिश मुलखांत जशीं Labour Commissions नेमिलीं जातात त्याचप्रमाणें येथेंहि व्यवस्था होईल. तथापि असेंब्लीतर्फे या बाबतींत मागणी झाल्यास विचार होईल.

ना. स. ग. फडकेः—असेंब्लीपुढें हा प्रश्न विचारला असल्यानें सरकारपुढेंच हा प्रश्न आहे असें समजावें.

ना. सौ. इंदिराबाई साठ्येः—जी समिति नेमली जाणार आहे ती मजुरांना दया दाखविण्याकरितां कीं निव्वळ कायदा करण्याकरितां ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—दयेचा प्रश्न नाहीं ह्या कायद्याखालीं सरकारला हुकूम करतां यावेत ह्मणून ही कमिटी नेमून नियम वगैरे व्हावयाचे आहेत.

ना. स. ग. फडकेः—संप वगैरे होण्याच्या भीतीच्या दृष्टीनें हे कायदे लागू करण्यास हीच वेळ योग्य आहे असें सरकारांस वाटत नाहीं काय ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—धान्याचा प्रश्न सध्यां प्रामुख्यानें सरकारपुढें असल्यानें इतर कामांकडे पाहण्यास सरकारला वेळ मिळेनासा झाला आहे.

ना. स. ग. फडकेः—पगार देणेंघेणें बंद नाहीं ना ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—रोजचे नित्याचे व्यवहार बंद नाहींत.

ना. स. ग. फडकेः—मग हाहि तितकाच नित्याचा ( Routine ) प्रश्न नाहीं काय ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—तितकासा नाहीं.

ना. प्रेसिडेंटः—प्रश्नाचीं उत्तरें देणेंत आलीं आहेत व त्यांवरून नामदारांना facts समजल्याच आहेत.

ना. द. मा. कुलकर्णीः—कोल्हापूर संस्थानांत याबाबत नियम असल्याचें सांगली दरबारांस माहित नाहीं काय ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—माहिती आणविली नाहीं.

ना. म. ह. गोडबोलेः—कायदा लागू करण्याच्या विचारावर ह्मणून आजवर पांच वर्षे गेलीं व आतां समिति नेमण्याच्या विचारावर ह्मणून, गिरणीमालकांच्या हिताच्या दृष्टीनें विलंब करण्याची योजना तर नाहीं ना ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—नाहीं.

प्रश्न नं.–९ धान्यपुरवठ्याकरितां उपक्रम

ना. म. ह. गोडबोले:—(अ) सांगली संस्थानांत धान्य पुरवठा करण्याकरितां सांगली संस्थाननें आतांपर्यंत काय उपक्रम केले ? (ब) किती रक्कम या कामास मंजूर केली ? (क) किती रकमेचा उपयोग ( धान्यादि खाद्य पदार्थांच्या खरेदीस ) केला ? (ड) कोठें कोठें ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—(अ) तालुका निहाय व सांगली येथें रिलीफ शॉप्स उघडलीं खेडोपाडीं जरूर तेथें दुकानें उघडणेंत आलीं; त्याचप्रमाणें डिपार्मेंट ऑफ सप्लाय म्हणून एक खातें नवीन निर्माण करणेंत आलें असून त्या खात्यातर्फे सांगलीस व तालुका निहाय स्टोअर्स उघडले असून स्टोअर्समार्फत धान्याची खरेदी विक्री करून लोकांच्या गरजा भागविणेचें काम चालू आहे; त्याचप्रमाणें संस्थानांतून व बाहेरून धान्याचा पुरवठा मिळविणेचें काम चालू आहे.

| | | |
|---|---|---|
| मिरजप्रांत:– | ३६ | दुकानें |
| कुची:– | २९ | ” |
| शहापूर:– | ३ | ” |
| शिरहट्टी:– | ५ | ” |

६९

(ब) स्टेट स्टोअर्सकरितां सहालाख. आणखी ४ लाखपर्यंत वाढवावे लागतील. सांगली रिलीफ शॉप करीतां ९००००, तालुका रिलीफ शॉप्सकरितां २००००, खेड्यांतील दुकानाकरितां प्रत्येक दुकानास ग्रामोद्धार निधीतून जास्तीत जास्त रु. ५०० शे रु. मदत म्हणून देणेंकरितां वट्ट रु. २९००० मंजूर करणेंत आलेले आहेत. त्याचप्रमाणें ज्या गावांत को. सोसायटी आहेत त्याकरितां ‘ अ ’ वर्गातील सोसायटीस रु. ५००, ‘ ब ’ वर्गाचे सोसायटीस रु. ४०० व ‘ क ’ वर्गातील सोसायटीस ३०० रु देणेचे को. बँकेनें मंजूर केले असून तेथील प्रसिद्धी ता. १३-१०-४२ रोजीं बँकेनें सर्क्युलर काढून केली आहे. ( क ) सांगली रिलीफ शॉपनें २९०००, व तालुका रिलीफ शाप्सनें मंजूर केलेली सर्व रक्कम घेतली आहे. सेंट्रल व तालुका स्टोअर्स करितां ६ लाखपर्यंत रक्कम जरूरीप्रमाणें बँकेतून घेतली जाते व परत केली जाते. ( ड ) संस्थानांत व संस्थानाबाहेर मिळेल त्या ठिकाणांहून म्हणजे हुबगांव, सावनूर, ग्वाल्हेर वगैरे ठिकाणांहून म्हणजे धान्य खरेदी केलें आहे.

ना. वा. ध. पाचवरे:—ह्या रकमेवर व्याज घेतलें जातें काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—स्टेट स्टोअरला दिलेल्या रकमेवर व्याज नाहीं. ती रक्कम सरकारकडून बिनव्याजी देणेंत आलेली आहे. को ऑपरेटिव्ह बँकेमार्फत ज्या रकमा देणेंत आलेल्या आहेत त्यावर व्याज आहे.

ना. म. फ. डबाली—शिरहट्टीस कांहीं व्यवस्था केली आहे काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी—अशी परिस्थिति तेथें मुळींच नाहीं. मी नुकताच तिकडे जाऊन आलो आहे. तेथें युद्धजन्य परिस्थितीची व तज्जन्य होणाऱ्या धान्यटंचाईची कल्पनासुद्धा नाहीं.

ना. स. ग. फडके—संस्थानच्या अधिकाऱ्यांची सरबराई व्यवस्थित होते त्यावरून आपण ह्मणतां काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी—प्रत्यक्ष माहिती घेऊन मी हा खुलासा केला आहे.

ना. के. गो कुलकर्णी:—तो प्रदेश अगदीं बाजूस असमुळें तेथें वर्तमान पत्रें जात नसावींत व म्हणून युद्धाची माहिती तिकडे नसेल !

ना. ह. ब. कुलकर्णी:—युद्धजन्य परिस्थितीचे इकडे भोगावे लागत असलेले परिणाम तिकडे नाहींत एवढाच माझ्या ह्मणण्याचा उद्देश आहे.

ना. रा ग. करंदीकर—खेड्यापाड्यांनासुद्धां तिकडे धान्य आहे काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी—होय.

ना. शा. गो. अनगोळकर—शहापुरास जोंधळ्याचीं पोतीं किती पाठविलीं ?

ना. ह. ब. कुलकर्णी—तेथें मुख्य अडचण रॉकेल व साखऱ्या यांची आहे व त्या दृष्टीनें व्यवस्था केली आहे.

ना. आ. आ. मुळे:—धान्य किती मिळालें म्हणजे भरपूर असें समजावयाचें ?

ना. ह. ब. कुलकर्णी—मूळ प्रश्नांतून हा उपप्रश्न उद्भवत नाहीं; नोटिस पाहिजे.

ना. आ. आ. मुळे:—दरबारतर्फे पुरवठ्याची कांहीं तरी योजना आंखणेत आली असेलच कीं नाहीं ?

ना. ह. ब. कुलकर्णी—दरबारजवळ ज्या मानानें स्टॉक असेल त्या मानानें पुरवठा

प्रश्न नं. ६— सांगली बँकेकडे सरकारी तिजोरींचें काम

ना. म. ह. गोडबोले—६ (अ) सांगली बँकेची इमारत पुरी होऊन अनेक वर्षें झालीं ना ? (ब) किती वर्षें झालीं ? (क) सांगली बँकेकडे संस्थानच्या तिजोरीचें काम सोंपविण्याचा विचार दरबार किती वर्षें करीत आहे?

ना. ह. ब. कुलकर्णी:—(अ) व (ब) सहा वर्षें झालीं. (क) दोन वर्षें चालू आहे.

ना. म. ह. गोडबोले:—असेंब्ली रिपोर्टसवरून पाहिलें तर १९२८ पासून हा प्रश्न विचारांत आहे असें दिसून येईल.

ना. ह. ब. कुलकर्णी:—असेल, परंतु बँकेची इमारत पुरी झाली म्हणजे विचार करूं असें त्यावेळीं उत्तर दिलें होतें.

ना. म. ह. गोडबोले:—१९३६ साली इमारत पुरी झाली असून आतांपर्यंत विचार झाला नाहीं कां ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—इम्पीरिअल् व रिझर्व्ह बँकेकडून तेथील गव्हर्मेंटचे व्यवहार कोणत्या अटीवर पत्करले आहेत, ही माहिती आणविणेची आहे. बँकेकडून लिहून आल्यानंतर विचार होईल.

ना. स. ग. फडके:—पुढील अधिवेशनापर्यंत तरी याचा विचार होईल काय ?

ना. रा. ब. मा. ह. लिमये:—शक्य तितक्या लौकर विचार होईल. सांगली बँकेकडे सरकारी तिजोरीचें काम सोंपविणें व ती रिझर्व्ह बँकेशीं संलग्न करणें त्या गोष्टींचा विचार सरकार शक्यतितक्या तांतडीनें करील असें मी दरबारतर्फे अश्वासन देतो.

**प्र. नं. ७—** सांगली बँक ही रिझर्व्हबँकेशीं शेडयूल्ड बँक करणें.

ना. म. ह. गोडबोले:-(अ) सांगलीं बँकेकडून उद्योगधंद्यास कांहीं नियमबद्ध प्रमाणांत भांडवलाचा पुरवठा व्हावा अशी सूचना कर्वे-गाडगीळ समितीनें केली आहे काय ? (ब) ह्या सूचनेप्रमाणें भांडवल पुरवठा होणेचे दृष्टीनें सांगली बँक ही रिझर्व बँकेची एक शेडयूल्ड बँक होणेची आवश्यकता नाहीं काय ? (क) सांगली बँक ही शिडयूल्ड बँक होण्याचे दृष्टीनें सांगली संस्थान काय उपक्रम वा प्रयत्न करीत आहे ? (ड) त्याकरितां जरूर तें आणखी एक लाख रुपये भांडवल बँकेंत गुंतविणेस सरकार तयार नाहीं काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—(अ) होय. अहवालांतील पान ३६० वर समितीच्या सूचना आहेत. (ब) आहे. (क) भांडवल वाढविण्याचा विचार दरबारच्या सल्यानें बँकेनें करणेचा आहे व त्याप्रमाणें बँक करीत आहे. (ड) बँकेकडून definite proposals आलीं ह्मणजे त्याजबद्दल सरकार विचार करील.

ना. रा. ब. मा. ह. लिमये:—मागच्या प्रश्नाच्यावेळीं मी याजबद्दलहि आश्वासन दिलेंच आहे.

ना. म. ह. गोडबोले:—बँकेवर सर्वस्वी सरकारचा ताबा असल्यानें या बाबतींत दरबार-कडूनच initiative घेतली जाईल काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—बँकेच्या बोर्डांत सरकारखेरीज इतर तीन सभासद आहेत त्यांच्याकडून याबाबतींत सूचना आल्यास बँकेस विचार करण्यास सोईचें होईल.

**प्र. नं. ८—** धर्मादाय रकमेचा विनियोग.

ना. म. ह. गोडबोले:—(अ) सांगली पेठेंत माल खरेदीविक्रीस धर्मादाय ह्मणून कांहीं पैसे घेतले जातात काय ? (ब) त्याचा विनियोग कशाकरितां केला जातो ? (क)

धर्मादाय म्हणोन घेतलेल्या पैशाचा उपयोग कसा केला जातो यावर सरकारचें लक्ष व देखरेख आहे काय ? (ड) ह्या धर्मादाय पैशाचा दुरुपयोग होत नाहीं काय ? (इ) निदान होण्याचा संभव नाहीं काय ? (फ) शेतकरी वगैरे सर्व रयतेकडून (धर्मादाय नांवाखालीं) घेतले जाणाऱ्या या पैशाचा उपयोग शेतकरी वगैरे रयतांच्या शिक्षणादि कामास, सरकारचे नियंत्रणाखाली होणें योग्य व न्याय्य नाहीं काय ?

ना. ह. ब. कुलकर्णीः–[अ] होय (ब) व (क) धर्मादाय दिलाच पाहिजे असा सरकारचा नियम नाहीं सबब तो देणारे व घेणारे यांच्या दरम्यानचा प्रश्न असल्यानें याजवर सरकारनें निर्बंध ठेवलेला नाहीं. (ड) याचा सरकारनें कांहीं विचार केला नाहीं. (इ) हा मताचा प्रश्न आहे. एकादे वेळीं होईल एकादे वेळीं होणार नाहीं. (फ) धर्मादाय देणारा शेतकीवर्ग व ट्रस्टी म्हणून सदर रकमेचा विनियोग करणारा व्यापारीवर्ग यांच्यामधील हा प्रश्न असल्यानें व धर्मादाय देण्याबद्दल जोपर्यंत सरकारचा नियम नाहीं तोपर्यंत विनियोगावर सरकारच्या नियंत्रणाचा प्रश्न उद्भवत नाहीं.

ना. रा. ग. करंदीकरः—धर्मादाय घेण्याची प्रथा आहे हें तरी सरकारांस माहित आहे ना ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—होय, आहे.

ना. वि. म करंदीकरः—अेकाद्यानें "देत नाहीं" असें म्हटलें तर चालेल काय ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—हा मताचा प्रश्न आहे.

ना. म ह. गोडबोलेः—आतां तरी सरकार त्या गोष्टीकडे लक्ष देईल काय ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—तसा कांहीं तंटा वगैरे सरकारपुढें आल्यास त्याचा विचार होईल.

ना. म. ह. गोडबोलेः—धर्मादाय घेण्याच्या प्रॅक्टिसबद्दल माझा प्रश्न आहे; व्यक्तिविषयक नाहीं.

ना. ह. ब. कुलकर्णीः—सरकारपुढें सध्यां हा प्रश्नच नाहीं.

ना. म. ह. गोडबोलेः —हा 'धर्मादाय' देण्याचें बंधन गिऱ्हाइकांवर नाहीं असें तरी सरकार प्रसिद्ध करील काय ?

ना. ह. ब, कुलकर्णीः—लोकांकडून तशी मागणी आल्यास विचार होईल.

ना. म. ह. गोडबोलेः—We are part & parcel of the public. तेव्हां हें Public चेंच मागणें आहे असें समजलें जाईल काय ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—ह्या सर्व व्यवहारावर चेंबर ऑफ कॉमर्सचा कंट्रोल असतो, त्या संस्थेकडून मागणी झाल्यास व्यवस्था होईल.

ना. स. ग. फडके:—असा धर्मादाय कर घेतला जात असेल तर त्यावर सरकारचा कंट्रोल असणें जरूर नाहीं काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—अेकाद्या व्यक्तीचा प्रश्न असेल तर त्याला योग्य कोर्टामार्फत दाद मागतां येईल येईल. सार्वजनिक प्रश्न याद्दष्टीनें पेठेतील सर्व व्यवहारांवर नियंत्रण करणारी व्यापाऱ्यांची संस्था जी चेंबर ऑफ कॉमर्स आहे ती हें पाहूं शकेल.

*    *    *    *    *

ना. प्रेसिडेंट:—ह्या सभागृहाचे अेक लोकनियुक्त सभासद ना. दादाभाई कच्छी यांनीं आपणांस चालू अधिवेशनास उपस्थित राहतां येत नसलेबद्दल इकडे तारेनें व पत्रद्वारें कळविलें आहे. ती तार मी वाचून दाखवितो. (वाचलें) " Detained at Upleta. No berth. can't attend". असेंब्लीसंबंधी नियम १२३ (१) मध्यें याबद्दल तरतूद केलेली आहे. त्याप्रमाणें त्यांस रजा द्यावी.

## ना. के. गो. कुलकर्णी, हनगंडी.

प्रश्न नंबर १— साखऱ्याचा दर

ना. के. गो. कुलकर्णी:—(अ) उगार शुगर वर्क्सकडून काय दरानें साखऱ्या विकत घेण्याचें दरबारनें ठरविलें आहे ? (ब) तो काय दरानें विक्री करण्याचें ठरविलें आहे. ?

ना. एन्. एम्. जोशी:—( अ ) २२४ पौंडास बारदानासह ४१८८— ex-factory (ब) घाऊक ४६–२–३. किरकोळ—मूळशिवा शेरास ८७. जादा व पुरवणी शिवा शे. ८८

ना. के. गो. कुलअर्णी:—यांतील difference कोण घेणार आहे ?

ना. एन्. एम् जोशी:—तो सरकारचेच हातीं येईल.

ना. म. ह. गोडबोले:—यापासुन फायदा काढण्याचें सरकारनें ठरविलें आहे काय ?

ना. एन्. एम्. जोशी:—एकाच बाबीवरून नफा तोटा काढतां येणार नाहीं; इतर वस्तूंवरीलही नफातोटा विचारांत घ्यावा लागेल. सरकारांस साखऱ्यावर नफा होत असला तरी इतर कांहीं धान्यांवर होणारा तोटाहि सोसावा लागणार आहे.

ना. के. गो. कुलकर्णी:—असा तोटा कशांत सोसला आहे काय ?

ना. एन् एम्. जोशी:—होय; ग्वाल्हेरहून आणविलेल्या जोंधळ्यांत सरकारला असा तोटा सोसावा लागला आहे. १८ रुपयांस आणविलेलें पोतें येथें १९ रुपयास विकावें लागलें.

ना. स.ग. फडके:—ज्यामध्यें पीठ आहे तोच जोंधळा ना ?

ना. एन्. एम्. जोशी:—होय.

प्र. नं. २— फलटणचा साखऱ्या

ना. के. गो. कुलकर्णी:—(अ) फलटणहून काय दरानें व किती पोतीं साखऱ्या दरबारनें विकत घेतला ? (ब) तो साखऱ्या काय दरानें संस्थानमध्यें विकला ? (क) खर्च किती झाला व नफा काय राहिला ?

ना. एन्. एम. जोशी:—(अ) डिसेंबर १९४२ अखेर ३२-११-१०॥ ex-factory. जानेवारी १९४३ पासून ३९-१-७॥ जानेवारी अखेर एकूण पोतीं ९२०० (ब) ता. २४–१–४३ पर्यंत, ता. २९–१०–४२ च्या जादा गॅझीटमध्यें नमूद केलेल्या दरानें. ता. ८–२–४३ पर्यंत, ता. २५-१-४३ व २८-१-४३ च्या जादा गॅझीटमध्यें नमूद केले दरानें. ता. ९-२-४३ पासून ता. ९-२-४३ च्या जादा गॅझीटमध्यें नमूद केले दरानें. (क) पत्रव्यवहार चालू असून हिशेब अपुरे असल्यामुळें नक्की आंकडे सांगता येत नाहींत; नफ्याबद्दल सांगतां येत नाहीं.

ना. के. गो. कुलकर्णी:—हा जो विक्रीचा दर ठरविला गेला तो आजूबाजूचे दर विचारांत घेऊनच ठरविला गेला ना ?

ना. एन्. एम्. जोशी:—होय. आजूबाजूचे दर व येथील स्थानिक परिस्थिती हें पाहूनच दर ठरविले आहेत.

ना. के. गो. कुलकर्णी:—अशी कोणती प्ररिस्थिती त्यावेळीं होती ?

ना. एन्. एम्. जोशी:—Notice पाहिजे.

ना. के. गो. कुलकर्णी:—दराबद्दल फेरविचार पुन्हां केव्हां होणार आहे काय ?

ना. एन्. एम्. जोशी:—परिस्थितींत बदल पडल्यानंतर.

ना. स. ग. फडके:—यांतील difference हल्लीं ट्रेझरींत ठेवणेंत आला आहे काय ?

ना. एन्. एम्. जोशी:— होय.

ना. आ. आ मुळे:—साखरविक्रींत होणारा नफा व धान्यविक्रींत होणार तोटा यांचे आंकडे गॅझीटमध्यें प्रसिद्ध केले जातील काय ?

ना. एन्. एम्. जोशी:— होय.

ना. प्रेसिडेंट:—या बाबतींतील धोरणाबाबत ऊहापोह उदईक होणारच आहे.

ना. के. गो. कुलकर्णी:—नफा काय राहिला हें तरी सांगतां येईल कां ?

ना. एन्. एम्. जोशी:—वेगवेगळ्या व्यवहारांचा वेगवेगळा नफा काढलेला नाहीं. नफा अगर तोटा हा सर्व बाबींवर मिळूनच ठरणार आहे.

प्र नं. ३— तालुकानिहाय साखरपुरवठा

ना. के. गो. कुलकर्णी:—(अ) तालुकानिहाय मासिक साखऱ्याची बर्ची किती आहे ? (ब) कोणत्या तालुक्यांत किती साखऱ्या पुरविला गेला ?

ना. एन्. एम्. जोशी:—(अ) प्रश्न मोघम आहे. (ब) जानेवारीअखेर मिरजप्रांत २००, कुची ३००, मंगळवेढें ४००, तेरदळ २२०, शहापूर ८००, शिरहट्टी ६००.

ना. आ. आ. मुळे:—दरमाणसीं किती quota ठरविला आहे ?

ना. एन्. एम्. जोशी:—आमच्याजवळ असलेल्या सांठ्यावरून प्रत्येक तालुक्यांत किती साखऱ्या पुरवतां येईल हें व याजबद्दलचा quota आम्ही ठरविला आहे. त्याप्रमाणें Urban ½ शेर व Rural ¼ शेर असा quota ठरविला आहे ?

ना. के. गो. कुलकर्णी:—लोकसंख्येच्या आधारावर हा quota ठरविला आहे कां हातीं असलेल्या सांठ्यावरून ठरविला आहे ?

ना. एन्. एम्. जोशी:—दोन्हींवरून.

ना. के. गो. कुलकर्णी:—हें कोणी ठरविलें ?

ना. एन्. एम्. जोशी:—सरकारच्या सप्लाय डिपार्टमेंटनें ?

ना. आ. आ. मुळे:—म्हणजे आपणच ना ?

ना. एन्. एम्. जोशी:—नाहीं; आणखीही दुसरे अधिकारी आहेत.

प्र. नं. ४—जीवनोपयोगी वस्तूंचा साठा व पुरवठा याबाबतींत स्थानिक पुढाऱ्यांचे सहकार्य

४ (अ) जीवनोपयोगी वस्तूंचा सांठा करण्याच्या व त्याच्या विभागणीच्या बाबतींत व्यापाऱ्यांचें व स्थानिक पुढाऱ्यांचें सहकार्य मिळविलें होतें काय ? (ब) नसल्यास कां नाहीं (क) असल्यास तें पुरेसें होतें असें वाटतें काय ? (ड) सहकार्य मिळविण्याचे बाबतींत दरबारतर्फे कांहीं उपक्रम करणेंत आला काय ?

ना. ह. ब कुलकर्णी:—(अ) होय (ब) प्रश्न उद्भवत नाहीं. (क) होय; तथापि हा मताचा प्रश्न आहे. (ड) होय.

ना. स. ग. फडके:—असेंब्ली, लोकलबोर्ड, ग्रामपंचायत अशांसारख्या पैकीं एखादा तरी प्रतिनिधि ह्या बोर्डावर घेतला होता काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—ज्यांच्या जास्ती उपयोग होण्यासारखा होता त्यांना घेतलें होते.

ना. के. गो. कुलकर्णी:—निदान कंझूमर्सचा तरी एखादा प्रतिनिधी ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—जे विकतात ते कंझूमर्सही असतातच.

ना. के. गो. कुलकर्णी:—म्हणजे व्यापारी व कंझूमर्स दोघेहि होते असेंच ना ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—होय. A consumer at home and a suppl er in the market.

ना. प्रेसिडेंट:—उद्यां ठरावाचे वेळीं याबाबत सविस्तर चर्चा होणारच आहे व त्यावेळीं बराचसा खुलासाहि होईल.

---

यानंतर हिज-हायनेस श्रीमंत राजेसाहेब स्वारींचें आगमन झालें. सभागृहाच्या दरवाजांत श्रीमंतांना गार्ड ऑफ ऑनरची सलामी झाली व मे. प्रेसिडेंटसाहेब, लीडर ऑफ दि हाऊस, लॉ मेंबर, मिनिस्टर, डिस्ट्रिक्ट जज, व पोलीस सुपरिंटेंडंट, हिज-हायनेस यांचे ए. डी. सी. व असेंब्ली सेक्रेटरी यांनी श्रीमंतांचें स्वागत केलें व स्वारी सभागृहांत आली. असेंब्लीच्या सर्व नामदार सभासदांनीं व जमलेल्या प्रेक्षकांनीं स्वारींना आदरानें उत्थापन दिलें. त्याचा यथोचित स्वीकार करून स्वारी स्थानापन्न झाली व श्रीमंतांनीं खालीलप्रमाणें आपलें भाषण वाचून दाखविलें.

## हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब सांगली हुजूर स्वारींचें भाषण.

सांगली संस्थान विधिमंडळाचे सन्मान्य अध्यक्ष व सभासदहो, चालू सालीं आपल्या विधिमंडळाची बैठक आपण विशेष निमित्तानें दुसऱ्यांदा भरवीत आहों. अशा प्रसंगीं आपलें स्वागत करण्यास आम्हांस फार आनंद वाटत आहे.

प्रथमारंभीं आपल्या मंडळाचे नवे अध्यक्ष श्रीयुत शंकर बाळाजी ढवळे यांचें मनःपूर्वक स्वागत करणें अवश्य आहे. आपले जुने अध्यक्ष श्रीयुत बीरेंद्रनाथ डे प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें विश्रांति घेण्याकरितां स्वगृहीं गेले आणि त्यांच्या जागीं त्यांच्याच तोलाचा दुसरा एखादा गृहस्थ निवडून काढण्याची जबाबदारी आमचेवर पडली. पण ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाहीं.

देशकाल वर्तमान नक्की ओळखणाऱ्या आणि बहुजन-समाजाच्या आदरास हटकून पात्र होणाऱ्या एखाद्या सद्गृहस्थाच्या शोधांत आम्ही असतांना श्रीयुत ढवळे आम्हांस लाभले आणि त्यांनीं आमच्या पाचारणामस उदारमनानें मान दिला, हें जितकें आमच्या भाग्याचें तितकेंच त्यांच्या सौजन्याचें द्योतक आहे. त्यांच्या सौजन्याला त्यांच्या स्वार्थत्यागानें विशेषच शोभा आली आहे. पस्तीस वर्षांहून अधिक काळपर्यंत नोकरी केल्यानंतर विश्रांती घेण्याचा त्यांचा हक्क होता आणि तो त्यांना सहज बजावताही आला असता; पण हें सर्व बाजूस टेऊन आणि आमच्या हांकेला मान देऊन ते आमच्या साहाय्यास आले आहेत. विशेष कौतुकास्पद गोष्ट म्हणजे आमच्यापेक्षांही

आर्थिक दृष्ट्या अधिक विलोभनीय अशी निमंत्रणें त्यांना दुसरीकडे आलीं होतीं आणि आर्थिक बाब क्षणभर गौण मानली तरी, त्यांच्या कर्तबगारीला अधिक विस्तृत क्षेत्र मिळण्याच्या दृष्टीनें तरी अशीं निमंत्रणें आकर्षक वाटण्याजोगीं होतींच यांत संशय नाहीं; पण तीं सर्व निमंत्रणें बाजूस टेवून त्यांनीं आपल्या कर्तृत्वाचा लाभ आह्मांस करून देण्याचें ठरविलें. आणि वैयक्तिक स्वास्थ्य आणि स्वार्थ या दोहोंवरही उघड उघड पाणी सोडलें; हा केवळ आमचा भाग्ययोग होय; व त्याची उपपत्ती ॥ व्यतिषजति पदार्थानान्तरःकोऽपि हेतुः ॥ या भवभूतीच्या न्यायावांचून अन्य तऱ्हेनें आह्मांस तरी लावतां येत नाहीं. त्यांची गतकालीन कामगिरी अगदीं संक्षेपानें सांगावयाची झाली तरी इतकें सांगणें भाग आहे कीं, Indian Civil Service चे एक घटक या नात्यानें District officer ह्मणून, आणि सेक्रेटरीएटमध्यें त्यांनीं वेगवेगळ्या अधिकारांवर उत्कृष्ट काम केलें आहे. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा अमलांत आल्यानंतर फिनान्स खात्यांत काम करण्याची आणि बिहार विधिमंडळाच्या योजनेंत व घटनेंत भाग घेण्याची त्यांना संधी मिळाली आहे. इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधील एकाद्या घटकाला आपल्या देशामध्यें न्याय खात्यांतील मोठ्यांत मोठी जेवढी अधिकाराची जागा मिळणें शक्य आहे, ती त्यांना मिळाली होती आणि पाटणा हायकोर्टाचे एक न्यायाधीश या नात्यानें आपली जबाबदारी उत्तम रीतीनें पार पाडून त्यांनीं सर्वतोमुखीं धन्यवाद मिळविले आहेत. यावरून इंडियन सिव्हिल सर्व्हिसला त्यांच्यामुळें भूषण आलें आहे हें वेगळें सांगावयास नको. आतां त्यांच्या कर्तृत्वाचा आह्मांस जो लाभ होणार आहे त्यामध्यें ज्ञान आणि अनुभव यानीं परिपक्व झालेल्या गुणसमुच्चयाचीं गोड फळें आपणांस चाखावयास मिळणार आहेत. आणखी एक विशेष गोष्ट ह्मणजे, हिंदी संस्थानांविषयीं त्यांना एक प्रकारचें ममत्व, सहानुभूति, आणि आदर वाटतो आणि या आपुलकीच्या धाग्यांतून आपल्यासारख्या मर्यादित उत्पन्नाचीं संस्थानें सुद्धां वगळलीं जात नाहींत हें त्याहूनही विशेष होय. आमच्या विधानाला वेगळ्या पुराव्याचें कारण नाहीं; त्यांचें येथें आगमन हीच त्याची साक्ष होय. अर्थात अशा सद्गृहस्थाविषयीं आह्मांस वाटणारा आदर, कौतुक आणि कृतज्ञता सार्वजनिकरीत्या व्यक्त करण्याची संधी आह्मांस मिळाली या गोष्टीचा आह्मास मोठा आनंद वाटतो.

सभ्य स्त्रीपुरुषहो, एकाच वर्षांत विधिमंडळाची दुसरी बैठक होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. ही जादा बैठक भरविण्याचें कारण आपण जाणतच आहां आणि तें म्हणजे चालू सालच्या प्रारंभीं खर्चाची जी तरतूद करण्यांत आली होती तिजपेक्षां फार मोठा खर्च करण्याचा प्रसंग केवळ आजच्या अननुभूत विकट परिस्थितीमुळें आपणांवर आला आहे, हें होय. अर्थात् अशा अवघड प्रसंगीं आपल्या बहुमोल विचार-विनिमयाचा लाभ वेगें दरबारास इष्ट वाटलें यांत

नवल नाही. आपल्या राज्यघटनेची उत्क्रांती करण्यांत आपण सहभागी आहोत आणि त्या उत्क्रांतीचें अधिष्ठान जनता आहे. या उत्क्रांतीच्या कामीं भाग घेण्यासाठीं जनतेपासून आम्हांस प्रेरकनिष्ठा मिळाली आहे आणि आपणां कुशल कार्यकर्त्यांना सेवेचा संदेश मिळाला आहे. अर्थात अशा आमच्या जनतेविषयी आम्हांस मोठा अभिमान वाटतो हेंही या प्रसंगी नमूद करणें आम्हांस इष्ट वाटतें. आणि पूर्वीप्रमाणेंच आपण यापुढेंही राज्य-घटनेंत होणाऱ्या प्रगतीचा उपयोग जनतेची परिस्थिती अधिकाधिक सुधारणेकरितां आणि संस्थानचा नांवलौकिक उज्वल वाढविण्याकरितां कराल असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे.

सभ्यस्त्रीपुरुषहो, सन १९१४ ते १९१८ चे दरम्यान् एक महायुद्ध होऊन गेलेलें आपणांस आठवत असेल. त्या युद्धालाही "जागतिक महायुद्ध" अशी संज्ञा मिळालेली होती. पण जागतिक महायुद्ध या शद्बांचा अर्थ सगळ्या जगाला होरपळून काढणारें युद्ध असा जर करावयाचा असेल तर तो आजच्या महायुद्धाला अक्षरशः लागू पडत आहे. सुधारलेल्या जगाचा आज प्रायः असा एकही भाग नाहीं कीं ज्याला या युद्धाची झळ लागली नाहीं. आजपर्यंत हें युद्ध ह्मणजे नुसती मानवी संहाराची एक खाईच नसून तिला गुलामगिरीच्या चिरंतन अरिष्टाचें अत्यंत अनिष्ट स्वरूप आलें होतें. पण ईश्वरकृपेनें या अरिष्टाला आतां इष्ट स्वरूप मिळण्याची चिन्हें दिसूं लागलीं आहेत. एकीकडे जर्मन सैन्याच्या मोडलेल्या संरक्षक फळीला रशियन सैन्याचे उत्तरोत्तर प्रखर तडाखे बसत आहेत, तर दुसरीकडे इजिप्त, सायरेनेका, लिबिया आणि ट्रिपोलिटानिया यांतून शत्रूचें समूळ उच्चाटण झालें आहे आणि ऑफ्रिकेतील वाळवंटांत हालचाली करणारें दोस्तराष्ट्रांचें सैन्य रोमेलला पुढें पुढें हुसकून लावीत चाललें आहे. विशेषतः ही दुसरी घटना अत्यंत प्रभावी व आशाजनक तर आहेच; पण ती निर्णायकही ठरो, अशी आपण ईश्वराजवळ प्रार्थना करूं या. अजूनही कदाचित् संकटाचे, निराशेचे आणि कदाचित् क्वचित् क्षणैक पिछेहाटीचेसुद्धां प्रसंग येतील, तथापि ब्रिटीश साम्राज्य आणि त्याचीं सहकारी दोस्त राष्ट्रें शत्रूनें बिनशर्त आणि सपशेल शरणांगती पतकरल्याविना थांबावयाचें नाहीं या निश्चित उद्देशानें लढत आहेत. विद्यमान लक्षणांवरून भविष्यकाळ आपणांस अनुकूल असा कौल देईल अशी श्रद्धा ठेवून वाट पहाण्यास हरकत नाहीं. मानव जातीस भेडसावणाऱ्या प्रलयापासून तिचा बचाव करण्याच्या कामीं योग्य तो भाग घेण्याची हिंदुस्थानाला ही बहुमोल संधी मिळाली आहे. हिंदुस्थानांतील लढवय्या सैनिकांनीं जो अजस्र भार उचलला आहे, त्यांत संस्थानांतील आपले बांधवहि सामील जाहले आहेत. त्यांनीं वेगवेगळ्या रणक्षेत्रांमध्यें यथोचित भाग-मग तो कितीही लहान असो-घेतला आहे आणि इतर कार्यक्षेत्रांतही आपले युद्ध-प्रयत्न यथाक्रम प्रगति करीत आहेत, हें येथें नमूद करणेंस आम्हांस आनंद होतो.

सन्मान्य स्त्री-पुरुषहो, इतिहासाची पुनरावृत्ती होत असते असें म्हणतात आणि ग्रामसंरक्षणाच्या बाबतींत तरी या ह्मणण्याचें प्रत्यंतर आपणांस निर्विवाद आलें आहे. पूर्वीच्या ग्रामसंस्थेतील गुणदोषांचें वर्णन तपशिलानें करण्याचा हा समय नाहीं, तथापि एवढें मात्र खरें कीं, जुन्या ग्रामसंस्थेंत अत्यंत आणीबाणीच्या वेळींसुद्धां स्वतःचें संरक्षण करण्याचा एक मोठा गूण होता. आणि तो अत्यंत मोलवान् होता हें आजच्या परिस्थितीनें पुन: एकवार सिद्ध केलें आहे. अलीकडे चोऱ्या, लूटमार व सशस्त्र दरोडेसारख्या भयंकर गुन्ह्यांचें प्रमाण पूर्वी कधीं नव्हतें इतकें बेसुमार वाढलेमुळें जनतेची सुरक्षितता व स्वास्थ्य यांस मोठा धोका उत्पन्न झाला आहे. अशा प्रसंगीं खेड्यापाड्यांतील लोकांचे संरक्षणाची कांहीं तरी तजवीज करणें अवश्य असलेमुळें प्रत्येक गांवीं १०-५ याप्रमाणें इसम नेमून ग्रामसरक्षक दलाचे स्थापनेस दरबारनें प्रारंभ केला असून त्याचा निम्मा खर्च त्या त्या गांवानें व निम्मा दरबारनें सोसावा अशी योजना केली आहे. लोकांना तिची उपयुक्तता पटून ते जसजसे तींत अधिकाधिक भाग घेतील तसतशी ती वाढत्या प्रमाणांत कार्यक्षम होईलच; तरीदेखील हल्लीं वाढलेल्या गुन्ह्यांचें तपासाचे कामाकरितां व सर्वसाधारण संरक्षण व बंदोबस्ताकरितां पोलिसांचे संख्येंत ७३ असामींची वाढ करावी लागलेआहे व तीहि संख्या अपुरी पडूं लागलेमुळें अंदाजपत्रक तयार केलेनंतरही पुन्हां आणखी जादा २९ इसमांची वाढकरणेची तरतूद करणें भाग झालें आहे.

यामुळें आणि वस्तूंच्या किंमती बेसुमार वाढल्यामुळें सालाच्या आरंभीं अंदाज-पत्रकांत खर्चाची जितकी तरतूद केली होती, तिजपेक्षां एक लक्ष पंचाहत्तर हजार रुपयांहूनही अधिक जादा खर्चाचें ओझें सोसण्याचा प्रसंग आपणांवर आला आहे. त्यांतच आणखी एका अडचणीची भर पडणार आहे, आणि ती ह्मणजे वेगवेगळ्या तालुक्यांतून चालू सालचा जमीन महसूल कसा वसूल करावयाचा हा बिकट प्रश्न होय. अर्थमंत्र्यांच्या भाषणांत काय येणार आहे याचा अंदाज बांधण्याचा प्रयत्न न करतां आह्मांस असें ह्मणावेसें वाटतें कीं मोठे आर्थिक बिकट प्रश्न सोडविण्याची जबाबदारी आपणांवर पडणार आहे. आह्मांस हें माहीत आहे कीं कुचीं तलावाचें अपुरेंकाम पुरें व्हावें अशी आपली तीव्र इच्छा आपण प्रकट करीत आहांत, परंतु दुर्दैवानें खाद्यधान्यांच्या पुरवठ्याचा प्रश्न इतका जिव्हाळ्याचा होऊन बसला आहे आणि त्याला इतकें प्रचंड सद्यःकालीन महत्व उत्पन्न झालें आहे कीं त्यापुढें इतर सर्व गोष्टी तात्पुरत्या बाजूस टेवणें प्राप्त झालें आहे. अशा परिस्थितींत खाद्य पदार्थांच्या एकाच प्रश्नावर आपणां सर्वांचें लक्ष केंद्रीभूत झालें असल्यामुळें तलावाचें काम सरकारला तूर्त हातीं घेणें शक्य नाहीं, हें आपल्या सहज लक्षांत येणार आहे. मात्र कुची तलावासारखीं कामें कायमचीं दृष्टीआड केलीं गेलीं असें आपण मुळींच समजूं नये.

यावेळीं सर्वांत जवळच्या युद्धक्षेत्रापासून आपण हजारो मैल अंतरावर आहोंत. पण ही वस्तुस्थिती असूनसुद्धां देशांतील इतर भागांप्रमाणेंच आपल्या संस्थानांतील नागरिक जनतेवर या युद्धामुळें थोडथोडक्या आपत्ती ओढवल्या आहेत असें नाहीं! संस्थानांत धान्याची चणचण उत्पन्न झाली आहे आणि तिजमुळें उपासमारीचें संकट आ पसरून पुढें उभें राहीलें आहे या गोष्टीची आपणांस सर्वांस मोठी चिंता लागून राहिली आहे. जीविताला आवश्यक असणाऱ्या वस्तूंचा संग्रह कमी झाला आहे; येवढेंच नव्हे तर वाहतुकीचीं साधनेंही दुर्मिळ झालीं आहेत. आणि त्यामुळें पदार्थांच्या किंमती झपाट्यानें वाढून जनतेच्या दैन्याची आणि सोशिकतेची सीमा झाली आहे. विशेष दुःखाची गोष्ट ही कीं अशा आणीबाणीच्या वेळींच आपणांस सर्व बाजूंनीं वेढून राहिलेल्या मुंबई इलाख्यांत इतर कोणत्याही इलाख्यापेक्षां अधिक प्रमाणांत पर्ज्यन्याच्या कमतरतेमुळें नापीक झालेनें धान्याची टंचाई भासत आहे. या भयंकर संकटांत आशेचा एक किरण दिसतो आहे आणि तो म्हणजे ज्या ठिकाणीं गरजेहून धान्याचा अधिक संग्रह आहे तेथून तो पैदा करून त्याचा पुरवठा दुर्भिक्षानें पीडिलेल्या भागाला करण्याची योजना मध्यवर्ती सरकारनें चालविली आहे हा होय; आम्हीही या दिशेनें आपल्याकडून परमावधीचे प्रयत्न चालविले आहेत. आम्हीही एक जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा करणारें खातें निर्माण केलें असून त्यांच्या पुरवठ्याकरितां एक डायरेक्टर, एक डेप्युटी डायरेक्टर, व संग्रहाकरितां एक डायरेक्टर आणि जादा अवलकारकून असे लोक नेमले आहेत. आणि त्यांनीं जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा व विभागणी करून द्यावी अशी योजना केली आहे. आम्हीं राजधानींत आणि तालुक्याच्या मुख्य गांवांतून खाद्यधान्याचे संग्रह केले आहेत आणि वेगवेगळ्या गांवीं मुख्य मुख्य खाद्यांची धान्यें मूळ किंमतीला गोरगरिबांस विकत घेण्याकरितां म्हणून दुकानेंही उघडलीं आहेत. आम्हीं साखर नियंत्रणाची योजना तयार करून चालू केली आहे. आणि त्याचप्रमाणें सांगली आणि सांगलीवाडीकरितां ज्वारी आणि इतर धान्यें यांचा नियंत्रित पुरवठा करण्याची योजना तयार करून तीही चालू करण्यांत आली आहे. या प्रसंगानें हिज् एक्झॉल्टेड हायनेस निजामसाहेब, हिजहायनेस महाराजाशिंदे, हर हायनेस दि छत्रपती महाराणीसाहेब कोल्हापूर, श्रीमंत राजासाहेब मिरज ज्युनियर आणि मेजर नवाब अबदुल मजीदखान दिलेरजंग बहादूर नवाबसाहेब सावनूर यांनीं कित्येक खाद्य-धान्यांचा आणि साखरेचा पुरवठा त्यांच्या संस्थानांतून आम्हांस करून देण्यांत जें औदार्य व बंधुभाव दाखविला त्याबद्दल त्यांच्याविषयीं आम्हांस वाटत असलेली कृतज्ञता व्यक्त केल्यावाचून आमच्यानें रहावत नाहीं. आमच्या संस्थानांतील ज्या क्षेत्रांत धान्यांचा संग्रह गरजेहून अधिक आहे तेथें तो विकत घेण्याविषयीं आमचे प्रयत्न चालले आहेत; पण इतकें करूनसुद्धां आपल्या हाल अपेष्टा संपल्या आहेत असें नाहीं.

ज्यांच्यापाशी खाद्य धान्यांचा संग्रह गरजेहून अधिक आहे त्यांनीं तो आपल्या दुर्भिक्ष-पीडित बांधवांपासुन छपवून ठेवण्याचें किंवा आपल्या संग्रहाचा योग्य मोबदला आपणांस परत मिळणार नाहीं अशी भीति बाळगण्याचें कांहीं एक कारण नाहीं. आम्हांस पूर्ण आशा आहे कीं मध्यवर्ती हिंदुस्थान सरकार प्रस्तुत जी योजना बनवीत आहे आणि जी हिंदुस्थानांत सार्वत्रिक लागूं होणार आहे ती शक्य तितक्या व्यापारी धोरणाला अनुसरूनच बनविली जाईल आणि तिच्या आधारानें गरजेहून अधिक धान्यसंग्रह बाळगणाऱ्या क्षेत्रांनीं आपण होऊन पीडित क्षेत्रांना त्याचा पुरवठा करावा आणि उपासमारीचें निवारण करावें हें सर्वथैव उचित होय. अशाप्रकारचे परोपकारमूलक विचार आपल्यांपैकीं कित्येकांच्या मनांत आधीच उत्पन्न झाले आहेत हें पाहून आम्हांस फार समाधान वाटतें. आपण लोकांचे प्रतिनिधी .अतएव त्यांच्या विश्वासास पात्र असल्यामुळें आपल्या वजनाचा उपयोग करून त्यांना अवास्तव धान्यसंग्रहाच्या कल्पनेपासून परावृत्त कराल आणि गरजेहून अधिक असलेलें धान्य गरजू व उपासमारीनें पीडिलेल्या लोकांच्या उपयोगाकरितां देण्याची प्रवृत्ती त्यांच्यामध्यें उत्पन्न कराल असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे.

आणि तरीसुद्धां उपरोक्त सर्व उपायांहून प्रस्तुतच्या आणीबाणीच्या काळांत आपणांस खरोखर तारक होणारा खात्रीचा एकमेव उपाय ह्मणजे सहानुभूती, सदिच्छा, सहकार्य यांची देवाण घेवाण हाच होय. सरकारनियुक्त अधिकारीवर्गाला कांहीं गोष्टी करतां येवोत अगर न येवोत तथापि आह्मी इतकें निश्चित सांगूं शकतो कीं जनतेपैकीं प्रत्येक घटकांत बंधुभाव, शेजारधर्म आणि स्वार्थत्याग यांची भावना जोंवर उत्पन्न होऊन कृतींत उतरली नाहीं तोंवर अन्य कोणत्याही उपायानें आपल्या जनतेच्या हालअपेष्टा कमी होणें शक्य नाहीं. ही भावना उत्पन्न झाल्याविना कोणत्याही अधिकाऱ्यांच्या कामागिरीला पुरेसें यश येणें शक्य नाहीं.

आम्हांस असें दिसून आलें आहे कीं दिवाणसाहेब यांना आपलीं नेहमीचीं जबाबदारीचीं निरनिराळीं कामें असलेमुळें डायरेक्टर ऑफ् सिव्हिल सप्लाईज ह्मणून पडणाऱ्या कामाच्या बोजांत त्यांना मदत पाहिजे आणि म्हणून या कामीं त्यांचेशीं सहकार्य करून त्यांना मदत करणेस लोकनियुक्त मंत्री यांनीं मान्यता दिली आहे व या योजनेस अनुसरून या उभयतांचें एक संयुक्त नियामक मंडळ ( Joint Directorate ) बनवून त्याचें काम संयुक्त जबाबदारीनें होणेचें ठरविणेंत आलें आहे. ही गोष्टसुद्धां वरील तत्वाची सूचक आहे. उपासमारीचें संकट डोळे वटारून पुढें उभें राहिलें असतां प्रत्येक व्यक्तीनें, प्रत्येक कुटुंबानें, किंबहुना प्रत्येक खेड्यानें या संकटाच्या तावडीतून निसटण्याचा उपाय आपल्या जरूरीपुरता किंवा सोयीपुरता पहावा हें स्वाभाविक आहे. पण अशा वेळींच आपणांसारख्या, लोकमताला वळण देणाऱ्या,

पुढाऱ्यांवर फार मोठी जबाबदारी येऊन पडते. बिनसरकारी सभासद आपल्या हृदयांतील तीव्र वेदना शब्दांनी उघड करून सांगतील तितक्या कदाचित् सरकारी सभासद बोलून दाखविणार नाहींत. तरीसुद्धां त्यांना हें समजून येईलच कीं जनतेच्या दुःखनिवारणाच्या कामीं सरकारी सभासदसुद्धां बेपर्वा अगर उदासीन असत नाहींत.. या प्रसंगीं आम्हीं आपणांस अत्यंत कळकळीनें असें सुचवितो कीं, आपण जनसमुदायांत मिसळावें आणि त्यांना स्वतःच्या व्यक्तिपुरताच नव्हे, कुटुंबापुरताही नव्हे, गांवापुरताही नव्हे, तालुक्यापुरतासुद्धां नव्हे, पण साऱ्या संस्थानापुरतां एकत्रित विचार करण्यास सांगावें. आपला प्रदेश मंगळवेढ्यापासून शिरहट्टीपर्यंत जागजागीं विस्कटलेला असेल; पण अत्यंत निकटच्या परंपरांनीं, ऐक्याच्या बंधनांनीं आणि हितसंबंधाच्या साधर्म्यानें, आपणांस दोन शतकें शिकवण देऊन पूर्णपणें निगडित केलें आहे आणि प्रस्तुतच्या संकटांत एकमेकांच्या हालअपेष्टांत सहभागी होऊन आणि शक्य त्या हलक्या करून हे संबंध एकजीव करण्याची पूर्वी कधीं आली नव्हती अशी संधी आज आपणांस लाभली आहे. दूरदूरच्या शेतांतून येऊन एका झेंड्याखालीं जमावें, वाटेतल्या हाल-अपेष्टा सहन कराव्या, इकडून तिकडून गोळा केलेलीं कणसें हातांवर चोळून खावीं, प्रसंगीं तहानभूक मारावी, पण ॥ मराठा तितुका मेळवावा ॥ या समर्थांच्या वचनानुसार आपल्या जमातीचा पूर्ण अभिमान धरून अटकेपर्यंत झेंडे नाचवावेत ही आपल्या महाराष्ट्राची ऐतिहासिक उज्वल परंपरा प्रसिद्ध आहे. अशा आपणां महाराष्ट्रीयांना जागच्या जागीं राहून दारुण हालअपेष्टांशीं झगडणें ही कांहीं विशेष अवघड अशी बाब नाहीं. याकरितां आम्हांस अशी बळकट आशा आहे कीं आपण सर्वांनीं, जवळच्या चतकोर भाकरीतला नितकोर आपल्या उपाशी बांधवाला देऊन सर्वांनीं जगावयाचें या एकाच तत्वानें प्रेरित होऊन आपणांस प्राप्त परिस्थितींत चालवयाचें आहे, या धोरणानें वागल्यास आपणांपुढचा आजचा निकडीचा प्रश्न तर सुटेलच पण आपणांमध्यें अत्यंत दृढ रीतीनें निगडित झालेल्या ऐक्याचा असा एक भक्कम पाया घातला जाईल कीं त्याच्या बळावर पुढें मागें येणारा कोणताही दुर्धर अगर खडतर प्रश्न आपण सहज सोडवूं शकूं, कारण परस्पर सदिच्छा, सहकारिता, आणि शेजारधर्म यांच्या एकत्रित सामर्थ्यापुढें टिकाव धरू शकेल असा कोणचाही प्रसंग जगांत नाहीं.

आपणांस ठाऊकच आहे कीं हल्लीचे कडाडलेले बाजारभाव लक्षांत घेऊन आम्हीं कांहीं दिवसांपूर्वी मासिक ३० रु. आणि त्याहून कमी पगाराच्या नोकरवर्गास दरमहा तीन रुपये महागाईभत्ता देण्याचें ठरविलें आहे. याहून अधिक वेतनाच्या कारकूनवर्गास कोणत्या रीतीनें साहाय्य करावें या विषयीं आमचा विचार चालला होता, आणि आज आम्हीं मोठ्या आनंदानें असें जाहीर करीत आहों कीं, ३० ते ६० रुपये मासिक वेतन घेणाऱ्या कारकूनवर्गास तोच महागाईभत्ता देण्याचें आम्ही योजिलें आहे.

आतां आमचें धोरण आपल्या लक्षांत पूर्णपणें आलें असेल आणि त्यावरून विद्यमान आपत्तीचें निरसन करण्याचा प्रयत्न करण्यांत आह्मी आमच्याकडून लवमात्र कसूर केली नाहीं; आमच्या धोरणांशीं पूर्णपणें संवादी होण्याजोगें धोरण आपणहि ठेवाल आणि तदनुसार आपल्या विचारविनिमयांतून निष्पन्न होणाऱ्या आपल्या सूचना दरबारास उपयुक्त अशाच येतील अशी आह्मांस आशा आणि उमेद आहे इतकें सांगून आणि सभ्य स्त्री-पुरुषहो, आपली बैठक यशस्वी होवो अशी सदिच्छा प्रकट करून, आह्मी आपला निरोप घेतो.

---

याप्रमाणें श्रीमंत स्वारींचें भाषण झाल्यानंतर स्वारी सभागृहांतून परत गेली. परत जातांना वर नमूद केलेले अधिकारी सभागृहाच्या दरवाजापर्यंत श्रीमंत स्वारींना पोंचवून परत स्थानापन्न झाले.

---

## सन १३५२ फसलीचें पुरवणी अंदाजपत्रक

ना. वि. का. खाडिलकर:—सन्मान्य अध्यक्ष महाराज, सन १३५२ फसलीचें पुरवणी अंदाजपत्रक मी नामदार सभासदांपुढें ठेवीत आहे.

सन १३५२ फसली साल अद्याप संपलेलें नाहीं व या सालासाठीं केलेल्या जमाखर्चाच्या अंदाजाचें निश्चित स्वरूप अद्याप समजून आलेलें नाहीं. अशा स्थितींत हें खर्चाचें पुरवणी अंदाजपत्रक नामदार सभासदांच्यापुढें मांडण्यांत येत आहे याचें कारण अगदीं उघड आहे. गेल्या तीनचार महिन्यांत जीवनास आवश्यक उपयोगी वस्तूंच्या किंमती वाढलेल्या आहेत व त्या वस्तू नेहमीप्रमाणें मिळणेंहि कठीण जाहलें आहे. तसेंच सर्व देशभर अस्वस्थतेचें वातावरण पसरलेलें असून गुन्हेगारीचें प्रमाण फारच वाढलेलें आहे. यामुळें चालू सालीं मूळ अंदाजपत्रक सभासदांच्यापुढें चर्चेस आलें असतांना जी परिस्थिति होती त्यामध्यें इतका फेरबदल झाला आहे कीं खर्चामध्यें मोठी वाढ करणेची तीव्रतेनें जरूरी भासूं लागली. हा वाढता खर्च (शक्य तेथें खात्याची कार्यक्षमता बिघडूं न देतां) भागवावा असें मनांत आणिलें तरी तो भागविणें अधिकाधिक कठीण अगर अशक्य दिसूं लागलें व नवीन उत्पन्न जाहलेली खर्च भागविणेची जिकीरीची स्थिती नामदार सभासदांच्या पुढें मांडणें अत्यंत आवश्यक जाहल्यानें व प्रजेच्या प्रतिनिधी वर्गाकडून अशा तऱ्हेची इच्छा प्रदर्शित केली गेल्यामुळें हें अधिवेशन वर्षाच्या मध्येंच भरवावें लागलें. अशा या अधिवेशनांत चालू सालांतील बहुतेक खर्चाचे संकल्प अपुऱ्या स्थितींत असल्यानें ज्याला आपण रिव्हाइज्ड अगर दुरुस्त अंदाजपत्रक ह्मणतो त्या त्याचा खर्डा सालअखेरी

जसा मांडता येईल तसा तो मांडता येणार नाहीं. जमेंत अगर खर्चांत फेरबदल कसे होतील हे अर्थातच या निव्वळ खर्चाच्या पुरवणी अंदाजपत्रकांत नामदार सभासदांना पहावयास मिळणार नाहींत. नामदार सभासदांच्या हातीं असलेल्या निव्वळ खर्चाच्या पुरवणी अंदाजपत्रांत ज्या बाबी नमूद आहेत त्यांत युद्धजन्य व महागाईच्या परिस्थितींत-ज्यामध्यें वाढ करणें अगर नव्यानें ज्या दाखल करणें अत्यंत जरूरीचें व तांतडीचें झालें अशाच बाबींचा मुख्यत्वेंकरून समावेश झालेला आहे. महागाईच्या अशा बाबी एकंदर अठरा असून त्यांची रक्कम २९९४६ आहे. सर्व हिंदुस्थान देशाप्रमाणें आपल्या संस्थानांतहि जें अशांततेचें व गुन्हेगारीचें वातावरण पसरलें आहे त्याच्या प्रतिबंधासाठीं व बंदोबस्तासाठीं जे जे उपाय लागलीचच्या लागलीच अमलांत आणणें भाग पडले अशा बाबी एकंदर सहा असून त्यांवर ९४५४९ इतकी रक्कम खर्च पडणारी आहे. या दोन प्रकारांखेरीज मूळ अंदाजपत्रकीं ज्याबद्दल तरतूद करणें नजरचुकीनें राहून गेलें अगर त्यावेळीं ती परिस्थिती अस्तित्वांत नसल्यामुळें ज्याबद्दल पैशाची तरतूद खर्चाकडे करणें शक्य नव्हतें अशाहि बाबींचा समावेश या पुरवणी अंदाजपत्रकांत केलेला आहे. अशा बाबी एकंदर २९ असून त्यासाठीं ३३९८४ इतकी रक्कम या पुरवणी अंदाजपत्रकांत दाखल झाली आहे. या तिसऱ्या प्रकारांत यापेक्षां दाखल होण्यासारख्या अशा आणखी कांहीं खर्चाच्या बाबी शिल्लक राहिलेल्या आहेत; पण त्यांचा विचार सालअखेरीस नामदार सभासदांच्यापुढें येणाऱ्या अंदाजपत्रकांत केलातरी चालेल असें वाटल्यावरून त्यांचा येथें अंतर्भाव केलेला नाहीं. या वर सांगितलेल्या तीन्ही प्रकारांच्या शेवटीं दाखविली १९८०७९ ची एकुणांत बांधलेली आहे. महागाईच्या बाबी पुरवणी अंदाजपत्रकांत खालीं नमूद केलेल्या खात्यांत दाखल आहेत. ९–संस्थान बंगलेवाडे (ड) बगीचा खर्च ३९० रु. ७–धार्मिकबाबी (३) अन्नछत्रें ८९९रु., ८–पागा (क)१ गवतकडबा ३४७८ (क) २ चंदी १९१२९ रु. ९–शेट्टी व कुरणें (ड) २ चंदीखेरीज ४७७ रु., १९–छापखाना (क) १ किरकोळ ७९ रु., १६–स्टेशनरीखातें (ड) १ निरनिराळ्या कचेऱ्यांची स्टेशनरी ९२६ रु. (ड) २ छापखान्यासाठीं कागद २६०० रु., १९ तुरुंग (१) सांगली सेंट्रल जेल (इ) ८ मागकारखाना कच्चा माल ५०० रु., (२) तालुके तुरुंग (अ) १ कैदी पोटगी ९६९ रु. २६—(ब) सांगली दवाखाना औषधें १००० रु. व रोग्यांसाठीं अन्न २९० रु. (क) तालुकेचे दवाखाने औषधें १००० रु. (ड) सूतिकागृह औषधें २०० रु., २७–(ब) ब ३ पब्लिकहेल्थ ब्लिसरिनेटेड लिंफ ७९ रु., २९–(इ) १ पशुवैद्यक औषधें २०० रु., ३२–(क) पब्लिकवर्क्स इमारती–नवीन कामें ३९३ रु. याप्रमाणें महागाईच्या बाबी दाखल केल्या आहेत. बाजारभाव कडाडल्यामुळें ह्या वर निर्दिष्ट केलेल्या खात्यांत धान्यादि जिनसा

मूळ अंदाजपत्रकांत नमूद केलेल्या रकमेंत खरेदी करणें शक्य न झालेमुळेंच ही खर्चांत वाढ झालेली आहे व याचा अनुभव प्रत्येकास रोजच्यारोज येत असल्यानें त्याबद्दल खुलासेवार विवेचन करून सभेचा वेळ घेणें बरोबर होणार नाहीं. म्हणून ह्यास महागाईच्या लहानसान बाबींसंबंधानें विस्तृत खुलासा करण्याची जरुरी दिसत नाहीं. फक्त नोकरवर्गांना महागाईबद्दल म्हणून जो भत्ता देण्यांत आला आहे त्याची रक्कम २९६६० रु. धरलेली आहे. यांत तीस रुपयापर्यंतच्या १८४९ नोकरांना दरमहा तीन रुपयेप्रमाणें व ३० ते ५० रुपये पगारापर्यंतच्या १११ लोकांना आणि ५० ते ६० पर्यंतच्या ९६ लोकांनाहि भत्ता देण्याचें हुजुर हुकमांत नमूद असल्यामुळें अंदाजी रक्कम दाखल केली आहे. श्रीमंत सरकार स्वारींच्या भाषणांत आंताच जाहीर झालेल्या महागाईभत्याच्या दरमहा वाढीला अनुसरून या रकमेंत थोडाबहुत फरक होण्याचा संभव आहे हें सांगावयास नकोच. आतां युद्धजन्य परिस्थिती व कांहीं तालुक्यांतील दुष्काळाचें स्वरूप यामुळें उत्पन्न झालेले दंगेधोपे व गुन्हेगारीचे इतर प्रकार यासंबंधानें ज्या तांतडीच्या उपययोजना आंखाव्या लागल्या त्यासंबंधानें थोडेसें तपशीलवार विवेचन करणें जरूर आहे. खातें नंबर ११ कायदा व न्याय याखालील ६ - दिवाणी दप्तरखांना यापैकीं (क) ७ किरकोळ यासाठीं नमूद असलेले ५५० रुपये बाहेरचे सिव्हिल रेकॉर्ड सुरक्षिततेच्या दृष्टीनें वाड्याच्या आवारांत आणलें त्यासाठीं आहेत. तसेंच प. वर्क्स (क) नवीन कामें यासाठीं २२२६० रु. ची रक्कम दाखल केली आहे. त्यापैकीं २१०० वर आतांच सांगितलेलें सिव्हिल रेकॉर्ड वाड्याच्या आवारांतील म्यूझियमचे इमारतींत सुव्यवस्थित रीतीनें ठेवणें व रुपये १०९६ मदरमध्यें सातवी शिडी तयार करून वर माळा वगैरे करणें यासाठीं मिळून एकंदर ३१९६ च्या खर्चाची तरतूद करावी लागली आहे; व हल्लींच्या वातावरणांत ती आवश्यक आहे. वरील २२२६० पैकीं राहिलेली रक्कम प. व. कामगाऱ्यांच्या यादींत नमूद केले कामगाऱ्यावर खर्च होणारी आहे. पोलिसखात्यामध्यें एकंदर तीस पोलिस लोकांची कायमची वाढ झालेली आहे. यासाठीं एकंदर रक्कम ८९८७ तपशिलांत दाखविलेप्रमाणें खर्च होणारी आहे. याखेरीज अधिक बंदोबस्ताची योजना अंतःस्वास्थ्यासाठीं करणें भाग पडल्यानें सालअखेरपर्यंत ४३ पोलिसची संख्या सुद्धा महिन्यांपर्यंत तात्पुरती वाढविण्यांत आलेली आहे. त्यासाठीं रक्कम रुपये ९९४२ दाखल केली आहे. यांतील तपशिलावरून खुलासा सहज ध्यानीं येईल. तसेंच र.सा.पोलिस सुपरिंटेंडंट यांना नेहमीच्या फिरतीखेरीज अचानकपणें व अनपेक्षितरीत्या बंदोबस्तासाठीं कोठें, केव्हां व कसें तांतडीनें जावें लागेल याचा नेम नसल्यानें अशा वेळीं वहानावर होणारा खर्च करावा लागतो; त्यासाठीं दरमहा ५० रुपयेप्रमाणें मूळ भत्त्यापेक्षां जादा मोटार अलाउन्स म्हणून मंजूर झालेला आहे. इतर पोलिसफोर्ससाठींहि अशाच तऱ्हेचा जादा खर्च

करावा लागणार असल्यानें त्यासंबंधीच्या सर्व बाबी ४४ (अ) १ खालीं नमूद करणेंत आलेल्या आहेत. ४४ (अ) खालील चवथी बाब ही, खेड्यांतील लोकांची मालमत्ता व जीवन अचानक पडणाऱ्या दरोड्यापासून सुरक्षित ठेवणेंसाठीं आहे. खेड्यांतील ह्या संरक्षण योजनेंत स्वयंस्फूर्तीनें आत्मसंरक्षणाची मोफत कामगिरी करणारे व पगारी अशा दोन प्रकारच्या लोकांची मंडळी शक्यतितकी प्रत्येक खेड्यांत स्थापन करण्याचा संकल्प असून या पगारी नेमल्या गेलेल्या अगर नेमल्या जाणाऱ्या लोकांच्या पगाराची निम्मी रक्कम लोकांनीं देणेची असून निम्मी रक्कम सरकारांतून मिळणेची आहे व या हिशोबानें १२५०० इतकी रक्कम दाखल झालेली आहे. बाकीचा हत्यारें वगैरेबद्दलचा खर्च तपशिलांत नमूद केल्याप्रमाणें ह्या खेड्यांतील संरक्षण योजनेवर सरकारांतून होणेचा असल्यानें तो तसा दाखल केला आहे. शहापूर हायस्कूलमध्यें एक स्वतंत्र गार्ड टेवणें जरूर पडल्यानें ५० रुपयांची ही बाब अगदीं जुजबी असली तरी माहितीसाठीं दाखल केली आहे. पब्लिक वर्क्सच्या यादीमध्यें ट्रेझरींत तळघर करणें व निरनिराळ्या शाखांच्या इमारतींत बंदोबस्तांच्या दृष्टीनें प्रतिबंधक उपाय म्हणून खिडक्या, दारें वगैरे दुरुस्त करणें व अधिक बळकट करणें अशा कामगाऱ्यांचा उल्लेख आहे. त्याबद्दलचा खुलासाहि कामगाऱ्यांच्या नामनिर्देशावरून सहज होणार आहे. या वरील वाढीच्या रकमेशिवाय आणखी काहीं महत्वाच्या वाढीच्या रकमा खालीं नमूद केल्या आहेत. शिक्षणखात्यांत मुलांच्या मध्यमवर्गाच्या शाळा याखालील मास्तरपगार या रकमेंत १३७ रुपयांची वाढ दाखविली आहे. सदर वाढ मंगळवेढें येथें ४ इयत्ता सुरू केली गेल्यानें दाखविली आहे. सांगली येथील प्रताप मॉडेल हायस्कूलची ग्रँट ९०० रुपयांनीं वाढविली असल्यानें "स्थानिक शाळांना मदत" यासाठीं रक्कम वाढविणेंत आलेली आहे. त्याचप्रमाणें ७ कानडी शिक्षक ब्रिटिशमध्यें ट्रेनिंगसाठीं पाठविले आहेत. यासाठीं त्यांच्या अलाउन्सची रक्कम रुपये ४०० "मुलांच्या प्राथमिक शाळा" या खालीं पोटसदर १० ट्रेनिंगकॉलेजमध्यें पाठविणेंत येणाऱ्या इसमास अलाउन्स या सदरीं वाढवून दाखल करणेंत आली आहे. ३२ प. व. खात्यांत पोटसदर "ए" सरकारी इमारतीत वीजपुरवठा याखालीं दरसाल २१०० रुपयेपर्यंतच्या नित्याचा खर्च करावा लागतो. तो मूळ १३५२ च्या बजेटीं दाखल करणेचा राहिला, तो आतां दाखल करणेंत आला आहे. ३६ पेन्शन व तैनात याखालीं चालू प्रत्यक्ष खर्चाच्या सरासरीवरून ९००० रुपयेची वाढ दाखविणेंत आली आहे. ह्या सर्व तपशीलवार खर्चाच्या बाबी लक्षांत घेतां एकंदर जो १९८०७९ जादा खर्चाचा अंदाज केला आहे तो सालअखेरपर्यंत पुरेसा होईलच असें नाहीं. निदान प्रत्यक्ष खर्च या रकमेच्या खालीं बिल्कूल जाणार नाहीं असें आजच्या परिस्थितीवरून मानण्यास हरकत नाहीं. सर्व्हिस हेड्सच्या ह्या बाबींखेरीज कॅपिटल-हेड्सखालीं नव्यानें करावा

लागणाऱ्या तरतुदीहि नामदार सभासदांच्या नजरेस आणणें जरूर आहे. यांतील प्रमुख बाबी ह्मणजे पुरवठाखातें व धान्यसंग्रहखातें या होत. धान्याची महर्गता व टंचाई यामुळें संस्थानांत अगर संस्थानाबाहेर जेथें मिळेल तेथें धान्य खरेदी करून व त्याचे सांगलीचे राजधानींत व इतर तालुक्याच्या मुख्य गांवीं सांठे करून ठेवणें, व त्यांतून संस्थानच्या निरनिराळ्या भागांत उघडल्या जाणाऱ्या स्वस्तधान्यविक्रीच्या केंद्रांतून तें विक्रीसाठीं पुरविणें ही ह्या नव्या खात्यांची स्थूलमानानें कामें आहेत, व तीं सुव्यवस्थित रीतीनें व्हावींत ह्मणून पुरवठाखात्यावर मे. दिवाणसाहेब यांची डिरेक्टर ह्मणून व त्यांचे नजरेखालीं काम करणेंसाठीं कोऑपरेटिव्ह खात्याचे रजिस्ट्रार यांची डेप्युटी डिरेक्टर - उपचालक - ह्मणून नेमणूक करण्यांत आलेली आहे. संग्रहखात्यावर मि. एन्. एम्. जोशी ह्यांना मुख्य अधिकारी नेमलें आहे. याखेरीज इतर नोकर, त्यांचा भत्ता व इतर खर्च याचें एक अंदाजपत्रक तयार केलेलें असून त्याची छाननीहि फिनॅन्स कमिटीचे बैठकींत झालेली आहे.

या धान्याच्या पुरवठ्यासाठीं लागणारें भांडवल अेक लाख प्रथमतः काम चालू करण्याचे दृष्टीनें तिजोरींतून पुरविलें गेलें, पण दिवसेंदिवस धान्याची टंचाई अधिकाधिक वाढत गेल्यानें खरेदीसाठीं भांडवल मोठ्या प्रमाणावर गुंतविणें जरूर भासल्यानें त्यासाठीं सांगली बँकेतून पांच लाख रुपयांची रक्कम दरसाल दरशेंकडा ३॥ टक्के व्याजानें कर्जाऊ घेण्याचें ठरलें. मिळून सहा लक्ष रुपयांचे एकंदर भांडवल धान्यखरेदी व पुरवठा यासाठीं गुंतवावें लागलें. या दोहों खात्यांत नोकरपगार, भत्ता व इतर खर्च यांवर होणारा खर्च अंदाजानें ३१०९३ धरलेला आहे. अशा तऱ्हेच्या खर्चाचा हा उपक्रम अगदीं नवीन असल्यानें व प्रत्यहीं परिस्थितींत व ह्या खात्यांच्या गरजांत फरक पडणार असल्यानें हा अंदाज कमजास्त होणें अगदीं सहाजीक आहे काहीं झालें तरी खर्चाच्या रकमेइतकीच जमा यावी व बुडितखर्च शक्य तितका करावा लागूं नये असें सर्वसाधारण धोरण आजमितीस आंखलेलें आहे. या व्यापारी पद्धतीनें चालविल्या जाणाऱ्या (पण नफा मिळविण्याच्या दृष्टीनें मुळींच नव्हे अशा) ह्या खात्यासंबंधीचा खुलासा पुरा करणेंपूर्वी एक गोष्ट नामदार सभासदांच्यापुढें आणणें क्रमप्राप्त आहे. आतांच सांगितल्याप्रमाणें संग्रहखात्याचें मुख्य ह्मणून ज्या गृहस्थांची नेमणूक झाली त्यांना डिव्हेलपमेंट ऑफिसर ह्मणून नेमणूक झाली होती. कर्वे कमिटीचा जो रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झालेला आहे त्यामध्यें अशा नेमणुकीबद्दलचा खुलासा केला असोन हें डिव्हेलपमेंटचें काम करणाऱ्या अधिकाऱ्याची लायखी कशा तऱ्हेची पाहिजे हें त्या रिपोर्टावरूनच स्पष्ट होणारें आहे. या कामास असणारे अधिकारी मिळणें ही एक मोठी अडचणीची गोष्ट होती; पण कर्वे-कमिटीचा रिपोर्ट तयार करणेच्या कामी ज्या गृहस्थांची बहुमोल मदत झाली त्यांनी हें काम पत्करण्याचें कबूल केल्यामुळें डिव्हेलपमेंट ऑफिसरच्या

नेमणुकीचा कठीण प्रश्न आपोआपच सुटला व संस्थानच्या नोकरीत मि. एन्. एम्. जोशी यांचा प्रवेश झाला. मि. जोशी यांची ह्या डिव्हेलपमेंटच्या कामासाठीं ह्मणून नेमणूक झाली तरी डिव्हेलपमेंटचें काम तूर्त बंद ठेवण्याचा विचार करावा लागला व त्या रिपोर्टासंबंधानें आपलें मत अद्याप व्यक्त व्हावयाचें त्याहे. धान्यसंग्रह वगैरेसारख्या गोष्टींची अधिक तीव्रतेनें जरूर भासूं लागल्यामुळें बाजारपेठेची व बाजारांतील भावांची माहिती असलेल्या अर्थशास्त्रज्ञाच्या नेमणुकीची आवश्यकता दिसूं लागली. यामुळें डिव्हेलपमेंटचें प्रिलिमिनरी काम थांबवून मि. जोशी यांची नेमणूक संग्रहखात्याकडे सहाजिकपणें केली गेली व या कारणानें त्यांना मिळणारा दरमहाचा पगार, त्यांच्या हाताखालील नोकरवर्ग, त्यांच्या भत्ता वगैरे बाबींवरचा खर्च २९९६ चा बोजा सर्व्हिसहेड्वर न ठेवतां पुरवठा व संग्रहखात्यांवर कॅपिटल् हेडखालीं टाकला गेला आहे. अेकप्रकारें बजेटमध्यें ही बचतच आहे, हें नामदार सभासदांच्या सहज ध्यानीं येईल. ह्या दोन खात्यासंबंधाच्या तपशीलाच्या कांहीं प्रती सभासदांच्या माहितीसाठीं पुरवण्यांत येतील व एक प्रत असेंब्लीच्या टेबलावरहि ठेवण्यांत आलेली आहे. त्यावरून या दोन खात्यांतील बाबींचा तपशील समजून येणार आहे. आतां, या जादा खर्चाच्या नवीन तरतुदीमुळें उद्भवणाऱ्या एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे नामदार सभासदांचें मी लक्ष वेधूं इच्छितो. चालू सालच्या मूळ बजेटमध्यें पान १२ वर प्रारंभींच "३६ - उत्पन्नांतील तुटीसाठीं घेतलेलें हंगामी कर्ज" ह्मणून ८२०३० रुपयांची रक्कम जमेकडे दाखल केलेली आहे व ही जमा धरल्यामुळेंच मूळ अंदाजपत्रिकांतील जमखर्चाची तोंडमिळवणी होऊं शकली ही गोष्ट नामदार सभासदांच्या स्मरणांत असेलच. ह्या रकमेचा बोजा पुढील सालच्या बजेटीं खर्चाच्या बाजूकडे तरतूद करून प्रथम भागवावा लागणार आहे. व ह्या बोजांत आताच्या पुरवणी अंदाजपत्रकांतील १९८०७९ च्या रकमेची भर पडणार आहे. या दोहोंची बेरीज करतां २४०१०९ इतक्या रकमेचा बोजा पुढील सालच्या अंदाजपत्रकावर प्रथमचा पडणार आहे. व त्यामुळें चालू सालीं दुष्काळी परिस्थिति संस्थानच्या कांहीं भागांत भेडसाऊ लागली आहे. व त्यामुळें चालू सालीं जमीनमहसुलाची रक्कम अंदाजाप्रमाणें वसूल होणारी नाहीं, ही गोष्टहि या वेळीं दृष्टीआड करून चालणार नाहीं व याचा परिणाम अखेर आढाव्यांत ८२०३० च्या तुटीपेक्षां अधिक रकमेंत होणार हें निःसंशय आहे. तात्पर्य, चालू सालीं एकंदर तूट २४०१०९ पेक्षां अधिक येणार व तितक्या रकमेचा बोजा पुढील सालच्या बजेटवर पडणार हें सहज दिसून येईल. ही तूट भरून कशी काढावयाची हाच काय तो मुख्य प्रश्न आहे. बजेटांतील तूट भरून काढण्याचें सर्वसामान्य सर्वसंमत धोरण दोनतीन तऱ्हेनें सामान्यतः आंखलें जातें. उद्योगधंद्याची वाढ करून उत-

त्याच्या नवीन बाबी निर्माणकरणें, कर्जकाढणें अगर करवाढ करणें हे तीन प्रकार सकृद्दर्शनीं नजरेसमोर येतात. पहिला प्रकार कष्टसाध्य व विलंबाचा आहे. चालू सालांत भासणाऱ्या बजेटांतील तूट भरून काढणेच्या कामीं त्याचा बिलकूल उपयोग नाहीं. कर्ज काढल्यानें आपण समजूनउमजून पुढच्या पिढीवर अधिक ओझें लादल्यासारखें होतें. ज्या पिढीनें खर्च केला त्याच पिढीनें त्याचें शक्य तितकें ओझें सहन करावें हेंच केव्हांहि योग्य आहे. आपलें ओझें हलकें करण्यासाठीं आपल्या भावी पिढीवर अवलंबून रहाणें अगर भार टाकणें हें प्रशस्त वसल्यानें होताहोईल तितकें तें टाळणें बरें; व त्यामुळें राज्यकारभारांतील आर्थिक अडचणी दूर होतील असेंहि नाहीं. हें दोन्ही प्रकार अशा तऱ्हेनें अयोग्य असल्यानें उरलामुरला करवाढीच्या शास्त्रसंमत मार्गाचा विचार करणें प्राप्त आहे. हें पुरवणीअंदाजपत्रक करतांना फिनॅन्स कमीटीतील सरकारी व लोकपक्षीय सभासदांची अतिशय मदत झाली याचा उल्लेख करणें भाग आहे. या कमिटींतील सर्व सन्मान्य मित्रांनीं प्रत्येक बाबीची छाननी करून ज्या उपयुक्त सूचना केल्या व जी सलोख्याची व सहकार्याची वृत्ती दाखविली त्याबद्दल कमिटीतील सर्व सभासदांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

---

## सुट्टीनंतर

ना. स. ग. फडके:—सन्मान्य अध्यक्षमहाराज, आतां या सभागृहावर एक कटु पण पवित्र कर्तव्य पार पाडण्याचा प्रसंग आलेला आहे. व तो म्हणजे कै. राजकुमार श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांच्या अकालिक व शोचनीय निधनाबद्दल या सभागृहास काय वाटतें हें प्रदर्शित करणें हा होय याबद्दल एक दुखवट्याचा ठराव मी सभागृहापुढें मांडणार आहे. तो ठराव मी आतां आपणास वाचून दाखवितो:—

कै. राजकुमार श्रीमंत पांडुरंगराव बाळासाहेब उर्फ प्रतापसिंह महाराज यांच्या दिनांक २२ ऑगस्ट सन १९४२ इसवी रोजीं मद्रास येथें घडलेल्या अकाली व शोचनीय निधनाबद्दल सांगली संस्थान विधिमंडळाच्या सभासदांच्या ह्या सभेस अत्यंत दुःख होत आहे. कै. श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांना हिंदी वैमानिक दलांत प्रवेश मिळवून वैमानिक विद्येत पारंगतता मिळविण्याच्या कामीं जें अतुल साहस व जो धडाडी दाखविली त्याबद्दल सांगली संस्थानच्या प्रजाजनांना सादर अभिमान वाटत होता. ह्या त्यांच्या वीरवृत्तीमुळेंच ते ऐतिहासिक लढाऊ पटवर्धन घराण्यांत ललामभूत झाले आहेत. कर्तव्यदक्ष पुत्र, प्रेमळ बंधू व शूर वीर या तीन्ही पेशांत ते आदर्श होते. त्यांच्या ह्या अकाली व शोचनीय निधनामुळें हिंद

हायनेस श्रीमंत राजेसाहेब व हर हायनेस श्रीमंत सौभाग्यवती मातोश्री राणीसाहेब आणि राज-घराण्यांतील इतर मंडळी यांना जें अपरिमित दुःख जाहलें आहे त्यांत ही सभा सहभागी आहे.

हा ठराव ह्या विधीमंडळाचे ना. अध्यक्ष यांनीं उभयतां श्रीमंत स्वाम्यांकडे सुपूर्त करावा अशी ही सभा ना. अध्यक्ष यांना अधिकार देत आहे. असा हा ठराव आहे. ह्या ठरावास आमच्या पक्षाचे लीडर फार्मली दुजोरा देतील. मला जें कांहीं बोलावयाचें आहे ते मी नंतर बोलेन.

Sir, I move.

ना. के. गो. कुलकर्णी:—आतांच ना. सभासदांनीं या सभागृहापुढे जो दुखवट्याचा ठराव आणला आहे त्याला दुजोरा देण्यासाठीं मी उभा आहे. ना. सभासदांनीं ठराव मांडताना सांगितल्याप्रमाणें कै. राजकुमार श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांचेबद्दल आमचे अंतःकरणामध्यें कोणत्या तऱ्हेची भावना वसत होती हें सांगण्याकरितां हा ठराव विधीमंडळापुढें मांडलेला आहे. श्रीमंत राजेसाहेब व श्रीमंत सौ. मातोश्री राणीसाहेब यांच्या व प्रजेच्या भावना यामध्यें कोणत्याही तऱ्हेचा भेदभाव नाहीं. श्रीमंत राजेसाहेब व श्रीमंत सौ. मा. राणीसाहेब यांना कै. श्रीमंतप्रतापसिंह महाराज यांच्या निधनाबद्दल अत्यंत दुःख झालेलें आहे. राजाचें दुःख तेंच प्रजेचें दुःख या नात्यानें या दुःखांत आह्मी सहभागी आहोत. हें उघड शब्दांनीं आमचीं अंतःकरणें व्यक्त करून सांगणें जरूर आहे असें नाहीं. तथापि कर्तव्य या दृष्टीनें आह्मी आमची अंतःकरणें उघड करून त्यांचा दुःखभार हलका करणें हें इष्ट असल्यानें त्या दृष्टीनें मी या ठरावास दुजोरा देतो. कै. श्रीमंत राजकुमार प्रतापसिंह यानीं अगदीं तारुण्यांत जी धडाडी दाखविली ती खरोखर वाखाणण्याजोगी आहे. पूर्वी पेशव्यांचे अमदानींत पटवर्धन घराण्यानें अनेक शौर्याचीं कामें धारातीर्थी स्वतःचें रक्त सांडून केलीं असून त्या योगानें आपलें नांव इतिहासांत अजरामर करून ठेविलें आहे. त्यानंतर ब्रिटिश अमदानींत अशा प्रकारें आपल्या अंगांतील शौर्य जगाचे निदर्शनास आणण्याची संधी या घराण्यास आतांपर्यंत लाभली नव्हती. ती संधी प्रत्यक्ष मिळण्याचा संभव दिसतांच कै. प्रतापसिंह महाराज यानीं वैमानिक दलांत भाग घेऊन व स्वतःचे रक्त सांडून पटवर्धन घराण्याचा पूर्वीचा लौकिक पुन्हां उज्वलित केल्याचे या घराण्याचे इतिहासांत हें पहिलें उदाहरण आहे. ब्रिटिश साम्राज्य या युद्धामध्यें पडलें आहे त्याच कारणांसाठीं कै. श्रीमंत प्रतापसिंह महाराज यानीं युद्धांत प्रत्यक्ष भाग घेऊन केवळ कर्तव्य या नात्यानें जी धडाडी दाखविली ती व त्यांचे इतर गूण लक्षांत घेतां ही व्यक्ती किती अवर्णनीय होती हे दिसून येईल. ज्यांच्याशीं ह्मणून त्यांचा संबंध आला त्यांना त्यांना त्यांचे ठिकाणीं वसत असलेले अलौकिक गूण अवगत आहेतच. वैमानिक शिक्षणासाठीं प्रथम ते

सांगलीहून जेव्हां गेले त्यावेळीं त्यांचे सांगलीस ठिकठिकाणीं सत्कार करण्यांत आले. त्यावेळीं युद्धांत आपण कोणते धोरणानें भाग घेत आहोत याची स्पष्टता त्यांनीं केली होती. ब्रिटिश-सरकारनें सर्व मानवजातीच्या कल्याणासाठीं युद्ध सुरु केलें आहे, व त्याच तत्वासाठीं मी या युद्धांत भाग घेत आहे असें त्यांनीं बोलून दाखविलें. वैमानिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर हिंदुस्थान सरकारनें श्रीमंत प्रतापसिंह महाराज हे राजघराण्यांतील व्यक्ती असल्याकारणानें त्यांना तितकें जबाबदारीचें व धाडसाचें काम देवूं नये अशा तऱ्हेचा विचार केला होता परंतु राजकुमारांचे अंगांत पटवर्धन घराण्याचें प्रतापी रक्त सळसळीत असल्यामुळें या सरकारच्या विचारास त्यांनीं नापसंती दर्शवून आपणांस प्रत्यक्ष युद्धावर काम करण्याची संधि द्यावी अशी विनंति केली. त्या त्यांच्या विनंतीस मान देऊन ब्रिटिश सरकारनें त्यांना हिंदी किनाऱ्याचे संरक्षणासारखें जबाबदारीचें काम सांगितलें. त्यांच्यावर जी जबाबदारी टाकलेली होती ती जबाबदारी त्यांनीं अखेरपर्यंत उत्तम तऱ्हेनें पार पाडली. परंतु या जबाबदारीतील त्यांची योग्यता कळण्यापूर्वींच त्यांचा शोकजनक अंत घडून आला. ज्या हेतूकरितां त्यांनीं ही संकट-मय कामगिरी पत्करली होती तो त्यांचा हेतू उच्च होता. कै. प्रतापसिंह महाराज यांचा आकस्मिक अंत घडल्यामुळें श्रीमंत राजेसाहेब यांचेवर जी दुर्धर आपत्ती कोसळली आहे तीच आपत्ती त्यांच्या प्रजेवरही कोसळली आहे. यांत पुन्हां दुर्दैवाची घटना अशी कीं, श्रीमंत युवराज महाराज यांना पुत्ररत्न झालेल्या शुभदिवशींच ही दुःखदायक बातमी इकडे येऊन पोचावी ! श्रीमंत राजेसाहेब हे परमोच्च अशा आनंदाचा उपभोग घेत असतां एकाएकीं पुत्र-निधनाची अत्यंत दुःखदायक वार्ता त्यांना समजावी हा दैवदुर्विलासच समजला पाहिजे. श्रीमंतांच्या मनाला या प्रकारच्या घटनेमुळें किती दुःख झालें असेल हें शब्दांनीं व्यक्त करणें कठीण आहे. परंतु याही परिस्थितींत त्यांनीं आपलें स्वतःचें मन शांत ठेऊन या प्रसंगानें कष्टी झालेल्या आपल्या प्रजेला उलट धीर दिला. याबद्दल त्यांना धन्यवादच दिले पाहिजेत. सामान्य माणसें अशा प्रकारच्या आपत्ती आल्या असतां गांगरून जाऊन आपलीं कर्तव्यें पार पाडण्याचीं विसरतात, परंतु श्रीमंत राजेसाहेब हे धीरानें आपलेवर आलेल्या आपत्तींतून पार पडून प्रजेसंबंधीं करावयाचीं सर्व कर्तव्यें दिलाई न करतां त्यांनीं बजाविलीं ही गोष्ट त्यांच्या थोरपणास साजेशीच आहे. परंतु त्यांचेवर आलेल्या आपत्तीचें दुःख हें सहजासहजीं विसरतां येणेंसारखें नाहीं. हें दुःख सहन करण्याची त्यांना शक्ती यावी व प्रजेचें स्वास्थ्य-संरक्षणाचे कामीं त्यांना उदंड आयुष्य यावें अशी श्रीगजाननाचें चरणीं मी प्रार्थना करतो. हा ठराव मांडतांना आणखी एक विचार करणेसारखी गोष्ट म्हणजे अटलांटिक चार्टरमध्यें जें मानवजातीच्या स्वातंत्र्याचें तत्व

प्रतिपादणेंत आलें आहे तें उदात्त तत्व आपले नजरेसमोर ठेवून श्रीमंत प्रतापसिंहांनी युद्धांत भाग घेऊन स्वतःचें बलिदान केलें ही गोष्ट इतिहासकार नमूद केल्याखेरीज राहणार नाहीं. व या दृष्टीनेंच या ठरावाचें महत्व आहे एवढें सांगून या ठरावास दुजोरा देऊन मी आपलें भाषण पुरें करतो.

मे. स. ग. फडके:—याठिकाणीं कै. श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांच्या आयुष्यांतील कांहीं मुख्य मुख्य गोष्टी सांगणें अस्थानीं होणार नाहीं असें मला वाटतें. कै. श्रीमंत पांडुरंगराव बाळासाहेब ऊर्फ प्रतापसिंह महाराज यांचा जन्म ता. २६-११-१९१६ इ. रोजीं झाला. त्यांचें प्राथमिक शिक्षण सांगलीसच झालें. नंतर पुढील शिक्षणासाठीं ते डेहराडून येथें 'प्रिन्स्-ऑफ-वेल्स' या लष्करी कॉलेजमध्यें जाऊन पुढें उच्च शिक्षणासाठीं ते केंब्रिज येथें गेले. विलायतेस गेलेवेळीं त्यांचें झालेलें स्वागत सर्वांच्या ध्यानांत असेलच. विलायतेंतील शिक्षणक्रम पुरा होण्यापूर्वीच युद्धजन्य परिस्थिती निर्माण होऊन त्यांना इकडे परत यावें लागलें. तथापि ज्या शिक्षणासाठीं ते गेले होते तें जरी पूर्णावस्थेला गेलें नाहीं तरी युद्धास उपयोगीं पडणारें वैमानिक प्राथमिक शिक्षण पूर्ण करून त्यांनी तेथें 'बी' लायसेन्स मिळविला होता. येथें आल्या-नंतर सुमारें वर्ष दीडवर्ष आपल्या कर्तबगारीस योग्य अशा तऱ्हेचा मार्ग कसा सांपडेल याची त्यांना सारखी तळमळ लागली होती. पटवर्धन घराण्याच्या परंपरेला साजेल अशा तऱ्हेचा परा-क्रम आपल्या हातून घडावा व मानवजातीच्या स्वातंत्र्यासाठीं चालू असलेल्या या युद्धामध्यें एक घटक या नात्यानें आपण कांहींतरी भाग घ्यावा अशा तऱ्हेचे विचार त्यांच्या मनांत आल्यामुळें त्यांनीं वैमानिक शिक्षणाची परवानगी मिळावी म्हणून कोल्हापूर रेसिडेंटकडे अर्ज केला. त्यांच्या अर्जाप्रमाणें त्यांना शिक्षण घेणेस परवानगी मिळून ते जेव्हां प्रत्यक्ष शिक्षण घेणेंसाठीं दिल्लीस गेले त्यावेळीं त्यांना दिलेला निरोप आपणां सर्वांच्या ध्यानांतून गेला नसेलच. ह्या शिक्षणाचा कोर्स सहा महिन्याचा असतां त्यांनीं अवघ्या तीन महीन्यांतच तो पुरा केला. त्यावेळी तेथील मिलिटरी अधिकारी यांना राजकुमाराबद्दल सहानुभूति वाटून त्यांनी ट्रेनिंग ऑफिसरच्या जागेवर त्यांची प्रथम नेमणूक केली. परंतु श्रीमंत प्रतापसिंहाना हें आवडलें नाहीं. आपल्या कर्तव्यक्षेत्राला ही जागा अपुरी आहे असें त्यांना वाटल्यामुळें युद्धामध्यें काम करण्याची आपणांस संधि मिळावी अशी मागणी त्यांनीं आपल्या अधिकाऱ्याकडे केली, व त्यांच्या या मागणीप्रमाणें त्यांना 'पायलट् ऑफिसर' म्हणून मद्रासच्या किनाऱ्यावर संरक्षणाकरितां नेमणेंत आलें. या किनाऱ्यावरच ते आपलें कर्तव्यपालन करीत असतांना ता. २२ ऑगस्ट १९४२ रोजीं त्यांना विमान अपघातानें मृत्यू आला. वास्तविक या दिवशीं त्यांना ड्यूटी अशी कांहीं नव्हती. आपणांस आज बरीच विश्रांति मिळाली आहे, तेव्हां आपण सहज हिंडून यावें, वाटेंत शत्रूपैकीं कांहीं बोटी अगर

विमानें दिसलीं तर त्यांचाही समाचार घ्यावा अशा विचारानें ते टेहळणीसाठीं गेले. त्या दिवशीं त्यांना शत्रूचें विमान वगैरे कांहीं आढळून आलें नाहीं. तेव्हां ते परतले. त्यांचें विमान ज्या ठिकाणीं खालीं आलें त्या ठिकाणीं चर काढलेला होता. या चरांत विमान उतरलें असतें तरी त्याला विशेष धोका पोंचला असता असें नाहीं, परंतु कै. श्रीमंत प्रतापसिंहांना चरांत विमान उतरविणें न आवडून त्यांनीं पुढें मैदान होतें त्यांवर तें उतरवावें म्हणून विमान तेथून वर नेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या प्रयत्नास दुर्दैवानें यश आलें नाहीं. विमान काढतांना त्याचें 'नोज' (Nose) जवळच्याच एका मातीच्या ढिगाऱ्यावर आदळून त्यांतील पेट्रोलनें पेट घेतला. हें विमान मोकळें नसून त्यामध्यें बॉम्ब होते. त्यांनींही पेट घेतला. त्यावेळीं राजकुमाराबरोबर त्यांचे तीन सहकारी इसम होते; परंतु वर घडलेल्या स्फोटाचा प्रतिकार करणें हें त्या सर्वांच्या शक्तीबाहेरचें असल्यामुळें राजकुमाराबरोबर त्यांचे जोडीदार हेंहि जळून खाक झाले. श्रीमंत प्रतापसिंह यांचा याप्रमाणें दुःखद अंत झाल्यानंतर तेथील लष्करी अधिकाऱ्यांनीं त्यांचें शवास यथोचित 'गार्ड ऑफ् ऑनर' दिला व तें शव तेथील महाराष्ट्र मंडळाचे ताब्यांत दिलें. महाराष्ट्र मंडळानें शवास अंत्यसंस्कार करणेंपूर्वी तावडतोब राजघराण्यास झालेल्या प्रकाराबद्दल तार केली; परंतु ती तार त्यावेळच्या दंगलीच्या परिस्थितीमुळें श्रीमंत राजेसाहेब यांना वेळेवर मिळूं शकली नाहीं. कारण विधिघटनाच अशी घडून यावयाची होती कीं, श्रीमंत राजेसाहेब व राजघराण्यांतील मंडळी ही परमोच्च आनंदाच्या शिखरावर असतांना ही अत्यंत दुःखदायक बातमी त्यांना कळावी! मला असें आठवतें कीं, ज्यावेळीं महाराष्ट्र मंडळाची तार सांगलीस पोंचली त्यावेळीं राजपौत्राच्या जन्मानिमित्त साखर वांटण्याची मिरवणूक (Procession) निघाली होती व ती सांगली पोस्ट ऑफीसच्या कोपऱ्यापर्यंत आली होती. ज्यावेळीं ही तार तारमास्तर यांचे हातांत आली त्यावेळीं तारमास्तरांचासुद्धां त्या तारेवर विश्वास बसेना! या प्रसंगाचा उल्लेख करतांना ते पुढें एकदां म्हणाले "जेव्हां ही तार मी पाहिली तेव्हां मी माझें स्वतःचें डोकें तपासलें, तें ठिकाणावर आहे कीं नाहीं हेंच पाहूं लागलो, इतका मी त्यावेळीं आश्चर्यचकित झालो." हे तारमास्तर खरोखरच मोठे समयसूचक होते म्हणावयाचें. कारण साखर वांटण्याचा देवलायांतील समारंभ संपून प्रोसेशन् बरखास्त झालेनंतर ही तार श्रीमंतांचे हातीं पडावी अशा तऱ्हेचें औचित्य त्यांनीं त्यावेळीं दाखविलें. ती तार अशा प्रकारची होती "Regret you s n, Pilot Officer, P. C. Patwardhan killed in plan cr sh n 22nd inst." महाराष्ट्र मंडळानें ही तार २२ तारखेस श्रीमंतांचे हातांत पडून त्याप्रमाणें ते तेथें येतील व २५ तारखेस आपण श्रीमंत प्रतापसिंहांच्या शवास अग्निसंस्कार करूं अशा बेतानें ती केली होती. परंतु त्यांच्या अपेक्षेप्रमाणें तार पोंचून श्रीमंतांचें तिकडे जाणें अशक्य झालेमुळें महाराष्ट्र मंडळानें पुढील संस्कारासंबंधीं जेवढी व्यवस्था ठेवणें जरूर होती तेवढी ठेविली व राजकुमाराचे योग्यतेनु

अनुसरून त्यांच्या शवास full military honours हेहि देण्यांत आले. महाराष्ट्र मंडळानें केलेल्या या कामगारीबद्दल आम्ही सर्वजण खरोखरच त्यांचे मोठे ऋणी आहोत.

कै. श्रीमंत प्रतापसिंह महाराज हे अगदी खेळाडूवृत्तीचे व निगर्वी होते. त्यांचें थोडें वर्णन करावयाचें झटलें तर ते लॉर्ड किचनेर टाईपचे होते. भेदक दृष्टी व विस्तीर्ण भालप्रदेश, तेजस्वी डोळे, वीरवृत्तीस साजेशी धिप्पाड ठेवण व डौलदार दब ही त्यांची वैशिष्ट्यें होतीं. आपल्या वर्तनांत शिष्टाचाराचें उल्लंघन त्यांनीं कधींही होऊं दिलें नाहीं. त्यांच्या वागण्यांत बाह्यतः थोडासा काठिणपणा दिसे. ते उच्च शिक्षणासाठीं ज्यावेळीं केंब्रिजला गेले त्यावेळीं आम्हांस अशीं सुखस्वप्नें पडत होतीं कीं, त्यांचें हें शिक्षण पुरें झाल्यानंतर ते परत येऊन फेडरेशनची भावी संयुक्त घटना अंमलांत येईल त्यावेळीं फेडरेशनमध्यें आमच्या संस्थानतर्फे प्रतिनिधी म्हणून जाण्याचा त्याना खास मान मिळेल. याचा अर्थ आम्ही संस्थानिकांना प्रजेचे प्रतिनिधी मानतो असा कोणी समजूं नये. परंतु दुर्दैवानें हें घडून आलें नाहीं! त्यांना युद्धजन्य परिस्थितीमुळें तो शिक्षणक्रम अर्धवट सोडून स्वदेशास परतावें लागलें. यापुढें त्यांच्या पराक्रमी वृत्तीस पोषक असा एकच मार्ग त्यांना मोकळा वाटला. तो ह्मणजे प्रत्यक्ष युद्धांत भाग घेऊन आपलें क्षात्रतेज जगाच्या नजरेस आणणें हा होय. त्यांचा युद्धांत प्रत्यक्ष भाग घेण्याचा विचार ऐकून पुष्कळांस आश्चर्य वाटलें. त्यांनीं त्यांना हें बिकट साहस न करणेंबद्दल परोपरीनें विनवूनहि सांगितलें. तथापि त्यांचा निश्चय अटळ राहिला. त्यांनीं सांगितलें, "मी पटवर्धन घराण्यांत जन्मलो आहे. त्या घराण्याला लढाईचें भय पूर्वी कधींच वाटलें नाहीं व तें आतांहि वाटणार नाहीं. मऊमऊ गाद्यागिरद्यांवर लोळण्यासाठीं मी जन्माला आलो नाहीं." मला वाटतें, श्रीमंत राजेसाहेबानासुद्धां त्यांच्या या हेतूची कल्पना वैमानिक शिक्षणाचा परवाना मिळेपर्यंत नसावी. अशा प्रकारच्या होतकरू व वीरवृत्तीच्या राजकुमाराचें अकल्पित-रीतीनें निधन व्हावें ही एक विधिघटनाच ह्मणावयाची! आमच्या कल्पनेप्रमाणें जर गोष्टी घडून आल्या असत्या तर त्यांचा आह्मांस फार उपयोग झाला असता. त्यांनीं आमच्यांतील पुढारी या नात्यानेंही फेडरेशनमधील प्रतिनिधी ह्मणून बहुमोल कामगिरी केली असती. बर्नार्ड शॉ या प्रसिद्ध आयरिश् लेखकाचें Apple Cart नांवाचें एक नाटक आहे. या नाटकांत राजा हा आपलें राज्यपद टाकून स्वतः निवडणुकीसाठीं मेंबर ह्मणून उभा राहूं इच्छितो. त्यावेळीं त्याच्या प्राइमुमिनिस्टरला अशी भीति पडते जर हा राजा निवडून येईल तर तो आपलें प्रधानपद खास पटकावील. तेव्हां तो प्रधान राजाला सांगतो कीं, "तुह्मी निवडणुकीला उभे राहूं नका. तुमचें राज्यपद आहे तेंच बरें आहे." तशीच परिस्थिती

कदाचित् यांच्याहि बाबतींत झाली असती. राजकुमार जर निवडणुकीस उभे राहिले असते तर कोणी सांगावें मलाहि त्यांच्यापेक्षां कमी मतें पडलीं असतीं ! दुर्दैवानें श्रीमंत प्रतापसिंह-महाराज हे आह्मां सर्वांना सोडूनच गेल्यामुळें यासंबंधीं आतां जास्त ऊहापोह न करणेंच बरें ! खरोखर या राजघराण्यासंबंधीं घडणाऱ्या बारिक सारिक गोष्टींकडेही प्रजेचें फार लक्ष असतें. यासंबंधीं उदाहरण द्यावयाचें झालें तर श्रीमंत युवराजमहाराज यांच्या पुत्ररत्नाच्या जन्मासंबंधीं अगोदरच एक महिना बातमी उठली होती. राजकवी साधुदास यांना ही सुवार्ता कळतांच ते तेथल्यातेथें काव्य रचून माझ्याकडे घेऊन आले व ह्मणाले " सदाशिवराव, येत्या 'विजय' च्या अंकांत एकाद्या कविता अवश्य आल्याच पाहिजेत. " सांगण्याचें तात्पर्य ह्मणजे, अशा आनंदाच्या शिखरावर आह्मी पोहोंचलों असतां आह्मांस एकाएकी ही दुःखद बातमी समजली व त्यामुळें आमचा आनंद नष्ट झाला व सर्व संस्थान शोकसागरांत बुडून गेलें. हें विधिमंडळहि या संस्थानच्या प्रजेची एकमेव प्रातिनिधिक संस्था असल्यामुळें तिनें पवित्र पण कटु कर्तव्य ह्मणून हा ठराव एकमतानें संमत् करावा अशी या सभागृहास मी विनंति करितो.

मे. रा. ब मा. ह. लिमये:—नामदार सभासदांनीं आतां जो दुखवट्याचा ठराव मांडला त्यास सरकारतर्फे पाठिंबा देण्यासाठीं मी उभा आहे. आतांपर्यंत ज्या दोन वक्त्यांचीं या ठरावास अनकूल अशी भाषणें झालीं त्यांतील प्रत्येक शद्बास माझा पूर्णपणें पाठिंबा आहे. मला वाटतें आपलें आणि श्रीमंत राजेसाहेब यांचें अंतःकरण एक असलें आणि राजाचें दुःख तें प्रजेचें दुःख असें जरी असलें तरी आपलें दुःख दर्शविण्यास विधिमंडळांत ठराव आणून भाषण करणें हेंच उचित व जरूर आहे. कारण भाव हा अंतःकरणांत गुप्त असतो, तो शद्बांनीं व्यक्त करून मांडणें म्हणजेच अंतःकरण व्यक्त करणें होय. कै. श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांचे अंगीं वसत असलेले गूण आपल्या सर्वांच्या परिचयाचे आहेतच. त्यांच्या निधनानें आपणां सर्वांस अत्यंत दुःख झालेलें आहे हें मी जाणून आहे; परंतु माझ्यासारखा मनुष्य, जो नेहमीं त्यांच्यानजिक वागत होता, त्यास या प्रसंगानें किती वाईट वाटलें असेल याची कल्पना आपणच करावी; कारण मला तें शद्बांनीं सांगता येत नाहीं. When heart is full, mouth refuses to speak.

श्रीमंत प्रतापसिंह महाराज हे राजघराण्यासारख्या अत्यंत उच्च दर्जात उत्पन्न झाले असूनही ते आमचेसारख्याशीं वागतांना एखाद्या सामान्य व्यक्तीप्रमाणें वागत. आपण राजकुमार आहोंत व हे सामान्य लोक आहेत अशा तऱ्हेचा भेदभाव त्यांचे ठिकाणीं मुळींच नव्हता. अशा प्रकारचे निगर्वी, उमद्या मनाचे व शूर राजपुत्र गमावावेत हें खरोखर आपलेंच दुर्दैव आहे! या ठरावास सरकारपक्षातर्फे आमची पूर्ण सम्मति आहे. ही दुर्दैवी घटना अत्यंत विचित्र तऱ्हेनें

घडून आली याबद्दल जास्तच वाईट वाटतें. श्रीमंत राजेसाहेब हे पौत्रजन्माच्या आनंदाच्या भरांत असतांना पुत्रनिधनाची वार्ता ऐकून एकदम आनंदाच्या अत्युच्च शिखरावरून दुःखाच्या गर्तेत लोटले गेले यामुळें या दुःखाचा तीव्रपणा त्यांना अधिक झाला असेल हें उघड आहे. तथापि श्रीमंतांनी आपलें मन शांत करून सर्वांना धीर दिला यावरून त्यांचें ठिकाणीं वसत असलेलें धैर्य खरोखर वाखाण्याजोगें आहे असेंच म्हटलें पाहिजे. एखादे सुंदर व सुवासिक म्हणून गुलाबाचें फूल खुडण्यास जावें व त्याच वेळेला त्याच्या पाठीमागून आड असलेल्या नागानें एकदम हातास दंश करावा अशी विलक्षण परिस्थिती तेव्हां निर्माण झाली. परंतु या निराशाजनक परिस्थितीतही श्रीमंतराजेसाहेब व श्रीमंत सौ. मा. राणीसाहेब यांनी धैर्य धरून हा प्रसंग निभावून नेला हेंच विशेष होय. तेव्हां हा सर्व कळवळा मनांत येऊनच मी ठरावास दुजोरा दिला आहे. ठराव मांडला आहे तो पूर्णपणें युक्त आहे म्हणून तो पास करावा अशी सभागृहास माझी विनंति आहे.

ನಾ. ಎಮ್. ಎಫ್ ಡಬಾಲಿ:—" ಮೆ. ಅಧ್ಯಕ್ಷ ಮಹಾರಾಜ ಮತ್ತು ಈ ಸಭಾಗ್ರಹದ ನಾಮದಾರ ಸಭಾಸವರೆ, ಹಿಜ್ ಹಾಯನೆಸ್ ಶ್ರೀಮಂತ ರಾಜೇಸಾಹೇಬ ಸಾಂಗಲಿ ಇವರ ದ್ವಿತೀಯ ಪುತ್ರ ಕುಮಾರ ಪ್ರತಾಪಸಿಂಹ ಮಹಾರಾಜರ ಅಕಸ್ಮಿಕ ಮರಣವಮೂಲಕ ತಂದ ದುಃಖವಟೆಯ ಠರಾವಿಗೆ ನಾನು ಅನುಮೋದನ ಕೊಡುವವರ ದೆಶೆಯಿಂದ ಯದ್ದುನಿಂತಿರುವೆನು. ಶ್ರೀಮಂತ ಪ್ರತಾಪಸಿಂಹ ಮಹಾರಾಜ ವಿಮಾನವಳವಲ್ಲಿ ಕಿಂಗಜರ ಕಮಿಶನರ ಪಡೆದು ನಮ್ಮ ಪಟವರ್ಧನದ ಘರಾಣೆಯಲ್ಲಿ ವೀರ ಪುರುಷರು ಇರುವರು. ಅಂತಾ ತೋರಿಸುವವರ ಸಲುವಾಗಿ ವಿಮಾನವಳದಲ್ಲಿ ಭಾಗ ವಹಿಸಿದರು. ಆದರೆ ಅವರ ಮನೋಬಯಕೆ ಪೂರ್ಣವಾಗವೆ ಅವರು ತಾರೀಖು ೨೨–೮–೪೨ ನೇ ಇಸ್ವಿ ದಿವಸ ವಿಮಾನದಿಂದ ಭೂಮಿಯಮೇಲೆ ತಿರುಗುವ ಕಾಲಕ್ಕೆ ಅಕಸ್ಮಿಕ ಮರಣ ಹೊಂದಿದರು. ಅವರ ಮರಣದ ಮೂಲಕ ನಮ್ಮ ಹಿಜ್ ಹಾಯನೇಸ್ ಶ್ರೀಮಂತ ರಾಜೇಸಾಹೇಬ ಹಾಗೂ ಹರ ಹಾಯನೇಸ್ ಶ್ರೀಮಂತ ಸೌಭಾಗ್ಯವತಿ ಮಾತೋಶ್ರೀ ರಾಣೀಸಾಹೇಬ ಇವರಿಗೆ ಬಹಳೇ ದುಃಖವಾಯಿತು. ನಮ್ಮ ರಾಜಘರಾಣೇಕ್ಕೆ ಈ ಎನ್ನು ದುಃಖವಾಯಿತು ಅವರಲ್ಲಿ ಅವರ ಶಿರಹಟ್ಟಿ ತಾಲೂಕಿನ ಜನರು ಸಮದುಃಖಿಗಳು ಇರುತ್ತಾರೆ ಮತ್ತು ಪ್ರತಾಪಸಿಂಹ ಮಹಾರಾಜರ ಆತ್ಮಾಕ್ಕೆ ದೇವರು ಶಾಂತಿಯನ್ನು ಕೊಡುವೆಂದು ನಾನು ಶಿರಹಟ್ಟಿ ತಾಲೂಕಿನ ಜನರವತಿಯಿಂದ ಸವರ ದುಃಖವ ಠರಾವಿಗೆ ಬೆಂಬಲ ಕೊಡುವೆನು.

मे. सौ. राधाबाई सराफः—मेहेरबान अध्यक्ष महाराज, नामदार सदाशिवराव फडके यांनी जो दुखवट्याचा ठराव मांडला आहे त्या ठरावाला दुजोरा देण्याकरितां मी उभी राहिल्ये आहे. श्रीमंत प्रतापसिंह महाराज हे आपल्या नांवाप्रमाणें सिंहासारखे खरा प्रताप गाजविणारे होते व त्यांना मृत्यू आला तोसुद्धां वीराला शोभण्यासारखाच यांत शंकाच नाहीं. त्यांचा व श्रीमंत युवराज महाराजांचा एक प्रफोटो आमचे घरीं आहे. ज्यावेळीं त्यांच्या दुःखदायक व आकस्मिक निधनाची वार्ता शहापूरला आली त्यावेळीं त्यांच्या खिलाडू स्वभावाची व वीरवृत्तीची आमच्या वरीं फारच शिफारस होत असलेली ऐकून आझांला आमच्यापैकीं एक उत्तम

मनुष्य सोडून गेला याबद्दल मनाला एकसारखी हुरहुर लागून राहिली. अशा दुःखदायक प्रसंगाबद्दल श्री. सरकार व श्री. सौ. मा. राणीसाहेब यांना किती कष्ट व दुःख झालें असेल याची कल्पनाच करवेना ! आमच्या हातून उभयतां श्रीमंत स्वाऱ्यांचें दुःख कसें कमी होणार ? आमच्या हातीं असलेली एक गोष्ट आह्मी केली. ती ह्मणजे आह्मी उभयतांनीं श्रीमंत स्वाऱ्यांना दुःखनिवारणार्थ पत्रें लिहिलीं. तसेंच शहापूर येथें नागरिकांची सभा भरवून दुखवट्याचा ठराव करून तो श्रीमंतांच्याकडे पाठविला व शहापूर येथील सर्व दुकानें बंद केलीं गेलीं होतीं. अशा रीतीनें सबंध सांगली संस्थान एका सुपुत्राला व वीराला आंचविलें गेलें. या श्रीमंतांच्या दुःखामध्यें आह्मी सांगली संस्थानचे सर्व प्रजाजन सामील आहोंत व ही असेंब्ली एकमतानें श्रीमंतांच्या दुःखामध्यें वांटेकरी आहे असें दर्शवील अशी आशा मला आहे. सांगली संस्थानच्या अखिल महिलावर्गातर्फे मी या ठरावास दुजोरा देत आहे.

मे. प्रेसिडेंटः—नामदार सभासदांनीं आतां थोडा वेळ थांबावें, कारण सभागृहाचे बाहेर कांहीं रयत लोक आलेले असून त्यांच्या कांहीं मागण्या आहेत; त्या त्यांनीं मजकडे लेखी दिलेल्या आहेत. मी आतां त्या आपणास वाचून दाखवितो. (वाचल्या) मला असें समजून आलें आहे कीं, पूर्वीं कांहीं वेळीं अशा तऱ्हेचे मोर्चे असेंब्लीचें अधिवेशन चालू असतांना आलेले होते व त्या वेळीं लीडर ऑफ दि हाऊस व लीडर ऑफ दि ऑपोझिशन या दोघांनीं बाहेर जाऊन त्या त्या लोकांचें म्हणणें काय आहे तें ऐकून घेतलें होतें. त्याचप्रमाणें आतांहि करावें असें मला वाटतें. बाहेर जमलेली सर्व मंडळी कवलापूर, कुमठें वगैरे गांवची आहेत. तेव्हां या गांवचे प्रतिनिधींनींही सदर दोन्ही लीडर्सबरोबर बाहेर जाऊन त्या लोकांची समजूत करावी; तों पर्यंत सभेचें काम स्थगित राहील. ( थोड्या वेळानें )

मे. प्रेसिडेंटः—सभेच्या कामास आतां सुरवात करणेस हरकत नाहीं.

मे. रा. ब. मा. ह. लिमयेः—सदर ठरावावर आणखी कोणास बोलावयाचें आहे काय ?

मे. म. ह. गोडबोलेः—होय, आम्हांपैकीं बऱ्याचजणांना बोलावयाचें आहे.

मे. ह. ना. पटवर्धनः—इनामदार वर्गातर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देतो.

मे. वा. भि. बेंडेः—अस्पृश्यसमाजातर्फे मी ह्या ठरावाला दुजोरा देतो.

ना. वि. म. करंदीकरः—कै. राजकुमार श्रीमंत प्रतापसिंह यांचा आकस्मिक व शोचनीय शेवट झाला याबद्दल जो ठराव ह्या सभागृहापुढें मांडणेंत आलेला आहे त्या ठरावास सर्व कुची तालुक्यातर्फे मी दुजोरा देत आहे. श्रीमंत प्रतापसिंह महाराज हे पटवर्धन घराण्यासारख्या वीर घराण्यांत जन्मास आले. ते पराक्रमी व धाडसी होते यांत शंका नाहीं, परंतु

तें धाडस, ते जर जगले असते तर, याहीपेक्षां आपणांस जास्त प्रत्ययास आलें असतें. या दृष्टीनें त्यांचें धाडस अपुरेंच राहिलें असें मी म्हणतो, कारण अपघात झाला तो धाडसी काम करीत असताना त्यांना झाला, परंतु ते शत्रूचा समाचार घेत असतांना झाला नाहीं. त्यांना जर अपघात झाला नसता तर पुढें ते हिंदुस्थान सरकारकडून क्रॉस मिळवून बहुमानास चढले असते अशी मला खात्री वाटते. वैमानिक शिक्षण घेण्यासाठीं श्रीमंत प्रतापसिंह हे जेव्हां विलायतेस गेले तेव्हां त्यांना थाटाचा निरोप दिला त्यावेळीं खरोखर मोठें समाधान वाटलें परंतू तें समाधान क्षणभंगूर ठरलें. ईश्वराची इच्छाच वेगळी होती ! असो. आपल्या हिंदुधर्मांत जें पुनर्जन्माचें तत्व आहे त्या तत्वाप्रमाणें ते आपली राहिलेली इच्छा पूर्ण करून घेण्यासाठीं त्याच राजघराण्यांत पुनर्जन्म घेऊन आपलें कार्य तडीस नतील असा माझा विश्वास आहे.

मे. अ. स. राजमाने:—कै. श्रीमंत राजकुमार प्रतापसिंह यांच्याबद्दलची बातमी सांगली येथील व्यापाऱ्यांना ज्या वेळीं समजली त्या वेळीं त्याना इतकें दुःख झालें कीं त्यांनीं सर्वांनीं आपले व्यवहार ताबडतोब बंद केले. चेंबर ऑफ कॉमर्समध्यें दुःखवठ्याची सभा भरवून दुःख-प्रदर्शनार्थ अकरा दिवस बाजार बंद ठेवावा असें ठरविण्यांत आलें व त्याप्रमाणें सर्व व्यापारी-लोकांनीं अकरा दिवस सर्व व्यापार बंद ठेविला होता. श्रीमंत प्रतापसिंह महाराज हे आमच्या-मध्यें खेळीमेळीनें रहात असल्यामुळें आमच्या अनेक तऱ्हेच्या अडचणीं व सुखसोयी त्यांना समजत असत व आमचीं गाऱ्हाणीं त्यांना समजताच तीं ते श्रीमंत राजेसाहेबांचे कानांवर घालून आमच्या अडचणीं ते ताबडतोब दूर करीत असत. श्रीमंत राजेसाहेब व व्यापारीलोक यांचेमधील ते एक दुवाच होते. श्रीमंत प्रतापसिंह यांच्या आकस्मिक निधनामुळें हा आमचा आधार नाहींसा होऊन आह्मांस कोणी त्राता राहिलेला नाहीं. कै. श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांचा थोरपणा लक्षांत घेऊन त्यांच्या मृत्यूबद्दल जो हा दुःखवठ्याचा ठराव मांडणेंत आलेला आहे त्यास व्यापारीवर्गातर्फे मी दुजोरा देतो.

मे. शं. ल. टुबाकी:—कै. श्रीमंत प्रतापसिंह महराजांचें नांव उच्चारतांच पराक्रमाची आठवण होते व ते नांवाप्रमाणेंच प्रतापशाली व धाडसी होते यांत शंका नाहीं. त्यांच्या अंगीं वसत असलेल्या ह्या गुणांची व त्यांच्या उमद्या स्वभावाची जाणीव मी आपणांस करून दिली पाहिजे असें नाहीं; ती सर्वांनाच माहित आहे. आपल्या धाडसी व पराक्रमी स्वभावास अनुसरून त्यांनीं चालू युद्धांत भाग घेतला हें कौतुकास्पद तर आहेच, परंतू त्यांतल्या त्यांत युद्धांत प्रवेश करतांना वैमानिक खात्याची त्यांनीं विशेषेंकरून जी निवड केली ती वाखणण्याजोगी आहे. युद्धांत रणांगणावर सैनिक म्हणून काम करणें हें धाडसाचें तर आहेच, परंतू वैमानिक म्हणून

काम करणें हें अधिक धाडसाचें आहे. अशा तऱ्हेचें अतुलनीय धाडस त्यांनीं केलें म्हणून त्यांचें कौतुक करण्यासाठीं याच सभागृहापुढें गेल्या अधिवेशनाचे वेळीं ठराव मांडणेंत आला होता; परंतु कालमहिमाच असा विचित्र कीं, या सभागृहपुढें त्यांच्या निधनासंबंधीं आज दुःखव्याचा ठराव मांडण्याचा प्रसंग आपणांवर येत आहे ! कै. श्रीमंत प्रतापसिंह महाराज हे सर्व संस्थानास अतिशय मार्गदर्शी झाले असते, परंतु दुर्दैवानें ते आम्हांस फार दिवस लाभले नाहींत. शहापूर तालुक्यांत सांब्रें विमानतळ तयार करण्याचें काम सुरू आहे. या विमानतळावर श्रीमंत प्रतापसिंह महाराज हे परत येतांना आपलें विमान उतरावितील व तें पाहून आम्हीं धन्य होऊं व शहापुरास येण्याबद्दल विनंती करूं अशा तऱ्हेचे मनोरथ आम्हीं केले होते. श्रीमंत प्रतापसिंह वैमानिक शिक्षण घेण्यास जाणेंपूर्वी सांगलीस पार्टीच्यावेळीं जमलेल्या मंडळींची त्यांनीं भेट घेतली त्यावेळीं आमचा हा मनोदय त्यांचे कानांवर घालणेंत आला होता. श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांनीं स्मित हास्य करून त्यास आपली मूक संमति दर्शविली होती. त्यांचेबरोबर हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब हेहि होते. स्वारींनांहि ही कल्पना मोठी कौतुकास्पद वाटली. गेल्या वर्षींच अशा प्रकारें मोठ्या आशेनें रचलेले हे मनोरथ ह्या वर्षी असे एकाएकीं दुर्दैवानें कोसळून पडावेत ही खरोखर विधिघटनाच होय ! आम्हां मानवी प्राण्यांच्या हातांत अशा वेळीं फक्त हळहळ व्यक्त करण्यापलीकडे कांहींच नाहीं ! राजघराण्यावर हा जो दुःखाचा डोंगर कोसळला आहे त्यामध्यें आपली प्रजाहि सहभागी आहे हें जाणून श्रीमंत राजेसाहेब व श्रीमंत सौ. मातोश्री राणीसाहेब यांनीं आपला दुःखभार हलका करावा अशी विनंती करून मी या ठरावास पाठिंबा देतो.

मे. शा. गौ. अनगोळकर:—श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांचें अकल्पित निधनासंबंधीं विधिमंडळापुढें जो ठराव आला आहे त्यास मुसलमान समाजातर्फे मी दुजोरा देण्यासाठीं उभा आहे. त्यांनीं आपल्या अल्पवयांतच विमानविद्या पूर्ण करून या युद्धांत आपल्या ज्ञानाचा उपयोग हिंदुस्थान सरकारला करून देण्याच्या हेतूनेंच वैमानिक खात्यांत आपला प्रवेश करून घेतला. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग पूर्णपणें होऊन त्याची फलश्रुती होण्यापूर्वीच त्यांचा अपघातानें अंत झाला ही परमेश्वराची इच्छा व प्रजेचें दुर्दैव म्हटलें पाहिजे !

मे. सौ. इंदिराबाई साठे:—अध्यक्ष महाराज, श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांच्या आकस्मिक दुःखदायक निधनासंबंधीं या सभागृहांत जो हा ठराव मांडणेंत आलेला आहे, त्यावर भाषण करणें मला अत्यंत जड झालें आहे. कारण यासंबंधीं दुःखाची पूर्वी झालेली जखम बरी होत आली होती तोंच त्यावरची खपली निघावी व पुन्हां त्या दुःखाची तीव्रता मनाला जाणवावी हें माझे मनाला बरोबर वाटत नाहीं. मला आतां अधिक कांहीं बोलवत नाहीं, तेव्हां हा जो ठराव पुढें आलेला आहे त्यास मी अत्यंत दुःखित अंतःकरणानें पाठिंबा देते.

मे. अेस्. अे. अमीनः—अध्यक्ष महाराज, आज आपल्यापुढें श्रीमंत प्रतापसिंह यांच्या अकाली व अत्यंत दुःखदायक निधनाबद्दल जो दुखवट्याचा ठराव आला आहे त्याला अनुमोदन देण्याकरितां मी उभा आहे. श्रीमंत प्रतापसिंहांच्या मृत्यूबद्दल संबंध संस्थानभर निरनिराळ्या ज्ञातींनीं, संस्थांनीं व जमातींनीं दुखवट्याचे ठराव पास करून सांगलीच्या राजघराण्यावर कोसळलेल्या दुःखांत आपण समभागी आहोत हें स्पष्टपणें सिद्ध केलें आहे. आज अत्यंत जबाबदार व लोकमतानुवर्ति अशा विधिमंडळांत दुखवट्याचा ठराव येत आहे हें अत्यंत योग्य व औचित्यपूर्ण आहे.

गेल्या अधिवेशनाचे वेळीं "श्रीमंत प्रतापसिंह आतां वैमानिक दलांत प्रत्यक्ष काम करूं लागले आहेत" असे या सभागृहास अत्यंत अभिमानाचे वाटणारे उद्गार आपल्या परमपूज्य प्रभूकडून त्यांच्या भाषणांत काढले जावेत आणि या अधिवेशनांत श्रीमंत प्रतापसिंहांच्या मृत्युबद्दल दुखवट्याचा ठराव मांडला जावा हा आह्मां प्रजाजनांचा दैवदुर्विलास आहे असें ह्मटलें पाहिजे.

श्रीमंत युवराजमहाराजांना पुत्रप्राप्ती झाली ह्मणून सर्व शहरांत उल्हासाचें वातावरण पसरलें होतें; सारी जनता आनंदून गेली होती पण अवघ्या बारा तासाच्या आंत तो उल्हास मावळला; त्या आनंदास खग्रास ग्रहण लागलें. नुकत्याच उमललेल्या व आनंदानें डोलत असलेल्या सुंदर फुलावर आधणाचें पाणी ओतलें असतां त्या फुलाची जशी अवस्था होते तशीच अवस्था त्यावेळीं जनतेच्या अंतःकरणाची झाली होती. श्रीमंत प्रतापसिंहांच्या मृत्यूची शोकान्त घटना इतक्या अकल्पित रितीनें, इतक्या त्वरेनें घडून आली कीं अद्याप त्यावर कित्येक लोकांचा विश्वास बसत नाहीं.

वैमानिक दलांत प्रत्यक्ष काम करूं लागल्यानंतर त्यांच्यावर जी कामगिरी सोंपविण्यांत आली ती विशेष त्रासदायक व धोक्याची नव्हती. ती कामगिरी करीत त्यांना आरामशीर कालक्रमणा करतां आली असती. पण त्यांच्या नसानसांत सळसळणाऱ्या पराक्रमी पटवर्धनांच्या रक्तानें त्यांना स्वस्थ बसूं दिलें नाहीं. आपल्या कर्तृत्वास वाव मिळण्यास हें पुरेसें क्षेत्र नाहीं ह्मणून आपणांस आघाडीवर पाठविण्यांत यावें अशी श्रीमंत प्रतापसिंह महाराजांनीं आपल्या वरिष्ठाकडे मागणी केली आणि त्या मागणीप्रमाणें पूर्व हिंदी किनाऱ्याचें संरक्षण करण्याकरितां त्यांना मद्रासला पाठविण्यांत आलें. या साऱ्या गोष्टीचा आपल्या परमपूज्य प्रभूंना किंवा आह्मां प्रजाजनांना थांगपत्ता देखील नव्हता. कदाचित् आपल्या कार्यांत व्यत्यय किंवा अडचण उपस्थित होईल ह्मणून श्रीमंत प्रतापसिंहांनीं ही गोष्ट कुणालाच कळविली नाहीं. मद्रासला नेमणूक झाल्यानंतरच त्यांनीं खऱ्या हकिकतीचा परिस्फोट केला. आणि अशा रीतीनें हिंदी किनाऱ्याचें संरक्षण करण्याची धोक्याची कामगिरी करीत असतांच मृत्यूनें आपला कराल पाश त्यांच्याभोंवतीं टाकला.

श्रीमंत प्रतापसिंहांना कालवश होऊन बराच काळ लोटला तरी त्यांची स्मृती अद्याप ताजी आहे. इतक्या लहान वयांत श्रीमंत प्रतापसिंहांनी आपल्या कर्तृत्वानें, निधडेपणानें व दिलदार स्वभावानें सांगली प्रजाजनांच्या अंतःकरणांत एवढें अढळस्थान मिळविलें आहे की त्यांची आठवण प्रजाजनांच्या स्मृतिपटलावरून कदापिहि पुसली जाणें शक्य नाहीं. श्रीमंत प्रतापसिंहांच्या निधनाची वार्ता, वज्राघाताप्रमाणें येथें येऊन आदळली, त्यावेळीं बाहेरचा कोणी सद्गृहस्थ हजर असता तर श्रीमंत प्रतापसिंहांच्या मृत्यूमुळें सांगलीच्या प्रजाजनांना केवढा जबरदस्त धक्का बसला आहे याचें असाधारण दृश्य त्यास पहावयास मिळालें असतें. त्यावेळीं सबंध शहरावर पसरलेली प्रेतकळा, ठिकठिकाणीं दिसून येणारी भीषण शांतता, आबालवृद्धांचे दुःखाचे सुस्कारे, स्थगित झालेले सर्व व्यवहार, स्वयंस्फूर्त पाळला गेलेला हरताळ ज्यांनीं पाहिला त्यांना श्रीमंत प्रतापसिंहांबद्दल प्रजाजनांना केवढें प्रेम वाटत होतें, सांगलीच्या राजघराण्यावर कोसळलेल्या दुःखांत प्रजा कशी समरस झाली होती याची स्पष्ट कल्पना आली असेल. असो.

श्रीमंत प्रतापसिंहांच्या अल्पजीवी पण तेजस्वी आयुष्यानें सर्वांस दिपवून टाकलें आहे. त्यांच्या आयुष्यास यथार्थ उपमा द्यावयाची झाली तर ती विद्युल्लतेची द्यावी लागेल. काळ्या-कभिन्न आकाशांत विद्युल्लता चमकावी, सगळीकडे लखलखाट व्हावा, सर्वांचे डोळे दिपून जावेत आणि क्षणांत तिचें अस्तित्व नाहींसें व्हावें, अशीच अवस्था श्रीमंत प्रतापसिंहांच्या आयुष्याची झाली आहे. त्यांच्या लहानशा आयुष्याचा आढावा काढल्यास तें अत्यंत प्रभावी व देदिप्यमान झालें असा निर्वाळा प्रत्येक व्यक्तीस द्यावा लागेल.

मागें मी एकदां जाहीर व्याख्यानांत सांगितल्याप्रमाणें, श्रीमंत प्रतापसिंहांना काय कमी होतें ? राजाच्या पोटीं जन्म, दारीं झुलवत असलेलें गजान्त वैभव, सर्व सुखसोयींची सिद्धता आणि उमललें तारुण्य, पण श्रीमंत प्रतापसिंहांनीं केवळ कर्तव्याकरितां मानवतेच्या संरक्षणार्थ या सर्व गोष्टींना तिलांजली दिली, आपल्या उमलत्या तारुण्यास त्यागाची भूमी बनविली आणि अत्यंत खडतर व प्राणांतिक धोक्याचा मार्ग पत्करला.

आपल्या लोकोत्तर आत्मत्यागानें, श्रीमंत प्रतापसिंहांनीं कितीतरी असाध्य गोष्टी साध्य केल्याचें श्रेय मिळविलें आहे. आपल्या पंचप्राणांची आहुति देऊन कर्तव्यशून्य व ऐदी तरुणांस खडबडून जागें केलें, सदैव ऐषआरामांत लोळत पडणाऱ्या लक्ष्मीपुत्रांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातलें, आपल्या परमपूज्य मातापित्यांना वीरमाता व वीरपिता हें नामाभिदान प्राप्त करून दिलें, साऱ्या महाराष्ट्राचा थरकांप करून टाकणाऱ्या आपल्या परमपूज्य पूर्वजांची उज्वल परंपरा राखली आणि ज्या मातेच्या पोटीं जन्म घेतला त्या पुण्यशील मातेचा कुसवा धन्य केला.

अशा अत्यंत थोर व प्रजाजनांचा कलिजा होऊन बसलेल्या श्रीमंत प्रतापसिंहांच्या आत्म्यास परमेश्वरानें सद्गती द्यावी अशी अनन्यभावानें परमेश्वरचरणीं प्रार्थना करून आणि या सभागृहापुढें आलेल्या ठरावास दुजोरा देऊन मी माझे चार शब्द संपवितो.


मे. म. ह. गोडबोले:—अध्यक्षमहाराज, कै. श्रीमंत प्रतापसिंह महाराजांच्या आकस्मिक निधनासंबंधीं जो दुःखप्रदर्शनाचा ठराव ह्या सभागृहापुढें आलेला आहे त्यास मी अनुमोदन देतो. राजकुमारांचे स्मृतीस माझें एक पुष्प अर्पण करणेसाठीं मी उभा आहे. आतांपर्यंत ह्या ठरावावर बऱ्याच सभासदांचीं भाषणें झालेली आहेत. त्यांपैकीं पुष्कळ नामदार सभासदांनीं आपआपल्या समाजातर्फे ह्या ठरावास पाठिंबा दिलेला आहे. मी विविक्षित वर्गातर्फे बोलणार नसून तरुण वर्गातर्फे बोलणार आहे, अर्थात् हे एक तरुणाचे विचार आहेत. तरुणाचे विचार साहसप्रिय असतात. भीति ही त्यांना माहितच नसते, मृत्यूची ते पर्वाच बाळगीत नाहींत. अर्थात श्रीमंत प्रतापसिंह महाराज यानींहि ती बाळगली नाहीं. एखादी विद्युल्लता चमकावी याप्रामाणें ते चमकून गेले. राजकुमारांनीं वैमानिकखात्यांत धडसाचें काम पत्करून जी कर्तबगारी दाखविली ती लक्षांत घेतां असें ह्मणण्यास हरकत नाहीं कीं, या आपल्या राष्ट्रामध्यें नुसते बुद्धिमान् लोकच आहेत असें नाहीं, सैन्यांत पराक्रम गाजविणारे लोक आहेत असेंहि नाहीं, तर वैमानिक खात्यांतहि धाडसाचीं कामें करणारे लोक आहेत. चालू महायुद्धांत जसें ब्रिटिश हिंदुस्थाननें जबाबदारीचें काम केलें आहे त्याचप्रमाणें आपल्या संस्थाननेंहि तितक्याच जबाबदारीचें काम केलें आहे हें श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांच्या उदाहरणावरून समजून येईल. श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांना वैमानिक अपघात न होतां ते सहीसलामत परत आले असते तर त्यांच्यासारख्या तेजस्वी पुरुषाचा आपल्या हिंदूराष्ट्राला बहुमोल फायदा झाला असता आणि त्यांनीं हिंदूराष्ट्रांत मानाचें स्थान खचित घेतलें असतें, परंतु त्यांच्या अकल्पित निधनामुळें ह्या गोष्टी पहाण्याचें भाग्य आपणांस लाभलें नाहीं व हिंदूराष्ट्रहि एका भावी पुढाऱ्यास मुकलें. राजकुमार आमचेतून गेले. त्यांना आलेलें मरण वीरानें तर खरेंच, परंतु हें मरण त्यांना अपघतांत आलें नसतें तर इतकें वाईट वाटलें नसतें. शत्रूंशीं झुंज देतांना जर त्यांना मरण आलें असतें तर अह्मांस इतकी हळहळ लागली नसती. आह्मांस हळहळ वाटते, परंतु हें आमचें हळहळणें त्यांना पसंत पडणार नाहीं. कर्तव्यकर्म करीत असतांना दुर्दैवाचा घाला त्यांच्यावर यावा याबद्दल फिरूनफिरून वाईट वाटतें. असो, मला जें सांगावयाचें होतें तें थोडक्यांत सांगितलें आहे. सर्व नामदार सभासदांनीं ह्या ठरावास मान्यता दर्शवून ह्या ठराव पास करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

मे. प्रेसिडेंटः—हा ठराव नेहमीच्या ठरावापेक्षां निराळ्या स्वरूपाचा आहे. नामदार सभासदांना काय वाटतें तें त्यांनीं बोलून दाखविलेंच आहे. कै. प्रतापसिंह महाराजांच्या निधनाची वार्ता मला पाटण्यास असतांना कळाली. ती इतकी अनपेक्षित होती कीं तिजवर माझा प्रथम विश्वासच बसेना. परंतु दुर्दैवानें ती खरी असल्याचें आढळून आलें. कै. राजकुमारांचें गुणवर्णन आतांपर्यंत नामदार सभासदांनीं केलें आहेच, त्यापेक्षां मला कांहीं जास्त बोलावयाचें नाहीं. ईश्वरीइच्छेपुढें कांहीं इलाज चालत नाहीं हेंच खरें. आतां सर्व नामदारांनी उभे राहू हा ठराव पास करावा.

( सर्व नामदार उभे राहिले. )

मे. प्रेसिडेंटः—हा ठराव सर्वानुमतें पास झाला आहे असें मी जाहीर करतो. आजच्या सभेचें काम आतां उद्यांक दुपारीं १२ वाजेपर्यंत तहकूब राहील.

( सभेचें काम मंगळवार ता. १६–३–४३ रोजीं दुपारीं १२ वाजेपर्यंत तहकूब राहिलें. )



# दिवस दुसरा.

## मंगळवार तारीख १६ माहे फेब्रुवारी सन १९४३ इ.

### — प्रश्नोत्तरें —

### ना. दत्तात्रय मार्तंड कुलकर्णी, सांगली.

प्रश्न नंबर १— धान्याच्या खरेदीचा व विक्रीचा दर.

१ (अ) शिरहट्टी, मंगळवेढें, ग्वाल्हेर, हैदराबाद वगैरे ठिकाणांहून जें धान्य खरेदी करून आणणेंत आलें त्याचा दर प्रत्येक व्यवहारात काय पडला ? (ब) खर्च किती आला ? (क) त्याची विक्री काय दरानें केली ?

ना. एन्. एम्. जोशीः—(अ) शिरहट्टी व मंगळवेढें वगैरे ठिकाणीं निरनिराळ्या दरानें खरेदी होत आहे. त्यांचा सरसकट दर इतक्यांत निवडण्यासारखा नाहीं. (ब) शिरहट्टी, मंगळवेढ्याविषयीं सांगतां येत नाहीं. ग्वाल्हेर ३-९-०, हैदराबाद ज्वारी ३-९-० व हैदराबाद बाजरी ३-८-०. (क) ग्वाल्हेर ज्वारी पोत्यास १४-१५-, हैदराबाद ज्वारी पोत्यास १४-१९-, हैदराबाद बाजरी पोत्यास १९-२०-.

शिरहट्टी, मंगळवेढें येथील धान्याची विक्री अद्याप केली नाहीं.

ना म. फ. डबालीः—शिरहट्टीस किती पोतीं जोंधळा खरेदी केला व सांगलीस किती पोतीं आणला ?

ना. एन्. एम्. जोशीः—एक हजार पोतीं खरेदी केली होती. त्यापैकीं ३५० पोतीं सांगलीस आलीं आहेत.

ना. म. फ. डबालीः—दर काय पडला ?

ना. एन्. एम्. जोशीः—१२ रुपये.

ना. म. फ. डबालीः—खर्च किती आला ?

ना. द. ब. कुलकर्णीः—आतांच निश्चितपणें सांगतां येणार नाहीं.

ना. रा. ग. करंदीकरः—माहिती मिळण्याकरितांच प्रश्न विचारलेले असतात; माहिती सांगण्यास काय हरकत आहे.

ना. स. ग. फडकेः—I appeal to the Chair. “काय दरानें खरेदी केली ?” असा प्रश्न आहे. मला वाटतें, हवी असलेल्या माहितीसंबंधीं पत्रक तयार करून तें टेबलावर ठेवणें जरूर होतें.

ना. म. फ. डबाली:—कोणत्या महिन्यांत किती धान्य खरेदी करण्यांत आलें ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—माहिती पत्रक टेबलावर ठेविलें आहे. ( परिशिष्ट ३ ) धान्य खरेदीचें काम चीप ग्रेन शॉपकडून झालेलें आहे. प्रत्येक पोत्याचा खरेदीचा दर परिस्थितीच्या मानानें १७ ते २१ रुपये व जास्तींत जास्त २३ रु. पर्यंत आला असावा. खर्च अदमासें दर पोत्यास २८।२ ते ३ रु. पर्यंत येत असतो असें वाटतें; कारण चीप ग्रेन शॉपचे हिशोब आतां माझेजवळ नाहींत व त्यामुळें प्रत्येक पोत्यास आणणावळीचा खर्च काय आला हें नक्की सांगतां येत नाहीं.

ना. म. फ. डबाली:— हें धान्य कसें विकलें व कसें पडलें ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—चीप ग्रेन शॉपकडे माहिती विचारली पाहिजे.

ना. रा. ग. करंदीकर:—जोंधळा कसा विकला हें तरी सांगतां येईल काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—आतां माझेपाशीं अकाउंट्स् नाहींत.

ना. के. गो. कुलकर्णी:—निदान नफा घेऊन विकला हें तरी खरें काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—ही माहिती माझेपेक्षां चीप ग्रेन शॉपलाच अधिक आहे.

ना. द. मा. कुलकर्णी:—मंगळवेढ्याची खरेदी काय भावानें चालू आहे ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—जुनी खरेदी सात मापट्यांनीं व नवी खरेदी आठ मापट्यांनीं. अलीकडे ८-१० दिवसांत याहूनहि महाग झाल्याचें समजतें.

ना. रा. ग. करंदीकर:—ग्वाल्हेर, हैदराबाद येथील जोंधळ्याचे व बाजरीचे विक्रीचे दर १४-१९-० व १९-२०-० असें सांगणेंत आले आहेत. तालुक्यासहि त्याच भावानें माल विकला जातो काय ?

ना. एन्. एम्. जोशी:—तालुक्याचे ठिकाणीं माल पोंचविण्याचे कामीं जो खर्च येतो तो खर्च धान्याच्या किंमतीवर आकारून जो दर होईल त्या दरानें तेथें मालाची विक्री केली जाते. दूरच्या ठिकाणीं हा दर १९ तें २० रुपयेहि पडतो. गांव दूर असल्यास तेथपर्यंत तें नेण्यास येणारा खर्च त्या गांवास सोसावा लागतो. सर्व ठिकाणीं सारख्याच दरानें धान्य विकलें जावें असें सरकारचें धोरण आहे. परंतु आतांच सांगितलेल्या कारणानें कांहीं ठिकाणीं तें नाइलाजानें महागाईनें विकावें लागतें.

ना. द. मा कुलकर्णी:—मी माझा प्रश्न नंबर २ विचारत नाहीं.

ना. प्रेसिडेंट:—ठीक आहे. पुढचा प्रश्न.

प्र. न. ३ सेंट्रल स्टोअरकरतां धान्यखरेदी.

ना. द. मा. कुलकर्णी:—सांगली संस्थानच्या हद्दींतून आजपर्यंत सेंट्रल स्टोअरकरतां किती धान्य खरेदी करण्यात आलें आहे ?

मा. एन्. एम्. जोशी:—सेंट्रल स्टोअरकरतांच केवळ धान्य खरेदी केलें जात नाहीं. संस्थानांतील सर्व भागांच्या गरजा भागविण्यासाठीं धान्य खरेदी केलें जातें. आतांपर्यंत शिरहट्टीहून १००० पोतीं ज्वारी, मंगळवेढ्यहून १४०० पोती ज्वारी, कुचीहून ३०० पोती ज्वारी व बाजरी, मिरजप्रांतांतून ६०० पोतीं ज्वारी, शहापूरहून १९०० पोती तांदूळ व ११०० पोती भात असें धान्य खरेदी करणेंत आलें आहे.

प्र. नं. ४ शहापूर तालुक्यांतील भात

ना. द. मा. कुलकर्णी:—(अ) शहापूर तालुक्यांत यंदा किती भात पिकलें व दरबारनें सेंट्रल स्टोअरकरतां किती खरेदी केलें ? (ब) तालुकानिहाय तांदूळ पुरविणेची दरबारनें आजपर्यंत काय व्यवस्था केली ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—(अ) शहापूर तालुक्यांत यंदा अंदाजी दोन लाख बंगाली मण इतकें भाताचें पीक झालें आहे. सेंट्रल स्टोअरकरतां जानेवारी १९४३ अखेर ७७८ पोतीं भात व १७१४ पोतीं तांदूळ खरेदी केलें. (ब) शिरहट्टी, तेरदळ, कुची व मंगळवेढें ह्या तालुक्यांस शहापूरहून प्रत्येकी १००–१०० पोती तांदूळ पाठविणेंत आला व सांगलीस १९०० पोतीं पाठविणेंत आला.

ना. के. गो. कुलकर्णी :—तेरदळास तांदूळ पाठविला होता काय? असल्यास किती पोतीं ?

ना. ह. ब. कुलकर्णी :—होय. परमिट देऊन पूर्वी बेझवाडा तांदूळ पाठविला होता. २०० पोतीं पाठविला होता.

ना. के. गो. कुलकर्णी :—त्याखेरीज स्टोअरमधून पाठविला आहे काय?

ना. ह. ब. कुलकर्णी :—हल्लीं स्टोअरमधून जातो.

ना. के. गो. कुलकर्णी :—दर काय?

ना. ह. ब. कुलकर्णी :—धान्य खरेदीसाठीं सरकारी व बिनसरकारी अशी एक सात सभासदांची कमिटी नेमणेंत आलेली आहे. धान्याच्या खरेदीचा दर व त्यावरील इतर आलेला खर्च हे पाहून ही कमिटी दर ठरविते.

ना. ह. ना. पटवर्धन:—तालुक्याला वेळेवर धान्य मिळतें कां?

ना. ह. ब. कुलकर्णी:—आह्मी आमच्याकडून करणेची ती सर्व व्यवस्था करतो; परंतु मध्येंच ब्रिटिश मुलखांत कांहीं अगर रेल्वेसंबंधीं कांहीं अडचण उद्भवली तर नाइलाज होतो. एकदां येथून मंगळवेढ्यास पाठविलेले तांदूळ पंढरपूर स्टेशनवर पंधरा दिवस अडकून पडले होते व त्यानंतर ते मंगळवेढ्यास जाऊं शकले.

ना. के. गो. कुलकर्णी:—धान्य विक्रीचे दर सर्व ठिकाणीं सारखेच आहेत काय?

ना. ह. ब. कुलकर्णी:—वहातुकीचा व बाकी कांहीं येणारा खर्च मालाच्या किंमती-मधून वगळला तर दर सारखेच पडतात.

ना. रा. ग. करंदीकर:—मंगळवेढ्यास तांदूळ पोंचला आहे काय?

ना. एन्.एम्. जोशी:—होय

ना. आ. आ. मुळे:—सांगली शहरासाठीं किती पोतीं व मिरजप्रांत तालुक्यासाठीं किती पोतीं तांदूळ ठेवण्यांत आला आहे

ना. ह. ब. कुलकर्णी:—फेब्रुवारी १९४३ पर्यंत १९०० पोती सांगलीस आणविलीं असल्याचें सर्वांशीं मी सांगितलेंच आहे. तीं सांगली व मिरजप्रांत ह्या दोन्हींच्या उपयोगाकरितां आहेत.

ना. आ. आ. मुळे:—त्यांत फोड करतां येईल कां?

ना. एन्. एम्. जोशी:—सांगली शहरास ७९ पोतीं व मिरजप्रांत तालुक्यास ९० पोतीं देण्यांत आलेलीं आहेत. सेंट्रलस्टोअरकडून रिलीफ शॉपला ३०० पोती दिलीं गेलीं आहेत. फेब्रुवारीकरतां जास्त तांदूळ आलेला आहे व परिस्थितीपाहून तो डिस्ट्रिब्यूट करण्यांत येईल.

ना. के. गो. कुलकर्णी:—तालुक्यास माल पाठविल्यानंतर त्याचें डिस्ट्रिब्यूशन व त्यावर देखरेख कोणाकडे असतें?

ना. एन्. एम् जोशी:—मामलेदाराकडे

ना. के. गो. कुलकर्णी:—मामलेदार काम करतात त्यांवर आपली देखरेख असते काय?

ना. एन्. एम्. जोशी:—सर्वसाधारण असते.

ना. ना. रं. कुलकर्णी:—अमूक दरानें माल घेतलेला आहे व अमूक दरानें विकावा असें तालुका-कमिटीला कळविलेलें असतें काय?

ना. ह. ब. कुलकर्णी:—होय; असतें.

ना' ना. रं. कुलकर्णी:—मग तें आह्मांस सांगितलें बात नाहीं?

ना. द. ब कुलकर्णी:—तसें सांगणवद्दल आम्ही त्यांना कळवूं.

प्र. नं. ५— धान्यखरेदीस येणारा खर्च

ना. द. मा. कुलकर्णी:—१ (अ) डेप्युटी डायरेक्टर ऑफ् सिव्हिल सप्लाइज यांचा धान्यखरेदी करणेच्या बाबतींत फिरतीभत्ता किती झाला? (ब) त्यांनीं किती धान्य विकत घेतलें? (क) सदरची खरेदी ज्या त्या तालुक्यांतील जबाबदार अंमलदारांकडून झाली नसती असें दरबारास वाटतें काय? (ड) तालुक्याच्या अधिकाऱ्यांस जादा भत्ता देऊन त्यांजकडे हें काम सोंपविलें असतें तर दरबारचा खर्च वांचला नसता काय?

ना. द. ब. कुलकर्णी:—(अ) धान्य खरेदीकरितां व डिपॉर्टमेंटच्या इतर कामाकरितां सप्टेंबर १९४२ ते डिसेंबर १९४२ अखेर रु. ३८।८।९।८६ भत्ता खर्च पडला आहे. (ब) सांगली, शहापूर, तेरदळ, रबकवी, येथील रिलीफ शॉप्सकरतां शिरहट्टी व सावनूर ह्या भागांतून त्यांनीं ६२०० पोती जोंधळे व १०० पोतीं गहूं; मंगळवेढ्याहून ४०० पोती ज्वारी सांगली रिलीफ शॉपकरतां शहापूराहून १९९० पोतीं तांदूळ व ११०० पोतीं भात; सेंट्रल स्टोअरकरतां कुची तालुक्यांतून ३०० पोती ज्वारी व बाजरी २९ पोती तूर, मंगळवेढ्याहून १४७२ पोतीं ज्वारी, मुंबईहून ५०० पोती मटकी व १०० पोती चवळी, गुडगेरीहून ६०० पोती हुलगे, पंढरपुराहून १०० पोती कुळीथ, हुबळीहून १०० पोतीं मूग व ३० पोतीं राळा गुडगेरीहून याप्रमाणें धान्य खरेदी झालें आहे व आणखीहि होत आहे. (क) व (ड) हे पालिसीचे प्रश्न आहेत.

ना. आ. आ. मुळे:—ग्वाल्हेर येथें धान्य खरेदी करण्यास कोण गेले होते?

ना. एन्. एम्. जोशी:—सरकारचे एक विश्वस्त अधिकारी.

ना. आ. आ. मुळे:—त्यांचे नांव कळेल काय?

ना. एन्. एम्. जोशी:—मे. गोविंद जनार्दन कुंटे.

ना. सौ. इंदिराबाई साठ्ये:—धान्य खरेदीच्या कामीं जे अधिकारी नेमलेले असतात त्यांना ह्या कामाचा प्रत्यक्ष अनुभव असतो काय?

ना. द. ब. कुलकर्णी:—सरकारांतून नेमणूक झाली आहे त्याअर्थी असावा असें वाटतें. (हंशा)

ना. आ. आ. मुळे:—धान्यखरेदीच्या कामीं एखाद्या तज्ञ व्यापाऱ्याचा सल्ला घेतला होता काय?

ना. द. ब. कुलकर्णी:—त्यांच्या सल्यानेंच खरेदीचे व्यवहार झालेले आहेत!

ना. ना. रं. कुलकर्णी:—खरेदी करतांना मालाची क्वॉलिटि पाहून खरेदी करतात की वाटेल तशी करतात ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—क्वॉलिटीहि पाहिली जाते व भावहि पाहिले जातात.

ना. ना. रं. कुलकर्णी:—खरेदीचे नियम पूर्णपणें पाळले जातात काय ?

ना. प्रेसिडेंट:—प्रश्न व उपप्रश्न विचारण्याच्या बाबतींत नामदार सभासदांचा थोडासा गैरसमज झालेला दिसतो; याकरितां असेम्ब्लीसंबंधी नियम ४२ कडे मी ना. चें लक्ष वेधूं इच्छितो. ह्या नियमांत " A question may be asked for the purpose of obtaining information or suggesting a course of action on a matter of public concern ... " असें म्हटलें आहे. प्रत्येक प्रश्नावर जर वादविवाद होऊं लागला तर त्यांतच सर्व वेळ खर्च होईल व मुख्य प्रश्न तसेच राहून जातील. अधिकाऱ्यांना कामाचा अनुभव होता की नाहीं, व्यापाऱ्यांचा सल्ला घेतला की नाहीं, अशा तऱ्हेचे गव्हर्मेंटच्या पॉलिसीचे प्रश्न विचारून निष्कारण कालाचा अपव्यय होतो. तेव्हां मूळ प्रश्नास दिलेल्या उत्तरावरून जेथें त्यासंबंधी विशेष बोध होणार नाहीं अशाच ठिकाणीं केवळ स्पष्टीकरणाकरतांच म्हणून व मूळ प्रश्नामधूनच उत्पन्न होणारे असे उपप्रश्न नामदारांनीं विचारावेत.

## ना. बाबासाहेब ज्ञानोजीराव शिंदे, मळेवाडी.

प्र. नं. १— बीबियाणांकरितां रक्कम

ना. बा. ज्ञा. शिंदे:—१ (अ) सांगली को. के. बँकेनें बी बियाणाकरितां किती रक्कम मंजूर केली आहे ? (ब) किती सोसायट्यांना सदर रक्कम देण्याचें ठरविलें आहे ? (क) किती सोसायट्यांना दिली आहे ? (ड) पुढील वर्षाकरितां बीबियाणांची कांहीं तजवीज बँक करणार आहे काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—(अ) ६०७०मंजूर केले आहेत. 'अ' वर्ग सोसायटीस ४०० रु., 'ब' वर्ग सोसायटीस ३०० रु., 'क' वर्ग सोसायटीस २०० रु., व 'ड' वर्ग सोसायटीस १०० रुपये याप्रमाणें ज्याज्या सोसायटीकडून मागणी येईल त्यांना बँकेनें रक्कम मंजूर केली आहे. (ब) सर्व सोसायट्यांना वरील नियमाप्रमाणें. (क) ११ सोसायट्यांना अदमासें १७११ पर्यंत रक्कम दिली आहे. (ड) होय; याचप्रमाणें करणेबद्दल खात्याकडून बँकेस सूचना देण्यांत येईल.

ना. बा. ज्ञा. शिंदे:—अकराच सोसायट्यांना रकमा दिल्या; बाकीच्या सोसायट्यांना कां दिल्या नाहींत ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—त्यांनाहि कळविलें होतें; परंतु त्यांनीं रक्कम नेली नाहीं.

ना. बा. श. पाचवरे:—कां ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—त्यांना ज्यावेळीं जरूरी लागेल त्यावेळीं त्या ती रकम नेतील.

ना. बा. श. पाचवरे:—त्या रकमेवर व्याज आकारलें जातें अशी कांहीं तक्रार आहे काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—अशा तक्रारी आलेल्या नाहींत.

प्रश्न नंबर २— सब्-रिलीफ् शॉप्सना को. के. बँकेचें भांडवल.

ना. बा. ज्ञा. शिंदे:—सब्-रिलीफ शॉप्सपैकीं किती शॉप्सनां को. के बँकेनें भांडवल पुरविलें आहे ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—आतांपर्यंत बँकेनें २२ सोसायट्यांना ६६०० रु. मंजूर केले आहेत. त्यांपैकीं १० सोसायट्यांनीं २९०० रु. प्रत्यक्ष नेले आहेत.

प्र. नं. ३— रॉकेल पुरवठा.

ना. बा. ज्ञा. शिंदे:—(अ) रॉकेलचा पुरवठा जनतेच्या गरजेच्या मानानें अपुरा आहे हें सरकारचे नजरेस आलें आहे काय ? (ब) असल्यास भरपूर पुरवठा करण्याची कांहीं योजना आहे काय ?

ना. शा. रा. बेतमंगलकर:—(अ) होय (ब) याबद्दल आम्ही ऑइल् कंपन्यांशीं पत्रव्यवहार केला होता; परंतु ब्रिटिश गव्हर्मेंटनेंच शेकडा ५० टक्के कपात केली असल्यामुळें ती खटपट यशस्वी झाली नाहीं; म्हणून नाइलाज आहे.

ना. रा. ग. कंरदीकर:—शेकडा ५० टक्के तरी तेलाचा पुरवठा होईल काय ?

ना. शा. रा. बेतमंलकर:—होईल.

प्र. नं. ४— को. सु. युनियन्मधील नॉमिनेशन्.

(अ) सांगली स्टेट को. सुपरवायझिंग युनिअन्मध्यें सरकारकडून कितीजणांना नॉमिनेट केलें जातें ? (ब) हें नॉमिनेशन् कोणाकडून होतें ? (क) गेल्या चार वर्षांत कोकाकोणास नॉमिनेट करणेंत आलें आहे ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—(अ) को. सु. यु. च्या उपनियमांप्रमाणें दहा सभासदांचें बोर्ड असून त्यांपैकीं ex-officio nominated तीन व रजिस्ट्रार यांनीं निवडलेला एक असे चार. (ब) सरकारकडून. (क) मि. रेटरेकर वकील.

## ना. रामचंद्र गणेश करंदीकर, मंगळवेढें.

प्रश्न नंबर १— मंगळवेढें तालुक्यांतील धान्यसांठा.

ना. रा. ग. करंदीकर:—(अ) मंगळवेढें तालुक्यांत ता. १ फेब्रुवारीपर्यंत जुन्या धान्याचा सांठा लोकांकडे किती पोतीं आहे ? (ब) मंगळवेढें तालुक्यांत बाजरी, जोंधळा, करड, हरभरा, तूर, वगैरे नवीन धान्य या वर्षी किती पोतीं प्रत्येकीं येईल ? (क) दरवर्षी सर्वसाधारण नवीन धान्य वर लिहिलेलें, किती पोतीं येत असतें ? (ड) तालुक्यांतील सर्व रयतांना वर्षांत बाजरी, जोंधळा, करडा, हरबरा, तूर हें धान्य किती पोतीं लागतें ? (इ) सरकारनीं ता. ७ फेब्रुवारीपर्यंत किती पोतीं धान्य व कोणतें व किती रुपयांचें खरेदी केलें आहे ? (फ) सरकारनीं सांठा केलेलें धान्य मंगळवेढें तालुक्याबाहेर तालुक्यांतील नामदार सभासद व प्रतिष्ठित नागरिक यांचे संमतीशिवाय सरकार हलविणार नाहीं असें सरकार जाहीर करील काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—(अ) अदमासें ५००० पोतीं असावा असें वाटतें; तथापि नक्की आंकडा समजून आला नाहीं. (ब) माहिती मागविली आहे, अद्याप आली नाहीं. (क) युद्ध सुरू झाल्यापासून हा प्रश्न उपस्थित झाला आहे. यापूर्वी असा प्रश्न उत्पन्न झाला नव्हता व त्यामुळें तशी माहिती उपलब्ध नाहीं. (ड) हल्लींच्या युद्धजन्य परिस्थितींत या बाबतींत हिंदुस्थान सरकारनें स्केल ठरविलें आहे त्याप्रमाणें म्हणजे माणशीं पांच बंगाली मण याप्रमाणें, मंगळवेढें तालुक्याची लोकसंख्या ३१९७८ आहे तेव्हां त्या मानानें, धान्य लागेल (इ) सुमारें १३०० पोतीं जोंधळा खरेदी केला आहे. (फ) हा सरकारचा पॉलिसीचा प्रश्न आहे.

ना. रा. ग. करंदीकर:—कोणतें धान्य कोणापाशीं किती आहे ही माहिती अद्याप आली नाहीं ती उद्यापर्यंत येईल काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—माहिती मागविली आहे. येईल बहुतेक.

ना. रा. ग. करंदीकर:—आजच तेथें पोस्टांत टाकली असेल तर उद्या येथें येईल. तेव्हां नक्की देईल की नाहीं ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—ही माहिती अशी आहे कीं ती प्रत्येक गांवाकडून व्यक्तिशः इतकी माहिती आणऊन, त्यावरून पत्रक तयार करून पाठवावें लागतें. म्हणून त्यास विलंब लागेल कदाचित्.

ना. ह. ना. पटवर्धन:—गेल्या सालचे आंकडे तरी सांगतां येतील कां ?

ना. ह. ब. कुलकर्णी:—रेकॉर्ड ठेविलेलें नसल्यानें तशी माहिती नाहीं.

ना. रा. ग. करंदीकर:—१३०० पोतीं जोंधळ्यास किती किंमत पडली ?

ना. आ. आ. मुळे:—निदान कायदरानें खरेदी केला तें सांगितलें तरी चालेल.

ना. ह. ब. कुलकर्णी:—जुना ७ मापय्यांनीं व नवा ८ मापय्यांनी.

प्र. नं. २— मंगळवेढ्यास दुष्काळी कामें सुरू करणें.

ना. रा. ग. करंदीकर:—(अ) मंगळवेढें तालुक्यांत दुष्काळी कामें सरकार तावडतोब सुरू करणार आहे काय ? (ब) तालुक्यांतील रयतातर्फे म्हणून कांहीं दुष्काळी कामें सुरू करण्याबद्दल हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांना विनंति करण्यांत आली आहे काय ? (क) मंगळवेढें येथील कृष्णा तलाव व कुमार तलाव यांचे गाळ काढण्याचें व पाण्याचा सांठा वाढविण्याचें काम तावडतोब सुरू करण्यांत येईल काय.

ना. शा. रा. बेटमंगलकर:— (अ) यासंबंधी विचार चालू आहे. मामलेदार यांचेकडून माहिती मागविली आहे. माहिती आल्यानंतर विचार करून काय करणेंचें ते ठरविणार आहोंत. (ब) अर्ज आले आहेत. मामलेदारांचेकडून या बाबतींत रिपोर्ट न आल्यामुळें कांहीं तजवीज झालेली नाहीं.

ना. रा. सा. भावे:— (क) तलावांची capacity भरपूर आहे. भरणें न भरणें पावसावर अवलंबून असतें. सांठा भरपूर असल्यानें त्याबावत विचार करण्याचें कारण नाहीं.

ना. रा. ग. करंदीकर:— दुष्काळी कामांबद्दल विचार होईल काय ?

ना. शा. रा. बेटमंगलकर:— मामलेदारांचा रिपोर्ट आल्यानंतर होईल.

ना. म. ह. गोडबोले:— दुष्काळी कामें सुरू करण्याबद्दल अर्ज येऊन किती दिवस झाले ?

ना. शा. रा. बेटमंगलकर:— १५--२० दिवस झाले.

प्रश्न नं. ३— मंगळवेढें तालुक्यांतील आणेवारी व सारातहकुबी.

ना. रा. ग. करंदीकर:— (अ) मंगळवेढें तालुक्यांतील कोणत्या पिकाची आणेवारी चार ते सहा आणे या दरम्यान झाली आहे ? (ब) सहा आणे आणेवारी असलेली खेडीं किती व त्यांची नांवें कोणतीं ? (क) चार आण्यांपेक्षां कमी आणेवारी कोणत्या खेड्यांतील पिकांची झाली आहे ? (ड) १३५२ फसलीचे सारा तहकूबी अगर सूट याबद्दल सरकारनें कांहीं हुकूम दिले आहेत काय ? (इ) नसल्यास सरकार याबद्दल विचार करीत आहे काय ? (फ) मंगळवेढें तालुक्यांतील किती खेड्यांतील लोकांचे सारातहकूबी अथवा सूट मिळण्याबद्दल अर्ज आले आहेत ? त्या खेड्यांचीं नांवें कोणती ? (ज) फसली सन १३६० चा आजपर्यंत तहकूब असलेला सारा सूट देण्यांत येईल काय ?

ना. शा. रा. बेटमंगलकर:— (अ) देगांव, मल्लेवाडी, बोराळें, मरवडे, तळसंगी, (ब) मंगळवेढें, अकोले, धर्मगांव, मुंडेवाडी, शिद्दापूर, तांडोर, लोणी, गोण्याळ, लच्याण, सलगरी, सिदनकेरी, हिवरगांव, हुलजती, शिरसी, जुनोनी, डोंगरगांव, गोणेवाडी, नंदेश्वर, खोमनाळ, माचिहाळ, खडकी, ढवळज, अनवली, चळ्हे, नंदुर. (क) अरळी, माळेवाडी, (ड) अद्याप नाहीं. (इ) उद्भवत नाहीं. (फ) होय. देगांव, अरळी, खोमनाळ, बोराळे, नंदेश्वर, मरवडे. (ज) नाहीं.

ना. रा. ग. करंदीकर:— १३९२ फसलीचा सारा वसूल झाला आहे काय ?

ना. शा. रा. बेतमंगलकर:— खरीप झाला आहे.

ना. ना. रं. कुलकर्णी:— आणेवारीसंबंधी रिपोर्ट केव्हां पावेत याबद्दल कांहीं नियम आहेत काय ?

ना. शा. रा. बेतमंगलकर:— होय आहेत. खरीपाचा जानेवारीत व रब्बीचा मार्चमध्यें.

ना. स. ग. फडके:— I rise to a point of order. In the last session, a request was made that the answers should be printed below the questions. This suggestion was made with a view to save the time, which is unnecessarily wasted in obtaining the answers. It was also promised at that time that this suggestion will be brought into effect, but unfortunately it is not carried out. I hope, therefore, that at the next session at least, answers will be printed.

आतां जी दहा गांवचीं नांवें वाचणेंत आलीं तीं सर्व ध्यानींहि राहिलीं नाहींत.

ना. प्रेसिडेंट:— कदाचित् कागदाच्या टंचाईमुळें व दुर्मिळतेमुळें उत्तरें छापलीं नसावीत.

ना. रा. ग. करंदीकर:—पुन्हां एकदां १० गांवांचीं नांवें वाचल्यास बरें होईल.

ना. शा. रा. बेटमंगलकर:— ठीक आहे. 'देवगांव, अरळी, खोमनाळ, बोराळें, नंदेश्वर, मरवडे, माळेवाडी, तळसंगी, नंदुर, ढवळस.

---

ना. प्रेसिडेंट:— प्रश्नोत्तराकरितां ठरविणेंत आलेली वेळ संपली आहे. आतां आपण कामास सुरवात करूं.

# बिन सरकारी ठराव.

ना. स. ग. फडके:—सन्माम्य अध्यक्षमहाराज. आपल्या परवानगीनें मी सभागृहापुढें पुढीलप्रमाणें ठराव मांडत आहे—

" सांगली दरबारनें धान्यपुरवठा व नियंत्रण या दोन्ही बाबतींत जें धोरण आतांपर्यंत स्वीकारलें आहे तें अत्यंत तिरकें समाधानकारक व लोकहितसंवर्धक नाहीं व त्यापासून गरजू प्रजाजनांस योग्य दरांत व प्रमाणांत मिळावें तसें धान्य मिळू शकत नाहीं. यास्तव लोकमतास प्राधान्य देऊन व लोकप्रतिनिधींच्या सल्यानें चालू धोरणांत आमूलाग्र बदल करण्यांत येऊन पुढील सूचनेप्रमाणें धोरण आंखण्यांत यावें अशी ह्या सभेची सांगली दरबारास नम्र शिफारस आहे.

(अ) सांगली येथें एक मध्यवर्ती समिती व तालुका व महालनिहाय पोटसमित्या नेमण्यांत याव्यात. त्यांत सरकारी अधिकारी, लेजिस्लेटिव्ह असेंब्ली, नगरपालिका, लोकलबोर्ड, शेतकीसंघ यांचे सभासद व इतर सन्माम्य नागरिक यांचा समावेश व्हावा;

(ब) ह्या समित्यांनीं आपापल्या भागांतील धान्याचा सांठा व जरूरी वगैरेसंबंधीं सर्व उपयुक्त माहिती मिळवून ती मध्यवर्ती समितीस पुरवावी. सांठा व विभागणीची व्यवस्था यापुढें करणेंत यावी;

(क) वरील मध्यवर्ती समितीनें संस्थानांतील सर्व भागांत जरूरीप्रमाणें बाहेरून धान्य वगैरे आणवून त्याचा पुरवठा करणेची व्यवस्था करावी;

(ड) हें करण्याच्या कामीं सांगली दरबारनें हल्लींप्रमाणें जादा व स्वतंत्र अधिकारी वगैरे नेमण्याचा खर्च न करतां संस्थानच्या आहेत ह्या मुलकी अधिकाऱ्यांना जरूर तर जादा अलाउन्स देऊन व बिनसरकारी प्रजाजनांचें विनामूल्य व स्वयंस्फूर्त सहकार्य घेऊन धान्यपुरवठ्याचें काम यापुढें करण्यांत यावें. "

असा हा ठराव आहे. ह्या ठरावाचे दोन भाग आहेत. त्यांतील पहिला भाग हाच मुख्य व महत्वाचा आहे. त्यामध्यें सांगली दरबारनें धान्यपुरवठा व नियंत्रण या बाबतींत हल्लीं अंगिकारलेलें दिरंगाईचें व प्रतिगामी धोरण बदलणेबद्दल सरकारास शिफारस करण्यांत आलेली आहे. ठरावांतील दुसऱ्या भागांत सरकारनें नवीन कोणतें धोरण स्वीकारावें व तें

कमें अमलांत आणावें यासंबंधीं कांहीं विधायक सूचना केल्या आहेत. धान्याचें दुर्भिक्ष सुरू झालेल्या काळापासून आतांपर्यंत सांगली संस्थाननें आपल्या प्रजेस धान्यपुरवठ्यासंबंधीं जे जे प्रयत्न केले आहेत ते सर्व नामदार सभासदांच्या नजरेसमोर आहेतच. ते प्रयत्न ह्मणजे सांगलीस व तालुक्याचे ठिकाणीं स्वस्त धान्याचीं दुकानें उघडून त्यांच्यामार्फत लोकांस सवलतीच्या दरानें धान्य मिळण्याची केलेली सोय होय. सांगली येथें दरबारनें एक स्वस्त धान्याचें दुकान काढून तें लोकप्रतिनिधींच्यामार्फत चालविलें होतें असें मानलें पाहिजे. या दुकानच्या खरेदीविक्रीसंबंधीं कामकाज पहाण्यासाठीं एक बिनसरकारी सभासदांचें बहुमत असलेली कमिटी नेमण्यांत आली होती. याप्रमाणें निरनिराळ्या तालुक्यांतहि सब्-कमिटीज् नेमल्या गेल्या असतील, परंतु ही सर्व आंखणी करतेवेळीं असेंब्लीच्या सभासदांचा सल्ला मात्र सरकारनें केव्हांच घेतला नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट होय. असेंब्लीचे सभासद खुद्द सांगली शहरांत बरेच आहेत. त्यांच्यापैकीं कोणाचाहि सल्ला या अडचणींच्यावेळीं सरकारनें घेतला असता तर त्यांनीं तो आनंदानें दिला असता. परंतु तसें आतांपर्यंत झालें नाहीं. हें दुकान मुळांत उघडलें त्यावेळीं तें चारदोन महिन्यांपलीकडे जास्त दिवस चालवावें लागेल अशी आमची कल्पना नव्हती. कारण लौकरच पाऊस होऊन सगळीकडे सुबत्ता होईल आणि धान्याच्या पुरवठ्याचा प्रश्न आपोआपच सुटेल अशी आमची अपेक्षा होती. ह्मणून आह्मी या योजनेबद्दल त्यावेळीं फारशी तक्रार केली नाहीं. परंतु पावसानें ओढ धरल्यामुळें आमचे सर्वच अंदाज चुकीचे ठरून धान्यपुरवठ्याचें भीषण स्वरूप असेंच्या तसेंच राहिलें. पुढें हा प्रश्न मोठा विकट असून तो सोडविण्यासाठीं बरेच सायास पडणार आहेत असें दिसून आल्यावरून सरकारनें तो हातीं घेऊन सांगलीस एक सेंट्रल स्टोअर उघडून त्याच्यामार्फत धान्यपुरवठ्याची तजवीज करण्याचें ठरविलें. नंतर डेप्युटी डायरेक्टर ऑफ् सिव्हिल सप्लाइज् नेमले गेले व इतर स्टाफ्चीहि नेमणूक झाली. धान्य खरेदीच्या कामीं डायरेक्टर सांगतील त्याप्रमाणें धान्याची खरेदी केली जाते. धान्य खेडोंपाडीं जाऊन खरेदी करावें लागतें. खेड्यांतील लोकांशीं मामलेदाराचा जितका संबंध येतो तितका या नवीन नेमणेंत आलेल्या अधिकाऱ्यांचा येत नाहीं यामुळें मामलेदारांना धान्य खरेदी करणेबद्दल अधिकार दिले असतां धान्यखरेदीचा प्रश्न जितका सुलभ होईल तितका या अधिकाऱ्यांच्या हुकमाप्रमाणें धान्य खरेदी करावयाचें म्हटलें तर होणार नाहीं. असले हे नवीन अधिकारी अशा वेळीं नेमण्याची खरोखर मुळींच जरूरी नव्हती. धान्यखरेदीच्या कामीं प्रत्यक्ष त्या गांवच्या माणसांचाच ( मॅन् ऑन् दि स्पॉट् ) जास्त उपयोग होतो. नहुन ज्यांचा प्रत्येक तालुक्यांतील जनतेशीं फारसा प्रत्यक्ष संबंध येत नाहीं अशा अधिकाऱ्यांचा व्हावयास हवा तितका उपयोग होत नाहीं.

मामलेदारांनीं जोंधळा सहा मापव्यांनीं मिळतो असें डेप्युटी डायरेक्टर यांना लिहावें व त्यांनीं उलट हुकूम लिहून पाठवावा कीं साडेसहा मापव्यांनीं मिळत असल्यास खरेदी करावा. हा हुकूम मामलेदार यांना येऊन पोचतो न पोचतो तोंच जोंधळ्याची धारण पांचावर यावी; असे किती तरी प्रकार यामुळें घडून आले आहेत. अगदीं नजीकचेंच व ताजें उदाहरण देण्याचें झाल्यास सांगलीवाडीचें देतां येईल कांहीं दिवसापूर्वी तेथें नुकतीच सुगी सुरू झाली होती. त्यावेळी सांगलीवाडीस पांच मापव्यांनीं भरपूर जोधळा मिळण्यासारखा होता, पण आमच्या अधिकारी-वर्गास तो भाव पसंत न पडून त्यांनीं, सहा मापव्यांनीं मिळाला पाहिजे असा आग्रह धरला. तोंपर्यंत जोंधळ्याची धारण चारावर आली. आतां मात्र पडेल त्या भावानें जोंधळा खरेदी करा असें तेच अधिकारी सांगत आहेत. वेळींच लोकांना विश्वासांत घेऊन व मामलेदारांना जास्त अधिकार देऊन धान्य खरेदी झालें असतें तर निदान हल्लीं दिसून येत आहे त्यापेक्षां थोडी निराळी परिस्थिती खास दिसून आली असती व धान्य खरेदी-साठीं आतांचा लागणारा विलंब टळला असता. या करितां मे. दिवाणसाहेब यांनीं या कामीं लक्ष घालणें जरूरीचें आहे. मे. दिवाणसाहेब यांच्याकडे धान्याचे साठे कोठें कोठें आहेत, कोणत्या इसमाकडे व कोणत्या गांवीं धान्य मिळण्याजोगें आहे यासंबंधीं सर्व खरीखुरी इन्फर्मेशन् असणें जरूर आहे. धान्याच्या माहितीचीं रिटर्न्स मामलेदार व इतर अधिकारी यांचेकडून मे. दिवाण-साहेब यांना पुरविली जातात, परंतु हें काम अधिक सुलभ व्हावें यासाठीं व अधिक बरोबर माहिती मिळावी यासाठीं मे. दिवाणसाहेब यांनीं सदर कामीं लोकप्रतिनिधींचें साहाय्य घेणें जरूर आहे. कारण सरकार धान्य कोणत्या कारणासाठीं खरेदी करीत आहे याची कल्पना लोकांना देणें आवश्यक आहे. आणि ही कल्पना त्यांना यथार्थ करवून दिली तर त्यांना सरकारच्या हेतूविषयीं वाटणारी भीति व शंका नाहींशी होऊन ते खुषीनें धान्य अगर धान्यासंबंधीची जरूर ती माहिती सरकारास देण्यास आनंदानें तयार होतील. सरकारी अधिकाऱ्यांपेक्षां लोक-प्रतिनिधींचा संबंध या लोकांशीं जास्त येतो व यामुळें लोकांच्या मनोवृत्ती धान्यखरेदी करण्याच्या कामीं अनुकूल करून घेण्यासाठीं अशा लोकप्रतिनिधींची मदत घेणें सरकारला आवश्यक आहे. आतांपर्यंत धान्य खरेदीच्या कामांत लोकांना विश्वासांत घेणें ह्या महत्वाच्या गोष्टीकडे सरकारनें पूर्ण दुर्लक्ष करून या कामासाठीं एक जादा एस्टॅब्लिशमेंट् नेमून त्यांचे करवीं हें काम करवून घेण्याची फोल अपेक्षा बाळगिली आहे. मला वाटतें, ही जादा एस्टॅब्लिशमेंटची योजना २५-ते ३० हजार रुपयांपर्यंत खर्च लागणारी आहे. इतका खर्च करूनहि आतापर्यंत किती धान्य खरेदी झालें व यापुढेंहि तें कितीसें होईल हें पाहिलें असतां केवळ निराशाच पदरीं येते. धान्य खरेदीकरितां हें जादा एस्टॅब्लिशमेंट् जें नेमण्यांत आलें आहे त्यांत प्रत्येक तालुक्याकरितां एकेक जादा

अव्वल कारकून देणेंत आला आहे. ह्या बादा अव्वल कारकुनांच्या मदतीमुळें कितीशी धान्य खरेदी होईल हें त्यांच्या कामाच्या प्रोग्रेसवरून यथाकाळ दिसून येईल. कारण ह्या नेमणुकीहि तालुक्यांतून ज्या झालेल्या आहेत व त्या दोनतीन महिन्यांच्या मुदतीनेंच झालेल्या आहेत. इतक्या टेंपररी स्वरूपाच्या नेमणुका करून धान्यखरेदीची कामगिरी करण्याची सरकारची जर अपेक्षा होती तर तालुक्यांतील मामलेदार, अव्वल कारकून, शिक्षक वगैरे नोकरलोक यांना बादा मुशाहिरा देऊन ही धान्यखरेदीची कामगिरी यशस्वी रीतीनें करतां आली असती. आपल्या संस्थानांतील कारकून शिक्षक वगैरेंना किती अल्प पगार मिळतो हें सर्व नामदारांना माहित आहेच. शिवाय हल्लींच्या महागाईच्या परिस्थितीमुळें त्या बिचाऱ्यांची जी तारांबळ उडालेली आहे ती त्यांना बादा मुशाहिरा या कामासाठीं देऊन हें काम त्यांच्याकडून करून घेतलें असतें तर खात्रीनें ती थोडी तरी कमी झाली असती; आणि सरकारचें कामहि त्या लोकांनीं मोठ्या उत्साहानें केलें असतें व थोड्या खर्चांत होऊन पैशांतहि बचत झाली असती. आतां धान्य-पुरवठ्यासंबंधीं जी नवी योजना केलेली आहे त्यापैकीं खुद्द सांगली गांवापुरती नगरपालिकेकडे सर्व जबाबदारी सोपवून धान्य वांटणेची तजवीज करणेंत आली आहे. त्याबद्दल मला कांहीं बोलावयाचें नाहीं. कारण सांगली शहर नगरपालिका ही लोकप्रतिनिधियुक्त अशी संस्था आहे आणि ह्या प्रतिनिधिक संस्थेकडे हें काम दिल्यापासून तें किती बिनबोभाट व सुरळीत चाललें आहे हें नामदार सभासदांना माहित आहेच. आतां धान्यखरेदी व विभागणी याबाबत हल्लींची सदोष पद्धती बंद केली तर कोणत्या धर्तीवर नवीन पद्धत सुरू करावी यासंबंधीं माझ्या कल्पने-प्रमाणें मी एक योजना आंखलेली ती मी आतां आपणांस वाचून दाखवितो. ती योजना अशी आहे :—

तालुक्यामध्यें खालीलप्रमाणें एक पांच जणांची समिति असावी:—

१ मामलेदार चेअरमन् ( त्यांच्या गैरहजेरींत स्थायी अव्वल-कारकून. )

२ व ३ असेंब्ली सभासद. ४ लोकलबोर्ड व व्हिलेज समिती. ५ शेतकी संघ.

ह्या सर्व मेंबर्सनीं ऑनररी काम करणेचें आहे. मुख्य काम:—

(१) आपल्या तालुक्यास जरूर असलेलें सर्व धान्य वगैरे स्टोअरमध्यें आणविण्याची तजवीज करणें, व तालुक्यांतील नागरिकांना तें योग्य त्या दरांत पुरविण्याची तजवीज करणें.

(२) स्टोअर्सवर देखरेख ठेऊन वेळोवेळीं तपासणी करून योग्य ते हिशोब ठेवण्या-बद्दल जरूर त्या सूचना करणें.

(३) स्टोअर्सला लागणारा पैसा स्टेटकडून मिळविणें.

(४) तालुक्यांतील लोकसंख्येच्या मानानें रेशनिंग स्कीम तयार करून तिचा अंमल करणें.

(५) स्टोअर्सच्या रक्षणाबाबद जरूर त्या तजविजी करणें.

(६) स्टोअर्सच्या व्यवस्थेबाबत जरूर त्या तजविजी करणें.:—

१ नोकरांची संख्या व जबाबदारी ठरविणें.

२ त्यांच्या नेमणूका करणें.

३ वजनें, मापें, बारदान वगैरे खरेदी करून पुरविणें.

४ पुरवठा अेजन्सी ठरविणें.

५ मालाच्या विक्रीची किंमत ठरविणें.

६ कार्टेज, हमाली, रेलवेफ्रेट्, म्युनिसिपल् टॅक्सीस्, भाण्डवलावरील व्याज व सूटसांडीकरितां २½ p. c. इतक्यांचा विचार करून

७ Weekly returns ( accounts and stocks of grain ) मे. दिवाणसाहेब यांच्याकडे पाठविणें.

तूर्त दरतालुक्यास खालीलप्रमाणें एस्टॅब्लिशमेंट् व इतर खर्च ६ महिन्यांपुरता प्रयोगादाखल ठरविण्यांत येत आहे.:—

१ Manager व स्टोअर कीपर Rs. 15 p. m.-९०

२ क्लार्क व अकौंटंट ( Rs. 10 p. m. )-६०

३ गार्ड व प्यून-६०

४ कॉंटिजन्सीज .... २४०

पोस्टेज, स्टेशनरी, दिवाबत्ती. भाडें ४५०×६=२७००

सदर स्टोअर्सचे मॅनेजर यांनीं मण्डळाच्या चिटणीसाचें काम करून स्टोअर्स चालविण्याचा आहे.

सदर एस्टॅब्लिशमेंटच्या नेमणूका स्टेटच्या हल्लीं असलेल्या ज्या त्या तालुक्यांतील स्टॉफ् पैकीं करणेच्या असून त्यांनीं हें काम out of office hours करण्याचें आहे.

दिवाण ऑफिसांतील कोणाहि एका कारकूनास द. म. १५ रु. प्रमाणें भत्ता देऊन त्याच्याकडून —

१ तालुका व सांगली येथील आठवडा पत्रकें, इतर रिटर्न्स पाहून त्यांची तपासणी करणें व सर्वांचें मिळून एक consolidated पत्रक तयार करून माहिती तयार ठेवणें.

२ निरनिराळ्या स्टोअर्सना लागणारा पैसा पुरविण्याच्या बाबतींत जरूर त्या तजावीजी करणेंकरितां दिवाणसाहेब यांचे हुकूम घेणें.

३ पत्रव्यहार चालविणें व जरूर ती माहिती व पत्रकें मागविणें.

वगैरे कामें करणेची आहेत.

हें केल्यानें स्टोअर्स डिपार्टमेंटवर होणाऱ्या खर्चाची बचत होणार आहे. Internal audit तालुक्यांत स्थायी अव्वल कारकून यांनी जातीनें करावी. त्यांना द. म. ९ ते १० रु. पर्यंत भत्ता द्यावा व सांगली येथील स्टोअर्सच्या ऑडिटची तजवीज ट्रेझरी आफिसरकडून दरमहा होणेची आहे. त्याकरितां तालुक्याप्रमाणेंच येथेंहि काम करणाऱ्या माणसास भत्ता मिळणेचा आहे.

याशिवाय सर्वच स्टोअर्सचें ऑडिट दरतिमाहीस ट्रेझरी ऑफिसर यांच्याकडून इतर गव्हर्मेंट् कमार्शिल् डिपार्टमेंटसप्रमाणें करणेंचें आहे. त्याकरितां आठवडा पत्रकांची एक नक्कल प्रत्येक स्टोअरनें ट्रेझरी ऑफिसरकडे पाठविणेची असून सदर रिटर्न्सबद्दलची माहिती ट्रेझरी ऑफिसरकडून मिळेल. डेप्युटी डि. ऑफ सिव्हिल् सप्लाईज् यांच्याकरितां जो जादा भत्ता व फिरती भत्ता व जादा कारकून या सर्वांची बचत होईल अशी अशी आमची समजूत आहे. डे. डायरेक्टर हे रजिस्ट्रार को. ऑ. सोसायटीज असल्यानें व त्यांच्यावर फिरतीची जबाबदारी असल्यानें त्यांनी याकामीं सर्व प्रकारें मदत करणेची आहे, परंतु त्यांचा जादा भत्ता व फिरती भत्ता यांची आम्हांस गरज दिसत नाहीं. संस्थाननें धान्यपुरवठ्याकरितां जादा अव्वल-कारकुनांच्या नेमणूका केल्या आहेत त्या व त्यांच्याकरितां केलेला खर्च हा जरूर आहे. असें आम्हास वाटतें.

ह्या योजनेप्रमाणें तजवीज करावयाची झाली तर काय खर्च येईल तो मी आतांच सांगितला आहे. माझ्या सांगण्याचा उद्देश असा आहे कीं, शक्यतों नवीन नेमणुका करून भरमसाट खर्च वाढविण्यापेक्षां आहे ह्या एस्टॅब्लिशमेंट्मधूनच नोकर घेऊन, त्यांना फार तर जादा अलाउन्स देऊन, त्यांचेकडूनच हें काम करवून घ्यावें असें माझें म्हणणें आहे. दिवाण ऑफिसमधील संबंधी कारकुनास जर जादा पंधरा रुपये दरमहा अलाउन्स दिला तर आपली नित्य कामें सांभाळून धान्यसांठ्यासंबंधी रिटर्न्स, पत्रव्यवहार वगैरे कामें तो सहज करूं शकेल. तसेंच ट्रेझरी ऑफिसकडून ऑडिटचें काम होवूं शकेल. को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे रजिस्ट्रार ह्यांना हल्लीं भरपूर पगार आहेच, अशा स्थितीत डेप्युटी डायरेक्टरचें

काम पहाण्याबद्दल, त्यांना आणखी जादा ४९ रुपये अलावन्स देऊन धान्यखरेदीच्या एहा लक्ष रकमेवर आणखी हा बोजा लादणें बरोबर होणार नाहीं. आपलें नेहमीचें काम पाहून त्यांना हें जादा काम करावयास सांगण्यास कांहीं हरकत नव्हती. कारण त्यांच्या नेहमीच्या ड्यूटीच्या स्वरूपाचीच पण थोडी निराळ्या प्रकारची अशी ही ड्यूटी आहे. कांहीं काम करण्याऐवजीं फक्त नुसता भत्ता घेऊन आपलें समाधान मानून घेतल्याचें दिसतें. त्यांनीं आतांपर्यंत जें काम केलें असें ह्मणणें आहे तेंहि असावें तितकें भरीव झालेलें नाहीं. लोकांच्या सहकार्यानेंच धान्य खरेदी करण्यासारखीं कामें पार पाडावयाचीं असतात. लोक वश करून घेतले तर पाहिजे ती मदत ते सरकारांस देतात व पाहिजे तीं कामें ते आनंदानें व हौसेनें करतात. हल्लीच्या दंग्याधोप्याची परिस्थिति जेव्हां सगळीकडे निर्माण झाली व सरकारांस ह्या गोष्टीचा पूर्ण बंदोबस्त करणें बरेचसें जड जाऊं लागलें अशा वेळीं खेड्यांतील व शहरांतील चांगली चांगली मंडळी आपखुषीनें रात्रीं अपरात्रीं जाग्रणें करून, गांवांत गस्त घालून ग्राम-संरक्षणाचें काम करूं लागलीं आहेत व पोलिसखात्यासहि ही एक मोठीच मदत झाली आहे व सध्यां होतेहि आहे हें नामदार सभासदांना माहित आहेच. यावरून कांहींहि मोबदल्याची अपेक्षा न बाळगतां लोक आपखुषीनें सरकारशीं सहकार्य करण्यास कसे सिद्ध असतात हें चांगलेंच दिसून येतें, परंतु आमचें सरकार वेळेवर कोणत्याच गोष्टी करीत नाहीं. कारण "विचार व विलंब" हें त्यांचें आवडतें तत्व आहे नोकरलोकांना दरमहा तीन रुपये महागाई भत्ता देऊं केल्याचें उदाहरणच पहाना! तो अशा वेळीं दिला गेला आहे कीं तो दीर्घ काल दिला जाऊं नये. आणखी चारपांच महिन्यांत युद्ध परिस्थिती कदाचित् बदलण्याचीहि चिन्हें सुदैवानें दिसूं लागलीं आहेत. हा महागाईभत्ता आतां जो देणेंत आलेला आहे तोहि इतका अल्प आहे कीं, ह्या सध्याच्या महागाईच्या परिस्थितींत तो आपणांस मिळत आहे असेंसुद्धां नोकरवर्गाला वाटण्याजोगा नाहीं. तथापि तो देऊन सरकारनें आपलें समाधान मानून घेतलें आहे ह्या महागाई भत्याप्रमाणें कांहीं थोड्या लोकांकडून माझ्या योजनेप्रमाणें जादा काम करून घेऊन त्याबद्दल त्यांना मेहेनताना दिला तर हा गरीब वर्ग या महागाईत कांहींसा टिकाव तरी धरूं शकेल. सरकारनें हल्लींची धान्यखरेदीची योजना अंगिकारून बरेच दिवस झाले आहेत. डेप्युटी डायरेक्टर ऑफ सप्लाइज हे गेले पांच सात महिने धान्यखरेदी-साठीं दौरा काढून प्रत्येक तालुक्यास जाऊन आले. त्यांचा फिरतीभत्ता व अलावन्सहि या मुदतींत भरपूर खर्च पडला आहे. मग धान्यखरेदीचे व्यवहार त्या प्रमाणात कां झाले नाहींत? याचें कारण एकच सांगतां येईल कीं, तालुक्याच्या स्थानिक अधिकाऱ्यांच्या हातांत धान्य खरेदी करण्याचे अधिकार नाहींत. डे. डायरेक्टरकडून काय हुकूम येईल इकडे त्यांना डोळे

असून बसावें लागतें व धान्य समोर नजरेस दिसत असूनहि अधिकार नसल्यामुळें त्यांना तें खरेदी करतां येत नाहीं. धान्यखरेदी ही बाब हल्लीं शेअर खरेदीविक्रीप्रमाणें होऊन बसली आहे. शेअर-बाजारांत जसा क्षणोक्षणीं पालट होत असतो तसा धान्याचे बाजारांत हल्लीं दरांत घटकोत्तटकी फरक पडण्याजोगी परिस्थिती आली आहे. हुकूम सुटल्यावेळीं जो भाव असतो तो हुकूम हातांत पडण्याचे वेळीं नसतो, आणि यामुळें Instructions प्रमाणें धान्य-खरेदी करण्याचें कामीं अडचण उत्पन्न होते. दुसरी अडचण अशी कीं, या धान्यखरेदीबाबत होणाऱ्या विलंबामुळें धान्य दुसरीकडे जाण्याचा संभव अधिक. तेरदळास अजून धान्य मिळालें नाहीं हें नामदारांना माहीत आहेच. आजवर मंगळवेढें तालुक्यांतील धान्यखरेदीचें काम ह्मणावें तितकें समाधानकारक नव्हतें, परंतु नुकतीच एका अधिकाऱ्याची तेथें नेमणूक झाल्यापासून जास्त धान्य मिळण्याची आशा उत्पन्न झाली आहे. प्रजापरिषदेच्या कामानिमित्त मी नुकताच मंगळवेढ्यास गेलो होतों त्यावेळीं या इसमांनीं ९००० पोतीं मिळण्याची आपणांस आशा आहे असें सांगितलें. त्यांनीं १४-१९ पोतीं ज्वारी असेंब्लीच्या एका सन्मान्य नामदारांकडून मिळविल्याचें सांगितलें

ना. रा. ग. करंदीकरः—त्यांनीं तीं मिळविलीं नाहींत, मी स्वतः होऊन खुषीनें तीं त्यांना दिलीं आहेत.

ना. स. ग. फडकेः— कां होईना. याबद्दल मी आपला आभारी आहे. यावरून माझ्या ह्मणण्यासच पुष्टी येते. स्थानिक मंडळींनीं सहकार्य दाखविलें तरच हें कार्य तडीस जाणार आहे. स्थानिक अधिकाऱ्याबरोबरच तेथील वजनदार लोकप्रतिनिधींचा समावेश असलेलें एक ॲड्व्हायझरी कौन्सिल् नेमावें अशा प्रकारचा ठराव नुकतांच मंगळवेढें येथें संस्थान प्रजा-परिषदेनें संमत केला आहे. त्यांत त्यांनीं नामदार लो. नि. मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालीं Food Advisory Council नेमावें असें ह्मटलें आहे. नगरपालिका, लोकल्बोर्डस्, शेतकीसंघ अशा संस्थांतील लोकप्रतिनिधी जर ह्या कमिटींत नेमले गेले तर त्यांचा जास्त फायदा आपणांस करून घेतां येईल. सुदैवानें सर्व तालुक्यांत अशा प्रकारच्या संस्था आहेतच. त्यामुळें हें शक्य आहे. आमच्या संस्थानास ज्या त्या बाबतींत ब्रिटिशांचें अनुकरण करण्याची वाईट खोड लागून राहिली आहे. ही खोड आपल्या संस्थानांस खर्चाची होते. ॲब्सेंटी-लॅंड्लॉर्डचें जाचक तत्व येथें लागू केलें आहे पण तें तत्व ब्रिटिशमध्यें मात्र हल्लीं कोठेंहि अस्तित्वांत नाहीं. इतक्या पुरातन काळीं तें तत्व तिकडे लागू होतें कीं आतां त्याची तिकडे कोणास आठवण देखील नाहीं. येथील नवे दिवाणसाहेब यांना प्रथम ही काय भानगड आहे हें समजेचना! पण

आमचें संस्थान असें बस्ताद कीं त्यानें या बुनाट तत्वाचा शोध लावून येथें त्याचा परिणाम-कारक रीतीनें अंमल केला आहे. ब्रिटिश हद्दींमधील सर्वच गोष्टींच्या दाखल्याची येथें आह्मांस जरूरी नाहीं.

तिकडील डोईजड राज्यकारभाराप्रमाणें इकडे डोईजड राज्यकारभार आम्हांस नको आहे. त्याची येथें जरूरी नाहीं. तिकडे 'मिलिटरी नीड्स्' फारच मोठ्या प्रमाणांत आहेत; तशी कांहीं आपल्या संस्थानची स्थिती नाहीं. आपलें उत्पन्न मर्यादितच आहे व खर्चहि पण मर्यादितच आहे. तेव्हां लोकांना विश्वासांत घेऊन धान्यपुरवठ्यासंबंधीं एखादी सुटसुटीत नवी योजना सध्यांच्या पारिस्थितींत आंखली तर ती हल्लींपेक्षां कमी खर्चाची होईल. स्थानिक अधिकारीवर्गाचाहि या दृष्टीनें अधिक उपयोग होईल. कोणता तालुका धान्याच्या दृष्टीनें सर्प्लस् आहे अगर कोणता तालुका डेफिसिट् आहे हें मी कांहीं आतां सांगत नाहीं. ती माहिती दरबारनें काढलीच असेल. सर्प्लस् पुरवठ्याच्या ठिकाणाहून डेफिसिट् पुरवठ्याच्या मुलखांत कांहीं धान्य येवूं शकलें तरच हा प्रश्न सुटणार आहे. या बाबतींत ज्यांची तक्रार आहे त्यांना मला इतकेंच सांगावयाचें आहे, कीं तुमचें लुबाडून ओरबाडून घ्यावें अशी आमची काडीमात्र इच्छा नाहीं. आम्हांला कोणाची भाकरी काढून घ्यावयाची नाहीं आहे. तशी आमची मुळींच वृत्ति नाहीं. आपण सर्वजण बंधू आहोंत या भावनेनें वागण्याची आमची इच्छा आहे. परंतु दुर्दैवानें ही वृत्ति सगळी कडे दिसून येत नाहीं. उदाहरणार्थ, शहापुरास पुरून उरेल इतका तांदूळ असतांना त्यापैकीं थोडा तांदूळ इकडे अगर इतर तालुक्यांत गेला तर याबद्दल शहापूरवाल्यांनीं लटकी ओरड करावी हें योग्य नाहीं. अशी एक गोष्ट सांगतात कीं एकदां बाजारांत पाऊस पडला; त्या वेळीं साखर विकणारानें आपली साखर पावसानें वाहून गेली म्हणून ओरड केली; मीठवाल्यानें आपलें मीठ वाहून गेलें म्हणून ओरड केली; पण त्याबरोबरच नारळ विकणारानेंहि आपले नारळ पावसानें भिजून गेले म्हणून निष्कारण ओरड करावयास सुरवात केली. या उदाहरणाइतकेंच वरील कृत्य हास्यास्पद आहे. नामदार सभासदांना हें माहित असेल कीं, संस्थानचा रहिवासी होणें हें इतरत्र सगळीकडे कसें डिस्क्वालि-होतें तें! त्याला ब्रिटिश हद्दींत नोकरींत प्रवेश मिळत नाहीं, शिक्षणांत सवलती मिळत नाहींत. व इतरहि अनेक अडचणी येतात. याबद्दल संस्थाननें कांहींतरी तजवीज केली पाहिजे. संस्थानांतील धान्य एका तालुक्यांतून दुसऱ्या तालुक्यास पाठविणेचें झाल्यास मध्यें ब्रिटिश हद्द लागते, परंतु तेथील नियंत्रणामुळें हें धान्य आमचें आह्मांस वेळेवर पोंचूं शकत नाहीं. जरूर तर यासंबंधांत दिल्ली येथील कंट्रोलर ऑफ सप्लाइज्कडे पत्रव्यवहार करून धान्याची नेआण यापुढें सत्वर व सुलभ रीतीनें होवूं शकेल अशी तजवीज करविणें जरूरीचें

आहे, व ही तजवीज आपल्या संस्थानने आगोदर केली पाहिजे. आतांच प्रश्नोत्तराचे वेळीं एका नामदारांनीं सांगितलें की मंगळवेढ्याला जाणारीं तांदळाचीं २९० पोतीं पंढरपूर स्टेशनवर पंधरा दिवस 'डीटेन्' करण्यांत आलीं आहेत. हें एकच उदाहरण सर्व परिस्थितीची कल्पना येण्यास पुरेसें आहे. धान्यपुरवठ्याचे बाबतींतील जे भीषण प्रश्न आज आपणां सर्वांस भेडसावीत आहेत त्यांचें स्वरूप थोडें कमी करण्याच्या दृष्टीनें मी मे. दिवाणसाहेब यांना अशी सूचना केली होती कीं, पांढरपेशे व धनिक लोक यांना यांतून वगळावेत. गरीब, मजूर, शेतकरी अशा लोकांची मुख्यत: व प्रथम सोय करावयाची असेल तर असें एक्स्क्ल्यूजन् होणेंच जरूरीचें आहे. व्यापारी लोक, तसेंच दरसाल एकहजारापेक्षां जास्त रुपयांची प्राप्ति असणारे ह्मणजे इन्कमटॅक्स् भरणारे लोक, डॉक्टर्स प्लीडर्स व इतर सुखवस्तु धनिक वर्ग यांना रेशनिंग कार्डवर धान्य मुळींच देऊं नये. अशा रीतीनें हा प्रश्न सोडवावा. सरकारनें लोकांना विश्वासांत घेऊन आपला हेतु त्यांना समजाऊन सांगावा. माझे मित्र ना. करंदीकर यांचें ह्मणणें असें आहे कीं, असें होत नसल्यामुळेंच धान्यखरेदीच्या कामांत सरकारांस अडचणी येतात. तेव्हां या ठरावाच्या बाबतींत दरबारचें धोरण काय आहे' हें ना. लीडर ऑफ दि हाऊस यांनीं अेकदा स्पष्ट जाहीर करावें. म्हणजे या बाबतींत आपोझिशन् पार्टीचे लीडर यांना आपली पोझिशन् क्लीअर करण्यांस सोयीचें होईल व कदाचित् या ठरावावरील चर्चा टाळतां येईल. असो. या माझ्या ठरावास सर्व सर्व सभसदांनीं एकमतानें पाठिंबा द्यावा अशी सर्वांना नम्र विनंती करून मी आपलें हें भाषण संपवितो. Sir I move.

ना. प्रेसिडेंट:—सभागृहापुढें असा ठराव आहे कीं :

" सांगली दरबारनें धान्यपुरवठा व नियंत्रण या दोन्हीं बाबतींत जें धोरण आतांपर्यंत स्वीकारलें आहे तें असावें तितकें समाधानकारक व लोकहितसंवर्धक नाहीं व त्यापासून गरजू प्रजाजनांस योग्य दरांत व प्रमाणांत मिळावें तसें धान्य मिळूं शकत नाहीं यास्तव लोकमतास प्राधान्य देऊन व लोकप्रतिनिधींच्या सल्यानें चालू धोरणांत आमूलाग्र बदल करण्यांत येऊन पुढील सूचनेप्रमाणें धोरण आंखण्यांत यावें अशी ह्या सभेची सांगली 'दरबारांस नम्र शिफारस आहे :—

(अ) सांगली येथें एक मध्यवर्ती समिती व तालुका व महालनिहाय पोटसमित्या नेमण्यांत याव्यात. त्यांत सरकारी अधिकारी, लेजिस्लेटिव्ह असेंब्ली, नगरपालिका, लोकल बोर्ड, शेतकीसंघ यांचे सभासद व इतर सन्मान्य नागरिक यांचा समावेश व्हावा;

(ब) ह्या समित्यांनीं आपापल्या भागांतील धान्याचा सांठा व जरूरी वगैरेसंबंधीं सर्व उपयुक्त माहिती मिळवून ती मध्यवर्ती समितीस पुरवावी. सांठा व विभागणीची व्यवस्था यापुढें करणेंत यावी;

(क) वरील मध्यवर्ती समितीनें संस्थानांतील सर्व भागांत जरुरीप्रमाणें बाहेरून धान्य वगैरे आणवून त्याचा पुरवठा करणेची व्यवस्था करावी;

(ड) हें करण्याच्या कामीं सांगली दरबारनें हल्लींप्रमाणें जादा व स्वतंत्र अधिकारी, वगैरे नेमण्याचा खर्च न करतां संस्थानच्या आहेत ह्या मुल्की अधिकाऱ्यांना जरूर तर जादा अलावन्स देऊन व बिनसरकारी प्रजाजनांचें विनामूल्य व स्वयंस्फूर्त सहकार्य घेऊन धान्य-पुरवठ्याचें काम यापुढें करण्यांत यावें. ”

ना. शा. रा. बेटमंगलकर:—अध्यक्षमहाराज,

ना. फडके यांनीं धान्यपुरवठ्याचे बाबतींतील ठराव सभागृहापुढें मांडून सरकारतर्फे धोरणासंबंधीं खुलासा केला जावा असें सुचविलें आहे. सदर बाबतींत मी दोन शब्द सांगणार आहे. धान्यपुरवठ्याच्या कामाकरितां सरकारनें जो स्टाफ् नेमला आहे तो तितकासा एफीशिअन्ट नाहीं आणि म्हणून या कामासाठीं बिनसरकारी लोकप्रतिनिधींची सरकार जर या कामीं मदत घेईल तर हा प्रश्न अधिक सुलभ रीतीनें सोडवितां येईल असें त्यांनीं सांगितलें. धान्य-पुरवठ्यचा प्रश्न ज्या वेळीं आपल्या संस्थानांत बिकट होऊन बसला त्या वेळीं सरकारनें उघड-लेल्या रिलीफ शॉपूचे चालक मंडळीमध्यें बिनसरकारी सभासदांचीच मेजॉरिटी होती. तथापि ह्या दुकानचें काम कसें चाललें होतें व त्याची मॅनेजमेंट कशी होती व काम कितपत समाधान कारक होत होतें याबद्दल सर्व नामदारांना माहिती आहेच. ना. फडके यांनाहि तें माहित असेलच, कारण सर्व वर्तमानपत्रांना कांहीं दिवस तें एक खाद्यच मिळालेलें होतें. धान्यपुरवठ्याचे कामीं एक समिती नेमली जावी असें त्यांनीं सांगितलें. ही कल्पना ठीक आहे. त्यांतल्या प्रिन्सिपल्स्नाहि सरकारचा विरोध नाहीं. ह्या योजनेनें धान्याचा स्टोअर झाल्यावर त्याची विभा-गणी करण्याचें कामीं खात्रीनें मदत होईल, परंतु धान्य मिळविण्याचें कामीं जितकी मदत हवी आहे तितकी ती होईल की नाहीं याबद्दल शंका वाटते. धान्यपुरवठ्याचे कामीं ना. फडके यांनीं आणखी एका गोष्टीवर भर दिला आहे, आणि ती म्हणजे सरकारनें हल्लीं कांहीं नवीन ऑफिसर्स नेमून या कामासाठीं जी व्यवस्था केली आहे त्याऐवजी तालुक्याचे मामलेदारांनाच कांहीं जादा अलावन्स देऊन त्यांचेकडूनच हें काम करवून घ्यावें, ही होय. परंतु यासंबंधांत मला असें सांगावयाचें आहे कीं, मामलेदार यांना हल्लीं असलेल्या नॉर्मल् ड्यूटीज्च इतक्या आहेत कीं, त्या संभाळून ह्या नवीन कामाकडे त्यांना लक्ष घालणेस सवड होईल कीं नाहीं याबद्दल मला शंका वाटते. इतके दिवस त्यांचेकडे आणेवारी करण्याचें काम होतें. जानेवारी पासून लँड रेव्हिन्यू कलेक्शन्स्चें काम सुरू झालें आहे. त्यांतच त्यांचा सर्व वेळ जातो. ह्या-शिवाय त्यांना फौजदारी, मदत, चालू वहिवाट वगैरे कजे चालविण्याचीं कामें असतात. हीं

सर्व कामें संभाळून धान्याबाबतच्या कामासाठीं स्वतंत्र वेळ त्यांना देतां येईल असें वाटत नाहीं. आणि म्हणूनच या कामासाठीं स्वतंत्र ऑफिसर्सच्या नेमणुका करण्यांत आलेल्या आहेत. लोकांना विश्वासांत घ्यावें, बिनसरकारी सभासदांची एक कमिटी नेमावी वगैरे ना. फडके यांचे ह्मणणें आह्मांस मान्य आहे. व त्याप्रमाणें आह्मी प्रथम प्रयोग करून पाहिलें आहे. कमिटीसंबंधीची योजना चांगली आहे. परंतु ह्या ठरावांतील इतर कांहीं योजना अमलांत आणणें थोडेसें अडचणीचें आहे. उदाहरणार्थ, सध्यां नवीन नेमलेले ऑफिसर्स कमी करून मामलेदार अगर अव्वल कारकून यांनाच जादा अलावन्स् देऊन त्यांचेकडून काम करवून घेणें वगैरे. यांत काय अडचणी आहेत त्या मी आतांच सांगितल्या आहेत. तेव्हां त्या दृष्टीनें ना. फडके यांनीं आपल्या ठरावांत जरूर त्या दुरुस्त्या कराव्यात अशी मी त्यांना विनंति करतो.

ना. के. गो. कुलकर्णी:—हा ठराव मांडण्यांतील मुख्य उद्देश हा आहे कीं, कोणतीहि एखादी योजना अंगिकारून, ती यशस्वी करून, लोकांना धान्य मिळेल अशी कांहीं तरी तजवीज करावी. ठरावांतील इतर किरकोळ गोष्टींवर भर दिलाच पाहिजे असा आमचा आग्रह नाहीं.

ना. प्रेसिडेंट:—ठरावास दुरुस्ती सुचविणेपूर्वीं प्रथम त्यास दुजोरा द्यावा, ह्मणजे तें प्रोसीजरला अनुसरून होईल.

ना. के. गो. कुलकर्णी:—"ह्या ठरावाच्या बाबतींत दरबारचें धोरण काय आहे हें एकदां स्पष्ट जाहीर करावें" असें ना. मूळ्हेरनीं सुचविलें आहे व त्यासंबंधीं ना. लीडर ऑफ् दि हाऊस यांनीं दरबारतर्फे खुलासा केलाच आहे. तरी आतां ह्या ठरावास दुजोरा देऊन पुढील चर्चा होणेस हरकत नाहीं असें मला वाटतें.

ना. द. मा. कुलकर्णी:—ना. फडके यांनीं सभागृहापुढें जो ठराव आणला आहे त्यास मी दुजोरा देतो.

मे. रा. ब. मा. ह. लिमये:—सन्मान्य अध्यक्षमहाराज, मला एक सूचना करावयाची आहे. सभागृहापुढें आलेल्या ठरावांत "यास्तव लोकमतास प्राधान्य देऊन व लोकप्रतिनिधींच्या सहाय्यानें चालू धोरणांत आमूलाग्र बदल करण्यांत येऊन" ह्या वाक्यांतील "आमूलाग्र" हा शब्द ड्रॉप् करून बाकी वाक्य राहणेस हरकत नाहीं. कमिटी नेमण्याची सूचना योग्य आहे. दरबारनें जादा व स्वतंत्र अधिकारी नेमण्याचा खर्च न करणेबद्दल जो मजकूर आहे, तो तितकासा विचारार्ह वाटत नाहीं. समाधानकारक काम होण्याच्या दृष्टीनें हा खर्च करणें

दरबारला आवश्यकच आहे. बाकी, धान्यपुरवठ्याच्या किंवा खरेदीच्या कामीं जनतेला विश्वासांत घ्यावें वगैरेबाबत जी सूचना आहे; ती स्वीकारणेस कांहीं हरकत नाहीं असें वाटतें.

मे. प्रेसिडेंटः—ना. फडके यांनीं सभागृहापुढें जो ठराव मांडला आहे तो दुरुस्त होऊन या सभागृहापुढें पास होण्यासाठीं कोणत्या स्वरूपांत यावा यासंबंधीं गव्हर्मेंट पार्टी व ऑपोझिशन् पार्टी यांचेमध्यें कांहीं तडजोड होणें शक्य असल्याचें दिसतें. ह्मणून दोन्ही पार्टीजचे लीडर्सनीं लॉबीमध्यें जाऊन तडजोडीची दुरुस्ती ठरवावी असें मी त्यांना सुचवितो. दोन्ही लीडर्सचे ठरेपर्यंत ज्या नामदारांना या ठरावावर आपले विचार प्रकट करावयाची इच्छा असेल त्यांनीं ते प्रकट करणेस हरकत नाहीं.

( लीडर्स लॉबीमध्यें विचार विनिमयासाठीं जातात. )

मे. द. मा. कुलकर्णीः—सन्मान्य अध्यक्ष, ना. फडके यांनीं मांडलेल्या ठरावास मी थोड्या वेळापूर्वी पाठिंबा दिलेलाच आहे व आतां मी या ठरावासंबंधानें चार शब्द बोलणार आहे. आपण पाहातच आहांत कीं सांगली संस्थाननें आतांपर्यंत जी धान्यपुरवठ्यासंबंधीं योजना अमलांत आणली आहे ती तितकीशी समाधानकारक नाहीं. संस्थाननें लोकांना दहशत घालणारीं बद्द हुकुमांचीं गॅझिटें छापलीं. याचा परिणाम असा झाला कीं लोकांत सरकारच्या हेतूविषयीं संशय उत्पन्न झाला व लोक सरकारला धान्य विकत देण्यास नाखूष झाले. धान्यपुरवठ्यासंबंधीं सरकारनें आंखलेली योजना व स्वीकारलेलें धोरण हें समाधान-कारक नाहीं असें ह्मणावयाचें दुसरें एक कारण आहे कीं, आतांपर्यंत सरकारनें पुष्कळ गांवचें धान्य विकत घेतलें असेल परंतु खुद्द सांगली गांवचें धान्य किती विकत घेतलें आहे ? सांगली गांवास जमिनी नाहींत किंवा त्या सर्व पिकल्या नाहींत असें आहे कीं काय ? मला वाटतें सांगली गांवच्या जमिनीच्या कबजेदारांकडून धान्य मागण्याचें धैर्य अधिकारीलोकांना होत नसावें. इतर खेडेगांवामधून धान्य खरेदी करण्याची सरकारची पद्धत खरोखरच मोठी विलक्षण आहे. त्या खेड्यांत धान्य पिकलें आहे किंवा नाहीं, पिकलें असल्यास आपणांस तें विकत मिळूं शकेल कीं नाहीं, याबद्दल पुरी चौकशी न करतांच त्या गांवास भागकारकून जातात, व तेथें गेल्यावर तेथील पाटील-कुलकर्णी यांना जमवून त्यांच्याकडून साधारण इन्फर्मेशन् काढून मग त्या गांवकामगारांच्या साहाय्यानें व त्यांना भीड घालून मेहेरबानीखातर ४-९ पोतीं धान्य त्या गांवामधून काढलें जातें. नंतर कोणते इसमाजवळ किती धान्य आहे व त्याच्या खर्चासाठीं किती धान्य लागणार आहे यासंबंधीं सांगोपांग माहिती काढण्याकडे कोणाचीच प्रवृत्ती होत नाहीं. जास्त धान्य मिळविण्याच्या भानगडींत भागकारकून

सहसा पडत नाहीं. बरें, या भानगडींत ते पडले व कोठें व किती धान्य मिळूं शकेल याचीही खात्रीलायख बातमी त्यांना समजली तरी स्थानिक रहिवाशांच्या सहानुभूतीचा अभाव ही त्यांच्या मार्गांत एक दुसरी अडचण येऊन उभी राहते. त्यामुळें त्यांना शक्य असलेलें धान्य खरेदी केलें जात नाहीं व एकंदरींत जास्त धान्याचा पुरवठा होऊं शकत नाहीं असा अनुभव आहे. धान्याच्या खरेदी किंवा विक्री अगर इतर हालचालींसंबंधीं नियंत्रणासंबंधींचे वहुहुकूम वेळोवेळीं सरकारनें गॅझिटांत प्रसिद्ध केल्यामुळें लोकांमध्यें भीति व अविश्वास उत्पन्न झाला आहे. माल घेतां येतो की नाहीं व विकतां येतो कीं नाहीं याबद्दल त्यांना कांहींच कल्पना न आल्यामुळें धान्याचा त्यांच्याकडून पुरवठा होणें साहाजिकच मुष्किलीचें झालें आहे. धान्याच्या वाबतींतलें हें नियंत्रण अधिक समाधानकारक व्हावें याबाबतींत यशस्वी होईल अशी एक योजना मांडावी, या हेतूनें आजचा हा ठराव सभागृहापुढें मांडण्यांत आलेला आहे. या ठरावाप्रमाणें लोकपक्षाची व सरकारपक्षाचा विश्वास असलेले प्रतिनिधींची एक मध्यवर्ती समिती नेमून त्याचेकडे ही धान्यपुरवठ्याची कामगिरी सोपवावी अशा प्रकारची या ठरावाची योजना आहे. हल्लीं अशी परिस्थिती झाली आहे कीं पैसे खर्च करूनही सरकारला धान्य खरेदी करून तें प्रजेला पुरवितां येईनासें झालें आहे. यामुळें प्रजेची अतोनात कुचंबणा होत आहे. लोकपक्षाचे पुढाऱ्यांचे मदतीशिवाय हा धान्याचा प्रश्न सुटणार नाहीं. याकरितां त्यांचें साहाय्य घेऊन कमिटी नेमून धान्य मिळवावें म्हणजे लोकांत समाधान होऊन त्यांची होणारी कुचंबणा दूर होईल. तरी या सर्व गोष्टींचा विचार करून सर्व नामदार सभासद ह्या ठरावास अनुमोदन देतील अशी आशा प्रदर्शित करतो.

ना. आ. आ. मुळेः—सन्मान्य अध्यक्षमहाराज, आतां ना. फडके यांनीं सभागृहापुढें जो हा ठराव मांडला आहे त्याला मी दुजोरा देत आहे. धान्य मिळणेचा प्रश्न, उत्तरोत्तर पहावें तों, अधिकाधिक बिकट होत चालला आहे. यानें इतकें तीव्र स्वरूप धारण करण्यापूर्वीच तो प्रश्न हाताळावयास हवा होता. असेंब्लीच्या गेल्या अधिवेशनाकरितां मी यासंबंधी प्रश्न पाठविले होते, पण ते दुर्दैवानें उशीरां पोंचल्यामुळें ॲडमिट् केले गेले नाहींत. पुढें परिस्थिती फार बिकट येणार आहे असें मी सदर प्रश्नांत स्पष्टपणें नमूद केलें होतें. ह्या बिकट परिस्थितीची जाणीव होऊन सरकारनें ह्या कामीं अधिक भांडवल घालावें असेंहि मी त्यांत सुचविलें होतें. व्यापारीबंधूंनीहि कांहीं भांडवल दिलें असतें आणि त्याच वेळीं धान्याचा भरपूर संग्रह करून ठेविला असता तर आज हा प्रश्न जितका कठिण होऊन बसला आहे तितका तो झाला नसता. पण जनतेचें दुर्दैव हें कीं माझे ते प्रश्न उशीरा गेले व ते त्यामुळें ॲड्मिट् झाले नाहींत आणि म्हणून आज जनतेस अत्यंत त्रास होत आहे. गेल्या सहा महिन्यांत

आपल्या संस्थानांतून बाहेरगांवीं सुमारे एक लाख धान्याचीं पोतीं गेलीं. योग्य वेळींच यावर सरकारकडून नियंत्रण न घातलें गेल्यामुळें जनतेवर आज हा प्रसंग ओढवला आहे. वेळींच नियंत्रण न घातल्यामुळें अल्लेलें धान्य आज वाळगून ठेवण्याची पराकाष्ठेची खटपट करावी लागत आहे व दुसऱ्या संस्थानांतूनतरी धान्याची भिक्षा आपणांस कोणी घालील काय अशी आशा करण्याची पाळी आज आपणांवर आली आहे. येथील रिलीफ् शॉपूला यावें तसें यश आलेलें नाहीं याचें कारण मिरज ज्युनिअरनें या बाबतींत जें धोरण स्वीकारलें आहे तें आमच्या संस्थाननें स्वीकारलें नाहीं हें होय. मिरज ज्यूनिअर संस्थान अगदीं लहान असूनहि धान्य-खरेदी व त्याचा पुरवठा या कामीं त्यांनीं आंखलेलें धोरण पाहिलें तर त्यांत काय गम्य आहे हें आपल्या ध्यानांत येईल.

ह्या संस्थानानें गांवांतील प्रमुख लोकं व प्रमुख व्यापारी यांचा या कामीं सल्ला घेऊन त्याचे मार्फतीनेंच हा धान्यपुरवठ्याचा प्रश्न अगदीं सहज रीतीनें सोडविला आहे. आणि यामुळें स्वस्त दरानें धान्य देणें तेथें शक्य झालें आहे. आतां ह्या सभागृहापुढें जो ठराव मांडणेंत आलेला आहे त्याचें स्वरूपहि अशाच प्रकारचे आहे. आमच्या संस्थाननेंसुद्धां प्रमुख लोकांच्या विचारानें प्रथमच ही धान्यपुरवठ्याची व धान्यखरेदीची योजना आंखली असती तर ती योजना सुंदर रीतीनें चालून पुष्कळच धान्यखरेदी करतां आली असती. आपणच काय ते शहाणे आहों, दुसऱ्यास कांहीं समजत नाहीं, आपण सर्व विषयांत ऑल् राउंड आहों, अशी विपरीत भावना आमच्या येथील अधिकाऱ्यांची झालेली आहे. त्यांची ही भावना अगदीं चुकीची आहे. " जेनो काम तेनो थाय " अशी जी आपल्यांत म्हण आहे ती अगदीं सार्थ आहे. व्यापारी-लोक हे आपल्या जन्मापासून त्या धंद्यांतच असतात व यामुळें खरेदीविक्रीचे व्यवहार ते जितक्या उत्तम रीतीनें जाणू शकतात तितकें दुसरें कोणीहि जाणूं शकणार नाहीं. म्हणून आमच्या अधिकारीवर्गानें ह्या व्यापारीवर्गाचा फायदा, धान्यखरेदीच्या कामीं करून घेतला असता तर धान्य-खरेदीबाबतचा हा प्रश्न अधिक सुलभ रीतीनें सुटून आजचा हा प्रसंग आपल्यावर खास ओढवला नसता आणि या गोष्टीचा विशेष फायदा गरीब जनतेला मिळाला असता. ही एक गोष्ट झाली. दुसरी गोष्ट अशी कीं, येथील अधिकारीवर्गानें येथून दुसरीकडे धान्यखरेदीसाठीं व तेथील स्थानिक अधिकाऱ्यांनीं येथील अधिकाऱ्यांच्या इन्स्ट्रक्शन्स् घेऊन धान्य खरेदी करणें फारच अवघड होऊन बसतें धान्य खरेदी करतां इन्स्ट्रक्शन्स् घेऊन जावें व प्रत्यक्ष त्याप्रमाणें धान्य खरेदी करण्यास बाजारांत जावें तों दरांत फरक पडावा व त्यामुळें धान्य खरेदी करतां येवूं नये अशी परिस्थिति निर्माण झाली आहे.

वेळोवेळीं दरांत फरक पडत असल्यामुळें स्थानिक अधिकाऱ्यानांच धान्यखरेदीचे कामीं योग्य दर ठरवून धान्य खरेदीकरण्याचे अधिकार दिले असतां ही अडचण उत्पन्न होणार नाहीं. मिरजप्रांत मामलेदार हे सांगलीसच असतात, व डेप्युटी डायरेक्टर हेहि येथेंच असतात. परंतु धान्यखरेदीबाबत त्यांचेमध्यें जो पत्रव्यहार होतो त्यांतच बराच वेळ गेल्या कारणानें धान्य खरेदी करतां येत नाहीं. बाजारांत रुपयास साडेपांच मापट्यांची धारण असतांना डे. डा. नीं सांगावें कीं "सहा मापट्यांचा दर असेल तरच धान्य खरेदी करावें, साडेपांच मापट्यांनी घेऊं नये". या हुकमाप्रमाणें मामलेदार धान्य खरेदी करणेस जातात तों रुपयास पांच मापट्यांची धारण झालेली असावी; व या नवीन धारणीचा रिपोर्ट मामलेदार यांनी डे. डा. यांजकडे करून रुपयेस पांच मापट्यानें धान्य खरेदी करण्यास मंजुरी मिळवावी, तों बाजारांत साडेचार मापट्यांची धारण झालेली असते. तेव्हां अशा प्रकारच्या पत्रव्यहारामध्यें निष्कारण काळ लोटल्यामुळें ह्या कालवधींचा परिणामच असा झाला कीं धान्य मिळणेंच अशक्य होऊन बसलें. पुरवठा होता तो संस्थानच्या धान्यनिर्गतीच्या नियंत्रणाच्या अभावीं परहद्दीत आधींच निघून गेला व यामुळें अगदी कमी दरांत धान्य घेण्याचा प्रसंग आज आलेला आहे. व तेंसुध्दां मिळेल कीं नाहीं अशी शंका उत्पन्न झालेली आहे.

मे. प्रेसिडेंट:—नामदार सभासदांनीं आपलें भाषण आतां थोडक्यांत संपवावें, कारण वेळ अगदीं थोडा आहे व अद्याप बऱ्याच नामदारांना बोलावयाचें आहे.

ना. आ. आ. मुळे:—आणखी चारच शब्द सांगून भाषण संपविणार आहे. तिसरी गोष्ट अशी कीं, खरेदी केलेल्या धान्याच्या सांठ्याची विभागणी योग्य रीतीनें होत नाहीं. सांगली शहर सोडून मिरजप्रांत तालुक्यांतील इतर सर्व गांवांची एकंदर लोकसंख्या ३०–३५ हजार आहे. सांगली शहरची सुमारें ४० हजार आहे. परंतु या दोन्हीं भागांत धान्यपुरवठा लोकसंख्येच्या प्रमाणांत केला जात नाहीं. यामध्यें नागर व ग्रामीण असा भेद करणेंत आलेला आहे. ग्रामीण म्हणजे खेडेगांवांत रहाणारे व नागर म्हणजे नगरांत रहाणारे. नगरांत रहाणाऱ्या लोकांस जमिनी नसतात म्हणून त्यांना सर्वांच्या आगोदर व मुबलक पुरवठा करावयाचा व ग्रामीण जनांना त्यांना जमिनी असतात म्हणून धान्यपुरवठा करण्याकडे दुर्लक्ष करावयाचें असा प्रकार झालेला आहे. त्या लोकांना धान्य मिळत नाहीं अशी त्यांची सारखी ओरड आहे. खेड्यापाड्यांतील लोक अडाणी म्हणून असा भेदभाव करणें योग्य नाहीं. परंतु लोक अडाणी असले तरी पोटाची आग भडकल्यावर ते मार्ग शोधण्याचा प्रयत्न केल्याखेरीज रहात नाहींत. याचें प्रत्येतर, काल कवलापूर, कुमठें वगैरे गांवचे शेकडो लोक येथें मोर्चा घेऊन आले

होते त्यावेळीं दिसून आलेंच आहे. सांगली शहरांत जी ४० हजार लोकसंख्या आहे तीपैकीं मजूर, धनिक, मध्यम वगैरे प्रत्येक वर्गाचे दहा हजार लोक आपण धरूं. यामध्यें मजूर वगैरे म्हणजे ज्यांना रोजचा बाजार केल्याखेरीज अन्न मिळत नाहीं असे लोकखेरीजकरून बाकीच्या इतर सर्व लोकांना ह्या धान्यपुरवठाच्या कामांत वगळणेंत यावें. दरमहा ५० रुपयापेक्षां ज्यांचें अधिक उत्पन्न आहे असे लोक किंवा सावकार म्हणजे धनिक वर्ग यांची जबाबदारी सरकारनें आपणांवर कां घ्यावी ? अशा लोकांना धान्य पुरविणें सरकारला शक्य नसेल तर या लोकांनीहि सरकारवर आपला बोजा टाकूं नये. कालच हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांनीं आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं, सर्वांना धान्य पुरविणेंचें सरकारनें मनांत जरी आणलें तरी तें शक्य होणार नाहीं या परिस्थितींत. म्हणून प्रत्येकानें एकमेकाशीं सहकार्य दाखवून आपल्या चतकोर भाकरीतील नितकोर दुसऱ्यास देऊन त्यास जगवावें. सर्वांचाच बोजा सरकारला झेपणें शक्य नसल्यानें प्रत्येकानें त्यास थोडाफार हातभार लाऊन सरकारास साहाय्य करावें. फक्त श्रमजीवि लोकांचाच बोजा जर सरकारवर पडला तर सरकार तो अगदीं उदारतेनें स्वीकारील. सरकारला धान्य मिळण्याच्या कामीं जी अडचण आहे तिच्या मुळाशीं धान्य खरेदा-बद्दल जनतेस वाटणारी भीति आहे. आज सरकार आपल्या जवळचें धान्य घेऊन जाईल व उद्यां आपणावर उपासमार करण्याची पाळी येईल, या भीतिनें लोकांची प्रवृत्ती धान्याचा सांठा करून ठेविण्याकडे झाली आहे. याकरितां धान्य खरेदी करण्याबाबदचा सरकारचा हेतू एकदां जनतेला जाहीर करून त्यांच्या मनांतील भीति सरकारनें नाहींशी करावी; व लोकांतील पुढारी अगर लोकप्रतिनिधी यांच्या साहाय्यानें धान्य खरेदीची योजना ठरवावी व धान्याच्या सांठ्यासंबंधीं माहीती मिळवावी. लोकप्रतिनिधींच्या सल्ल्यानें पूर्वीच धान्य खरेदी केलें असतें तर जेथें एकहजार पोतीं मिळालीं, तेथें तीं दहाहजार मिळूं शकलीं असतीं. तरी ठरावांत नमूद केल्याप्रमाणें समिति नेमिली जावी आणि तिच्या सल्ल्यानें धान्य पुरवठ्याचा प्रश्न सोडवावा अशी सरकारांस विनंति करून मी या ठरावास दुजोरा देतो.

ना. मिनिस्टर:—सन्मान्य अध्यक्ष, ना. फडके यांनीं सभागृहापुढें जो ठराव मांडलेला आहे तो सरकार व लोकपक्ष या दोघांनाहि सम्मत होईल अशा तऱ्हेची त्यामध्यें दुरुस्ती करण्याकरितां ना. लिडर ऑफ अपोझिशन व ना. लिडर ऑफ दि हाऊस् यामध्यें वाटाघाट चालू आहे. त्या उद्देशानें हा ठराव आणला गेला आहे. तो खरोखरीच स्तुत्य आहे. अमुक अमूक गोष्टी सरकारकडून केल्या जाव्यात असें ठरावांत नमूद आहे. मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, यापैकीं बऱ्याच गोष्टी दरबारनें केल्या आहेत. साधारणपणें आतांपर्यंत दरबारनें कोणत्या रीतीनें

कार्य केलें हें आपणां सर्वांसमोर आहेच. धान्याचा पुरवठा व त्याची विभागणी हीं कामें लोकप्रतिनिधींच्या सल्यानें केलीं जावीत व धान्य खरेदी करितांना लोकांचा विश्वास संपादन करावा हीं या ठरावांतील दोन्ही तत्वें स्वीकारण्याजोगीं आहेत. ना. मुल्हर यांनीं सांगली रिलीफशॉपचें उदाहरण दिलें आपणा सर्वांना माहितच आहे कीं, या सांगली रिलीफ शॉपमध्यें बिनसरकारी समासदांचें बहुमत व लोकप्रतिनिधीत्व होतें. तेव्हां येथें आतांपर्यंत चालू असलेली पद्धत या ठरावांतील धोरणास अनुसरूनच होती असें म्हणण्यास कोणतीच हरकत नाहीं. धान्याच्या विभागणीचें काम आतांसुद्धां येथील प्रातिनिधीक संस्थकडे म्हणजे नगर-पालिकेकडे दिलें आहे. ना. सभासदांना माहितच असेल कीं धान्य पुरवठ्याच्या बाबतींत वेळोवेळीं आलेल्या अडचणींच्या वेळीं मे. दिवाणसाहेब यांनीं संस्थानांतील प्रमुख पुढारी व तज्ञ व्यापारी यांचा सल्ला घेतला आहे. हें सर्व इन्फॉर्मली होत होतें त्यासच आतां फॉर्मल स्वरूप यावयाचें असा या ठरावाचा उद्देश असावा असें वाटतें. तालुका रिलीफ शॉपमध्यें मॅनेजर व सल्ला देणारे बिनसरकारीच लोक आहेत आणि त्यांच्या सल्यानें हल्लीं येथील कामें चालतात. अर्थात् सर्वच तालुक्यामधून असें धोरण चालू आहे. तरी सभागृहापुढील ठरावांत जें तत्व गोविलें आहे त्याची अंमलबजावणी सध्यां चालूच आहे हें ना. सभासदांच्या ध्यानीं येईल. लोकांना अधिकाधिक विश्वासांत घेतलें तर हें कार्य सहजरीतीनें साध्य होईल, मंगळवेढें सिंहट्टी वगैरे ठिकाणीं सरकारनें धान्य खरेदी केलें आहे, परंतु तें इकडे आणण्याच्याकामीं कांहीं अडचणी येत आहेत. ठरावांत नमूद केल्याप्रमाणें तालुका समित्या नेमल्यास हेंही कार्य सुकर होईल कमिटीच्या सल्यानें संस्थानात धान्य कसें खरेदी करता येईल, स्थानिक लोकांची गरज भागुन उरलेलें धान्य कसें मिळवितां येईल, खरेदी केलेले धान्य तूट असलेल्या भागाकडे कसें आणता येईल वगैरे बाबतींत स्थानिक अधिकारी कमिटीच्या सल्यानें वागतील तर आणि लोकांस याची जाणीव करून देतील तर हा प्रश्न सुलभतेनें सुटेल अशी माझी समजूत आहे. मिरज प्रांत तालुक्यांतील खेड्यांतून काल आलेल्या मोर्च्याचें उदाहरण घेवून सांगावयाचें झाल्यास ठरावांत नमूद केल्याप्रकारची एखादी तालुका समिति असती तर त्या लोकांना आपल्या अडचणी कमिटीमार्फत सरकारला सुचवितां आल्या असत्या; सरकारलाही कमिटीमार्फत स्पष्टता करतां आली असती आणि त्यांना थेट येथपर्यंत येण्याचा प्रसंगही आला नसता. तात्विक दृष्टीनें पाहिल्यास या ठरावांतील पहिला भाग मान्य होण्यासारखा आहे. ना. फडके ह्यानीं या विषयासंबंधीं बोलतांना धान्यपुरवठ्याच्या बाबतीत, जॉइंट् रिस्पॉन्सिबिलीटीच्या तत्वानुसार मंत्र्यांचेवर जबाबदारी पडते असें सांगितल्याचें स्मरतें. परंतु ना. फडके यांनीं प्रश्न विचारतांना मात्र एका प्रश्नाचेबाबतींत मंत्र्याकडील खात्याबद्दल फक्त मंत्र्यांवरच जबाबदारी टाकण्याच्या दृष्टीनें त्यानांच उद्देशून प्रश्न विचारला आहे....

ना. स. ग. फडके:—सन्मान्य अध्यक्षमहाराज, I think that the Honourable member is misled in respect of our remarks regarding joint responsibility. They are directed to the department concerned and not to individuals. व्यक्तीगत आम्हांस कांहींच म्हणावयाचें नाहीं. ज्या खात्याला उद्देशून आम्ही प्रश्न विचारतो त्या खात्याकडूनच त्यांचें स्पष्टीकरण व्हावें अशी आमची अपेक्षा असते.

मे. प्रेसिडेंटः—गव्हर्मेंट् ऑफ् सांगली ॲक्टखालील नियमांतील नियम ४३ मध्यें "A question addressed to Government shall be deemed to have been addressed to the member in charge of the department to which the question relates" असें यासंबंधांत explanation दिलेलें आहे.

ना स. ग. फडके:—होय. प्रश्न इतकाच आहे कीं, मुलकीखात्यासंबंधीचा प्रश्न असेल तर त्या खात्याच्या कौन्सिलरासच तो विचारला जाईल आणि त्यांचेकडूनच उत्तर यावें अशी आमची अपेक्षा असते. We accept the principle of joint responsibility in this sense..

ना. मिनिस्टरः—मला इतकेंच दाखवावयाचें आहे कीं, ना. फडके यांचेकडून conveniently कसें बोललें जातें याचा मी वर उल्लेख केला आहे.

ना. स. ग. फडके:—असें होत नाहीं असें आपण चॅलेंजनें आम्हांस दाखऊं शकाल काय!

ना. मिनिस्टरः—If a challenge is there, I would accept it.

तेव्हा माझें म्हणणें असें कीं, ठरावांत जी मध्यवर्ती समिती नेमण्याबद्दलची सूचना आहे ती मलाहि मान्य आहे. या समितीचा सल्ला सरकारला खरोखरच बहुमोल होईल.

ना. रा. ग. करंदीकर:—सन्मान्य अध्यक्ष, ह्या ठरावर भाषण करण्यापूर्वी माझा ह्या ठरावास पूर्ण पाठिंबा आहे हें मी अगोदरच सांगतो धान्यपुरवठ्याबाबतचा सर्वांपुढेंच मोठा कठीण प्रश्न उत्पन्न झाला आहे. धान्य म्हटलें कीं लोकांना मंगळवेढें दिसतें. या धान्याचें बाबतींत दामाजी नांवाचा सत्पुरुष मंगळवेढ्यास होऊन गेला व मी जें आतां भाषण करणार आहे त्यांत दामाजीचेंच नांव येणार आहे. त्या दामाजीनें जसें त्या काळीं लोकांना धान्य पुरविलें तसेंच आपणहि दामाजी व्हावें व लोकांना धान्याचा पुरवठा करावा अशी आमची इच्छा होती, परंतु आमची खूप इच्छा असली तरी आम्हांला ती पूर्ण करणें अशक्य झालें आहे. कारण धान्याचें आगर म्हणून मंगळवेढ्याचा पूर्वी नांवलौकिक होता. परंतु ती पूर्वीची स्थिती आतां पार बदलली आहे. 'इनामदार व दारोदार' या म्हणीप्रमाणें आमची आज स्थिती झाली आहे. परंतु अशी स्थिती असूनहि मंगळवेढ्यास दुरून टोल इतकें धान्य हल्लीं तेथें आहे असा सर्वांचा गैरसमज झालेला दिसतो. मंगळवेढें येथें बेफाम पिकलें आहे, तेथें धान्य भरपूर आहे, कोणीहि जाऊन तेथून धान्य आणावें, असा इकडील लोकांचा ग्रह झाला आहे व त्यांना तिकडून

धान्य आणण्यास परवानेहि सरकारकडून दिले जात आहेत. हा इकडील जनतेचा झालेला गैरसमज दूर व्हावा, मंगळवेढें तालुक्याची या बाबतची खरी वस्तुस्थिति सभागृहाला कळावी अशी माझी इच्छा असलेनें मंगळवेढ्यास धान्याचा सांठा किती आहे, तेथील लोकांना धान्याच्या पुरवठ्याची किती जरुरी आहे वगैरे बाबतचे आंकडे मी आपणांला सांगणार आहे. मंगळवेढें तालुक्यांत धान्यपुरवठ्याबाबत लोकांची एक सभा झाली होती त्यामध्यें मंगळवेढें तालुका धान्यपुरवठा किती करूं शकेल वगैरेबाबत विचार झाला. सदर सभेस मंगळवेढें तालुक्यातील खेड्यांतील लोकहि आले होते. ह्या सभेंत जो विचारविनिमय झाला त्यावरून मंगळवेढें तालुका आपल्या गरजा पुरवून संस्थानांतील इतर तालुक्यांना धान्याचा पुरवठा कसा करूं शकेल याबद्दल सर्वांना शंका वाटली. मंगळवेढ्यास धान्याचा सांठा किती आहे याबद्दल सरकारचे अंदाजाचे आंकडे कळवावेत अशी मागणी आह्मी बऱ्याच वेळां केली असतांहि नक्की आंकडे अद्यापि समजले नाहींत. साधा कंट्रोल अगर पर्मिट्चा हुकूम देतांना त्या गांवचें सामर्थ्य व तेथील परिस्थिति हीं लक्षांत घेतलीं जात नाहींत. मंगळवेढें तालुका भरपूर पिकला आहे असें समजून प्रत्येकाच्या गरजेप्रमाणें पाहिजे तेवढें धान्य मंगळवेढें तालुक्याचे बाहेर नेण्यास सरकारांतून परवाने दिले जातच आहेत. परंतु आपल्या गरजा भागून दुसऱ्यांना इतक्या सढळ हातांनीं मदत करण्याइतका मंगळवेढें तालुका पिकला आहे असें मला वाटत नाहीं. कंट्रोल्बाबत जें सर्क्युलर संस्थानकडून काढणेंत आलें आहे तें विशिष्ट भागांस लागू न करतां सर्व सांगली संस्थानास एकदम लागू करण्यांत आलें व यामुळें खुद्द मंगळवेढें तालुक्यांतच एका सुपीक भागांतून दुसऱ्या नापीक भागांत धान्य नेणें अवघड होऊन बसलें आहे. इतकेंच नव्हें तर आपल्याच शेतांत पिकलेलें धान्य स्वतः मालकासदेखील आपल्या व आपल्या कुटुंबाच्या चरितार्थासाठीं याच तालुक्यांतील दुसऱ्या गांवास नेण्याची अडचण पडूं लागली आहे. उदाहरणार्थ, एखाद्या सांगलीस रहाणाऱ्या इसमाची जमीन कवलापुरास असेल तर त्यास सांगलीस धान्य आणावयाचें नाहीं अशी बंदी केली जाते. त्यांतून सरकारची परवानगी मिळविणेच्या भानगडींत तो पडलाच तर ती परवानगी मिळेपर्यंत तो माल त्यास त्याचे खळ्यावरच ठेवावा लागतो. आणि परवानगी मिळण्यास किती अडचणी येतात हें मी नामदार सभासदांना सांगावयास पाहिजे असें नाहीं! इतक्या अडचणींतून त्यास यश येऊन परवानगी मिळालीच तर व तेवढ्या अवधींत त्याच्या खळ्यावरील धान्य चोरांनीं लुटून नेलेलें नसलें तर तें त्यानें घरीं आणावें व जाग्यावर कांहीं राहिलें नसल्यास त्यानें आपल्या नशिबास दोष देत स्वस्थ बसावें. निदान मंगळवेढ्यास तरी अशा तऱ्हेचीं बंधनें नको होतीं. ही पद्धति फार गैरसोयीची व त्रासदायक होत असल्यानें ती बंद करणेंत यावी असें आह्मी सरकारांस यापूर्वी कळविलें होतें, परंतु त्याबद्दल सरकारकडून

अद्याप कांहींच विचार करणेंत आलेला दिसत नाहीं. पूर्वी हा परवाना मिळणेस कोण यातायात पडे! अर्जाला आठ आणे कोर्ट फी तिकिटाचा भुर्दंड भरावा लागे; अर्ज दिल्यानंतर तो ऑफीसच्या मशिनरीमधून जाऊन परवाना अर्जदाराच्या हातांत पडण्यास निदान आठ दिवस लागत व गरीब लोकांना हा परवाना मिळविण्यासाठीं दिवसगत लागून त्याशिवाय किती हेलपाटे व तत्प्रीत्यर्थ किती खर्च करावा लागत असेल याची कल्पना आपणच करावी! सुदैवानें अलीकडे हा त्रास व भानगड कमी होऊं लागली आहे. सरकार वाटेल त्या खाजगी व्यक्तींना परवाने देत आहे, परंतु जेथून धान्य आणावयाचें तेथें त्याचा किती सांठा आहे याची माहिती सरकारास विचारली तर सांठा किती आहे याबद्दल "माहिती काढणेंत आली नाहीं" असें उत्तर दिलें जातें. गेल्या सालीं अशा प्रकारचा कठिण प्रसंग मंगळवेढें तालुक्यांत आला नव्हता. परंतु चालू सालीं मंगळवेढें तालुक्यांतील पीक व्हावें तसें न झाल्यामुळें आह्मांलाच धान्य कसें पुरेल याची विवंचना लागून राहिली आहे आणि अशा परिस्थितीतहि सरकार वाटेल त्याला परवाना देते ही खरोखर आश्चर्याची गोष्ट ह्मटली पाहिजे! मंगळवेढें तालुक्यांतील सांठ्याची माहिती सरकारला तर नाहींच, परंतु स्टोअरकरतां मात्र धान्य खरेदी करावें असे हुकूम केले जातात २४०० पोतीं एका वेळेला पाठवून द्या असें मंगळवेढें मामलेदारांना लिहिणेंत येतें. त्या बिचाऱ्या मामलेदारांची मात्र फारच केविलवाणी स्थिती होते; कारण ते सरकारचा पगार खातात. या हुकमाप्रमाणें अंमलबजावणी केली तर तालुक्यांतील लोकांचा दोष येईल व हुकमाप्रमाणें धान्य न पाठवावें तर सरकारचा रोष होईल अशा दुहेरी कात्रींत ते सांपडलेले असतात. ह्याकरितां धान्यखरेदीच्या कामीं तालुक्यांत जर एखादी कमिटी असेल व त्या कमिटींत लोकप्रतिनिधी असतील तर त्या कमिटीचा अशा वेळीं पुष्कळच फायदा होईल. म्हणून तालुका-कमिटी नेमावी वगैरे बाबत ठरावांत जी सूचना आहे तिला माझा दुजोरा आहे. आणि ह्या तालुका-कमिटीचा फायदा सरकारी अधिकाऱ्यांना असा होईल कीं, हल्ली त्यांना जो दोन्हींकडून दोष दिला जात आहे तो तरी दूर होईल. वर्तमानपत्रांना स्थानिक स्थिती माहिती नसते. आपण थोड्या दिवसांपूर्वी सांगलीच्या एका वर्तमानपत्रांत "येथील मामलेदार हे फारच धीमे असल्यानें धान्यखरेदीचें काम त्यांचे हातून व्हावें तितकें समाधानकारक होत नाहीं म्हणून एखाद्या तडफदार मामलेदाराची नेमणूक त्यांचेजागीं व्हावी असें स्थानिक लोकांचें मत आहे" असें छापून आल्याचें पुष्कळ नामदारांनीं वाचलें असेल. परंतु मंगळवेढें तालुक्यापैकीं कोणाहि इसमाचें याप्रमाणें मत नाहीं. माहितीच्या अभावीं हा विपरीत मजकूर छापला आहे. मंगळवेढ्याचा जुना सांठा पांच हजार पोतीं आहे, असें नुकतेंच सांगण्यात आलें. परंतु माझ्याही मतें, ही सरकारची माहिती बरोबर नाहीं. आतांपर्यंत १४०० पोतीं धान्य सरकारकडून

खरेदी करण्यांत आलें आहे. आतां मंगळवेढ्याची स्थिती अशी आहे कीं, घरोघर हिंडून चिपटें-मापटें खरेदी केलें तरी एकूण हजार एक पोतीं निघतील कीं नाहीं याची शंकाच आहे. आणि अशा स्थितींत मिळेल तेवढें धान्य खरेदी करा अशा तऱ्हेचा लकडा मंगळवेढ्याकडे सरकारी अधिकाऱ्यांना सारखा लागला आहे. मंगळवेढ्यांहून मिळेल तेवढें धान्य सांगलीस आणावयाचें अशा तऱ्हेची स्वार्थी प्रवृत्ती सांगलीचे लोक दाखवूं लागले आहेत. इतकेंच नव्हे तर जेथें पिकलें आहे तेथील लोकदेखील अशाच तऱ्हेची वृत्ती दर्शवूं लागले आहेत. धान्य खरेदी करण्याचा सपाटा अशा रीतीनें सुरू झाल्यामुळें सरकारच्या हेतूबद्दल लोकांच्या मनात गैरसमज उत्पन्न झाला आहे. सरकारच्या ह्या हेतूबद्दल वाटेल तशा बातम्या उठविल्या जात आहेत. सरकार जें धान्य खरेदी करीत आहे तें सध्यां सोलापुरास जी मिलिटरी आहे त्याचेकरितां खरेदी करीत आहे, अशीहि एक कंडी तेथें उठल्याचें कानीं आलें आहे. तेव्हां सरकारनें असें खात्रीपूर्वक लोकांना सांगावयास हवें कीं, तालुक्याच्या लोकांच्या उपयोगांकरिताच सरकार हें धान्य खरेदी करीत आहे. सरकारी सांठ्यासाठीं हवें तेवढें धान्य सरकारनें खरेदी करावें, पण बाहेरगांवचे लोकांना तें पुरविण्यासाठीं सरकारनें आमचेकडून धान्य खरेदी करूं नये असें आमचें ह्मणणें आहे. सदर सरकारी सांठ्यापैकीं कांहीं धान्य कवलापूरसारख्या दुष्काळी व इतर गरजू भागांतील गांवचे लोकांना देऊं नये असें आमचें मुळींच ह्मणणें नाहीं, परंतु ज्या तालुक्यांतून धान्य बाहेर नेणेचें त्या तालुक्यांतील लोकांची सोय प्रथम पाहिली पाहिजे, असें माझें ह्मणणें आहे. आह्मी पोटभर जेवावें व कवलापूरचे लोकांनीं उपाशी रहावें असें आमचें ह्मणणें नाहीं. आमचेजवळ अर्धी भाकर असेल तर कवलापूरच्या उपाशी लोकांना त्यापैकीं चतकोर खास आह्मी देऊं. परवां या गांवचे कांहीं लोक मंगळवेढ्याहून जोंधळा आणणेकरितां गाड्या घेऊन आले होते, परंतु खुद्द मंगळवेढ्यासच जोंधळा नाहीं अशी परिस्थिती त्यांना तेथें उत्पन्न झालेली दिसल्यामुळें ते आपल्या गाड्या तशाच परत घेऊन निघाले. ही त्यांची स्थिती पाहून त्यांना तसें विन्मुखावस्थेंत परत पाठविणें आह्मांस बरें न वाटल्यानें आह्मी फार मोठ्या मेहनतीनें प्रत्येकाचे गाडींत दोनदोन पोतीं घालून त्यांना रवाना केलें. हेंच ध्येय यापुढें मंगळवेढेकरांचें राहील. सदर बाबतींत तेथील अधिकाऱ्यांचें आह्मांस मिळावें तसें साहाय्य मिळत नाहीं. प्रत्येक गोष्टींत ते सांगलीहून आलेल्या हुकुमाकडे बोट दाखवितात. त्यांना स्वतःला स्वतंत्रपणें कांहींच अधिकार नसल्यानें धान्यखरेदीचे कामीं सरकारला फारच अडचणीचें होतें. सरकारनें एक लोकनियुक्त कमिटी नेमावी व तिच्या सल्ल्यानें धान्यखरेदीची व धान्यसांठ्याची तजवीज करावी वगैरेबाबत ना. फडके यांनीं सभागृहापुढें आणलेल्या ठरावांत ज्या सूचना आहेत त्यांस माझा पाठिंबा आहे.

गेल्या दोनतीन वर्षांतील मंगळवेढें तालुक्यांतील पिकांची आणेवारी पाहिली तर धान्य तेथें किती पिकलें यासंबंधींचा अंदाज लागेल. आणेवारी हें तालुक्यांत किती पीक झालें हें समजण्याचें एक सूचक साधन आहे. परंतु ही आणेवारी करण्याची सरकारी अधिकाऱ्यांची रीत कांहीं विलक्षणच आहे ! चालू सालची आणेवारी काय याबद्दल सरकारास विचारतां, सर्व गांवचे रिपोर्ट अद्याप आले नाहींत, ते आल्यानंतर सांगणेंत येईल असें उत्तर आलें. परंतु अधिकारी काय आणेवारी करणार हें नामदारांना मी आतांसुद्धां सांगूं शकेन ! कारण आणेवारी कशी करणेची तें अगोदरच ठरलेलें असतें अशी शंका येते.. मंगळवेढें तालुक्यांतील ३२ गांवांपैकीं २०-२१ गांवांच्या पिकांची आणेवारी सहा आण्याला चिकटेल, कारण कमींतकमी सहा आणे आणेवारी झाली कीं त्यावर सारा वसूल करतां येतो असा नियम आहे. तेव्हां ओढूनताणून सहा आणे आणेवारी करण्याकडे सरकारी अधिकाऱ्यांची प्रवृत्ति असते. या दृष्टीनें पाहिलें तर २०-२२ खेड्यांची आणेवारी सहा आणे होईल, चार खेड्यांची सहा ते आठ आणे होईल आणि सुमारें पांच एक खेडीं चार आणे आणेवारीचीं निघतील. तेव्हां ह्या आणेवारीच्या हिशोबानें एकंदर मंगळवेढें गांवास दहा हजार पोतीं नवीन धान्य चालू सालीं उत्पन्न होईल. आतां, प्रत्येक माणसास दरसाल पांच बंगाली मण धान्य लागतें असें सरकारनें ठरविलें आहे. या हिशोबानें मंगळवेढ्याच्या वस्तीला हें धान्य पुरेल कां याचा नामदारांनींच विचार करावा ! याशिवाय सदर तालुक्यांतील मल्लेवाडीसारखीं अशीं कांहीं गांवें आहेत कीं त्या त्या गांवच्या वस्तीच्या मानानें त्या ठिकाणीं धान्योत्पादन होत नाहीं अशा गांवांना मंगळवेढ्यांतूनच धान्य पुरवावें लागतें. मल्लेवाडी गांवचे लोकांना ८०० पोतीं लागतात, तर तेथें पिकलेलें धान्य १८६ पोतीं आहे. अर्थात् बाकी कमी पडत असलेली पोतीं पुरविण्याची जबाबदारी मंगळवेढ्यावरच आहे. अर्थात् अशा हिशोबानें पाहिलें तर सगळ्या मंगळवेढें तालुक्याला एकंदर १२०००० पोती वर्षाला धान्य लागेल. इतका सांठा येथें आहे अशी खात्री झाल्यानंतर मगच तेथून धान्य बाहेर नेण्यास परवाने दिले जावेत अशी माझी सूचना आहे. ना. फडके यांचे भाषणांत मी स्वतः धान्य दिल्याचा उल्लेख आलेला आहे हें धान्य मी स्टोअरला का दिलें याचें कारण एकच आहे. तर तें लोकांत, सरकारला धान्य विकत द्यावें अशी निष्ठा अथवा विश्वास उत्पन्न करण्यासाठीं. तेव्हां थोडक्यांत ह्मणजे मंगळवेढें तालुक्यांतून धान्य बाहेर चाललें आहे, त्याला आळा बसावा व ठरावांत सुचविल्याप्रमाणें तालुका व मध्यवर्ती समित्या नेमून हा प्रश्न सरकारनें अधिक सुलभ रीतीनें सोडवावा एवढें सांगून मी आपलें भाषण संपवितो.

**ना. म. फ. डवाली:**— ಮೆ. ಅಧ್ಯಕ್ಷ ಮಹಾರಾಜ ಮತ್ತು ನಾಮದಾರ ಸಭಾಸದರೆ, ಈಗ ನಾ. ಸದಾಶಿವರಾವ ಫಡಕೆ ಇವರು ಮುಂದೆ ತಂದ ಠರಾವಿಗೆ ದುಜೊರಾ ಕೊಡುವದರಕಿಂತ ಮುಂಚೆ ನನಗೆ ಶಿರಹಟ್ಟಿ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿ ಧಾನ್ಯದ ಸಂಗ್ರಹದ ಮಾಹಿತಿ ಕೊಡುವ ಇಚ್ಛಿ ಇದೆ. ದರಬಾರದಿಂದ ಈಗ್ಗೆ ಸ್ವಿಕರಿಸಿದ ಧೋರಣ ಜನರ ಹಿತದ ಸಲುವಾಗಿಯೇ ಅದೆ. ಆದರೆ ಜನರ ಹತ್ತರಾ ಎಷ್ಟು ಧಾನ್ಯವು ಶಿಲ್ಲಕ ಅದೆ ಮತ್ತು ಅವರಿಗೆ ಎಷ್ಟು ಧಾನ್ಯದ ಜರೂರಿ ಅದೆ ಅದನ್ನು ಮಾಹಿತಿ ಮಾಡಿಕೊಂಡು ಆ ಪ್ರಕಾರ ಅವರಿಗೆ ಪುರವತೆ ಮಾಡಬೇಕು. ಈಗ ಶಿರಹಟ್ಟಿ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿ ಚಾಲೂ ಇದ್ದ ಯೋಜನೆಯಿಂದ ಜನರ ಹಿತವು ಆಗಲಾರದು. ನಮ್ಮ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿಯ ಸಂಗ್ರಹ ಮತ್ತು ಪುರವಠಾ ಈ ಎರಡು ಸಂಗತಿಯು ವಿಚಾರ ಮಾಡಬೇಕಾದರೆ ನಮ್ಮ ಶಿರಹಟ್ಟಿ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿಯೇ ನಾಪೀಕಿ ಆಗಿದ್ದ ಸಂಗತಿ ಎಲ್ಲರಿಗೂ ಗೋತ್ತುವಿದೆ. ಆದ್ದರಿಂತಾ ಅಲ್ಲಿಯ ಬಡಜನರಿಗೆ ಧಾನ್ಯಪುರವತೆ ಮಾಡಿ ಕಾಳುಕಡಿ ಇಲ್ಲಿಗೆ ತರಿಸಲಿಕ್ಕೆ ಸಾಧ್ಯವಾಗ ಬಹುದೋ ಹ್ಯಾಗೆ ಎಂಬುವದರ ಎಲ್ಲ ಮಾಹಿತಿ ತೆಗೆದುಕೊಳ್ಳಬೇಕು. ಮೆ. ಹರೀಭಾವು ಕುಲಕರ್ಣಿ ಇವರು ನಮ್ಮ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿ ಫಿರತಿಗೆ ಬಂದ ಹೋದರು. ಆ ಕಾಲಕ್ಕೆ ಒಂದು ಮೀಟಿಂಗನಲ್ಲಿ ಅವರು ಈ ತಾಲೂಕಿಗೆ ಬೇಕಾಗುವ ಧಾನ್ಯಪುರವಠಿದ ಮಾಹಿತಿ ತೆಗೆದುಕೊಂಡು ಅಲ್ಲಿಯ ಜನರಿಗೆ ಸಾಕಾಗುವಷ್ಟು ಧಾನ್ಯ ಅಲ್ಲಿ ಶಿಲ್ಲಕ ಇಟ್ಟು ಆ ನಂತರಾ ಜಾಸ್ತಿ ಧಾನ್ಯ ಸಂಗ್ರಹ ನಮ್ಮ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿ ಅದೆ ಅಂತಾ ತಿಳಿದು ಬಂದರೆ ಸಾಂಗಲಿ ಶಹರ ಅಥವಾ ಇತರ ಠಿಕಾಣಕ್ಕೆ ಕಾಳುಕಡಿ ತಗೊಂಡು ಹೋಗ-ಬೇಕು ಅಂತಾ ಹೇಳಿದರು. ನಮ್ಮ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿ ಕೂಲಿಮಾಡುವವ ಜನರು ಜಾಸ್ತ ಇರುತ್ತಾರೆ. ಅವರಿಗೆ ಹೊಲಗಳು ಇಲ್ಲಿದ್ದ ಕಾರಣಾ ಅವರಿಗೆ ಧಾನ್ಯಪುರವತೆ ಮಾಡುವದು ಅತ್ಯಂತ ಅವಶ್ಯಕವಿದೆ. ನಮ್ಮ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿ ಬಡಜನರು ಜಾಸ್ತಿ ಇದ್ದ ಕಾರಣಾ ಅವರಿಗೆ ಸಾಕಷ್ಟು ಸಂಗ್ರಹವಿಲ್ಲಾ. ಇದೇ ಜಾನೆವಾರಿ ೧೯೪೩ ತಿಂಗಳಲ್ಲಿ ನಮ್ಮಲ್ಲಿ ಧಾನ್ಯ ಸಂಗ್ರಹ ಆಗದೀ ಇಲ್ಲದಂತಾಗಿತ್ತು. ನಾಲ್ಕು ದಿವಸಗಳಲ್ಲಿ ನಮಗೆ ಧಾನ್ಯಪುರವತೆ ಆಗಲೇ ಬೇಕು ಅಥವಾ ಬಹಳ ಕಠೀಣ ಪ್ರಸಂಗ, ಅಂದರೆ ಉಪಾಸ ಬೀಳುವ ಪ್ರಸಂಗ ಬರಬಹುದು ಅಂತಾ ಜನರು ಕೂಡಿ ಹೇಳಲಿಕ್ಕೆ ಬಂದಿದರು. ಆ ಕಾಲಕ್ಕೆ ಬಡಜನರಮೇಲೆ ಗೋಳಬಾರವಾಯಿತು. ಇಂತಹ ದುಸ್ಥಿತಿಯು ನಮ್ಮ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿ ಬಂದಹತ್ತಿದೆ. ಆದಕಾರಣಾ ನಮ್ಮ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿ ಧಾನ್ಯಸಂಗ್ರಹ ಜಾಸ್ತಿ ಅದೆ ಅಂತಾ ಮಾಹಿತಿ ತಗೊಂಡಿಪ್ಪರಮೇಲಿಂದ ತಿಳಿದು ಬಂದದೆ ಪರಮಿಟಸ್ ಕೊಡಬೇಕು ಮತ್ತು ಧಾನ್ಯ ಸಂಗ್ರಹ ಇಲ್ಲಿಗೆ ತರಿಸಬೇಕು. ಇಷ್ಟು ಹೇಳಿ ನಾನು ಈ ಠರಾವಿಗೆ ಅನುಮೊದನ ಕೊಟ್ಟು ಸಭಾಗ್ರಹದ ರಜಾ ಬೇಡಿಕೊಳ್ಳುತ್ತೀನೆ."

(लीडर ऑफ् दि हाऊस व लीडर ऑफ् दि ऑपोझिशन् लॉबीतून परत सभागृहांत येतात.)

**ना. प्रेसिडेंट:**—सदर ठरावाबाबत उभयपक्षांच्या नेत्यांमध्यें तडजोड झाली असल्याचें त्यांनीं मजला कळविलें आहे. त्याप्रमाणें सदर ठरावांतील दुरुस्त्या नामदारांना वाचून दाखविल्या जातीलच; पण त्यापूर्वी कोणास बोलावयाचें असल्यास बोलावें.

**ना. सौ. इंदिराबाई साठ्ये:**—सन्मान्य अध्यक्ष,

नां. फडके यांनीं आणलेल्या सदर ठरावास मी पाठिंबा देणार आहे. धान्यखरेदी लोकांना विश्वासांत घेऊन केली पाहिजे हें खरेंच, परंतु त्यासाठीं जे अधिकारी नेमावयाचे ते लोकांच्या विश्वासांतील व लोकांत मिसळणारे असे असले पाहिजेत. अधिकारी व इतर लोक यांचेमध्यें जर सहकार्य असेल तर धान्यखरेदी करणें सोपें होईल, नाहींतर अंदाजपत्रकांत सहा लाख रुपये सदर कामासाठीं दाखल केले आहेत ते सर्व खर्च होऊन जावयाचे व धान्य मात्र जनतेला

मुळींच मिळावयाचें नाहीं अशी परिस्थिती होईल. धान्यखरेदीच्या कामासाठीं मोठमोठे पगाराचे अधिकारी नेमावयाचे, त्यांचेकरितां जादा स्टाफ द्यावयाचा व इतरहि खर्च करावयाचा आणि इतकें करून धान्य मिळालें नाहीं म्हणजे हा सर्व खर्च फुकट जावयाचा. तेव्हां सरकारनें विचार करून हा खर्च करावयाचा ठरविला असेल तर तो जास्त सार्थकी लागला असें होईल. दरबारचें मत काय आहे तें मला सांगतां येत नाहीं, परंतु धान्यपुरवठ्याबाबत कशी योजना असावी याबद्दलचें माझें मत मी सांगते. जे लोक इन्कमटॅक्स् देतात त्यांना सरकारनीं मुळींच धान्य पुरवूं नये, त्यांनीं पडेल त्या दरानें तें बाजारांतून खरेदी करावें; तसेंच गिरण्या व विडीकारखानदार यांचा जो नोकरवर्ग असतो त्यांना धान्यपुरविण्याची तजवीज त्या गिरण्यांच्या मालकांनीं व त्या कारखानदारांनींच केली पाहिजे अशी त्यांचेवर सक्ती करावी. यामुळें मजुरांचे होणारे या बाबतींलील हाल वांचून सरकारवर जो त्यांचा बोजा पडत आहे तो तितका हलका होईल. गिरणीमालक हे स्वतःच्या फायद्यासाठींच गिरणी चालवीत असतात, व हल्लींच्या युद्धजन्य परिस्थितींत त्यांनीं भरपूर फायदा मिळविलेला आहे. म्हणून ह्या लोकांना आपल्या कारखान्यांतील मजूर लोकांचा भार उचलण्यास कांहींच हरकत नाहीं. धान्य खरेदी व पुरवठ्याचे कामीं ज्या अंमलदारांची निवड करावी असें मी म्हटलें आहे त्यांत मे. मिनिस्टरसाहेब यांचीच निवड मी सुचविते. कारण ते लोकनियुक्त अधिकारी असल्यामुळें लोकांच्या परिचयाचे व माहितीचे आहेत आणि याबाबतच्या आमच्या अडचणी वगैरे आम्हांला त्यांना सांगता येतील व सरकारच्या अडचणीहि आम्हांला त्यांच्यामार्फत कळूं शकतील. तेव्हां या दृष्टीनें कमिटी नेमावी अशी माझी विनंति आहे.

ना. वि. म. करंदीकरः—सन्मान्य अध्यक्ष, आमचे मित्र ना. करंदीकर व ना. डबाली यांनीं आपल्या तालुक्यांतून दुसरीकडे धान्य नेलें जावूं नये म्हणून व नेणेंचे झालेस त्याकरितां कमिटी नेमावी म्हणून सूचना केलेली आहे. परंतु मी आतां जें आपणांस सांगणार आहे तें आमच्या तालुक्याची नड काय आहे या दृष्टीनें सांगणार आहे. आमच्या कुची तालुक्यांत धान्य मुळींच यंदा पिकलें नसल्याकारणानें या तालुक्याची चालू सालीं फारच दैना झालेली आहे. तेव्हां कुची तालुक्यांत धान्य बाहेरून कसें आणतां येईल व त्याचा पुरवठा कसा करतां येईल हा प्रश्न सोडविणारी कमिटी आम्हांस पाहिजे आहे. कुची तालुक्यांत हल्लीं कमिटी आहे, परंतु ती धान्य विकणारी आहे. पण धान्य मिळालें तर विकावयाचें ना ? धान्य नाहीं म्हणून तालुक्यांत हाकाटी झाली तरी या कमिटीस तें वेळेवर मिळत नाहीं. तेव्हां या दृष्टीनें सरकारनें आमच्या तालुक्यांत धान्य कसें आणतां येईल, व नंतर त्याचा तालुक्यांत कसा पुरवठा करीतां येईल हें ठरविण्याकरितां लोकप्रतिनिधी घेवून एक कमिटी नेमावी, अशी माझी विनंति आहे, आणि या दृष्टीनें मी या ठरावास दुजोरा देत आहे.

प्रे. प्रेसिडेंट: — नामदार सभासदांना मला अशी अेक सूचना करावयाची आहे कीं; ह्या धान्यपुरवठ्याचे बाबतींत विचार करणेसाठीं येथें परवांचे दिवशीं Conference भरणार आहे, त्यावेळीं यासंबंधी अधिक उहापोह होईलच. तूर्त विरोधी पक्षाचे नेते आपणांस दुरुस्त ठराव वाचून दाखवतील व नंतर आपण आपलीं मतें प्रदर्शित केल्यास बरें.

ना. डॉ. बी. ए. बोगार:—Honourable President, just now it was suggested by the majority of Hon'ble Members that there should bea Taluk a Committee, consisting of Official and Non-Official Members in order to solve the difficult problem of food-supply. I agree to this proposal; but the thing is that the Committee, which is in existence at present in Terdal Mahal, consists of Non-officials, who are share-holders and who belong to the mercantile class. I propose that this Committee should consist of Members who have got corn and not of those who have not got the possession of corn. But unfortunately the merchants have been given preferance to the agriculturists.

ना. के. गो. कुलकर्णी ( ली. ऑ. अ ):—सन्मान्य अध्यक्षमहाराज, ना. लीडर ऑफ् दि हाउस यांचेबरोबर विचार करून आम्ही ह्या ठरावांत कांहीं दुरुस्त्या केल्या आहेत. हा दुरुस्त ठरावच मी आतां वाचून दाखवितो म्हणजे मूळ ठरावांत काय काय दुरुस्त्या केल्या आहेत त्या ना. सभासदांचे ध्यानांत आपोआपच येतील. दुरुस्त ठराव असा आहे:—

" सांगली दरबारनें धान्यपुरवठा व नियंत्रण या दोन्ही बाबतींत जें धोरण आतांपर्यंत स्वीकारलें आहे तें असावें तितकें समाधानकारक नाहीं व त्यापासुन गरजू प्रजाजनांस योग्य दरांत व प्रमाणांत मिळावें तसें धान्य मिळूं शकत नाहीं. यास्तव लोकमतास प्राधान्य देऊन व लोकप्रतिनिधींच्या सल्यानें चालू धोरणांत बदल करण्यांत येऊन पुढील सूचनेप्रमाणें धोरण आखणेंत यावें अशी ह्या सभेची सांगली दरबारांस नम्र शिफारस आहे.

(अ) धान्यादि जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा व विभागणी या कामीं सल्ला देण्यासाठीं डॉइरेक्टर डायरेक्टरेट् सांगली याच्या नेतृत्वाखालीं एक मध्यवर्ती कमिटी ( अॅडव्हायजरी कमिटी ) नेमण्यांत यावी व त्यांत तालुका, महाल, सांगली शहर व इतर हितसंबंध (इंटरेस्ट्स्) पहाणारे असे सात बिनसरकारी सभासद असावेत.

(ब) त्याचप्रमाणें तालुका व महालनिहाय मामलेदार व महालकरी यांच्या नेतृत्वाखालीं वरील बाबतींत त्यांस सल्ला देणेसाठीं प्रत्येकीं एक समिती असावी व प्रत्येक समितींत तीन बिनसरकारी सभासद असावेत.

(क) वरील समित्यांतील बिनसरकारी सभासदाची नेमणूक दरबारनें करावी.

(ड) ह्या समित्यांनीं आपापल्या भागांतील धान्याच्या सांठा व जरूरी वगैरेसंबंधीं सर्व उपयुक्त माहिती मिळवून ती मध्यवर्ती समितीस पुरवावी. सांठा व विभागणीची सर्व व्यवस्था यापुढें तशी करणेंत यावी.

(इ) वरील मध्यवर्ती समितीनें संस्थानांतील सर्व भागांत जरूरीप्रमाणें बाहेरून धान्यें वगैरे आणून त्यांचा पुरवठा करणेची व्यवस्था करावी.

(फ) हें करण्याच्या कामीं सांगलीं दरबारनें बिनसरकारी प्रजाजनांचें विनामूल्य व स्वयंस्फूर्त सहकार्य घेऊन धान्यपुरवठ्याचें काम शक्य तेवढ्या काटकसरीनें करावें."

असा हा दुरुस्त ठराव आहे. धान्याचा भरपूर पुरवठा आपल्या हातीं नाहीं, व अशा स्थितींत दरबारला धान्यपुरवठा करावयाचा आहे. तेव्हां हा हेतू व्यक्त करणेकरितां प्रथम विचार व्हावा या हेतूनें हा ठराव मांडला जात आहे. धान्याच्या हालचालीबाबत ज्या अडचणी उत्पन्न झाल्या आहेत, त्या दरबारनें केल्या अगर प्रजाजनानें आपणांवर ओढून घेतल्या असें ह्मणण्याचा माझा मुळींच हेतू नाहीं. हल्लीची युद्धजन्य परिस्थिती आणि अवर्षणामुळें उत्पन्न झालेला दुष्काळ हींच विशेषत: धान्याची अडचण भासण्यास कारणें झालीं आहेत. शिवाय ब्रिटिश मुलुखांत कंट्रोलसंबंधीं कायदे केल्यामुळें संस्थानासहि कंट्रोल बसवावा लागला. व त्यामुळें धान्य मिळणेस व त्याच्या वाहातुकीस अडचण उत्पन्न झाली. दरबारनें नुसतां कंट्रोल बसविला एवढ्यानेंच आमचा कार्यभाग होऊं शकत नाहीं. आमचें संस्थान निरनिराळ्या तालुक्यांत विखुरलें असल्यानें संस्थानांतील एका तालुक्यांत उत्पन्न होणांर धान्य दुसऱ्या गरजू तालुक्यांस संस्थानच्या परावलंबित्वामुळें जाऊं शकत नाहीं. ब्रिटिश गव्हर्मेंट अनेक ठिकाणीं विस्तारलेलें आहे व आपल्या संस्थानच्या हद्दी ठिकठिकाणीं ब्रिटिश मुलुखास लागलेल्या आहेत. व यामुळें ब्रिटिश इंडियावर हल्लीच्या परिस्थितींत आपण किती अवलंबून आहोत याची आतां आपणांस जाणीव होऊं लागली आहे. ब्रिटिशनें एक्सपोर्ट बॅन केले तर संस्थाननेंहि तसें करून चालणार नाहीं. कारण आह्मीं स्वतंत्र नसून आमचें जीवन परावलंबी आहे. १९१४ सालच्या महायुद्धांत धान्याची महर्गता जवळजवळ अशीच होती. तथापि त्यावेळीं असा प्रकारचा कंट्रोल नव्हता. त्यावेळीं रुपयास चार मापटीं जोंधळा मुबलक मिळत असे. फक्त ब्रह्मदेशांतील तांदळावर कंट्रोल बसविलेला होता. पण तांदूळही भरपूर मिळत असे.

ब्रिटिश गव्हर्मेंटनें धान्याच्या आयात निर्यातीबद्दल जे निर्बंध केलेले आहेत त्याच्या मुळाशीं मी फारसा शिरत नाहीं. धान्य मिळवण्याच्या बाबतींत ज्या अडचणी निर्माण झालेल्या आहेत, त्याबद्दल दरबार दोषी आहे असें नाहीं व दरबारवर टीका करून

कार्यभागहि होणार नाही. सांगली दरबारनें मनांत आणलें तरी एकट्या सांगली दरबारला स्वतंत्रपणें या अडचणी दूर करतां येणार नाहीत; परंतु दरबारला अडचणी दूर करतां येत नाहींत एवढें म्हणण्यानेंही आपला कार्यभाग खचित होत नाहीं. सांगली दरबारनें जर ब्रिटिश गव्हर्मेंटकडे परिणामकारक रिप्रेझेंटेशन् केलें आणि आपला कोटा (quota) वाढवून घेतां आला तर येथील लोकांच्या मागण्या भागवितां येतील. हल्लीच्यासारखी परिस्थिति पूर्वी कधीहि आम्ही पाहिलेली नव्हती असें माझ्या माहीतीमधले ८०-९० वर्षांचे वृद्ध गृहस्थ सांगतात. मिरजप्रांत तालुक्यांतील १० खेड्यांत दुष्काळ पडलेला आहे. पूर्वी या गावीं कधीं दुष्काळ पडला नव्हता असें नाहीं. दुष्काळ पडला तरी दुसरीकडून धान्य पुरवठ्याची सोय होत असे. धान्य नाहीं म्हणून दरबारकडे मोर्चा आणला अशी स्थिती मात्र कधीं उत्पन्न झाली नव्हती. कसाहि चरितार्थ चालत असे. धान्याचा तुटवडा भासण्याचीं जीं अनेक कारणें आहेत त्यांपैकीं प्रमुख कारण म्हणजे ठिकठिकाणच्या कंट्रोलमुळें धान्याची झालेली नाकेबंदी हीं होय. ही अडचण प्रजाजन दूर करूं शकणार नाहीं. त्याबद्दल सांगली दरबारनें ब्रिटिश गव्हर्मेंटशीं भांडलेच पाहिजे. सहकार्याशिवाय ही अडचण दूर होणार नाहीं. ब्रिटिश दरबारशीं भांडून सांगली दरबारनें आपला कोटा वाढवून घेतला पाहिजे. संस्थानच्या ताब्यांत असलेल्या सध्याच्या कोट्यावरचे संतुष्ट व्हावयाचें म्हटल्यास दरबारला धान्यपुरवठा करतां येणें मुळींच शक्य होणार नाहीं. पुरवठा जितका व्हावयास पाहिजे आहे तितका तो होत नसेल तर धान्याची किंमत वाढूं लागते व अशा परिस्थितींत व्यापारीलोक नफेबाजी करण्यास प्रवृत्त झाल्यामुळें धान्य सोडत नाहींत. तेव्हां ब्रिटिश इंडियामध्यें धान्याबाबत ज्या अडचणी आहेत त्याच अडचणी येथें आहेत. तिकडे सेंट्रल फूड् अॅड्व्हायजरी कमिटी नुकतीच स्थापन झाली आहे. सदर कमिटीपुढें जीं व्याख्यानें झालीं त्यांतून परिस्थितीचा त्यांनीं निष्कर्ष काढला होता. त्यांनी असें म्हटलें होतें कीं, शेतकरी व व्यापारी यांनीं एकमेकाला नफेबाज म्हणून दोष द्यावयाचा व सर्वांनीं सरकार कार्यक्षम नाहीं अशी ओरड करावयाची. सांगावयाचें तात्पर्य हेंच कीं, यांत अमुक एक वर्ग अगर सरकार दोषी आहे असें ठरवितां येणार नाहीं. व्यापाऱ्यांनीं संधी चालून आली असतां नफा मिळवावा हें मनुष्यस्वभावास अनुसरूनच आहे. कारण नफा मिळवून त्यावर आपला चरितार्थ चालविणें हाच त्यांचा धंदा असतो. शेतकऱ्यांचें सर्व जीवन शेतीपासून उत्पन्न होणाऱ्या धान्यादिकांवर अवलंबून असतें आणि इतर वस्तूंच्या किंमतींत भरमसाट वाढी झालेल्या असल्यामुळें त्यांचा खर्च भागविण्यासाठीं शेतकऱ्यांनीं आपल्या जवळच्या धान्यावर जास्त पैसा उभा करण्याची आशा केली तर व त्यांच्या वस्त्रादिक इतर गरजा लक्षांत घेतल्या तर तें त्यांचें करणें बावगें आहे असें कोणीहि म्हणणार नाहीं बाजारांत जेव्हां ज्वारी १२ मापट्यांनीं विकली जात असे तेव्हां

शेतकरी निमूटपणें त्या दरानें ती विकीत असत, सहा मापट्यांचा दर असतांना त्या दरांतहि त्यांनी ती विकली, आणि आतां सहाऐवजीं चार मापट्यांची हाव त्यांनीं कां धरावी असें विचारलें तर. सर्व बाजूंनीं निकृष्टावस्थेस पोंचलेली त्यांची परिस्थिती त्यांना तसें करण्यास भाग पाडतें असेंच ह्मणावें लागतें. संस्थानाबाहेरच्या बाबी व संस्थानवर त्यांचा झालेला परिणाम या दोन्ही गोष्टी विचारांत घेऊन मी असें ह्मणतो कीं, मंगळवेढें आणि शिरहट्टी हे आपले दोन तालुके सर्प्लस् नसले तरी ते सेल्फसपोर्टिंग् मात्र आहेत व मिरजप्रांत आणि कुची हे दोन्ही तालुके डेफिसिट् आहेत. सेल्फसपोर्टिंग असे जे आज भाग आहेत त्यांनीं डेफिसिट असलेल्या इतर तालुक्यांना मदत केली तरच ते तालुके आजच्या परिस्थितींत जिवंत राहूं शकतील. काल रोजीं हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब स्वारींनीं आपल्या भाषणांतून सांगितलेला उपदेश प्रत्येकानें आपल्या नजरेसमोर ठेवणें जरूर आहे. आपणांकडे चतकोर भाकर असेल तर दुसऱ्या उपाशी रहाणारास त्यांपकीं नितकोर देऊन दोघेहि जिवत राहणें जास्त श्रेयस्कर आहे. टीका केली तर पोट भरतें असें नाहीं, परंतु पोट भरण्याचा कांहीं तरी मार्ग शोधतां येईल असें वाटतें. आम्हीं एखादी गोष्ट सुचविली व सरकारनें त्याचा सहानुभूतीपूर्वक विचार केला तर त्याचा कांहीं तरी उपयोग होईल. परंतु आमच्या सूचना अगर टीका विचारांत न घेतां अधिकारी आपली अधिकारी-वृत्ती दाखवून चुका करूं लागले तर त्यामुळें प्रजेच्या हालअपेष्टा मात्र द्विगुणित होतात आणि पुष्कळ वेळानें त्यांची चूक त्यांच्या लक्षांत येते. लोकांनीं सरकारांस कांहीं सूचना केल्या तर त्या कांहीं सरकारच्या चालू गाड्याला खीळ घालण्याकरितां करणेंत येत नाहींत तर सरकारच्या हातून कांहीं विधायक कार्य केलें जावें ह्या हेतूनेंच अशा सूचना केलेल्या असतात. तरी ह्या सर्व गोष्टी विचारांत घेऊन सरकारनीं आमच्या सूचनांचा विचार करावा अशी मी त्यास विनंती करतो.

ना म. ह. गोडबोले:—सन्मान्य अध्यक्षमहाराज, सभागृहापुढें आतां जो ठराव आलेला आहे त्यास अनुमोदन देण्याकरितां मी उभा राहिलो आहे. माझ्या मनांतील बहुतेक विचार आतांपर्यंत ज्या ज्या ना. सभासदांचीं भाषणें झालीं त्यांत आलेलेच आहेत, आणि सर्वांत शेवटीं सदर ठरावावर बोलण्याची माझी पाळी आल्यामुळें आतां बोलण्यासारखें कांहीं फारसें राहिलेलेंच नाहीं, तथापि एकदोन विचार जे मला सुचले आहेत ते मी नामदार सभासदांचेपुढें मांडणार आहे. सभागृहापुढें आलेल्या ठरावावर नामदार सभासदांचीं भाषणें होऊन अेकमेकाला छेद देण्याचें काम झालें आहे व त्यायोगानें सरकारचें काम बरेंच हलकें झालें आहे असेंहि दिसण्याचा संभव आहे. लोकप्रतिनिधी जेव्हां जेव्हां सरकारवर भरपूर टीका करतात तेव्हां तेव्हां सरकारच्या हातून भरपूर काम झालें नाहीं असें म्हणण्याचा त्यांच्या त्या टीकेचा आशय असतो.

सरकारवर जी जबाबदारी असते ती अधिकारीवर्गाला कळावी या हेतूनें त्या त्या टीका केलेल्या असतात. त्या टीकाकारणाऱ्या लोकप्रतिनिधींना सरकारनें तें काम करण्यास जर सांगितलें तर त्यांना सरकारवर पडलेली जबाबदारी कळेल व सरकारवरची जबाबदारी कमी होईल व पुष्कळशी टीकाहि कमी होईल. टीकाकारावर त्या कामाची जबाबदारी टाकली कीं टीकेचें तोंड बंद होतें. याचें प्रत्यंतर पहावयाचें असेल तर आमच्या नामदार मिनिस्टरांचेंच देतां येईल. आतांच विरोधी पक्षाच्या नेत्यांनीं ह्या ठरावावर भाषण केलें. अशा प्रकारचें भाषण सरकारपक्षाच्या नेत्यालाहि करतां आलें असतें कीं नाहीं याची मला शंका वाटते. याचें कारण सरकारनें प्रथमच या ठरावास सहानुभूति दर्शवून तडजोड करण्याची करण्याची जबाबदारी विरोधी पक्षाचे नेत्यावर टाकली हें होय. माझा सांगण्याचा आशय असा कीं, सरकारनें जर लोकांवर जास्त जबाबदारी टाकली तर सरकारवर होणारी टीका कमी होईल. लोकांचा प्रतिनिधी असा मिनिस्टर नेमून त्याचेकडे सोपीव खातीं दिल्यापासून त्या खात्यांवर पूर्वी होणाऱ्या टीकेचा ओघ आतां साहाजिकच दुसरीकडे वळलेला आहे, हें सरकारला सांगण्याची जरूरी आहे असें वाटत नाहीं. अशाच रीतीनें हल्लीच्या कायद्याप्रमाणें अशी एक मिनिस्टर नेमण्याची योजना आहे, तशी आणखी एखाद्या मिनिस्टरची योजना सरकार जर करील तर त्या प्रमाणांत सरकारवरची जबाबदारीहि कमी होईल आणि टीकाकारांचीं तोंडेंहि बंद होतील.

दुसरी एक सूचना मला करावीशी वाटते कीं ज्या ज्या वेळीं जनतेच्या गरजांचा आपण विचार करतो, त्या त्या वेळीं धान्यापलीकडे आपली मजलच जात नाहीं. फार फार झालें तर रॉकेल् व साखऱ्या या दोन वस्तूंचा मात्र धान्याबरोबर सरकारकडून समावेश केला जातो. या खेरीज अशा कित्येक दुसऱ्या जीवनोपयोगी वस्तू आहेत कीं, ज्यांच्यावाचून शेतकरीवर्गाचें चालूंच शकत नाहीं व ज्या वस्तूंचे भाव दुप्पट चौपट झालेले आहेत. उदाहरणार्थ कापड, काड्याच्या पेट्या वगैरे. कापड ही वस्तू हवापाणी किंवा अन्न यांच्या इतकीच मनुष्यप्राण्याला आवश्यक आहे. धान्याबरोबरच सरकारला कापडाचीहि योजना हातीं घेणें जरूर आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांत व कांहीं कांहीं संस्थानांतूनसुद्धां सरकारनें गोरगरीबांसाठीं 'स्टँडर्ड क्लॉथ्‌ची' योजना करून स्वस्तदरांत कापड मिळण्याची तजवीज केली आहे. आपल्या संस्थानांतहि उगर शुगर वर्क्स् ही जशी साखरेची गिरणी आहे त्याचप्रमाणें बालाजी मिल्स्, गजाननमिल्स् यासारख्या मोठ्या गिरण्याही सांगली शहरांत आहेत. तेव्हां इतर ठिकाणच्या सरकारनीं ज्याप्रमाणें तेथील गिरणी मालकांशीं सहकार्य करून स्टँडर्ड क्लॉथ् काढण्याचें ठरविलें आहे त्याप्रमाणें येथील आमच्या सरकारला कापड काढतां येणें शक्य आहे. व हें कापड संस्थानांतील खेडीं व शहरें यांतील गरीबलोकांना पुरवितां येईल. चांगलें कापड जरी पुरवितां आलें नाहीं तरी जाडेभरडें कापड कां होईना या लोकांना स्वस्त दरांत सरकार देऊं शकेल.

एका नामदार सभासदांनीं संस्थानी प्रजेमध्यें नागर व ग्रामीण असा भेद करूं नये अशी सूचना केली आहे. सदरबाबतींत माझे विचार असे आहेत कीं, ही सूचना वाजवी नाहीं. नागर व ग्रामीण असा फरक जरूर तेथें करणेंच जास्त योग्य आहे असें माझें मत आहे. सांगली शहरांत जितकी साखर खपते तितकी ती खेड्यांतून खपणार नाहीं; याच्या उलट जितकी ज्वारी खेड्यांमधील जनतेला लागते तितकी ज्वारी शहरांतील जनतेला पचणार नाहीं. तेव्हां या दृष्टीनें असा फरक जो करणेंत आलेला आहे तो योग्यच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. माझ्या माहितीप्रमाणें खालसा मुलखांतहि अशीच वहिवाट आहे. जेथें लोकसंख्या मोठी व धान्याचें उत्पादन कमी अशा गांवांसच प्रथम पुरवठा केला जातो. कारण मजूरवर्गाचा जास्त भरणा असलेल्या गांवांकडेच सरकारची नजर आधीं जाते. ह्मणून स्वस्त धान्याचें दुकान प्रथम सांगलीसच आधीं निघालें तें युक्तच झालें तेथें मुंबई सरकारहि अशीच तजवीज करतें हें, मुंबई अगर सोलापूरसारख्या मोठमोठ्या शहरीं, कीं ज्या ठिकाणीं मजूरवर्गाची वसती जास्त आहे, सरकार धान्यपुरवठा प्रथम करण्यांत कसें दक्ष असतें, हें पाहिलें असतां दिसून येईल. राजधानीच्या गांवीं धान्यपुरवठा व्यवस्थित झाला नाहीं तर दंगेधोपे होण्याचा संभव असतो, तेव्हां या दृष्टीनें नागर व ग्रामीण असा जो भेद केलेला आहे तो इष्टच आहे असें कोणीहि ह्मणेल. सर्वच जनतेला धान्य पुरविणेंचें असें जर सरकारनें मनांत आणलें तर सरकारलाहि ती एक अवघड गोष्ट होऊन बसेल. यासाठीं सरकारवरच सर्व दर्जाच्या लोकांनीं भार न घालतां अन्य तऱ्हेनें धान्य मिळविणें ज्यांना शक्य असेल त्यांनीं तें मिळवून सरकारवरचा भार हलका करावा. कित्येक ठिकाणीं ब्लॅक् मार्केटसारख्या संस्था अस्तित्वांत आहेत हें नामदार सभासदांना माहित असेलच. ह्या मार्केटमधून धान्य खरेदी करणेकरितां लोकांना परवाने दिले जावेत आणि जरूर तर सरकारनें या पद्धतीनें धान्य मिळविण्याचा प्रयत्न करावा. कारण सरकारनें या कामासाठीं मुद्दाम नेमलेल्या अव्वलकारकुनासहि धान्य खरेदी करावयास ते गेले तर त्यांना तें मिळत नाहीं. तेंच ब्लॅक मार्केटच्या पद्धतीचा अवलंब केला तर मिळूं शकेल. तेव्हां धान्य खरेदी करण्यास लोकांना सरकारनें परवाने दिले तर सरकारवरचा भार तितकाच हलका होईल. कारण सर्व धान्य आपणच खरेदी करून सर्व लोकांना त्यांचा पुरवठा करूं असें सरकारनें मनात आणलें तर तें त्यांना शक्य होणार नाहीं. शिवाय या कामीं लागणारा पैसाहि त्यांना पुरणार नाहीं. सांगली येथें जे रिलीफ् शॉप् उघडणेंत आले होतें त्यांत बिनसरकारी अधिकारी होते हें खरें; परंतु या लोकांमध्यें कंझुमर्स कोणी नव्हतें. यामुळें ह्या बिनसरकारी सभासदामध्यें सहानुभूती दिसून येत नव्हती असें मला ज्या कांहीं गोष्टी कळल्या त्यावरून सांगूं शकतो. जी

कमिटी नेमावयाची त्यांत कंझूमर्सही असावेत. व्यापारी लोक असूं नयेत. याचें कारण असें आहे की, कमिटीची धान्यखरेदीची जी योजना ठरेल ती व्यापारी त्यांत असतील तर त्यांना कळेल व ते गांवांत धान्याच्या दराबद्दल वाटेल ती हूल उठवून सरकारच्या धान्यखरेदीच्या कामांत पेंच उत्पन्न करूं शकतील. तसेंच ज्या तालुक्यांत चालू साली देवदयेनें बरें पिकलें आहे त्या तालुक्यातील लोकांनी स्वार्थी बुद्धी सोडून नापीक तालुक्यांस मदत करावी. सर्वांनी उदारतेचें व स्वार्थत्यागाचें ध्येय स्वीकारलें तर सरकारचें जनतेचें ध्येय साध्य होईल. व्यापाऱ्यांनी सहानुभूती दाखवून धान्य खरेदीच्या कामीं सरकारला मदतच केली पाहिजे. तशी जर वृत्ती व्यापारी ऱ्यांनी स्वीकारली नाहीं तर सरकारनें ऑर्डिनन्स् काढून त्यांचे कोठे जप्त केले पाहिजेत तरच हल्लींच्या भीषण परिस्थितीतीत अर्धपोटी लोकांचें मृत्युच्या दाढेंतून सरकारला रक्षण करतां येईल. अर्धपोटी म्हणण्याचें कारण खरोखरच हिंदुस्थानांत सध्यां बरेच लोक अर्धपोटी राहूं लागले आहेत. अेका वर्तमानपत्रांत मी रत्नागिरीचें बातमीपत्र वाचलें. तेथें खरोखर कित्येक गरीब लोकांना सध्यां अेकवेळ जेवून तेवढ्यावरच समाधान मानून घ्यावें लागत आहे. तेव्हां अशा दुष्ट स्थितीचें आपल्या संस्थानांतून निर्मूलन करण्यासाठीं आपण सर्वांनीं प्रयत्न करणें जरूर आहे व या दृष्टीनें हा जो तडजोडीचा ठराव सभागृहापुढें आलेला आहे त्यास मी दुजोरा देतो.

ना. प्रेसिडेंटः—सभागृहापुढें ना. फडके यांनी प्रथम हा धान्य पुरवठ्याबाबदचा ठराव मांडला; त्यांस दुजोरा देणारीं भाषणें झाल्यानंतर, उभय पक्षांच्या नेत्यांच्या विचारें दुरुस्त झालेला ठराव विरोधी पक्षाच्या नेत्यांनीं मांडला. सदर दुरुस्त ठरावास ना. गोडबोले यांनीं अनुमोदन दिलें आहे. ना. डवाली यांना सदर ठरावावर बोलणेचें असलेबद्दल त्यांनीं मजकडे कळविलें आहे. तरी त्याप्रमाणें त्यांनीं बोलावें.

**ना. म. फ. डवाली**:—ಈಗೆ ನಾ. ಫಡಕೇ ಇವರು ತಂದ ಠರಾವಿನಲ್ಲಿ ದುರಸ್ತ ಠರಾವು ನಾ. K. G. Kulkarni ಇವರು ಓದಿದರು ಅದರಲ್ಲಿ (ಡ) ಇದರಲ್ಲಿ ದುರುಸ್ತಿಯ ಸೂಚನೆ ಮಾಡಬೇಕು ಅಂತಾ ಹೇಳುವದಕ್ಕೆ ನಾನು ತಿಂತಿರುವೇನು. ಈ ಠರಾವಿನಲ್ಲಿ ಪ್ರೋಟ ಸಮೀತಿಗಳಲ್ಲಿ ಕೆಲಸ ಮಾಡುವವ ಜನರ ನಿವಡಣೂಕಿ ಸರಕಾರದಲ್ಲಿಯ ಜನರಪೈಕಿ ಆಗಬೇಕು ಅಂತಾ ಅದೆ. ಆದರೆ ನಿವಡಣೂಕಿ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿಯ ಡಿ. ಎಲ್. ಬಿ. ಮೆಂಬರ್ಸ, ಮ್ಯು. ಕ. ಮೆಂಬರ್ಸ ಅಥವಾ ರಯತ ಅಸೆಂಬ್ಲಿ ಮೆಂಬರ್ಸ ಈ ಜನರಪೈಕಿ ಮಂದಿಯನ್ನು ಆರಿಸುವವರಲ್ಲಿ ಬರಬೇಕು. ಮತ್ತು ಆ ಸಮೀತಿಗಳು ಇಂತಹ ಸಭಾಸದ ಜನರ advice ತೆಗೆದುಕೊಂಡು ಕೆಲಸಮಾಡಬೇಕು ಅಂತಾ ನನ್ನ ಸೂಚನೆ ಅದೆ. ಆ ಪ್ರಕಾರ ಇದರಲ್ಲಿಯ (ಡ) ಈ ಕಲಮಿನಲ್ಲಿ ದುರುಸ್ತಿಯಾಗಬೇಕು."

**ना. शा. रा. बेटमंगलकर**:—ना. फडके यांनीं मूळ ठराव मांडला त्यांत विरोधी पक्षाच्या नेत्यांनीं आमच्याशीं विचारविनिमय करून ज्या दुरुस्त्या केल्या त्यांसह तो दुरुस्त ठराव त्यांनीं सभागृहापुढें मांडला आहे. सदर ठरावांत, एक मध्यवर्ती कामिटी आणि तालुका व महालनिहाय प्रत्येकीं एक समिति नेमणेंत येऊन त्यांत बिनसरकारी सभासद नेमणेबद्दलच्या ज्या

सूचना आहेत त्याबद्दल मला असें सांगावयाचें आहे कीं, सदरबाबत विचारविनिमय करण्यासाठीं परवाचे दिवशीं याच ठिकाणीं Conference भरणार आहे; व त्या Conference मध्यें मध्यवर्ती समिती व तालुका समित्या यांमध्यें कोणाच्या नेमणुका करावयाच्या याबद्दल विचार होईलच. तेव्हां तो विषय त्यावेळेच्या चर्चेला ठेवावा व आतां हा दुरुस्त ठराव सभागृहाचे मतांस टाकावा.

ना. प्रेसिडेंटः—ना. फडके यांनीं मांडलेला ठराव व ना. कुलकर्णी यांनीं मांडलेला दुरुस्त ठराव हे दोन्हीहि मताला टाकतां येतील; पण जर ना. मून्हर यांनीं दुरुस्त ठरावास आपली संमति आहे असें सांगितलें तर मूळ ठराव मताला टाकण्याची जरूरी राहात नाहीं; फक्त दुरुस्त ठरावच मताला टाकला म्हणजे झालें.

ना. स. ग. फडके:—माझ्या मूळ ठरावास ज्या दुरुस्त्या सुचविलेल्या आहेत त्या मी, मून्हर या नात्यानें accept करतो.

ना. प्रेसिडेंटः—ना. मून्हर यांनीं दुरुस्त ठरावच accept केला असल्यानें सभागृहापुढें असा ठराव मांडणेंत आला आहे कीं—

" सांगली दरबारनें धान्यपुरवठा व नियंत्रण या दोन्ही बाबतींत जें धोरण आतांपर्यंत स्वीकारलें आहे तें असावें असावें तितकें समाधानकारक नाहीं व त्यापासून गरजू प्रजाजनांस योग्य दरांत व प्रमाणांत मिळावें तसें धान्य मिळूं शकत नाहीं; यास्तव लोकमतास प्राधान्य देऊन व लोकप्रतिनिधींच्या सल्ल्यानें चालू धोरणांत बदल करण्यांत येऊन पुढील सूचनेप्रमाणें धोरण आखणेंत यावें अशी या सभेची सांगली दरबारांस शिफारस आहे.

(अ) धान्यादि जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा व विभागणी याकामीं सल्ला देण्यासाठीं जॉइंट डायरेक्टोरेट्, सांगली याच्या नेतृत्वाखालीं एक मध्यवर्ती कमिटी ( अड्व्हायजरी कमिटी ) नेमण्यांत यावी व त्यांत तालुका, महाल, सांगली शहर व हितसंबंध [ इंटरेस्ट्स् ] पहाणारे असे सात बिनसरकारी सभासद असावेत.

(ब) तालुका व महालनिहाय मामलेदार व महालकरी याच्या नेतृत्वाखालीं वरील बाबतींत त्यांस सल्ला देण्यासाठीं प्रत्येकीं एक समिती असावी व प्रत्येक समितींत तीन बिन-सरकारी सभासद असावेत.

(क) वरील समित्यांतील बिनसरकारी सभासदांची नेमणूक दरबारनें करावी.

(ड) या समित्यांनीं आपापल्या भागांतील धान्याचा सांठा व जरूरी वगैरेसंबंधीं ह्वी उपयुक्त माहिती मिळवून ती मध्यवर्ती समितीस पुरवावी. सांठाविभागणाची सर्व व्यवस्था चापुर्ई तशी करणेंत यावी.

(इ) वरील मध्यवर्ती समितीनें संस्थानांतील सर्व भागांत जरुरीप्रमाणें बाहेरून धान्य वगैरे आणून त्यांचा पुरवठा करणेची व्यवस्था करावी.

(फ) हें करण्याच्या कामीं सांगली दरबारनें बिनसरकारी प्रजाजनांचें विनामूल्य व स्वयंस्फूर्त सहकार्य घेऊन धान्य पुरवठ्याचें काम शक्य तेवढ्या काटकसरीनें करावें. "

सदर ठरावास ज्यांची संमत्ति असेल त्यांनीं उभे रहावें.

( ना. भोरशेट्टी खेरीज सर्व सभासद उभे राहिले. )

ना. फ. शि. भोरशेट्टी:— मला हा ठराव पसंत नाहीं.

ना. प्रेसिडेंट:— All right. I declare that the Resolution is carried by majority.

---

## पुरवणी अंदाजपत्रकावरील सर्वसाधारण चर्चा.

ना. प्रेसिडेंट:— ठरावाचें काम संपलें आहे, शिवाय थोडा वेळाहि उरलेला आहे. तेव्हां पुरवणी अंदाजपत्रकावरील सर्वसाधारण चर्चा करण्यास हरकत नाहीं. प्रथम विरोधीपक्षाच्या नेत्यांनीं भाषण करावें हें बरें.

मे. के. गो. कुलकर्णी:—सन्मान्य अध्यक्षमहाराज, ना. फिनॅन्स मेंबर यांनीं कालरोजीं सन १३५२ फसलीच्या खर्चाचें पुरवणी अंदाजपत्रक सभेस सादर केलें आहे. ज्या परिस्थितीत हें अंदाजपत्रक करावें लागलें, तिचें वर्णन करितांना ना. फिनॅन्स मेंबर यांनीं सुरवातीसच असें सांगितलें आहे कीं, " गेल्या तीन चार महिन्यांत जीवनास आवश्यक उपयोगी वस्तूंच्या किंमती वाढलेल्या आहेत, व त्या वस्तू नेहमींप्रमाणें मिळणेंहि कठिण झालें आहे. तसेंच सर्व देशभर अस्वस्थतेचें वातावरण पसरलेलें असून गुन्हेगारीचें प्रमाण फारच वाढलेलें आहे. यामुळें चालू सालीं मूळ अंदाजपत्रक सभासदांच्यापुढें चर्चेस आलें असतांना जी परिस्थिति होती त्यामध्यें इतका फेरबदल झाला आहे कीं, खर्चामध्यें वाढ करणेची तीव्रतेनें जरुरी भासूं लागली. " ना. फिनॅन्स मेंबर यांच्या म्हणण्याप्रमाणें युद्ध व महागाई या परिस्थितीमुळें खर्चामध्यें वाढ करणें भाग पडलें आहे यांत शंका नाहीं. ब्रिटिश मुलुखांत सुरू असलेल्या आंदोलनाचा परिणाम संस्थानवरही झाला आहे. गुन्हेगारी वाढली त्याकरितां नवीन हत्यारें खरेदी करणें व जुन्यांची दुरुस्ती करणें, जादा पोलीस फोर्स नेमणें, त्यांच्या प्रवासखर्च वगैरे बाबींवरील खर्चाची तरतूद करणें जरुरीचें झालें. तसेंच चंदी वैरणीचे भाव वाढल्यामुळें घोडी वगैरे जनावरें जगविण्यासाठीं जादा खर्च करावा लागला. त्याचप्रमाणें गाडीदुरुस्तीसाठीं खर्च करावा लागला. चंदी खरेदीकरितां सांप्रतमीं ७००० रुपये मंजूर असतां जादा रक्कम

१९१२१ रु. पुरवणी बजेटी दाखल करावे लागले. अशा तऱ्हेचा जादा खर्च, ना. फिनॅन्स मेंबर यांनीं आपल्या भाषणांत सांगितलेला — बदलत्या परिस्थितीमुळें करावा लागला याबद्दल दुमत असणार नाहीं. आणि या दृष्टीनेंच हें पुरवणी अंदाजपत्रक मांडलें गेलें आहे. परंतु या होणाऱ्या जादा खर्चास बजेटांतील कांहीं कांहीं बाबींवरील खर्चामध्यें काटकसर करून सरकारास तोंड देतां येईल. उदाहरणार्थ, बजेट हेड ३२ यामध्यें १३५२ फसलीकरितां इमारतींची नवीन कामें या सदरीं ३११२६ रु. मूळ अंदाजपत्रकांत नमूद आहेत, व यापैकीं बरीचशी रकम अद्याप खर्च व्हावयाची आहे. असें असतां पुन्हां पुरवणी अंदाजपत्रकांत याच सदरीं २२२६० रु. इतक्या मोठ्या रकमेची मागणी करण्यांत आली आहे. सदर बाबतींत माझें म्हणणें असें आहे कीं, अद्याप जीं नवीन कामें सुरू होण्याचीं असतील तीं स्थगित केलीं तर चालण्याजोगें आहे. लोखंड, सीमेंट वगैरे वस्तूंचे दर हल्लीच्या युद्धजन्य परिस्थीमुळें पराकाष्ठेचे वाढले असल्यानें दुप्पट तिप्पट पैसे खर्च करूनहीं योजलेली इमारत पुरी होईल कीं नाहीं याची शंका आहे. पूर्वी १००० रु. त होणारी इमारत सध्यां ४००० रु. खर्च केले तरी बांधून मिळेल किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं. तेव्हां या सदरांतील कांहीं कामें स्थगित केलीं तर बरीचशी बचत होऊन तिचा आपणांस दुसरीकडे उपयोग करून घेतां येईल. राष्ट्रसंवर्धक खात्यांमध्यें आम्हीं कांहीं काटकसर सुचविली तर कित्येकांकडून अशी टीका होण्याचा संभव आहे कीं या खात्यांचा आम्हीं विश्वासघात करतो आहोंत; परंतु आमचा तसा उद्देश मुळींच नाहीं आपणास घर बांधावयाचें असेल तर कमी खर्चात जास्त चांगलें घर कसें बांधता येईल याचा आपण प्रथम विचार करतो व थोडे दिवस थांबल्यानंतर जर तें काम कमी खर्चात होईल असें वाटलें तर तें पुढें ढकलतो. तसेंच याही बाबतींत करावें असें माझें मत आहे. एखाद्या शाळे-करितां १००० रु. मंजूर असतां सध्याच्या परिस्थितींत जर २००० रु. लागू लागले तर ती शाळा तूर्त न बांधलेलीच बरी; कारण आणखी पांचसहा महिन्यांत सुदैवानें हल्लीची महागाईची परिस्थिती बदलली तर त्यांच पैशांत एका ऐवजीं दोन शाळा बांधतां येतील. वर्ष सहामहिन्यांत ही परिस्थिती पालटेल अशीं चिन्हें पण दिसूं लागली आहेत. तोंपर्यंत राष्ट्रसंवर्धक खात्यांनीं अमुलीं कामें स्थगित करावीत.

यानंतर पुरवणी बजेटांतील खातें नं. ४६ ह (१)—सप्लाय डिपार्टमेंट् यांतील धान्य खरेदीकरितां जे ६००००० रु. दाखल आहेत, त्याखेरीज इतर ज्या खर्चाच्या बाबी आहेत त्याकडे मी ना. सभासदांचें लक्ष वेधूं इच्छितो. थोड्या वेळांपूर्वी धान्यपुरवठ्यासंबंधी जो एक ठराव सभागृहापुढें आला होता तो कांहींशा दुरुस्तीनें सम्मत झाला आहे. त्या ठराव मांडण्यांतील स्पिरिट् हें आहे कीं धान्यपुरवठ्याच्या कामीं व्हॉलंटियर्सनां, म्हणजे विनावेतन

खुशीनें काम करणाऱ्यांना वेतन जावें. लोक खुशीनें काम करण्यास तयार असतांना ज्यादा एस्टॅब्लिशमेंट नेमून खर्च करावयाचा हें बरोबर नाहीं. ज्यादा खर्च न करतांना लोकांची मदत घेऊन ही धान्यपुरवठ्याची लोकोपयोगी कामें करवून घेतलीं जावींत, असें मला वाटतें. धान्यखरेदीकरितां सहा लाख रुपयांची तरतूद योग्यच आहे, परंतु ह्या धान्यखरेदीवर मॅनेजर, कारकून, ज्यादा अव्वल कारकून वगैरे प्रकारच्या एस्टॅब्लिशमेंटचा पगाराचा बोज पडला तर धान्यखरेदीचा दर किती स्वस्तांत पडेल याचा जरूर विचार करावा, तुलनात्मक दृष्टीनें पाहातांहि सदरची खर्चाची सदरें जरूर नाहींत असें मला वाटतें. कारण यामुळें ऑफिसरांची संख्या वाढून लोकहितसंवर्धक असें कांहींच पदरांत पडत नाहीं. अधिकाऱ्यांची डिपार्टमेंटॅलिझम् मात्र वाढत आहे अशी लोकांची तक्रार आहे, व अशा करण्यांनीं ती सार्थच आहे असें म्हणावें लागेल. ह्या खात्याच्या एस्टॅब्लिशमेंटकरितां पांच महिन्यांसाठीं जवळ-जवळ तीस हजार रुपये दाखल केले आहेत, म्हणजे वर्षाला सुमारें ६०-७० हजार रुपये खर्च झाला. या एस्टॅब्लिशमेंटची जरुरी केव्हां संपेल तेव्हां संपो, पण तूर्त तरी हे आपल्या उरावर बसले आहेत, तेव्हां केव्हां निघेल हें सांगतां येत नाहीं, मात्र हें खातें जातांना लाख दीडलाख रुपयेंतरी खाऊन जाणार यांत शंका नाहीं. कांहींच कारण नसतांना हा बोजा ह्या खात्यावर पडत आहे. कारण धान्यखरेदीचें काम डेप्युटी डायरेक्टर व तालुक्याचे मामलेदार करीतच आहेत. तरी मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, इतकी रक्कम खर्च करून हें एस्टॅब्लिशमेंट ठेवणें संस्थानास महाग पडत आहे.

पुरवणी बजेटांतील खातें नं. १-७-८ यांत दाखल केलेल्या रकमा इन्ऍव्हिटेबल् असल्यानें त्यावद्दल माझें कांहींच म्हणणें नाहीं. मात्र 'बगीचा खर्च' यासदरीं मूळ बजेटी जी ११०० रुपयांची रक्कम दाखल आहे, त्यातूनच हा बगीच्या दुरुस्तीचा खर्च भागणेंत कांहींच हरकत नव्हती, त्याकरितां ज्यादा रकमेची जरुरी नव्हती.

ना. वि. का. खाडिलकर (फि. मे.):—I rise to a Point of Order. "बगीचा" म्हणजे वाहनाचा नव्हे; तर "बगीचा" म्हणजे बाग; बागेचा खर्च. (हंशा)

मे. के. गो. कुलकर्णी:—Thank you. पुरवणी बजेटांतील खातें नं. १०-पोलीस खात्यावर दाखविलेला ज्यादा खर्च योग्यच आहे. कारण हल्लींच्या धामधुमीच्या काळांत दंगे-दरोड्यांचें प्रमाण वाढूं लागलें असल्यामुळें ज्यादा पोलीस भरती करावी लागली व त्यामुळें हा खर्च करावा लागत आहे. तेव्हां हा खर्च योग्यच आहे. तसेंच युद्धजन्यपरिस्थितीमुळें औषधांच्या किंमतींत झालेल्या वाढीमुळें नं. २६ दवाखाना खात्यांवर जी वाढ झालेली आहे तीही वाजवीच आहे असें कोणीही म्हणेल. एकंदरींत ह्या पुरवणी अंदाजपत्रकांमध्यें

बहुतेक जादा खर्च अपरिहार्य असल्यानेंच दाखल करावे लागले आहेत असेंच म्हणावें लागेल. मात्र मला फक्त एवढेंच सांगावयाचें आहे, कीं पब्लीकवर्क्स खात्यानें याचवेळीं जादा रकमेची मागणी न करितां मूळ अंदाजपत्रकांत दाखल असलेल्या २१००० रुपयांच्याच रकमेंमध्यें काटकसर करून जादा येणारा खर्च भागवावा असें सुचवून मी माझें भाषण पुरें करतो.

### सुट्टीनंतर

ना. द. मा. कुलकर्णी:—सन्मान्य अध्यक्षमहाराज, सन १३९२ च्या पुरवणी अंदाजपत्रकांतील खर्चाचे आंकडे ज्याप्रमाणें ना. फिनॅन्स मेंबर यांनीं सांगितले तसेंच त्यांनीं जमेचेहि आंकडे सांगावयास हवे होते. वर्षांतून दोन वेळां असेंब्लीचीं अधिवेशनें भरविणेंचें जें तत्व ठरलेलें आहे त्याचा अम्मल चालू सालींच प्रथम झालेला दिसतो; त्याप्रमाणेंच यापुढेंहि ही प्रथा चालू रहावी अशी इच्छा प्रदर्शित करून मी चालू विषयाकडे वळतो. ह्या पुरवणी अंदाज-पत्राकामुळें अकंदर खर्चांत एक लक्ष अठ्ठावन हजार रुपयांची वाढ होणार आहे. अडीच लाख रुपये मुळांत खर्च करून पुन्हां ही जादा १५८००० रु. ची मागणी करणेंत येत आहे व त्यास कारण म्हणजे हें वॉर-बजेट आहे असें सांगणेंत येतें. कदाचित लढाईमुळें व जागतिक परि-स्थिती बिघडल्यामुळें धान्याचे भाव कडाडले असून जबरदस्त किंमती पडत असल्यानें जादा खर्च येणें स्वाभाविकच आहे व त्या दृष्टीनें धान्यखरेदी सदरास जे सहा लाख रुपये दाखल आहेत ते योग्यच आहेत असें म्हणतां येईल. परंतु मूळ बजेट असेंब्लीपुढें आल्यावेळीं त्या बजेटमध्यें दाखल करणेंच्या कांहीं रकमा राहिल्या गेल्या. त्या आतां पुरवणी बजेटांत दाखल करणें योग्य नाहीं. युद्धकालीन तजविजी व अंतःस्वास्थ्य या खात्याचे पोटीं "मोटारलॉरी व त्यासंबंधीं खर्च" यासाठीं ९०९० रुपयांची मागणी करणेंत आली आहे, परंतु एवढ्या रकमेंत नवीन लॉरी मिळणार नाहीं. करितां त्याऐवजी अेखादी मोटारलॉरी भाड्यानें कामापुरती घेतली असती तर खास खर्च कमी आला असता. सरकारनीं उशीरां कां होईना नोकरांना महागाई भत्ता दिला याबद्दल सरकारचें अभिनंदन करणें जरूर आहे. एवढें सांगून मी रजा घेतो.

ना. स. ग. फडके:— सन्मान्य अध्यक्षमहाराज,

चालू सालीं हें दुसरें अधिवेशन भरविल्याबद्दल मी श्रीमंत हिज हायनेस स्वारींचें अभिनंदन करितो व त्याबरोबरच प्रश्न विचारण्यास व ठराव मांडण्यास परवानगी दिल्याबद्दल मी आपलें मनःपूर्वक अभिनंदन करतो. हें अभिनंदन करतांना नव्या करांबद्दल ना. फिनॅन्स मेंबर यांनीं जो बिलरूपी ठराव मांडला आहे त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करतां येत नाहीं याबद्दल मला खेद वाटतो; तथापि ना. फिनॅन्स मेंबर यांनीं फिनॅन्स कमिटीतील कामाचे वेळीं आमच्याशीं जें सहकार्य केलें त्याबद्दल मात्र मला त्यांचे अभिनंदन करावेसें वाटतें, कनिष्ठ

नोकरांच्या महागाई भत्त्याबाबतहि श्रीमंतांनीं उशीरां कां होईना, जी कालरोजीं घोषणा केली, तिजबद्दल पूर्णांशानें अभिनंदन न करतां आलें तरी मीं त्यांचें अंशात्मक-रीत्या अभिनंदन करतो. अंदाजपत्रकावरील भाषण सुरू करण्यापूर्वी दरम्यानच्या काळांत ज्या कांहीं एकदोन संस्मरणीय गोष्टी घडल्या असतील त्यांचा उल्लेख करण्याची माझी पद्धत आहे. तीस अनुसरून सध्यां महाराष्ट्राच्या कळकळीचा प्रश्न— जें महाराष्ट्राचें विद्यापीठ तें अस्तित्वांत यावें अगर नाहीं याबद्दल मुंबई सरकारनें नेमके नामदार डॉ. जयकर यांच्या अध्यक्षतेखालीं जी चौकशी-समिती नेमिली आहे तिजपुढें साक्षी देण्याकरितां आपल्या संस्थानतर्फे मे. भट, विद्याधिकारी व मे. डी. एल्. गोखले यांना दरबारनें पाठविलें त्याजबद्दल मला खरोखरच सांगली दरबारचें मनःपूर्वक अभिनंदन करावेंसें वाटतें. त्याचप्रमाणें सध्यांच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष यांच्याबद्दल श्रीमंतांनीं कालरोजीं जाहीररीत्या जे धन्योद्गार काढले त्या विचारांशीं मी पूर्णपणें सहमत असल्यानें त्याबद्दलहि या दरबारचें अभिनंदन करावेंसें मला वाटतें. इतक्या चांगल्या गोष्टी सांगितल्या तशी एक वाईट गोष्टहि मला ह्या विधीमंडळास विदित करावयाची आहे. ती ह्मणजे सध्याचे डिव्हेलपमेंट ऑफिसर यांची नेमणूक होय. कर्वे-आर्थिक-चौकशी समितीच्या रिपोर्टांतील इतर सूचनांचा अंमल केल्याचा मागमूस सुद्धां नसतांना फक्त त्यांतील डिव्हेलपमेंट ऑफिसरच्या नेमणुकीची सूचना मात्र, त्या रिपोर्टाचा विचार होणेंपूर्वी दरबारनें अमलांत आणली यावरून "आधीं कळस मग पाया रे" या संतोक्तीची आठवण होऊन मला फार वाईट वाटतें. असें कोणतें संकट प्रजेवर गुदरलें होतें कीं, जें या नेमणुकीमुळें टाळतां आलें आहे ! डिव्हेलपमेंट ऑफिसर ह्या व्यक्ती-बद्दल मला कांहींहि ह्मणावयाचें नाहीं. या निमित्तानें मला ब्रिटिश हद्दींतील दिल्ली येथील मध्यवर्ती विधिमंडळांतील सन १९३७ सालांतील दोन तहकुबीच्या सूचनांची आठवण होत आहे त्यावेळीं ना. सत्यमूर्ती व ना. लाला शामलाल यांनीं चेंबर्स व ग्रेगरी यांच्या नेमणुकी-बद्दल दोन सभा-तहकुबीच्या सूचना आणल्या होत्या. त्या दिल्ली मध्यवर्ती विधिमंडळानें बहुमतानें संमत केल्या आहेत. तेथें जी विचारसरणी प्रकट केली गेली तीच विचारसरणी येथेंहि प्रकट करावी असें मला वाटतें. ती अशी कीं, "हिंदी लोक तज्ञ नाहींत ह्मणून त्यांची नेमणूक होत नाहीं व नेमणुकीची संधी नाहीं ह्मणून हिंदी लोकांना तज्ञ होण्यास मार्ग नाहीं." अशा दोन्ही बाजूंनीं सांगली संस्थानांतील प्रजाजनांची पद्धतशीर कुचंबणा गेलीं कित्येक वर्षें होत आहे. मि. ग्रेगरी यांना १०० रुपये पगार विलायतेंत मिळत असतां त्यांना येथें २९०० रुपये पगार देण्यांत आला. तशीच ह्या डिव्हेलपमेंट ऑफिसर यांची स्थिती आहे. आमच्या संस्थानांत लायख इसम नाहींत असें नाहीं; पण त्यांना वरिष्ठ जागांवर

केव्हांहि नेमलें बात नाहीं. कचठें येथें एक लंडन विश्वविद्यालयांतील एकॉनॉमिक्स विषय घेऊन फर्स्ट क्लास बी. एस्. सी. झालेले नोकर कुजत पडले आहेत. अशांची नेमणूक या जागेवर झाली असती तर कोठें बिघडलें असतें ! अशांना कां नेमलें नाहीं म्हणून विचारलें कीं, ते तज्ञ नाहींत म्हणून असें ठरावीक साच्याचें उत्तर देण्यांत येतें. नेमणुकीशिवाय ते तज्ञ तरी कसे होऊं शकणार ? ही ' व्हिशस् सर्कल'मधील विचारसरणी प्रकट करणें अत्यंत गैर आहे. यामुळें आमच्या संस्थानांत अशी परिस्थिति निर्माण झाली आहे कीं, एखादी १००-१५० रुपयांची मोठी जागा रिकामी झाली कीं, ती आपणांस मिळणें शक्य नाहीं, ती बाहेरच्या कोणातरी इसमास खास मिळणार अशी समजूत निर्माण झाल्यामुळें संस्थानच्या सर्व नोकर लोकांत एक तऱ्हेचें हीनगंडत्व निर्माण झालें आहे. तें नाहींसें झालें पाहिजे. इतकें प्रास्ताविक भाषण करून मी मूळ विषयाकडे वळतो.

नवीन करवाढीबद्दल ना. फिनॅन्स मेंबर यांनीं कालरोजीं भाषण केलें आहे. ना. अर्थमंत्री यांच्या भाषणांत ही करवाढ कां करावी लागली याबद्दलहि कारणें देण्यांत आलीं आहेत. पण ही करवाढ तात्पुरती आहे अगर नाहीं याबद्दल त्यांनीं कांहीं खुलासा केला नसल्यानें आम्हांस मतदान करण्यास बरीच अडचण पडणार आहे. ही करवाढ सुचवितांना सन १९३८ इसवी सालीं सारासुटीच्या वेळीं जी कपात करण्यांत आली ती कायम करण्यांत आल्याचें ना. अर्थमंत्री यांनीं जाहीर केलें असतें तर फार बरें झालें असतें ! ना. अर्थमंत्री नेहमीं नागर व ग्रामीण प्रतिनिधी असा कृत्रीम भेद निर्माण करून लोकप्रतिनिधींचीं मतें मिळवीत असतात. तसा भेदाभेद आम्ही आमच्यांत केव्हांहि पडूं देणार नाहीं. नोकरलोकांची पगारवाढ करतांना साठ रुपयांऐवजीं पंचाहत्तर रुपये पर्यंतच्या पगाराच्या लोकांना निदान चार रुपये तरी महागाई भत्ता द्या असें आमचें म्हणणें होतें. इतर संस्थानाप्रमाणें तरी या बाबतींत सांगली संस्थाननें उदारपणा दाखविणें जरूर होतें. तो दरबारनें दाखविला नाहीं म्हणून मी ना. मलेवाडीकर यांच्याप्रमाणें या बाबतींत पूर्णांशानें दरबारचें अभिनंदन करण्यास तयार नाहीं. ना. फिनॅन्स मेंबर यांनीं या अंदाजपत्रकांत पुष्कळ गोष्टी मांडलेल्या नाहींत. माझें त्यांना असें विचारणें आहे कीं, ताकास जातां मग मोगा कां लपवतां ? ना. मलेवाडीकर यांच्या म्हणण्याप्रमाणेंच मीहि म्हणतो कीं, या अंदाजपत्रकांत जमेकडे ८४००० रुपयेची रक्कम ना. अर्थमंत्री यांनीं जमा दाखवावयास पाहिजे होती. एक्साइज खातीं ७९००० व इनकमटॅक्स खातीं जादा पांच हजार मिळून ही रक्कम होते. गेल्या मे महिन्यांत उगार शुगर वर्क्समधून २२०० पोती साखऱ्या बाहेर पडला. त्यावरची मिळालेली अंदाजी १३००० एक्साइज डयूटी कोठें गेली ? चालू सालीं ११०००

पोतीं साखऱ्या बाहेर पडेल असा अंदाज आहे. त्याची एक्साइज ड्यूटी अंदाजी ६६०००। रुपये आपणांस या बजेटमध्यें कोठेंहि जमा केलेली दिसून येत नाहीं अशा तऱ्हेनें जमेची बाजू कमी दाखविण्याची व खर्च मात्र जास्त दाखविण्याचा अशी ना. अर्थमंत्री यांची नेहमीची पद्धत आहे. चालू साली इन्कमटॅक्सचें उत्पन्न निदान पांच हजार रुपयांनीं तरी वाढेल असें मला वाटतें. म्हणजे वरील ८४००० रुपयांची ही जमा – जी कोठेंच दाखविली गेली नाहीं – ती ध्यानांत घेतली असतां पांच लक्ष रिझर्व्ह फंडमधून चालू सालीं तूट भरून काढण्यासाठीं घेतलेले ८१०३० रुपये वजा केले असतां ही तूट भरून काढण्याचा प्रश्न आपोआपच सुटतो. त्याचप्रमाणें चालू सालीं फलटण व कोल्हापूरमधून अंदाजी ५२०० पोती साखर सांगली दरबारनें येथें आणली. तीं पोतीं फलटणला ३२-११-९ नीं तेथें मिळत होतीं व तीं ४३-१-० नें येथें विक्री करण्यांत आलीं. त्यांतून दरबारला अंदाजी ५२००० रुपये फायदा झाला असेल. त्याचप्रमाणें उगार शुगर वर्क्स कंपनी लिमिटेड इडील प्रत्येक पोतें सांगली दरबार ४१-८-० ला विकत घेऊन तें इतरांना ४६-२-० रु. स विकतें. याप्रमाणें ११००० पोत्यांचा हिशोब केला असतां अंदाजी ५५००० रुपये फायदा सांगली दरबारला या विक्रीमुळें मिळणें शक्य आहे. या दोन्ही रकमांची बेरीज ५२००० + ५५००० = १०७००० रुपये होते. व चालू सालीं अंदाजपत्रकांतून किमान एक लक्ष सातहजार रुपयांची बचत करतां येणें शक्य आहे. त्याचा विचार केला असतां ना. फिनॅन्स मेंबर यांनीं हा करवाढीचा ठराव कां मांडावा हेंच मला समजून येत नाहीं. ही बचत खालील खात्यांतून पुढीलप्रमाणें करतां येईल.

१. खातें नंबर ३ बजेटपान १६-श्रीमंत विठ्ठलराव बापूसाहेब यांची नक्त नेमणूक ३००० रुपये, या रकमेसाठीं ना. गृहमंत्र्यांकडून गेल्या अधिवेशनांत मागणी करण्यांत आली नव्हती. असें असतां ना. अध्यक्षांच्या सहीनें जें मंजूर झालेल्या रकमाचें पत्रक बाहेर पडलें आहे त्यांत चुकीनें ही रक्कम खर्च दाखविण्यांत आली आहे. त्याबद्दल काल रोजीं मी या अधिवेशनाचे प्रारंभीं प्रिव्हिलेज-मोशन देणार होतो, परंतु ना. अर्थमंत्री यांनीं ती चूक दुरुस्त करण्याचें मजपुढें कबूल केल्यामुळें मी ती सूचना सभागृहापुढें आणली नाहीं.

२. व्यवस्थाखातें नं. ११ बजेटपान २०–१८००० रुपये शिल्लक राहणें शक्य आहे.

३. खातें नं. १९ जेलसुपरिंटेंडंट--सहा महिन्यांचा पगार बचत ६०० रुपये.

४. खातें नं. २०–पोलीसखातें, बजेटपान ३३–टीअरगॅस (खर्च झाला नाहीं) १७०० रुपये.

५. खातें नं. ३२–पब्लिक् वर्क्स् खातें २०००० रुपये. कामगिऱ्या झाल्या नाहींत.

६. खातें नं. २७-पब्लिक हेल्थ बजेटपान ४५ (क) मोठ्यासाठींकरतां तरतूद. चार हजारपैकीं शिल्लक २००० रुपये (ड) खेड्यांतून पाणीपुरवठा व रस्ते १३००० रुपये. रक्कम खर्च झालेली नाहीं. (फ) मलेरिया प्रतिबंधक उपाय पैकीं शिल्लक २००० रुपये.

७. खातें नं. ३७ व इतर देणग्या

६. अे. आर्. पी. खर्च १९००० रु. पैकीं शिल्लक ८००० रुपये आहेत.

७. वॉर इंजरीज बद्दल खर्च ९००० रुपये पैकीं शिल्लक २००० रु. आहेत.

८. सिव्हिक्गार्डस्पैकीं खर्च वजा जाता शिल्लक २००० रुपये आहेत.

८. खाते नं. ४४ दुष्काळी कामगिऱ्या बजेटपान ९६ पैकीं शिल्लक १७९३७ रुपये (महागाईभत्ता वजा जातां) आहेत.

९. खातें नं. २६ सुतिकागृह (ड) स्त्रीडॉक्टरचा पगार शिल्लक दहा महिन्यांचा ५०० रुपये.

१०. खातें ४४ (२) पुरवणी बजेटमधील सार्वे इन्स्पेक्टर यांचें ऑफीस खर्च रुपये २३६४ ही रक्कम संस्थानला ब्रिटिश सरकारकडून परत मिळणार आहे.

अशी ही रक्कम एकूण एक लक्ष सात हजार एक रुपये होते. ह्मणजे जमेकडील १०७०००; रुपये व ही १०७००१ रुपयांची बचत या दोन्हींचा विचार केला असतां सांगली दरबारला करवाढ करण्याची सद्यःस्थितींत कांहींहि आवश्यकता नाहीं असें नामदार समासदांना दिसून येईल. एवढ्या मोठमोठ्या बोटी बुडत असून ब्रिटिश सरकार त्यांचा खर्च बिनतक्रार सोसत असतांना एका विमानतळाच्या व्यवस्थेच्या खर्चाकरितां ब्रिटिश सरकार सांगली स्टेटकडे बघेल असें मला वाटत नाहीं. नवीन करवाढीस आमची हरकत आहे असें नाहीं; वर मी केलेल्या अंदाजांत कांहीं चुकाहि असू शकतील, परंतु हें पुरवणी बजेट मांडतांना काऊ-चिऊच्या गोष्टी सांगून आमची समजूत घालण्यापेक्षां बजेटची काय परिस्थिति आहे तें आह्मांला स्पष्ट कळूंद्या, आह्मी सर्व वस्तुस्थिति पाहूं व या सर्व गोष्टींचा विचार करूं आणि तशी जरूरच असेल तर जादा करवाढीलासुद्धां आह्मी तयार आहोंत. असें आमचे ना. अर्थमंत्र्यांना सांगणें आहे. याखेरीज चालू सालच्या अंदाजपत्रकांतून पुढील बाबतींतील खर्चात काटकसर करतां येण्याजोगी आहे. खातें नंबर ७-संस्थानच्या धार्मिक बाबी पान १७, चालू सालच्या श्रीगणपतीच्या उत्सवाच्या खर्चात बचत करण्यासाठीं एका स्वतंत्र माजी मंत्र्यांची श्रीमंतांनीं नेमणूक केली होती व उत्सवाच्या खर्चात अंदाजी १९०० रुपये बचत झाली अशी माझी माहिती आहे. हा ललिताचा प्रसाद संस्थानच्या गंगाजळींत पेवूंद्या एवढेंच माझें ह्मणणें आहे. चालू सालीं हायस्कूलच्या फीच्या

उत्पन्नांत थोडीबहुत वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणें रेल्वेच्या उत्पन्नांतहि वाढ झाली असली पाहिजे असें माझें ह्मणणें आहे. " थट्टी व कुरणें " यांतील खर्चांत बचत होण्यासारखी आहे, परंतु त्यामध्यें मी शिरूं इच्छीत नाहीं. कारण तेथील लक्ष्मीच्या कुरणांत एक मोठा देवनाग आहे असें मी अैकलें आहे ! श्रीमंतांनीं एका बड्या ऑफिसरांना दाबून पगार मिळत असतां त्यांच्या ऑपरेशन् व औषधपाण्याच्या खर्चाकरतां आपल्या अधिकारांत २०० रुपयांची देणगी दिली आहे. यापेक्षां एखादा गरीब पटेवाल्याच्या बायकोच्या बाळंतपणासाठीं ही रकम खर्च पडली असती तर फार बरें झालें असतें व त्याचा दुवाहि श्रीमंतांना मिळाला असता. या अशा अपात्री दानाची पुनरावृत्ती होवूं नये अशी माझी श्रीमंतांना नम्र कळकळीची विनंती आहे. खालील गोष्टी व त्यावरील खर्च या पुरवणी अंदाजपत्रकांत यावयास नको आहेत. पोलिटिकल कॉन्फरन्सीस्‌करतां कांहीं रक्कम खर्चादाखल झालेली पाहिली कीं मला चीड आल्याशिवाय रहात नाहीं. या खात्यानें सांगली संस्थानच्या धान्यपुरवठ्याच्या प्रश्नाबद्दल काय व्यवस्था केली आहे ? हिंदुस्थान सरकार ह्मणतें कीं आमचें संस्थान हें मुंबई इलाख्याचा एक भाग आहे. हें जर खरें तर त्याबद्दल कांहीं रेसिप्रोकल् व्यवस्था व्हावयास नको काय ? आमचे मंत्री दिल्लीस जाऊन असल्या कामीं कांहीं खटपट करत नसल्यास अशा खर्चास मंजूरी देऊन काय उपयोग ? पुरवणी अंदाजपत्रकांत ' दिवाणीदप्तरखाना ' या सदरावर तीन हजार रुपयाची रकम पुन्हां खर्च करावी लागत आहे. हा खर्च पाहिला तर डोकें फिरल्याशिवाय रहात नाहीं. एकदां दिवाणी रेकॉर्ड वाड्याबाहेर नेलें काय ! व पुन्हां आंत तें आणलें जातें काय ? कांहीच समजत नाहीं. हें रेकार्ड बाहेर नेतांना मागील एक वरिष्ट अधिकारी ह्मणाले होते कीं, आमचे सिव्हिल रेकॉर्ड वाड्याच्या प्रवेशद्वारांजवळच्या घोडीं उभीं करणेच्या कमानींत ठेवलें तरी चालेल. त्यांना हें कळलें नाहीं कीं — ते निघून गेले तरी सांगलीचें सिव्हिल रेकार्ड हें सतत रहाणारच ! त्या वेळीं सिव्हिल् रेकार्डमधील उंच शिड्या मोडून त्या बाहेर नेल्या त्या आतां पुन्हां जोडून उंच कराव्या लागत आहेत !! खालील कलमांपैकीं कांहीं रक्कम खर्च दाखविली गेली असली तरी ती पूर्णांशानें तशी खर्च होणें शक्य नाहीं. उदाहरणार्थ 'व्हिलेज गार्डसूचा पगार' यांतील कांहीं भाग लोकांकडून येणार आहे. लाठ्या, भाल्यांचा पुरवठा अद्यापिहि लोकांना झालेला नाहीं अशी मंगळवेढें येथील जनतेची तक्रार आलेली आहे. मोटारलॉरीखरेदीकरतां ९०९० रुपये खर्च दाखविले आहेत ही लॉरी मिळाली तर बरी, परंतु माझ्या मतें यापेक्षां संस्थाननें एखादी लॉरी भाड्यानें ठेवण्याचें ठरविलें असतें तर यापेक्षां कमी खर्च लागला असता. "विशेष प्रसंगी तरतूद" या सदरांतील बराच खर्च कमी करण्यासारखा आहे. एकूण ह्या बजेटमधील खर्चांत बरीच मोठी बचत होण्याचा संभव आहे व बरीच मोठी रक्कम यांत जमा न दाखविलेली अशीहि

राहिलेली आहे. शेवटीं या सप्लिमेंटरी बजेटमधील "कॅपिटल् हेड्सूबद्दल" दोन शब्द सांगून मी माझें भाषण पुरें करतो. या हेड्खाली शिरहट्टीच्या "वूलइंडस्ट्रीला" १२८०० रुपये दिल्याचें दाखविलें आहे. ती रक्कम कर्ज स्वरूपाची असून परत येणारी आहे. ह्मणून तीबद्दल मी कांहीं अधिक बोलत नाहीं. "सप्लाय व स्टोअर्स" डिपार्टमेंटबद्दल मी जास्त बोलूं इच्छीत नाहीं, कारण त्याबद्दल विधिमंडळानें नुकताच एक ठराव संमत केला असून त्या ठरावांतील आशयाप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांनीं शक्य तितका खर्च कमी करण्याचा यत्न करावा अशी माझी सूचना आहे. या दृष्टीनें ह्या अंदाजपत्राकडे पाहिलें तर उद्यां सुचविल्या जाणाऱ्या करवाढीला कोणताहि आधार मिळत नाहीं असें मला मोठ्या खेदानें ह्मणावें लागतें. त्यासंबंधीचे माझे विचार मी उद्यां मांडीनच. शेवटीं, मला हें भाषण करण्यास थोडा जास्ती वेळ दिल्याबद्दल मी ना. प्रेसिडेंटसाहेब यांचे आभार मानून हें माझें भाषण संपवितों.

ना. रा. ग. करंदीकर:—सन्मान्य अध्यक्ष,

(१) माझे मित्र ना. फडके यांनीं आतां जें भाषण केलें त्यास मी सहमत आहे. त्यांनीं निरनिराळे आंकडे सांगून ह्या अंदाजपत्रकाचें चांगलेंच विवरण केलें आहे. परंतु त्याचेप्रमाणें मी आंकड्यांच्या तपशिलांत न शिरतां हें अंदाजपत्रक कोणाच्या फायद्याचें आहे याविषयीं चार शब्द सांगणार आहे. ह्या बजेटमध्यें शेतकऱ्यांच्या हिताकरितां कांहींहि नाहीं. सरकारी नोकरांना महागाईभत्ता दिला आहे व व्यापाऱ्यांना फायदा मुबलक आहे, पण शेतकऱ्यांना काय आहे? ना. फिनॅन्स मेंबर असें ह्मणतील कीं, सहा लाख रुपये धान्यखरेदीकरतां जे अंदाजपत्रकांत नमूद आहेत ते शेतकऱ्यांचेकरितांच आहेत. परंतु ते तरी कोठें विनाव्याज दिलेले आहेत? त्यावरहि अडीच टक्के व्याज आकारणेंत आलेलें आहेच........

ना. वि. का. लाडिलकर:--फक्त पांच लाखच सांगली बँकेतून व्याजानें घेणेंत आलेले असून एक लाख रुपये जे सरकारांतून घेणेंत आलेले त्यांवर व्याज आकारणेंच नाहीं.

ना. रा. करंदीकर:—हरकत नाहीं. एक लाखावर जरी व्याज नसलें तरी पांच लाख तरी व्याजानेंच काढलेले आहेत ना? हे व्याजानें बँकेतून काढण्याचें कारण मला समजत नाहीं. संस्थानचा दरसाल वाढणारा रिझर्व फंड या कारणांकरितां वापरला असता तर कांहीं हरकत आली नसती. सांगली बँकेकडून कर्ज काढलें तरच पैसे आहेत नाहींतर दरबारजवळ पैसे नाहींत अशी दरबारची स्थिती आमच्या समजुतीनें नाहीं. आपला स्वतःचा पैसा जवळ ठेवण्याचा व दुसऱ्याकडून व्याजानें रक्कम काढून गुजराणा करावयाचा व गरीबावर व्याजाचा खर्च जास्त घालावयाचा हें बरोबर नाहीं. दुसरी गोष्ट, स्टोअर डिपार्टमेंट्च्या खर्चासंबंधीची. या बाबतींत

सभागृहानें नुकता एक ठराव मंजूर केला असून त्याप्रमाणें शक्य तितक्या कमी खर्चात सदर खातें चालविण्याचें सरकारनें जाहीर केलें असलेनें या बाबतींत दाखविलेली सुमारे एकतीस हजार रुपये रक्कम खर्च पडणार नाही असें वाटतें.

(२) दुष्काळी कामें सरकारनें आतांच सुरू करावयास पाहिजेत. परंतु मे. मामलेदारांकडून अद्याप रिपोर्ट आलेले नाहींत म्हणून कामगाऱ्या सुरू केल्या नाहींत, असें आमच्या एका प्रश्नास उत्तर देण्यास आलेलें आहे. रिपोर्ट कदाचित् येणार नाहींत अगर दुष्काळ संपल्यानंतर पुढील वर्षी येतील. सध्यां लोक मोकळे आहेत, त्यांना काम दिल्याशिवाय त्यांच्या हातांत पैसे येणार नाहींत. पैसे न मिळाल्यास ते पोट कसें भरणार! आपल्या सरकारजवळ पुष्कळ साठा धान्याचा आहे अशी जरी स्थिती झाली तरी त्याचा त्यांना काय उपयोग आहे? मंगळवेढ्यास दामाजीपंतानी कोठार लुटविलें होतें असें म्हणतात. त्यांना त्यांचे पैसे देण्यास विठू महार आला होता; येथें मात्र तसें कोणी येणार नाहीं.

(३) भाले वगैरेचा खर्चहि याबजेटीं दाखविलेला दिसत आहे, पण हे भाले केव्हां मिळणार आहेत कोणास ठाऊक! आमचें पोलीसखातें हें इतकें जागरूक आहे कीं, त्याला गुंडांच्या हातांतील भाला मात्र दिसत नाहीं, परंतु तोच भाला एखाद्या नागरिकाच्या हातांत दिसला तर त्यांचे डोळे वटारले जातात! भाल्यास परवानगी लागते कां नाहीं हा प्रश्नच आहे; तथापि याबाबतींतील आपलें धोरण एकवार दरबारनें जाहीर करावें असें मला वाटतें. माझ्या मतें सध्याच्या काळीं अशी सर्वास परवानगी देण्यास दरबारनें हरकत घेऊं नये.

(४) एकीकडे माहागाईभत्ता दिला असूनही कांहीं ठिकाणी कित्येक दिवस पगारहि मिळत नाहीं, अशी स्थिती झालेली आहे. मंगळवेढें स्पेशल ट्रिब्यूनल कोर्टामधील नोकरलोकांचे पगार गेले सात महिने दिलेले नाहींत. शेवटीं पुष्कळ तक्रारी झाल्यानंतर तसलमाती वगैरे दिल्या आहेत, असें समजतें. गांवकामगारांचा दुष्काळाकरितां दर तीन महिन्यांनीं पगार द्यावा असें गॅझेट झालेलें आहे, परंतु त्याची अंमलबजावणी मात्र आजवर झालेली निदान मलातरी माहित नाहीं.

(५) तालुक्यांत सध्यां एक म्हण प्रचारांत येऊं लागली आहे. कीं कोणाचेंही काम खोटाळ्यांत टाकावयाचें असेल तर तें, "घाला पथकांत". माझ्या मतें एकादां या पथकातून टपाल पाठविण्याच्या व्यवस्थेची पुनर्घटना केली तर पुष्कळ उपयोग होईल.

(६) मोडीची अडचण शहरांत कदाचित् भासत नसेल, पण खेड्याच्या बाजारांत एक रुपयाचे मोडीकरितां बट्टा दिल्याशिवाय मोड मिळत नाहीं. सरकारचे ट्रेझरींत पुष्कळ नाणें

असेल, सावकाच्या दुकानांत रोज पुष्कळ चिल्लर येत असेल, परंतु ही सर्व मोड जाते कोठें अगर तिचें काय होतें कोणास ठाऊक? ह्या गोष्टीचीसुद्धां दरबारनें कांहींच सोय केली नाहीं. एका फौजदारी केसमध्यें साक्षीदारास भत्ता देते वेळीं "दहा आणे घेऊन आलास तर सहा आणे भत्ता देऊं" असें सांगणेंत आलेलें होतें. ही परिस्थिति बरोबर नाहीं. अॅड्‌मिनिस्ट्रेशन् एफीशिअन्ट्‌ली झाली पाहिजे; मशीनरी मूव्ह झाली पाहिजे.

(७) ग्रामोद्धार खात्याकडे पाहिलें तर त्या खात्याची पहिल्यापासून पुनर्घटना केली पाहिजे. पूर्वीचीं तत्वें परिस्थिति बदलल्यामुळें लागूं पडत नसतील तर तीं बदलली पाहिजेत. शाळाखातेंतहि बऱ्याच सुधारणा अद्याप व्हावयास पाहिजेत. मंगळवेढें येथील शाळेबद्दल पुष्कळ तक्रारी सांगतां येण्यासारख्या आहेत. मास्तरलोकांच्याहि पुष्कळ तक्रारी आहेत, परंतु त्यांचा विचार होत नाहीं. गांवचे लोकांचा सल्ला शिक्षणाधिकारी यांना दिला असतां तो बाजूला ठेवला जातो. कोणत्याहि खर्चास जास्त पैसा पाहिजे असेलतर नागरीक जीवनाच्या सोयी करून रकमा घ्या. नागरीक बजेटांतील आंकड्यांकडे पहात नसून अॅड्‌मिनिस्ट्रेशनमुळें जाचक-पणा होऊं लागला तर तो त्याला त्रासदायक होतो. म्हणून नागरिकजीवन सुखी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

(८) हें वॉर बजेट आहे असें सांगण्यांत येतें. ह्या बजेटांत पोलिसखात्यावर पुष्कळ रक्कम घातलेली आहे. परंतु आमचाच पैसा खर्च होऊन पोलिसांचेंच राज्य न व्हावें म्हणजे झालें! सध्यां पोलिसांच्या हातांत एक मोठें शस्त्र मिळालेलें आहे. कांहीं करावयाचें असो, कांहीं झालें असो किंवा कांहीं चालूं असो, आलाच भारत संरक्षण कायदा पुढें! शेतकऱ्यानें स्वतःच्या पोटापुरता जोंधळा ठेविला तरीसुद्धां त्याला भारत संरक्षण कायद्याखालीं पोलीस दाब देतातच. त्याला पोटापुरता जोंधळा खरेदी करूं देत नाहींत. तरी या बाबतींत मे. पोलिस सुपरिंटेंडंट यांचेकडून अधिक खबरदारी घेतली जाईल अशी आम्ही अपेक्षा करितो. ह्या बजेटवरून हें बजेट तुटीचें नसून तें करवाढीचें बजेट आहे असें म्हणावें लागतें. एवढें सांगून मी माझें भाषण संपवितो.

ನಾ. ಮ. ಫ. ಡಬಾಲಿ:—ಮೇ. ಅಧ್ಯಕ್ಷ ಮಹಾರಾಜ, ಮತ್ತು ನಾಮದಾರ ಸಭಾಸದ ಮಹಾಶಯರೇ, ಈ ವರೆಗೆ ನಾ. ಫಡಕೆ ಇವರು ಸನ ೧೩೫೩ ಫಸಲೀನಲ್ಲಿ ಪುರವಣಿ ಅಂದಾಜಪತ್ರಕದಮೇಲೆ ಪ್ರತ್ಯೇಕ ಅಂಕಿಗಳನ್ನು ಕೊಟ್ಟು ತಮ್ಮ ಭಾಷಣ ಮಾಡಿರುತ್ತಾರೆ. ನಾನು ಇದರಲ್ಲಿಯ ಕೆಲವು ಕಲಮುಗಳಮೇಲೆ ಹೇಳುವದಕ್ಕೆ ನಿಂತಿರುವೆನು.

ಛಾಪಿಲ ಅಂದಾಜಪತ್ರಕೇಲ್ಲಿಯ ಪಾನು ೩ ಇದರಲ್ಲಿ ಖಾತೇ ನಂ. ೧೬, ಸ್ಟೆಶನರೀ ಖಾತೇಯ (ಡ) ಇದರಲ್ಲಿ ಸ್ಟೇಶನರಿ ಮತ್ತು ಸ್ಟೋರ್ಸ ಖರೇದಿ ಮಾಡುವದಕ್ಕಾಗಿ ರಕ್ಕಮು ರೂ. ೩೫೦೦ ಜ್ಯಾದಾ ಮಂಜೂರಿ ದೇಡಲಾಗಿದೆ. ನಮ್ಮ ಸ್ಟೆಟನಲ್ಲಿಯ ಗ್ಯಾಝೆಟ ಅಥವಾ ಪಟ್ಟೆ ಹುಕುಮುಗಳು ಪ್ರಸಿದ್ಧ

ಆಗುತ್ತವೆ. ಅವೆಲ್ಲ ಮರಾಠಿ ಅಥವಾ ಇಂಗ್ಲೀಶ ಭಾಷೇಯಲ್ಲಿ ಛಾಪಿಸುತ್ತಾರೆ. ಕೆಲವು ಹುಕುಮುಗಳು ಅತ್ಯಂತ ಮಹತ್ವದ್ದು ಇರುತ್ತವೆ. ಆ ಹುಕುಮುಗಳು ಕನ್ನಡ ಓದುವವ ಜನರಿಗೆ ತಿಳಿಯುವದಿಲ್ಲಾ. ಆದರಿಂದೆ ಮರಾಠಿ ಅಥವಾ ಇಂಗ್ಲೀಶ ಭಾಷೇಯಲ್ಲಿ ಛಾಪಿಸಿದ ಮಜಕೂರು ಅವರ ಭಾಷೇಯಲ್ಲಿ ಅಂದರೆ ಕನ್ನಡಭಾಷೇಯಲ್ಲಿಯೂ ಕೂಡಿ ಓದಲಿಕ್ಕೆ ಸಿಗುವದು ಅವಶ್ಯಕವಿದೆ. ನಮ್ಮ ಶಿರಹಟ್ಟಿ ತಾಲುಕಾ ಪೂರ್ಣ ಕನ್ನಡ ಇದ್ದ ಅದರ ಜನರಿಗೆ ಮರಾಠಿ ಓದಬರಿಯುವದು ಬರುವದಿಲ್ಲಾ. ಕಾರಣ ಗ್ಯಾಝೇಟು ಅಥವಾ ವಟ್ಟ ಹುಕುಮುಗಳು ಮರಾಠಿ ಹಾಗೂ ಕನ್ನಡ ಭಾಷೇಯಲ್ಲಿ ಛಾಪಿಸುವದಿಲ್ಲಿ ಬರಬೇಕು.

ಅದರಂತತೆಯೇ ಪಾನು ೫ ಖಾತೆ ನಂ. ೨೪ ಶಿಕ್ಷಣಖಾತೆ ಇದರಲ್ಲಿ ೨೩೩೭ ರೂಪಾಯಿಯ ಮಾಗಣಿ ಆದೆ. ಅದರೊಳಗೆ (ಡ) ಇಪರದ ರೂ. ೪೦೦ ಟ್ರೇನಿಂಗ ಕಾಲೆಜನಲ್ಲಿ ಕಳಿಸಿದ ಶಿಕ್ಷಕರಿಗೆ ಅಲಾಉನ್ಸ್ ಅಂತಾ ಕಲಮು ಅದೆ. ನಮ್ಮ ಸಂಸ್ಥಾನದಲ್ಲಿ ಮರಾಠಿ ಟ್ರೇನಿಂಗ ಕಾಲೇಜ ಸೂರೂ ಆಗಿರುತ್ತದೆ. ಆವರೇ ಶಿರಹಟ್ಟಿ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿಯ ಶಿಕ್ಷಕ ಜನರಿಗೆ ಧಾರವಾಡಕ್ಕೆ ಟ್ರೇನಿಂಗ ತೆಗೆದುಕೊಳ್ಳುವದಕ್ಕಾಗಿ ಈ ಅಲಾಉನ್ಸದೊಳಗಿಂದಾ ಮದತ ಆಗಬೇಕು.

ಹಾಗೂ ಪಾನು ೬ ಖಾತೆ ೩೨, ಪಬ್ಲಿಕ ವರ್ಕ್ಸ ಇದರೊಳಗೆ ೨೪೪೬೪ ರೂಪಾಯಿಯ ಮಾಗಣೀ ಆದೆ. ಆ ರೂಪಾಯಿದೊಳಗಿಂದ ಶಿರಹಟ್ಟಿ ತಾಲೂಕಿನಲ್ಲಿಯ ಯತ್ತಿನಹಳ್ಳಿ ರಸ್ತೆ ಅಗದೀ ನಾದುರುಸ್ತ ಅದೆ. ಅದನ್ನು ತಯಾರ ಮಾಡುವದರಲ್ಲಿ ಬರಬೇಕು. ಆ ರಸ್ತೆದ ಕೆಲಸ ಇದರೊಳಗಿಂದ ರಕ್ಕಮು ಖರ್ಚು ಹಾಕಿ ತಯಾರ ಆಗುವದು ಅವಶ್ಯ ಅದೆ. ಅದೆ ರೀತಿಯಿಂದಾ ಮಾಗಡೀ ಕೆರಿ ದುರುಸ್ತಿ ಮಾಡುವದು ಮತ್ತು ಅದರಲ್ಲಿ ಕೆಸರೆಲ್ಲಾ ಖೊದಾಯಿಸುವ ಕಾಮಗಾರಿ ಈ ಖರ್ಚದೊಳಗಿಂದ ಮಾಡಬೇಕು. ಈ ಕೆರಿ ದುರುಸ್ತಿಯ ಮತ್ತು ಯತ್ತಿನಹಳ್ಳಿ ರಸ್ತೆ ತಯಾರ ಮಾಡುವ ಕೆಲಸಗಳು ಇದೇ ದಿವಸಗಳಲ್ಲಿ ತಾಬಡ-ತೋಬ ಸುರು ಮಾಡುವದರಲ್ಲಿ ಬಂದರೆ ಅಲ್ಲಿಯ ಬಡಜನರಿಗೆ ಮತ್ತು ಕೂಲಿಕಾರರಿಗೆ ಕೆಲಸ ಸಿಕ್ಕಿದ್ದರಿಂದಾ ಅವರ ಹೊಟ್ಟೆಯ ಪ್ರಶ್ನವನ್ನು ಸ್ವಲ್ಪ ಮಟ್ಟಿಗೆ ಬಿಡಿಸದಂತಾಗುವದು.

ಇನ್ನೊಂದು ನನ್ನ ಸೂಚನೆ ಅಂದರೆ ಪಾನು ಖಾತೆ ನಂ. ೪೪ ಇದರಲ್ಲಿ ೫ ನೇ ಕಲಮಿನಲ್ಲಿ ಮಹಾ-ಗಾಯಿ ಭತ್ತೆ, ಇದಕ್ಕೆ ೨೫೬೬೦ ರೂಪಾಯಿ ಹಾಕಿದೆ. ನಮ್ಮ ಸಂಸ್ಥಾನದಲ್ಲಿ ೩೦ ರೂಪಾಯಿ ತನಕಾ ಪಗಾರ ಸಿಗುವ ನೌಕರ ಜನರಿಗೆ ೩ ರೂಪಾಯಿ ಮಹಾಗಾಯಿ ಭತ್ತೆ ಸಿಗುತ್ತದೆ. ಬ್ರಿಟೀಶ ಹದ್ದಿಯಲ್ಲಿ ತಪಾಸಮಾಡಿ ನೋಡಿದರೆ ಅಲ್ಲಿಯ ನೌಕರ ಜನರಿಗೆ ೧೦ ರೂಪಾಯಿ ಮಹಾಗಾಯಿ ಭತ್ತೆ ಸಿಗುತ್ತದೆ. ಬಾಜಾರಪೇಟೆಯಲ್ಲಿ ದರಬಂದು ವಸ್ತು ಕಲ್ಪನಾತೀತ ತುಟ್ಟಿಯಾಗಿರುತ್ತದೆ. ಈಗ ಸುರೂ ಇದ್ದ ಮಹಾ-ಗಾಯಿ ಭತ್ತೆ ನೌಕರ ಜನರಿಗೆ ಅಗದೀ ಅಪುರಾ ಆಗುತ್ತದೆ. ಈ ಭತ್ತೆ ೩ ರೂಪಾಯಿ ಕೊಡದೆ ಬೇಸಿ ೬ ರೂಪಾಯಿ ಮಾಡವದರಲ್ಲಿ ಬರಬೇಕು. ಈ ಪ್ರಕಾರ ನನ್ನ ಸೂಚನೆಗಳು ಅವೆ.

ना. सौ. इंदिराबाई साठ्ये:—अध्यक्ष महाराज, उद्यांचा जो कर लोकांवर लादला जाणार आहे, तो श्रीमंत लोकांवर लादला जाणार आहे. यापूर्वीचे कर गरीबांवर व मध्यम वर्गावर होते. याशिवाय मला आणखी एक कर सुचवावयाचा आहे. दरमहा रुपये १०० ते २०० पर्यंत पगार असणाऱ्या सरकारी नोकरांनी आपल्या पगारांत दरमहा शे. १० रु. व दरमहा २०० चे पुढे पगार असणाऱ्या सरकारी नोकरांनी दरमहा शे. २५ प्रमाणे कपात करून घ्यावी व त्या पैशांतून गोरगरिबांस धान्य खरेदी करून द्यावें अशी माझी सूचना आहे. मूळ अंदाजपत्रकांत रक्कम फिरतीभत्याकरितां दाखल असतां पुन्हां पुरवणी अंदाजपत्रकामध्ये रक्कम दाखल

केली आहे. ना. फिनॅन्स मेंबर यांनीं मागितलें कीं राज्यकारभार उत्तम व्हावयास पाहिजे असेल तर अधिकाऱ्यांची फिरती भरपूर झाली पाहिजे, पण माझें असें म्हणणें आहे, कीं सध्याचे दिवसांत अधिक काटकसरीच्या दृष्टीनें जरूरीच असल्याशिवाय फिरती न करणें बरें. माहिती आणविण्याचीं अगर पाठविण्याचीं कामें टपालानेंच करावीत; नाहींतर क्षुल्लक कामाकरितां प्रवासभत्याचा खर्च जास्त असें होवूं नये. शिवाय अधिकाऱ्यांनी पहिल्या अगर दुसऱ्या वर्गानें प्रवास न करतां इंटरनें सर्रास प्रवास करावा........

एक आवाजः— अहो ते नेहमींच इंटरनें प्रवास करतात हो; पण भत्ता सेकंड अगर फर्स्ट क्लासचा घेतात. (हंशा)

ना. सौ. इंदिराबाई साठ्ये:—मी परवां मुंबईस गेल्या वेळीं मला असें आढळून आलें कीं हजारो रुपये मिळविणारे माझे एक स्नेही साध्या बसमधूनच प्रवास करीत असतात. नेहमीं गहूं खाणारे ते लोक सध्यां गहूं मिळत नाहीं तरीही त्याची पर्वा त्यांनीं केली नाहीं. अशी परिस्थितीहि सध्यां साध्या व्यवहारांत दिसून येते. माझी अशी एक सूचना आहे कीं अधिकाऱ्यांनीं ज्या वर्गानें खरोखरच प्रवास केला असेल त्या वर्गाच्या तिकीटाची तारीख व नंबर हीं बिलांत नमूद केलीं जावीं. सारांश ज्या रीतीनें व जितका पैसा राखतां येईल, वांचवितां येईल तितका तो वांचविण्याचा प्रत्येकानें मनःपूर्वक प्रयत्न करावा. मला दुसरी एक अशी गोष्ट सांगावयाची आहे कीं सांगली दवाखान्याचा कारभार ठीक चाललेला नाहीं असा बोभाटा सर्वत्र झालेला आहे. सिव्हिल् हॉस्पिटलच्या तोडीचा आपला येथील दवाखाना असतांना दवाखान्याच्या बागेतील फुलें घेण्याचासुद्धां अधिकार येथील चीफ मेडिकल् ऑफिसरला नाहीं. अधिकार दिले तर डॉक्टर कार्यक्षम होईल. प्रथम पूर्ण अधिकार द्या व नंतर गोरगरिबांना औषध दिलें जातें कीं नाहीं, दवाखान्यांतील कामकाज बरोबर चाललें आहे कीं नाहीं याबद्दल सरप्राइज् व्हिजीट्स् देऊन चौकशी करा. दवाखाना खात्यावर मी एक कपातीची सूचना दिलेली आहे, त्यावेळीं याबाबतींत अधिक बोलेन.

ना. म. ह. गोडबोले:—अध्यक्षमहाराज, ह्या पुरवणी अंदाजपत्रकावर अखेर अखेर बोलण्याची पाळी मजवर आली असल्यानें मला माझे सर्व विचार अगदीं थोड्या शब्दांत मांडावयाचे आहेत. ह्या पुरवणी अंदाजपत्रकाकडे पाहिलें तर व त्याला नांवच द्यावयाचें झालें तर "अन्नाचें भीतीनें भेडसावून काढुन घेतलेलें अंदाजपत्रक" असें म्हणतां येईल. जिकडे तिकडे अन्नाची अडचण मांडावयाची व अमुक अेखादी गोष्ट विचारल्यास "तुम्हांस अन्न हवें कीं नको" अशी भीति निर्माण करावयाची आणि त्या भीतिच्या पोटीं आपलें इष्ट कार्य

साधावयाचें असें दिसत आहे. ह्या अन्नाच्या भीतिनें कांहीं लोक भितात, परंतु जे बेडर आहेत त्यांना त्याचें मुळींच भय वाटत नाहीं. अन्नाची इतकी भीति कां घालतां? तो प्रश्न ज्याचा तो सोडवील. दुसरें अधिवेशन भरविल्याबद्दल कांहीं नामदारांनीं सरकारचे आभार मानले आहेत परंतु मला त्याबद्दल मुळींच आभार मानवत नाहींत. दुसरें अधिवेशन भरविण्या-बद्दल आम्ही दरसाल मागणी करीत होतो, परंतु त्या वेळीं तें कोठें भरविलें नाहीं? मग आतांच कां भरविणेंत येत आहे? पैशाची जरूरी सरकारला होती म्हणून! दरिद्री नारायणास त्यांनीं केव्हांहि हांक मारावी, तो तयारच आहे. अशा वेळेसच सरकारला आमची आठवण होते. वास्तवीक सरकारनें दोन्ही बाजूनीं तयारी दाखविणेस पाहिजे; तशी ती त्यांनीं दाखविल्यास आमचीहि तयारी आहे. धान्यपुरवठ्याबाबत हल्लीं प्रत्येक ऑफिसर तेंच एक काम करतो असें भासविलें जातें. दिवाणसाहेब, मिनिस्टरसाहेब, डिस्ट्रिक्ट जज्जसाहेब, कोणीहि ऑफिसर घ्या; जो तो धान्यपुरवठ्यांत व्यग्र राहून आपण तें एक मोठें शतकृत्य करतो आहोंत असें दाखवितो. कोणत्याहि गोष्टीचा वीरवृत्तीनें विचार करावयास हवा. सरकारला आज पैशाची गरज आहे व म्हणून आमचेवर तें निरनिराळया करांचें ओझें लादीत आहे. सरकारला आणीबाणीच्या ह्या प्रसंगीं अशा करण्यानें पैसा मिळाल्याचा आनंद होत असला तरी प्रजेची स्थिती व तिच्या आकांक्षा सरकारनें समजून घेतल्या पाहिजेत. पुत्रजन्माइतकी वास्तविक दुसरी आनंदाची गोष्ट नाहीं, परंतु त्या वेळीं मातेला मात्र जिवापलीकडे यातना होत असतात व जीव जगतो कीं जातो अशी स्थिती तिची होत असते. हिंदुस्थानासारख्या अफाट विस्ताराचे रशिया व चीन हे मोठे देश जगाच्या पाठीवर आहेत. आमच्यासारखेच तेहि देश कृषिप्रधान आहेत. परंतु एकीकडे जपानशीं लढत असतांनासुद्धां चीननें आपली आर्थिक व औद्योगिक योजना पुरी केलेली आहे. आतां तर चीनमधील एकाद्या शहरावर बॉंबिंग करावयाचें झालें तर जपानला आतोनात खर्च करावा लागतो व स्वतःची प्राणहानीहि सोसावी लागते असें म्हणतात. माझ्या म्हणण्याचा आशय एवढाच कीं, अशा अस्थिर परिस्थितींतहि चीन आपला कार्यभाग साधूं शकतो. देशांतील सध्याच्या अस्थिर वातावरणाचें व धान्याच्या टंचाईचें बुजगावणें आम्हास सरकारनें दाखवूं नये. अढवर्णीस आम्हांस भिऊन भागणार नाहीं. आलेल्या दिव्यांतून पार पडावयाचें आहे म्हणून नित्याची कामें बंद ठेवून चालणार नाहीं. शाळा, दिवाणी कोर्टें, रेव्हिन्यूकडील कामें बंद पाडून आम्हांस धान्य नको आहे. ह्या परिस्थितींतहि आम्ही औद्योगिक कार्यक्रमाकडे लक्ष देऊन उद्योगधंद्यांची वाढ केली पाहिजे. पूर्वी एकाद्या उद्योगधंद्यांच्या वाढीबद्दल प्रश्न विचारला असतां "आर्थिकचौकशी-समितीचा रिपोर्ट अद्याप येणेचा आहे, तो आला म्हणजे विचार करूं"

असें सरकारकडून उत्तर मिळत असे, परंतु आतां तो रिपोर्ट सरकारकडे येऊन बरेच दिवस झाले असतांनाहि धान्याच्या टंचाईचें बुजगावणें पुढें करून त्या रिपोर्टाचा विचार बाजूस ठेवलेला आहे. त्या रिपोर्टाचा विचार निदान असेंब्लीच्या पुढच्या अधिवेशनापर्यंत तरी व्हावा असें वाटतें. कुची-तलावासंबंधानें हिज् हायनेस् श्रीमंत राजेसाहेब यांच्या भाषणांत उल्लेख आलेला आहे. संस्थाननें आजवर ज्या योजनेवर लाख सव्वालाख रुपये खर्च केले आहेत. ती योजना आणखी एक लाख दीड लाख रुपये खर्च करून पुरी करणें व तिचा उपयोग याच वेळीं उद्योग धंद्याचे वाढीकडे करणें इष्ट आहे. आज आपणास मजूर स्वस्त दरानें मिळतील, व अन्नाच्या पायीं गांव सोडणारांना काम मिळून त्यांच्यावरचा आलेला प्रसंगहि निभावून जाईल. सांगली बँकेचे बाबतींतहि अशीच एक गोष्ट आहे. सदर विषय माझ्या आवडीचा असल्यामुळें मी त्याचा विशेष अभ्यास केला आहे. संस्थानच्या तिजोरीचें काम सांगली बँकेकडे सोपविण्यांबद्दल सन १९२८ पासून विचार चालू आहे. बँकेची इमारत पुरी झाली कीं हें काम बँकेकडे सोपविण्यांत येईल असें सांगण्यांत येत होतें. आतां इमारत होऊन सहा वर्षें झालीं तरीहि अद्याप या बाबतींत सरकारचा विचार चालूच आहे. मुंबई इलाख्यांत डिस्ट्रिक्ट ट्रेझरीचीं कामें बँकेकडे सोपविणेंत येवून त्यांनीं खर्चाची बचत केलेली आहे........

मे. रा. ब. मा. ह. लिमयेः—सर्वच डिस्ट्रिक्ट ट्रेझऱ्यांची नाहीं; कांहीं डि. ट्रे. यांचे.

मे. म. ह. गोडबोलेः—बरें; कांहीं डिस्ट्रिक्ट ट्रेझरींचीं कामें बँकेकडे दिलीं आहेत व खर्चांत बचत केली आहे. हीच बचत येथें कां करूं नये समजत नाहीं. सांगली बँक ही रिझर्व बँकेची एक शिड्यूल्ड बँक असा दर्जा प्राप्त करून देणें हाहि एक विभाग ह्या बँकेचे बाबतीतील आहे. सांगली संस्थान हें पुढारलेलें संस्थान आहे. मला वाटतें कीं, विचार करून करून हें संस्थान उलट्या बाजूनें आपला पहिला नंबर मिळवील कीं काय ! ! शिड्यूल्ड बँक होण्यांत सांगली संस्थानासहि भूषण आहे. ही बॅन्क धान्यखरेदीकरतां सरकारला पांच लाख रुपयें कर्जाऊ देऊं शकते तीच बँक शेड्यूल्ड असती तर तिनें दहा लाख रुपये या कामासाठीं पुरविले असते. हिंदुस्थानांतील सुमारें ९० बँका रिझर्व बँकेस आजपावेतो जोडण्यांत आल्या आहेत. त्यांमध्यें सांगलीबँकहि जोडण्याबाबद सरकार इतका कसला विचार करते आहे तें तर परमेश्वरासच माहित ! विचाराशिवाय कोणतीच गोष्ट करावयाची नाहीं हा सांगली संस्थानचा दंडक डिव्हेलप्मेंट ऑफिसर आणि त्यांचें डिपार्टमेंट यांच्या नेमणुकीच्या बाबतींत मात्र बदललेला दिसतो. त्या नेमणुका विचारापूर्वीच झालेल्या आहेत. बार्शी-लाईट-रेल्वेंत दोन लाख रुपये दरबारनें गुंतविले आहेत. त्यावर शेकडा दोन टकेसुद्धां व्याज मिळालेलें नाहीं. उलट सांगली बँकेंत गुंतविलेल्या भांडवलाच्या दीडपट रकम सांगली संस्थानास आजवर मिळालेली आहेत. ही बार्शी-लाईट

रेल्वेतील इन्व्हेस्टमेंट् सांगली बँकेचा दर्जा वाढविण्याकडे गुंतविली असती तर सरकारास खास फायदा झाला असता. कितीहि वेळां ह्या गोष्टी सरकारपुढें मांडल्या तरीहि सरकार त्याचा कांहींहि विचार करीत नाही. सरकारच्या ह्या बुद्धीस बुरणूस बुद्धी म्हणावी की काय हें समजत नाहीं ! कोणत्या दप्तरखान्यांत ह्या गोष्टी पडून राहिल्या आहेत तें परमेश्वरच जाणे !! सतरा लाख रुपये संस्थानच्या खजिन्यांत बिनव्याजी पडून आहेत. अशा स्थितींत नवीन कर जनतेवर कां लादावेत समजत नाहीं ! आर्थिकदृष्ट्या ही मोठी चूक होते आहे. जनतेच्या मागण्यांचा ज्या दरबारला विचार करावयाचा नाहीं त्या दरबारला जनतेजवळ नवा कर मागण्याचा काय अधिकार ? कोणत्याहि गोष्टी नवीन करण्याला धडाडीचा अधिकारी असावा लागतो. ह्या बाबतींत सरकारनीं आपले अधिकारी कमी करून लोकमतानुवर्ती मिनिस्टर्स नेमावेत अशी माझी सूचना आहे. सरकारनें पेन्शनरर्स ऑफिसर्स नेमले कीं ते फक्त पेन्शनीला पेन्शन् कशी जोडतां येईल एवढेंच पाहतात. ते अगदीं महत्वाकांक्षाशून्य असतात. त्यांचे हातून उत्साहानें काम काय होणार व संस्थानची प्रगती काय होणार ? उलट एखाद्या लोकमतानुवर्ती मंत्र्याची पांच वर्षांचीच कारकीर्द झाली तरी त्याला आपल्या कारकीर्दीत आपण अमुक अमुक गोष्टी केल्या याचा रिव्ह्यू देण्याकरितांतरी लोकहिताच्या गोष्टी त्याला कराव्या लागतात. लोकमताच्या दडपणानें त्यांना महत्वाकांक्षाशून्य होऊन चालत नाहीं. पेन्शनर आफिसर्स न नेमतां संपूर्ण जबाबदार पद्धति संस्थानमध्यें अवलंबिली पाहिजे. निदान इंग्लंडचा इतिहास पाहिला तर चार्लस् राजाच्या कारकीर्दींत ज्या ज्या वेळीं पैशाची जरूरी लागत असे त्या त्या वेळीं त्यानें असेंब्ली बोलवावी व पैसा मंजूर करून घ्यावा अशी त्या वेळीं प्रथाच पडून गेली होती. राजाला पैसा हवा असला म्हणजे त्यानें असेंब्ली बोलवावी, लोकांवर नवा नवा कर लादावा व पैसा उकळावा. कित्येक वेळां तर या भीतिनें असेंब्ली भरतहि नसे, व ती भरविण्याकरितां असेंब्लीच्या सभासदांना पकडवॉरंटें काढून असेंब्ली भरवावी लागत असे. आपल्या संस्थानांत इन्कमटॅक्सचा कायदा लागू झाल्या वेळीं राखीव सोंपीव असे दोन भाग बजेटचे झाले आहेत. माझ्या मतें सोंपीव केले असे तेवढेच सोंपीव न रहाता राखीव केलेले खेरीजकरून बाकीचे सर्व सोंपीव व्हावेत असें आहे. औद्योगिकखातें लोकमतानुवर्ती मंत्र्याकडे असणेंच जरूर आहे. फलटण संस्थानांत लोकमतानुवर्ती दोन मिनिस्टर्स दरबारनें घेतले आहेत. मिनिस्टर्सकडून कोणत्याहि गोष्टी झाल्या तर त्यांतील चुका अधिकाऱ्याच्या कसुरीमुळें नव्हेत असें वाटल्यामुळें सहाजीकच टीकेचें टोंक बोथट होतें. गेल्या चार वर्षांतील ( मिनिस्टरच्या नेमणुकीनंतर ) सोंपीव खात्यांवरील टीकेनें हें सिद्ध झालें आहे. प्रजेचे अधिकार वाढवून मिळण्याच्या आमच्या ह्या

सनदशीर मागणीचा विचार ह्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीतून तक्रारी करून होतो असें जनतेस दाखवून द्या, ह्मणजे जादा अधिकार मिळविण्याकरितां सरकारवर दडपण टाकण्याचा प्रसंग येणार नाहीं. उगार शुगर वर्क्सचीच गोष्ट घ्या. ह्या कारखान्याचा डाव सतत दोनतीन वर्षे फुकला; चारपांच लाख रुपये जादा लागले. ह्या टीकेचा बोजा सरकारनें आपणांवर कां घ्यावा समजत नाहीं. लोकमतानुवर्ती अशी उद्योगधंद्याची वाढ झाली तरच त्यांत भूषण आहे. महत्वाकांक्षाशून्य अशा स्थिर नोकरशाहीकडे हें उद्योगधंद्याचें खातें ठेऊन दरबार आपल्यावरील टीकेस अधिक जागा करून ठेवीत आहे. विचाराबद्दल हॅम्लेट नाटक प्रसिद्ध आहे. विचार करीत करीत राजपुत्र हॅम्लेटला शेवटीं मृत्यू येतो. तद्वतूच विचार होईपर्यंत बाकीचीं संस्थानें भराभर पुढें जाऊन आपलें संस्थान प्रागतिक संस्थानच्या यादींत तरी राहील की नाहीं याची शंका वाटते. अडचणींच्या परिस्थितीचा फायदा कसा होतो याचें एक विशिष्ट उदाहरण सांगून मी माझें भाषण संपवितो. थोड्या दिवसांपूर्वी आपण आपल्यापुरतें व मी माझ्या बंगल्याचा राजा ही भावना दृढ होती, परंतु सध्याच्या जागतिक परिस्थितीमुळें एकानें दुसऱ्यास मदत केली पाहिजे व उभयतांनीं परस्परांचें रक्षण केलें पाहिजे अशी स्थिती निर्माण झाली असून त्यादृष्टीनें जनतेचीं पावलें पडूं लागलीं आहेत. अशा अडचणीचे वेळीं संस्थाननें शस्त्रास्त्रांच्या बाबतीतील आपलें धोरण बदललें पाहिजे व थोडी त्यांनीं उदारवृत्ती धारण करावी अशी माझी सरकारांस सूचना आहे. कांहीं दिवसांपूर्वी माझ्या एका स्नेह्यानें जंबियासारखें दिसणारें एक हत्यार तयार केलें. त्याबद्दल त्यास शिक्षा होऊन शेवटीं हायकोर्टमध्यें तो दोषमुक्त ठरला. ही वृत्ती सोडून जबाबदार नागरिकांचे बाबतींत तरी हा कायदा सरकारनें ढिला करावा. सुप्त बंधुभाव जागृत होत आहे, भाऊ भाऊ समजून एकानें दुसऱ्यास मदत करण्याची परिस्थिती प्राप्त झाली आहे. अशा स्थितींत संस्थानची प्रजा व राज्यकर्ते यांचेमधील तेढ कमी होऊन त्यांचेमध्यें अधिक सलोखा वाढेल अशी वृत्ती दरबारनें धारण करावी अशी दरबारला विनंति करून मी माझें भाषण पुरें करतो.

ना. शा. रा. बेतमंगलकर:—[ इंग्रजीतून भाषण केलें त्याचा मराठींत सारांश ] या पुरवणी अंदाजपत्रकावर ना. सभासदांनीं आतांपर्यंत जीं भाषणें केलीं आहेत त्यांचीं उत्तरें ना. फिनॅन्स मेंबर हे देतीलच. एक दोन मुद्यासंबंधीं मी खुलासा करणार आहें. डि. ऑफीसरच्या नेमणुकीबाबत ना. सभासदांनीं बरीच टीका केली. कर्वे—गाडगीळ आर्थिक-चौकशी समितीच्या अहवालांतील शिफारशीचा ताबडतोब विचार करून त्यांतील जरूर त्या सूचनांचा अम्मल करावा या हेतूनें ही नेमणूक करणेंत आली होती. परंतु कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध होणेस मूळच्या अंदाजापेक्षां अधिक काल लागल्यानें, मे. डिव्हेलपमेंट ऑफिसर यांचा

उपयोग दुसऱ्या कामाकडे परिस्थितीमुळें करावा लागला आहे. एका नामदार सभासदांनीं मोटारलॉरीचे खरेदीकरितां बजेटमध्ये जी रकम दाखल केली त्याबद्दल टीका केली. परंतु सदर रकम ही केवळ मोटारलॉरीचे किंमतीचीच नसून त्यांत तिच्या नित्य व नैमित्तिक खर्चाची व तिजकरितां नेमावे लागणाऱ्या नोकरांच्या पगारांचीही तरतूद केलेली आहे. मंगळवेढ्याचे ना. करंदीकर यांनीं गांवनोकरांचा पगार वेळेवर मिळत नाहींत अशी तक्रार केली. त्यांनीं कॉंक्रीट उदाहरणें दाखविल्यास त्याजवर विचार करणेस बरें पडेल. ना. सौ. इंदिराबाई साठे यांनीं सरकारी अधिकाऱ्यांनीं फारसा प्रवास न करितां शक्यतो टपाल मार्गेंच काम भागवावें व अगदीं जरूरीच्या वेळींच प्रवास करावा व खर्चात बचत करावी असें सांगितलें. याबाबतीत मला इतकें सांगावयाचें आहे कीं प्रवासाचे प्रसंग आम्हां सरकारी अधिकाऱ्यांवर फार जरूरीचे येतात म्हणूनच आम्हांस प्रवास करावा लागतो. माझे मित्र ना. पोलीस सुपरिटेंडंट यांना, " आज येथें दरोडा पडला आहे, अमुक ठिकाणीं चोरी झाली आहे, अमुक ठिकाणीं दरोडेखोरांनीं मारामारी केली आहे " अशा तऱ्हेच्या तारा सारख्या येत आहेत. अशा स्थितींत नुसतें खुर्चीवर बसून टपाल पाहून काम चालवावें म्हटलें तर अगदीं अशक्य आहे..........

ना. स. ग. फडके:—ना. सौ. साठे यांनीं फक्त डेप्युटी डायरेक्टरच्या प्रवासाबद्दल उल्लेख केलेला आहे.

ना. शा. रा. बेतमंगळकर:—त्यांचेकडेही किती प्रकारचीं कामें सोपविलीं गेलीं आहेत याची नामदारांनीं माहिती करून घेतल्यास त्याच्याबद्दल सुद्धां नामदार तसें म्हणणार नाहींत. ना. गोडबोले यांनीं उपस्थित केलेला प्रश्न दरबारच्या पॉलिसीचा आहे, इतकेंच मी सांगतो.

म. रा. ब. मा. ह. लिमये:—ना. गोडबोले यांनीं आपलें भाषण अगदीं मनापासून केलेलें दिसतें. काल प्रश्नोत्तराचे वेळीं सांगली बँकेच्या प्रश्नांचे बाबतींत मी जो खुलासा केला होता त्यावरून पुन्हां ते आज त्याबाबतींत बोलतील असें मला वाटलें नव्हतें; तथापि तो विषय आतां इतका पुरा झाला आहे की त्यांतील अखेरच्या हुकुमाकरितां ते कागद एक्झिक्यूटिव्ह कौंसिलच्या प्रेसिडेंटसाहेब यांच्या टेबलावरच आहेत. त्यांच्या ज्ञानाचा अमोलिक फायदा घेवून त्यांच्या सल्ल्यानें दरबार सदर बाबतींत लवकरच अखेरचे हुकुम करील. ना. गोडबोले यांनीं टगार शुगर वर्क्ससंबंधी बरीच टीका केली. सध्याचे मॅनेजिंग एजंटस् मेसर्स शिरगांवकर हे सदर धंद्यांतील नांवाजलेले तज्ञ असून त्यांनीं कोल्हापूरचा साखरेचा कारखाना नांवारूपास

आणून नांव कमावलें आहे. . असा माहितगार व कर्तृत्ववान् इसमाच्या हाताखालीं आमचा कारखाना असतांना ना. गोडबोले यांनी अशा तऱ्हेची टीका कां करावी व इतक्यांतच निराश कां व्हावें हें समजत नाहीं. आपला कारखाना सुरू होऊन एकदोन वर्षेच झाली आहेत व अद्याप तो बाल्यावस्थेंत आहे. थोड्याच दिवसांत तो उत्तमरितीनें चालूं लागेल आणि त्याचा फायदा संस्थानला खात्रीनें मिळेल, अशी उमेद बाळगणेस कांहीं हरकत दिसत नाहीं.

ना. मिनिस्टर:—अध्यक्षमहाराज, अंदाजपत्रकावर ना. सभासदांनीं आतापर्यंत भाषणें केलीं त्यांतील सोपीव खात्यांवर जेवढी टीका झाली आहे त्यापुरताच मी खुलासा करणार आहे. सुरुवातीला ना. कुलकर्णी, लीडर ऑफ् दि अपोझिशन् यानी प. व. खात्याचीं कांहीं कामें तहकूब करावीत अशी सूचना केलेली आहे. लांकूड, लोखंड, सिमेंट वगैरे मालांचे भाव अत्यंत कडाडले आहेत. त्यामुळें त्यांचीं सूचना आम्ही अवश्य विचारांत घेत आहोत- Original Works पैकीं जेवढीं कामें अपुरीं असतील तेवढीं शेवटपर्यंत संपवून चालू सालीं नवीन कामें बहुतेक हातीं घेतलीं जाणार नाहींत. ना. फडके यांनीं चालू सालच्या बजेटांतील कांहीं रकमा खर्च न पडतां शिलुक राहतील असें सांगितलें आहे. पब्लिक् हेल्थ् पोटीं मोठ्या साथींकरितां ४००० रु. ची तरतूद आहे. ती तितकी लागणार नाहीं असें त्यांचें मत आहे. १३११ फसलीचा खर्च पाहिल्यास ३९०० रुपये या सदरावर खर्च झालेले आहेत. त्या दृष्टीनें ह्या खात्यांत विशेष बचत होईल असें वाटत नाहीं. खेड्यांतून पाणीपुरवठा व रस्ते ह्या बाबीसंबंधी वस्तुस्थिती अगदीं वेगळी आहे. यांतून कामगाऱ्या व्हाव्या तशा होतील असें मला वाटत नाहीं. गुदस्त सालीं बरीच रक्कम शिलुक राहिली असून चालू सालीं ही विशेष खर्च होईल असें सांगतां येत नाहीं. सध्यां मूळ योजनेस अनुसरून लोकांकडून कॉन्ट्रिब्यूशन्स येत नाहींत व त्यामुळें चालू सालीं कामगाऱ्या होतील कीं नाहीं याबद्दल शंका आहे. या बाबतींत अन्य कांहीं योजना करावी कां याबद्दल आम्ही विचार करीत असून एक योजना तयार करीत आहों. तिचा विचार झाल्यानंतर यांपैकीं कांहीं रक्कम खर्च पडेल. मलेरिया प्रतिबंधक उपायाकरितां चार हजार रुपये दाखल आहेत. सध्यां क्विनाइन् इतकें महागलें आहे कीं या रकमेतून फारसें सेव्हिंग होईल असें वाटत नाहीं. शाळेसंबंधीं कांहीं लहानसहानच तक्रारी आहेत. त्या तक्रारी कोणत्या त्या नामदारांनीं आमच्या नजरेस आणिल्यास त्या दूर करण्याचा अवश्य प्रयत्न केला जाईल. दवाखान्याच्या बाबतींत ना. सौ. साठ्ये यानीं कांहीं तक्रारी हाऊसपुढें मांडल्या. सिव्हिल् मेडिकल् कोड संस्थान मजकुरीं कसें लागूं करतां येईल याबद्दल आम्ही विचार करीत आहोंत. हें कोड इतकें मोठें आहे कीं, तें सर्वच्या सर्व लागूं करणें शक्य व जरूरहि नाहीं. तेव्हां त्यांतील निवडक नियम एकत्र करून तें लागूं करण्याचा विचार आहे. मंगळवेढ्याचे

ना. पटवर्धन यांनीं, व्हेटर्नरी ऑफिसर मंगळवेढ्यास गेले नाहींत अशी तक्रार केली. सदर बाबतींत आतां कांहीं कागदपत्र माझेपुढें नसल्यानें माहिती सांगतां येत नाहीं, तथापि त्याबाबत चौकशी करीत आहों. मंगळवेढें येथील इंग्रजी ४ थ्या इयत्तेच्या स्थापनेसंबंधीं उपकर-णाच्या बाबतींत नवरं ते हुकूम देणेंत आले आहेत. कांहीं हत्यारें मिळालीं नसतील म्हणूनच ती रक्कम अद्याप खर्च पडण्याची राहिली असेल. ना. डवाली यांनीं ट्रेनिंगला जाणाऱ्या कानडी शिक्षकांच्या यांबाबत कांहीं सोय करावी असें सांगितलें. पुरवणी अंदाजपत्रकांत जी रक्कम दाखल केली आहे ती याचकरितां आहे. त्याचप्रमाणें ज्या रस्त्याबद्दल त्यांनीं तक्रार केली त्यापैकीं हल्लीं चालू असलेली मरमत्तीचें काम पुरें झालेनंतर पुढील रस्ता पुढच्या सालीं हातीं घेतां येईल.

ना. ह. व. कुलकर्णी:—सन १३५२ फसलीच्या ह्या पुरवणी खर्चाच्या अंदाजपत्रकावर आतांपर्यंत बऱ्याच नामदार सभासदांचीं भाषणें झालीं आहेत. त्यांतील धान्यपुरवठा खात्याबद्दल ज्या तक्रारी मांडणेंत आलेल्या आहेत त्यासंबंधीं मी थोडासा खुलासा करणार आहे. धान्यपुर-वठा खात्याची कल्पना गेल्या नोव्हेंबर महिन्यांत आली. नुकताच हाऊसमध्यें या बाबतींत जो ठराव पास झाला त्यावेळीच हा खुलासा मी करणार होतो, परंतु मला वेळच न मिळाल्यामुळें आतां मी तो खुलासा थोडक्यांत करतो. प्रारंभीं गेल्या मे-जूनपर्यंत धान्याची अडचण व चणचण भासली नाहीं. पाऊसही तोंपर्यंत ठीक झाला होता. या सुमारास कांहीं धान्य मंगळवेढ्याहून नकळत गुजराथेंत गेलें. जुलई-ऑगस्टमध्येंहि पाऊस बरा पडल्यानें सरकारनें तिकडे विशेष लक्ष दिलें नाहीं, पुढें मात्र पावसानें ओढ दिल्यानंतर व लढाईमुळें धान्याचे भाव वाढल्यानंतर काय करावें याबद्दल विचार सुरू झाला. त्यानंतर रिलीफ शॉप सांगली येथें उघडण्यांत आलें. ह्या रिलीफ शॉपची तीनचार महिन्यांपर्यंतच जरूरी लागेल अशी मूळची कल्पना होती, परंतु २१ आक्टोबरपर्यंतसुद्धां पाऊस न पडल्यामुळें ती दिशा बदलली व हें खातें स्थापन करण्याचें ठरलें. प्रथमतः पन्नास हजार रुपये दरबारनें ह्या रिलीफशॉपकरितां काढले होते, परंतु ते अत्यंत अपुरे वाटूं लागल्यामुळें दरबारनें त्याकरितां पांच लाख रुपये सप्लाय-डिपार्टमेंटकडे दिले. सरकारनें सांठा करून ठेवावा अशा कल्पनेनें वेळोवेळीं व ग्वाल्हेर, हैद्राबादकडून खरेदी केली. रिलीफशॉप व सेंट्रल शॉपमधून आतांपर्यंत तीसपस्तिस हजारांचा (पोती) बटवडा झालेला आहे. हा हिशोब ठेवण्याचा म्हटलें तर त्याकरितां साधारण व्यवस्था करून भागण्यासारखें नव्हतें. आतांची योजनादेखील पुष्कळ काटकसरीचीच आहे. या खात्या-मुळें सर्व खरेदी भागते असेंहि नाहीं. मामलेदारांची मदत आम्ही घेत आहोंतच. मामले-दारांना ह्या कामाखेरीज इतर पुष्कळ ड्यूटीज असल्यामुळें धान्यखरेदीचा बोजा सर्वस्वी

त्याच्यावर पडूं नये म्हणून आदा अव्वलकारकून दिलेले आहेत व अशा रीतीनें धान्य मिळविण्याची योजना चालू आहे. धान्यखरेदीच्या बाबतींत आम्हांस पुष्कळ अडचणीहि येत आहेत. त्यांतील अगदी थोड्या अडचणींचा उल्लेख मी थोडक्यांत करतो. ह्या धान्यखरेदीच्या कामी प्रयत्न करतांना आम्हांस एकंदर तीन मेन्टॅलिटीज दिसून आल्या. शेतकऱ्यांना वाटतें कीं, धान्य राखून ठेवावें व पुढें भाव तीन-साडेतीन मापट्यांचा होईल त्याचा फायदा घ्यावा, व्यापाऱ्यांना वाटतें कीं चार मापट्यांप्रमाणें घेऊन कमी दरानें विकावें व भरपूर फायदा मिळवावा, आणि सरकारचा प्रयत्न असा कीं, सेंट्रल स्टोअरला जास्तींत जास्त धान्य कसें मिळवून देतां येईल. सहा तालुक्यांपैकीं कांहीं तालुके डेफिसिट् आहेत. तालुका डेफिसिट् असला तरीसुद्धां त्यांतहि कांहीं गांवें सरप्लस असतातच. अशा सर्व ठिकाणांहून धान्य मिळविण्याची सरकारची पराकाष्ठा चालू आहे. दरांचे बाबतींतसुद्धां डे. डायरेक्टर हे एकटेच दर ठरवितात असें नाहीं. दरबारची ऑर्डर व मामलेदार आणि डे. डायरेक्टर यांचा प्रत्यक्ष अनुभव या सर्वांचा विचार होऊन योग्य तो दर उभयतांचे विचारें नेहमीं ठरविला जातो. जरूर त्या वेळीं पत्रव्यवहारानें व तारेनेंसुद्धां दर ठरविलेले आहेत. लोकांना किती धान्य द्यावें हें ठरविण्याचें काम डायरेक्टर ऑफ स्टोअर व डे. डा. ऑ. स्टोअर हे करतात. गरिबांना अगोदर धान्य मिळावें हा प्रश्न सरकारपुढें आहे. पुष्कळ पाहिजे आहे, परंतु आपल्याजवळ असेल त्यामानानें मिळणार हेंहि उघड आहे. ह्या सर्व धान्यखरेदीविक्रीचा हिशोब पद्धतशीर रीतीनें लिहिण्याकरितां अत्यंत काटकसरीच्या धोरणानें स्टाफ नेमला आहे. त्यांचा पगारहि फारच थोडा म्हणजे कारकुनास पंधरा ते वीस रुपये व स्टोअरकीपर व अकाउंटंट यांना प्रत्येकीं पंचवीस रुपये याप्रमाणें देण्यांत येत आहे. मापें घालणाऱ्या लोकांनाहि त्यांच्या कामाचे मानानें मजुरी देण्यांत येते. या कामी खर्च शक्यतो कमी व जरूरीपुरताच केला असल्याचें ना. सभासदांना दिसून येईल. ह्या माझ्या खुलाशानें नामदारांचे गैरसमज दूर होतील अशी आशा प्रदर्शित करतो.

## अभिनंदनपर ठराव

ना. के. गो. कुलकर्णी:—सन्मान्य अध्यक्षमहाराज, आपल्या परवानगीनें मी सभागृहापुढें खालीलप्रमाणें अभिनंदनपर ठराव मांडतो—"श्रीमंत युवराज माधवराव महाराज यांना पुत्ररत्नाचा लाभ झाल्याबद्दल ही सभा आनंद व्यक्त करते व राजपौत्र श्रीमंत परशरामराव ऊर्फ विजयसिंहजी यांना दीर्घ आयुरारोग्य व वर्धिष्यमान उत्कर्ष इच्छिते. त्यांचा जन्मोत्सव व इतर सर्व परंपरागत समारंभ सांगली संस्थानच्या आजवरच्या इतमामास व लौकिकास साजेसे साजरे करण्यांत यावेत अशी ह्या सभेची हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांना नम्र शिफारस आहे.'

" हा ठराव ह्या विधिमंडळाचे ना. अध्यक्ष यांनीं उमयतां श्रीमंत त्यांच्याकडे सुपूर्द करावा अशी ही सभा ना. अध्यक्ष यांना अधिकार देत आहे. "

ना. के. गो. कुलकर्णी:—ह्या ठरावाचे दोन भाग आहेत. पहिला आनंद प्रदर्शित करणेचा, व तो प्रदर्शित करणेंकरितां ज्या गोष्टी व समारंभ करणें जरूर आहेत असा दुसरा भाग. श्रीमंत युवराज महाराज यांची प्रकृती मध्यंतरीं बरीच बिघडली होती. त्यांच्या प्रकृतीसाठीं हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांनी जे प्रयत्न केले व परदेशीं स्त्रिअम्नापर्यंत देखील जाऊन जे परिश्रम घेतले ते सर्वश्रुत आहेतच. सुदैवानें ह्या त्यांच्या परिश्रमांना यश येऊन श्रीमंत युवराज महाराज यांची प्रकृती सुधारली व श्रीगजाननाचे कृपेनें त्यांना पुत्ररत्नाचा लाभ झाला ही सांगली संस्थानच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखी गोष्ट झाली आहे. या गोष्टीचा दुसरा विशेष असा कीं, पौत्रप्राप्तीचा असा हा सुयोग येण्याचें हें पहिलेंच उदाहरण सांगलीच्या इतिहासांत आहे. ह्या आनंदाप्रीत्यर्थ व्हावयाचे सर्व समारंभ संस्थानच्या आजवरच्या लौकिकास व इतमामास साजेल अशा पद्धतीनेंच केले जावेत अशी जर जनतेनें सदिच्छा बाळगली तर तें योग्य आहे असें कोणीही म्हणेल. हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब ह्यांची ह्या बाबतींतील कळकळ सर्वांना विदित आहेच. श्रीमंत युवराज महाराजांना पुत्ररत्नाचा लाभ झाल्यास किती खर्च करावयाचा व कन्यारत्न झाल्यास किती खर्च करावयाचा यासंबंधी आम्ही फिनॅन्स कमिटीमध्ये अगदीं थोडे दिवसच आधीं, विचार करीत होतो; व त्या कमिटीपुढें मांडणेंत आलेल्या खर्चास कमिटींतील आम्ही समासदांनी आनंदानें संमतिहि दिली होती. श्रीगजाननाचे कृपेनें पुत्रप्राप्ती झाली, परंतु विधिघटना वेगळी असल्यामुळें मध्यंतरीं जो दुःखदायक प्रसंग उद्भवला त्यामुळें हा आनंदाचा प्रसंग आजवर साजरा होऊं शकला नाहीं. असो. दुःख हें काहीं कालपर्यंत राहूं शकतें. त्या दुःखाचा पहिला आवेग ओसरल्यानंतर थोडासा विवेक करून, सदर समारंभानिमित्त जो खर्च करण्याचा पूर्वी संकल्प होता तो आतां श्रीमंतांनीं पुरा करावा अशी शिफारस ह्या ठरावाच्या दुसऱ्या भागांत आहे. श्रीगजानन सर्व राजकुटुंबीयांना दीर्घायुरारोग्य देवो अशी त्याचे चरणीं नम्र प्रार्थना करून मी ह्या सभागृहाला अशी विनंति करतो कीं सदरच्या मी ह्या सभागृहापुढें मांडलेल्या ठरावास सर्व नामदार सभासदांनीं संमति द्यावी.

ना. प्रेसिडेंट:—सभागृहापुढें असा ठराव आहे कीं, " श्रीमंत युवराज माधवराव महाराज यांना पुत्ररत्नाचा लाभ झाल्याबद्दल ही सभा आनंद व्यक्त करते व राजपौत्र श्रीमंत परशरामराव उर्फ विजयसिंहजी यांना दीर्घ आयुरारोग्य व वर्धिष्णुमान उत्कर्ष इच्छिते. त्यांचा जन्मोत्सव व इतर सर्व परंपरागत समारंभ सांगली संस्थानच्या आवजरच्या इतमामास व

कैकिकास सांचे साजरे करण्यांत यावेत असी ह्या सभेची हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांना नम्र शिफारस आहे ”

“ हा ठराव ह्या विधिमंडळाचे ना. अध्यक्ष यांनी उभयतां श्रीमंत स्वाऱ्यांकडे सुपूर्द करावा अशी ही सभा ना. अध्यक्ष यांना अधिकार देत आहे. ”

ना. स. ग. फडके:—सदर ठरावास मी आनंदानें दुजोरा देतो. ना. मूल्हर यांनी जे विचार प्रदर्शित केले आहेत त्यांस मी सहमत आहे.

ना. बा. ध. लागू:— सरकारनियुक्त बिनसरकारी सभासदांतर्फे मी या ठरावास दुजोरा देतो.

ना. ह्या. रा. बेटमंगलकर:—सरकारी सभासदांतर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देतो.

ना. घ. ह. काजी:—मुसलमान समाजातर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देतो.

ना. दा. ग. कांबळे:—अस्पृश्य समाजातर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देतो.

ना. म. फ. बवाली:—ನಮ್ಮ ಯುವರಾಜ ಮಹಾರಾಜ ಶ್ರೀಮಂತ ಮಾಧವರಾವ ರಾವಸಾಹೇಬ ಇವರಿಗೆ ಪುತ್ರರತ್ನದ ಲಾಭವಾಯಿತು ಅದಕ್ಕೆ ಅಭಿನಂದನದ ಠರಾವು ತಂದಿರುತ್ತದೆ. ಅದಕ್ಕೆ ಶಿರಹಟ್ಟಿ ತಾಲೂಕಿನ ಎಲ್ಲ ರೈತ ಜನರತರ್ಫೆ ಈ ಠರಾವಿಗೆ ನಾನು ಅನುಮೋದನ ಕೊಡುತ್ತೇನೆ.”

ना. अ. स. राजमाने:—चेंबर ऑफ् कॉमर्सतर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देतो.

ना. श. गो. अनगोळकर:—शहापूर तालुक्यातर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देतो.

ना. वि. म. करंदीकर:—कुची तालुक्यातर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देतो.

ना. बा. भि. बेडे:—माझाहि ह्या ठरावास पाठिंबा आहे.

ना. सौ. इंदिराबाई साठ्ये:—सांगली शहरांतील महिलावर्गातर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देते.

ना. ह. ना. पटवर्धन:—इनामदार तैनातदार वर्गातर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देतो.

ना. रा. ग. करंदीकर:—मंगळवेढे तालुक्यातर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देतो.

ना. शं. ग. गाडगीळ:—सराफवर्गातर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देतो.

ना. आ. आ. मुळे:—मिरजप्रांत तालुक्यातर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देतो.

ना. बा. य. पाचवरे:—माझाहि ह्या ठरावास पाठिंबा आहे.

ना. प्रेसिडेंट:— हा ठराव सभागृहानें एकमतानें पास केला आहे असें मी जाहीर करतो.

(सभेचें काम बुधवार ता. १७ माहे फेब्रुवारी सन १९४३ या दिवशीं दुपारीं १२ वाजेपर्यंत तहकूब ठेवणेंत आलें.)

—— + ——

# दिवस ३ रा.

## बुधवार ता. १७ माहे फेब्रुवारी सन १९४३ इ.

:— प्रश्नोत्तरें —:

### ना. सौ. इंदिराबाई साठ्ये, सांगली.

प्रश्न नं १ धूम्रपान प्रतिबंधक--कायद्याखालील केसीस.

ना. सौ. इंदिराबाई साठ्येः— सांगली संस्थानचा सन १९१७ च्या धूम्रपान-प्रतिबंधक कायदा पास झाल्यापासून आजपर्यंत या कायद्याखालीं किती केसिस केल्या व त्यांचे परिणाम काय झाले ?

ना. शा. रा. बेतमंगलकरः—कांहींहि केसीस घालणेंत आलेल्या नाहींत.

ना. स. ग. फडकेः—मुलें विड्या ओढीत नाहींत म्हणून घातल्या नाहींत का गुन्हेच झाले नाहींत ?

ना. शा. रा. बेतमंगलकरः—कांहींहि केसीस घालणेंत आलेल्या नाहींत एवढें खरें.

ना. रा. ग. करंदीकरः—गुन्हे होतात ना ?

ना. शा. रा. बेतमंगलकरः—केसीस कांहींहि घालणेंत आलेल्या नाहींत हें सांगितलेंच आहे. (हंशा)

ना. आ. आ. मुळः—यापुढें तरी केसीस घालणेंत येतील काय ?

ना. शा. रा. बेतमंगलकरः—याबद्दल जरूर तो विचार करणेंत येईल.

प्रश्न नं. २ गिरण्यांतील कामकरी व कारखान्यांतील स्त्रिया यांना महागाईभत्ता.

ना. सौ. इंदिराबाई साठ्येः—२ (अ) सांगली शहरांत असलेल्या गिरण्यांतील कामकरीवर्ग व विड्या तंबाखु कारखान्यांत काम करणाऱ्या स्त्रिया यांचे रोजचे मजुरीत महागाई-निमित्त मालकाकडून भत्ता देण्यांत येतो काय ? असल्यास त्याचें प्रमाण काय ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—(अ) होय. (ब) गिरण्यांतील कामकरी वर्गास दरमहा चार रुपये, तंबाखु-कारखान्यांतील स्त्रियांना दरमहा दोन रुपये व विडी कारखान्यांतील स्त्रियांना दरमहा एक रुपया.

ना. सौ. इंदिराबाई साठ्येः—ब्रिटिश मुलखांत काय प्रमाण आहे ?

ना. ह. ब. कुलकर्णीः—माहिती आणविलेली नाहीं.

## ना. अण्णासाहेब सखाराम रामाने सांगली

प्रश्न नं. १ लायक विद्यार्थिनीस स्कॉलरशिप.

ना. अ. स. रामाने:—१ (अ) एडवर्ड मेमोरियल फंडांतून विद्यार्थीनींकरितां ठेविलेली कॉलेज स्कॉलरशिप १९४१ सालीं मॅट्रिक पास झालेल्या मुलींपैकीं कोणास देणेत आली ? (ब) जास्ती मार्क कोणास मिळाले होते ? (क) लायख विद्यार्थिनी याचा अर्थ-व्याख्या कांहीं ठरविलेली आहे काय ? (ड) लायख विद्यार्थिनी कोण हें समजणेकरितां पास झालेल्या सर्व विद्यार्थिनींचे अर्ज मागविले होते काय ? (इ) ज्या विद्यार्थिनीस ही स्कॉलरशिप देणेत आली ती एका सरकारी अधिकाऱ्याची मुलगी आहे व तिला दुसऱ्या मुलींपेक्षां परीक्षेत मार्क कमी मिळाले आहेत ही गोष्ट खरी आहे काय ? (फ) शिक्षणखात्याची शिफारस व आतांपर्यंतचा वहिवाट बाजूस सारून ती स्कॉलरशिप देणेत आली आहे हें खरें आहे काय ?

ना. त्रि. मो. भट:—(अ) कुमारी कमल सदाशिव खाडिलकर (ब) कुमारी व्हासनीस (क) तशी व्याख्या ठरलेली नाहीं. (ड) डिझर्व्हिंग केसिस होत्या त्यांचेच अर्ज मागविले होते. (इ) होय. (फ) शिक्षणखात्याची शिफारस व इतर बाबी लक्षांत घेऊन हा निकाल देण्यांत आला आहे.

ना. अ. स. रामाने:—कुमारी खाडिलकर इचेपक्षां कुमारी व्होरा इजला अधिक मार्क्स मिळाले होते काय ?

ना. त्रि. मो. भट:—होय.

ना. आ. शा. मुळे:—मग तिला शिष्यवृत्ती कां दिली नाहीं ?

ना. त्रि. मो. भट:—याचें उत्तर (फ) मध्यें आहे.

ना. मिनिस्टर:—या बाबतींत मी थोडासा खुलासा करतो. शिष्यवृत्ती देतांना मार्क्स बरोबरच मुलींच्या पालकाची आर्थिक परिस्थिती ध्यानीं घेऊनच हा विचार केला आहे.

ना. अ. स. रामाने:—मग व्होरांची परिस्थिती काय वाईट होती ?

ना. मिनिस्टर:—माझ्या म्हणण्याचा तोच आशय आहे. त्यांची परिस्थिती चांगलीच आहे.

ना. आ. आ. मुळे:—ही कुमारी खाडिलकर म्हणजे हल्लीं दिवाण ऑफीसमध्यें ऑफीस सुपरिंटेंडेंटच्या जागेवर काम करीत आहेत त्यांचीच मुलगी ना ?

ना. त्रि. मो. भट:—होय.

प्र. नं. २— इन्कमटॅक्सची आकारणी

ना. अ. स. राजमानेः—२ सांगली पेठेंतील सन १९३७-३८ व ३८-३९ व ३९-४० या सालांतील. (अ) किराणा, सोनें, चांदी, स्टेशनरी व तंबाकू यांचा व्यापार करणारे व्यापाऱ्यांपैकीं किती व्यापाऱ्यावर त्यांनीं दाखविलेल्या नफ्यावर इन्कमटॅक्सची आकारणी करण्यांत आली आहे ? (ब) किराणा, सोनें, चांदी व तंबाकू यांचा व्यापार करणाऱ्यां पैकीं किती लोकांवर flat-rate नें इन्कमटॅक्सची आकारणी केली गेली ? (क) अशी आकारणी केली गेल्यामुळें या कायद्याच्या अंमलबजावणीबद्दल असंतोष उत्पन्न होत आहे याची जाणीव सरकारांस आहे काय ? (ड) यापुढें व्यापाऱ्यांचे जमाखर्च पाहून त्यांना प्रत्यक्ष झालेल्या नफ्यावर इन्कमटॅक्सची आकारणी होईल काय ? (इ) सन १९३७-३८ व ३८-३९ व ३९-४० या तीन सालांत इन्कमटॅक्सची आकारणीच्या ठरावाविरुद्ध किती रकमेची किती अपिलें झालीं व त्यापैकीं किती रकमेबद्दल व किती अपिलांची दाद दिली गेली ?

ना. शा. रा. वेटमंगलकरः—(अ) ७५ (ब) २२०. (क) नाहीं. (ड) प्रश्न उद्भवत नाहीं. (इ) एकंदर १९५ अपिलें झालीं. त्यापैकीं ९६ मंजूर झालीं व ९९ नामंजूर झालीं.

ना. अ. स. राजमानेः—अद्याप कांहीं अपिलांचीं कामें चालू आहेत काय ?

ना. शा. रा. वेटमंगलकरः—नोटीस पाहिजे.

( ना. राजमाने हे, त्यांनी १९४२ मध्यें झालेल्या अधिवेशनाकरितां पाठविलेल्या प्रश्नांपैकीं प्र. नं. ३ विचारूं लागले. )

ना. प्रेसिडेंटः—ना. राजमाने यांनी चालू अधिवेशनाकरितां जे प्रश्न पाठविले आहेत त्यांत हा प्रश्न नाहीं; करितां हा प्रश्न त्यांना विचारतां येणार नाहीं.

प्रश्न नंबर ३— सुपरवायझिंग बोर्डाकडील कामें.

ना. अ. स. राजमानेः—(अ) सुपरवायझिंग बोर्डाकडे सदर संस्था स्थापन झाल्यापासून आजपावेतो सालवार किती कामें निवाड्यासाठीं आलीं ? (ब) सुपरवायझिंग बोर्डाकडे हल्लीं उपलब्ध असलेले अधिकार सांगली चेंबर ऑफ् कॉमर्सकडे सुपूर्त करण्यांत येतील काय ?

ना. द. ब. कुलकर्णी—(अ) ता. ३।१।१९४२ पर्यंत १९३ अर्ज आले व २९ अपिलें दाखल झालीं व त्यानंतर आतांपर्यंत १४ अर्ज व ३ अपिलें आलीं. (ब) नाहीं.

प्रश्न नं. ४— रेल्वे बोर्डावरील नेमणूक.

ना. अ. स. राजमाने:—(अ) रेल्वे बोर्डावर ज्यावेळी सभासदांची नेमणूक होते त्यावेळी सांगली सरकारला विचारण्यांत येतें काय ? (ब) असल्यास चेंबर ऑफ् कॉमर्स प्रभासदांपैकीं कोणाहि सभासदांची अगर सरकारी नोकरांखेरीज इतर कोणाहि सद्गृहस्थांची निवड करण्याबद्दल सरकार शिफारस करील काय ?

ना. शा. रा. बेटमंगलकर:—(अ) होय. (ब) एकंदर १० वर्षांच्या मुदतीपैकी ८ वर्षे कोल्हापूरनें प्रतिनिधी निवडणेचा असतो व राहिलेलीं २ वर्षे सांगलीच्या वाट्यास आलेलीं आहेत. ही जेव्हां पाळी येईल त्यावेळीं मा. यांचे म्हणण्याबद्दल विचार करतां येईल.

प्र. नं. ५:— सांगली गोळीबार.

ना. अ. स. राजमाने:—(अ) सांगली संस्थान प्रकाशपत्रिकेद्वारें सांगली स्टेशननजीक ता. १४-८-४२ रोजी झालेल्या गोळीबाराबद्दल व लाठीहल्ल्याबद्दल नेमलेल्या कमिटीनें गोळीबाराच्या व लाठीहल्ल्याच्या हुकुमांचा निषेध केल्याचें सरकारचे नजरेस आलें आहे काय ? (ब) गोळीबारापूर्वी लाठीहल्ला केला होता ही गोष्ट खरी आहे. काय? (क) असल्यास लाठीहल्ला करण्यापूर्वी लाठीहल्ल्याची सूचना देण्यांत आली नव्हती हें खरें आहे काय? (ड) गोळीबार केल्यावेळीं श्रीयुत बोंग सराफ यांच्या जोगेश्वरी निवासाच्या तटाच्या भिंतीत व जैन बोर्डिंगच्या पाठीमेकडील आवारांत गोळ्या धडकल्या होत्या ही गोष्ट खरी नाहीं काय ? (फ) गोळीबारांत किती फैरी झाडल्या अगर किती गोळ्या खर्च पडल्या ? (ग) छऱ्यांचा उपयोग केला होता काय? (ह) मुंबई, मुंबईउपनगर व अहमदाबाद येथें दंगे हटविण्यासाठी केलेल्या गोळीबारांत एकच वेळ एकच गोळी झाडण्यांत आलेचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे हें खरें नाहीं काय? (म) गोळीबारानंतर एकदोन दिवसांत येथील वृत्तपत्रांच्या संपादकांना व वृत्तपत्रप्रतिनिधींना मोतीबाग बंगल्यांत बोलावून घेऊन त्यांची समजावणी करण्याचा प्रयत्न झाला काय ?

ना. शा. रा. बेटमंगलकर:—(अ) होय. (ब) होय. (क) खरें नाहीं. (ड) ही गोष्ट सरकारास माहीत नाहीं. (इ) १६. (फ) होय. (ग) माहिती नाहीं. (ह) नाहीं. (म) गोळीबार झाल्यानंतर १-२ सभ्यगृहस्थांना बोलावण्यांत आलें होतें.

ना. अ. स. राजमाने:—सूचना देऊनहि लोक हालले नाहींत काय ?

ना. शा. रा. बेटमंगलकर:—कांहीं हालले; कांहीं हालले नाहींत.

ना. स. ग. फडके:—१-२ सभ्यगृहस्थांना बोलाविलें होतें तें कशाकरितां ?

ना. शा. रा. बेटमंगलकर:—तें मी सांगूं इच्छीत नाहीं.

ना. स. ग. फडके:—त्यानंतरचें गव्हर्मेंट-कम्युनिक निघालें काय ?

ना. शा. रा. बेटगेरीकर:—अद्याप.

प्रश्न नंबर ६:— सांगली वखारभागांतील पोलिस-संरक्षण.

ना. अ. स. राजमाने:— (अ) वखारभागांत गेले कित्येक महिन्यांत रात्रीं पोलीस संरक्षण नाहीं हें खरें आहे काय ? (ब) असल्यास वखारभागसंरक्षणाची जबाबदारी संस्थानी पोलिसांवर नाहीं काय ? (क) येथील कांहीं बड्या अधिकाऱ्यांच्या राहत्या ठिकाणी हत्यारी पोलिसांचा पहारा आहे काय ? (ड) असल्यास वखारभागांत हत्यारी पोलिस गस्तीस कां मिळत नाहींत ? (इ) हत्यारी पांच पोलीस तरी गस्तीकरितां वखारभागांत मिळतील काय ? (फ) निदान किती मिळतील ?

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णी:—(अ) नाहीं. (ब) उद्भवत नाहीं. (क) होय. (ड) गस्त करणें हें हत्यारी पोलिसांचें काम नव्हे, (इ) नाहीं.

प्र. नं. ७ श्री. व्होरा व मे. दिवाणसाहेब यांचा मतभेद

७ (अ) स्वस्त धान्याच्या दुकानच्या व्यवहारासंबंधी मॅनेजर श्रीयुत व्होरा व दिवाणसाहेब यांचमध्यें मतभेद होत असे काय ? (ब) असल्यास तें दुकान बंद करण्यास हा मतभेद कारणीभूत झाला कीं विजय वर्तमानपत्रांतील टीका अगर दुसरेंच कांहीं कारण आहे ?

ना. एन्. एम्. जोशी:—(अ) मतभेद होत नसे. (ब) उद्भवत नाहीं.

ना. अ. स. राजमाने:—मग दुकान बंद करण्याचें कारण काय ?

ना. एन्. एम्. जोशी:—सांगली नगरपालिकेनें ही व्यवस्था करण्याचें कबूल करून आपणांकडे घेण्याचें ठरविलें व दरबारकडे नगरपालिकेनें कळविल्यावरून ही व्यवस्था नगरपालिकेकडे सोंपविली गेली आणि त्यामुळें दुकान बंद करण्यांत आलें.

ना. आ. आ. मुळे:—रिलीफ शॉपचें काम बरोबर होत नाहीं असें निदर्शनास आल्यावरून तें दुकान बंद करण्यांत आलें आहे ना ?

ना. एन्. एम्. जोशी:—तसें नाहीं. एकच दुकान असल्यानें लोकांचा फार वेळ जातो अशा तक्रारी होत्या.

प्रश्न नंबर ८— सांगली स्टोअर्सकडील वजनेंमापें.

ना. अ. स. राजमाने:— (अ) सांगली स्टेट स्टोअर्सकडे लाजमीकडील वजनें, धान्य, साखर वगैरे वजन करणेस वापरतात तीं चेंबरचे स्टँडर्ड वेट्सशीं पडताळून पाहतां तीं —

मणकी ३ रत्तल ३ – १६ तोळे कमी,
मणकी २ रत्तल ५६ – १ रत्तल कमी,
मणकी १ रत्तल २८ – १८ तोळे कमी,
धडा १ रत्तल ७ – ४ तोळे कमी,
दुधडी १ – ५ तोळे कमी,

अशी कमी भरतात हें खरें आहे काय ? (ब) सदर बाबतींत अधिकाऱ्यांकडून दाद न लागलेमुळें श्रीमंत हिज् हायनेस् राजेसाहेब यांचेकडे अर्ज केल्यावर तपासणी झाली ही गोष्ट खरी आहे काय ? (क) ज्या लोकांना आतांपर्यंत सदर वजनांची धान्यें व साखर वगैरे देणेंत आलीं त्यांना कमी वजनाबद्दल भरपाई स्टेट स्टोअर्स देईल काय ?

ना. एन्. एम्. जोशीः—(अ) आहे (ब) दाद लागली नाहीं हें खरें नाहीं. श्रीमंतांचा हुकूम झाल्यावर तपासणी झाली हें खरें आहे. (क) जरूर तेथें भरपाई झालेली आहे व होत आहे. ही गोष्ट जानेवारींतच समजून आली आहे.

## ना. राजाराम पांडुरंग खराडे, मांजर्डे

प्र. नं. १ मांजर्डे येथें सातवीचा वर्ग

ना. रा. पां. खराडेः—तालुके कुचीपैकीं मांजर्डे गांवीं सातवीचा वर्ग सुरू करणेंत येईल काय ?

ना. त्रि. मो. भटः—विद्यार्थ्यांची संख्या सातवीच्या वर्गांत भरपूर राहील असें दिसून आल्यास वर्ग सुरू करणेंत येईल.

ना. रा. पां. खराडेः—भरपूर म्हणजे किती ?

ना. त्रि. मो. भटः—निदान १० तरी विद्यार्थी पाहिजेत.

ना. स. ग. फडकेः—संख्या कायम झाल्याशिवाय वर्ग नाहीं व वर्ग चालू नाहीं म्हणून संख्या नाहीं, असेंच vicious circle चालू रहाणार काय ?

ना. त्रि. मो. भटः—सध्यां तेथें सहावीचा वर्ग चालू आहे; त्या वर्गाची परीक्षा झाल्यानंतर त्यांतील किती विद्यार्थी सातवींत येतात तें पाहून विचार होईल.

प्रश्न नं. २. सांगली पेठेंतील धर्मादाय फंड.

ना. रा. पां. खराडेः—(अ) सांगली पेठेंत शेतकऱ्याकडून अडत दुकानांत माल विक्री केला जातो त्यावेळीं धर्मादाय म्हणून व्यापारीलोक फंड वसूल करतात. त्या पैशावर

मालकी कोणाची आहे ? (ब) सदर रकम सरकार आपल्या ताब्यांत घेऊन शेतकऱ्यांना सांगलीस माल आणलेवेळी रहाणेकरितां व जनावरांकरितां इमारत बांधून मिळेल काय ?

ना. प्रेसिडेंट :—ना. गोडबोले यांनी ता. १९-२-४३ रोजीं यासंबंधांतच प्रश्न विचारला होता व त्या वेळीं याबद्दलचा बराचसा खुलासाहि पण झालेला आहे. आतां पुन्हां प्रश्नोत्तरें होऊन निष्कारण सभागृहाचा वेळ जाऊं नये.

ना. म. ग. फडके :—यांतील (ब) प्रश्न वेगळा असल्यानें त्यापुरतें काय उत्तर असेल तें द्यावें.

ना. ह. ब. कुलकर्णी :—सरकारच्या हुकमानें हा फंड वसूल होत नसल्यानें त्या बाबतींत सरकारचें नक्की धोरण आजच कांहीं सांगतां येत नाहीं.

ना. प्रेसिडेंट :—ना. खराडे यांच्या प्रश्न नं. ३ मध्यें ज्या कुची तलावाचा उल्लेख आहे त्यासंबंधी हिज हायनेस स्वारींच्या भाषणांत उल्लेख आलेला असल्यानें पुन्हां हा प्रश्न ना. खराडे यांनी विचारून सभागृहाचा वेळ घेऊं नये.

ना. रा. पां. खराडे :—ठीक आहे. पुढचा प्रश्न विचारतो.

प्रश्न नं. ४ — ग्रामोद्धारांतून होणारीं कामें.

ना. रा. पां. खराडे :—(अ) ग्रामोद्धारांतून होणारीं कामें नियमाप्रमाणें लोकांकडून मदत मिळत नाहीं म्हणून सध्यां राहिलीं आहेत काय ? (ब) चालू परिस्थितींत लोकांच्या मदतीशिवाय ग्रामोद्धार रकमेंतून अशीं कामें केलीं जातील काय ?

ना. ह. ब. कुलकर्णी :—(अ) होय. बहुतेक कामें या कारणामुळें राहिलेलीं आहेत. (ब) लोकांनी मदत नसतांना ग्रामोद्धाराचीं कामें होतीलच असें वाटत नाहीं.

ना. आ. आ. मुळे :—नियमाप्रमाणें निम्मी मदत लोकांकडून मिळण्यासारखी नसल्यास ⅓ घेऊन कामें सुरू होतील काय ?

ना. प्रेसिडेंट :—हा पॉलिसीचा प्रश्न आहे. शिवाय ना. मिनिस्टर यांनी "या बाबतींत नवीन नियम आपण करीत आहोत" असें कालच्या आपल्या भाषणांत सांगितलें आहे; तेव्हां निष्कारण वेळ घालवूं नये. पुढचा प्रश्न ना. खराडे यांनीं विचारावा.

प्रश्न नं. ५—गॅझीटमधील महत्वाचा मजकूर मराठी व कानडी भाषांतून प्रसिद्ध करणें.

ना. रा. पां. छत्रे:— धान्यनियंत्रणाबाबद वगैरे महत्वाचा मजकूर स्टेट गॅझीट-मध्यें इंग्रजीतून प्रसिद्ध केला जातो व त्यामुळें गांवकामगार यांना आणि इतर प्रजाजनांना तो समजणें अशक्य होतें. करितां सदर मजकूर मराठी व कानडी भाषांतून प्रसिद्ध करण्यांत येईल काय?

ना. एन्. एम्. जोशी:—कागदाचे सध्याचे भाव लक्षांत घेऊन सरकार जरूर तो विचार करील.

ना. आ. आ. मुळे:—इंग्रजीमधून छापावयास कागद लागत नाहीं काय?

ना. ह. ब. कुलकर्णी:—Ordinances इंग्लिशमधूनच प्रसिद्ध करावे लागतात. गांवा-कडे हुकूम देतांना मामलेदार त्यांचीं भाषांतरें करून पाठवितात.

ना. बा. थ. पाचवरे:—सांगली दरबारची भाषा मराठी कां कानडी?

ना. ह. ब. कुलकर्णी:—दोन्ही.

## ना. आण्णाराव आप्पाजी मुळे, कवलापूर.

प्र. नं. १—मागसलेल्या वर्गास सरकारी नोकऱ्या.

(अ) संस्थान मजकुरीं मागसलेल्या वर्गाच्या प्रजेचें प्रमाण जास्त आहे. तरी त्या प्रमाणांत संस्थानच्या अधिकाऱ्यांच्या जागा भरणें सरकारास इष्ट वाटत नाहीं काय? (ब) खालीं राहलेल्या जागांवर वरील प्रमाण पोंचेपर्यंत मागासलेल्या वर्गांतूनच लायख इसमांची भरती करणें आवश्यक नाहीं काय? (क) ह्या दृष्टीनें सध्यां भरती होत असते काय? (ड) नसल्यास कां नाहीं? (इ) केव्हांहि एकादी जागा भरणेची झाल्यास उमेदवारांना जाहीर नोटीस देऊन त्यांचे अर्ज घेण्याची सर्रास पद्धत कां अवलंबिण्यांत येत नाहीं?

ना. आ. आ. मुळे:—(अ) व (ब) संस्थानच्या पॉलिसीचे व मताचे प्रश्न आहेत. (क) व (ड) प्रश्न उद्भवत नाहींत. (इ) उमेदवारांची भरती करण्याचें वेळीं चालू साली गॅझीटमध्यें नोटिफिकेशननें प्रसिद्ध केलें होतें.

प्रश्न नंबर २— ग्रामपंचायतींच्या निवडणुकी.

ना. आ. आ मुळे:—(अ) ब्रिटिश मुलखांतील ग्रामपंचायत, लोकलबोर्ड व स्कूलबोर्ड वगैरे कायद्यांचें तत्व संस्थान मजकुरीं अक्षरशः लागू करण्याचा सरकारचा विचार आहे काय? (ब) ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचे बाबतींत ज्या त्या गांवीं प्रत्येक समाजास प्रातिनिधिक हक्क मिळणें सरकारास इष्ट वाटत नाहीं काय? (क) वाटत असल्यास सॉलिड व्होटिंगचें तत्वावर निवड-णुकी लढविण्याचें सरकार पसंत करील काय?

ना. मिनिस्टर:—[अ] अक्षरशः याचा अर्थ समजला नाहीं. ग्रामपंचायत, लोकलबोर्ड वगैरे कायदे ब्रिटिश हिंदुस्थानांत लागू असलेलेच, त्यांत येथील स्थानिक परिस्थितीप्रमाणें जरूर ते फरक करून, येथें लागू केलेले आहेत. [ब] नाहीं. [क] उद्भवत नाहीं.

## पुरवणी अंदाज–पत्रकावरील चर्चेस उत्तर.

मे. वि. का. खाडिलकर ( फिनॅन्स मेंबर ):—सन्मान्य अध्यक्षसाहेब, काल पुरवणी अंदाजपत्रकांतील खर्चाच्या बाबीसंबंधानें जे आंकडे मांडण्यांत आले त्याजबद्दल सर्वसाधारण चर्चा आतापावेतों झाली आहे. जी चर्चा झाली ती तशी होईल, अशी माझी अपेक्षा नव्हती. कारण त्यांत वादग्रस्त मुद्दे नव्हते. साधारण अशा पुरवणी बजेटाचे चर्चेच्या वेळीं मूळ बजेट मंजूर होतानां जें धोरण ठरलें गेलें त्यावर चर्चा सहसा होऊं नये असें तत्त्व असतांनासुद्धां ही टीका झालेली आहे. तथापि जी अनुकूल वा प्रतिकूल टीका झाली ती सरकारला लोकपक्षाकडून त्यांचें मत समजावें या हेतूनेंच झालेली आहे. किंचित् असेंही म्हणणें भाग पडतें कीं झालेल्या प्रखर टीकेचा पाया बराचसा गैरसमजावर आधारलेला होता. तोच गैरसमज शक्य झाल्यास दूर करण्याचा माझ्या कुवतीप्रमाणें प्रयत्न मी करणार आहे. लोकप्रतिनिधींनीं जो असंतोष दर्शविला, त्यांत गैर असें कांहींच नाहीं. सात्विक असंतोष हा उत्कर्षाचा पाया असतो. तेव्हां आतांपर्यंत जो असंतोष व्यक्त केला गेला त्याचा पहिला भाग ना. मळेवाडीकर यांनीं मांडला. या पुरवणी बजेटांमध्यें खर्चाचे जसे आंकडे दिले आहेत, तशाच तऱ्हेनें उत्पन्नाच्या बाजूचे आंकडे मिळाले असते तर बरें झालें असतें. असेंही ते म्हणाले. खालसा मुलूखांत अशी प्रथा आहे असें त्यांनीं प्रतिपादलें, परंतु त्याला माझें असें उत्तर आहे कीं तशी तिकडे वहिवाट नाहीं. पुरवणी खर्चाच्या बाबी या क्वचित् प्रसंगीं सभागृहापुढें येतात. त्या देण्यामध्यें सरकारची गैरसोय तशी लोकांचीही गैरसोय असल्यानें त्यांत बराच वेळ जातो. विलायतेंतील पार्लमेंटमध्यें जें धोरण अशाबाबतींत ठरलेलें आहे, तेंच धोरण खालसा मुलूखांत अवलंबिलेलें आहे. व खालसांतील धोरणाचें अनुकरण येथें केलेलें आहे. याला आधार म्हणून मी आपणास या शास्त्रांतील तज्ज्ञ मनुष्यानें लिहिलेल्या एका पुस्तकांतील उतारा वाचून दाखवितो. (वाचून दाखविला) यावरून अशीं बजेट्स् आखणेंचे प्रसंग वरचेवर येऊं नयेत, शक्यतोंवर एकदांच बजेट व्हावें हेंच धोरण दिसून येतें; व असे वरचेवर प्रसंग येवूं नयेत हेंच बरोबर आहे. हें पुरवणी बजेट कां मांडलें व तें केवळ खर्चाचेंच कां मांडलें याचा माझ्या प्रारंभीच्या भाषणांत खुलासा जितका करतां आला तितका केला होता. परंतु त्याची पुनरावृत्ति नाइलाजानें पुन्हां करावी लागली आहे. पहिला गैरसमज असा आहे कीं, पुरवणी बजेट व

दुरुस्त बजेट यांतील अंतरच कळलें नाही. बजेटकडे दृष्टी टाकल्यास असें दिसेल की, त्यामध्ये जमेकडे व खर्चाकडे चार कोष्टकें ठेविलीं आहेत. १३४९ व १३५० फसलीचा प्रत्यक्ष खर्च, १३५१ चा अंदाजी खर्च व १३५१ चा दुरुस्त खर्च असे मागील खर्चाचे आंकडे दिलेले आहेत. जमेच्या व खर्चाच्या प्रत्येक बाबींत फेरफार कसा झाला हें अगदी सालअखेर-पर्यंत सांगतां येणें अशक्य आहे. त्या दृष्टीनें दुरुस्त आंकडे सांगण्यांत येत असतां पुरवणी बजेटाचा दुरुस्त बजेटशीं कांहीं संबंध नाही. हा फरक समजावून घेतला असता तर जी टीका ना. सभासदांनी केली ती झाली नसती. या आक्षेपानंतर ना. फडके यांनी जे आक्षेप घेतले त्यांचा मुख्य भर बजेटमध्ये वास्तविक तूट येणार नसून खर्चामध्ये जर बचत केली तर व जमेकडे जमेच्या जादा बाबी घेतल्यानंतर तूट व जमा यामुळें तोंडमिळवणी होऊं शकेल याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी बरेचसे आंकडे मांडले. त्यांनी असेंहि सांगितलें की यामुळें एकूण २१४००० रुपये आहेत व त्यामुळें तोंडमिळवणी सहज होणार आहे. माझी अशी इच्छा आहे की तशी तोंडमिळवणी अवश्य व्हावी. ना. फडके यांनी आंकडे मांडतांना प. व. खातेमध्यें बचत होईल असें सांगितलें. लढाईच्या व ग्रामोद्धाराच्या खर्चाचीहि त्यांनी पाहणी केली. वॉर इंजरिज आणि टीयर गॅस या बाबींतील खर्च, लढाई इकडे येणारच नाहीं असेंही त्यांनीं सांगून, शिल्लक राहील असें प्रतिपादन केलें. लढाईचें हें त्यांचें पंचांग व भविष्यकथन थोडें अधिक धाडसाचें आहे असें म्हटल्याखेरीज राहवत नाहीं. बजेट करतांना कोणत्याही इमर्जन्सीची तरतूद केलेली असावी. तयारी नसल्यामुळें प्रसंगच आला तर घोटाळा होऊं नये म्हणूनच अशी तरतूद करावी लागते. प. व. खात्याबद्दलचा प्रश्न आमच्या एका विद्वान् मित्रांनीं मांडला. प. व. खात्याची मूळ धरलेली कामें झाली नाहींत तर बचत होईल असें त्यांनीं सांगितलें. १३५२ फ. ची ओरिजिनल कामगाऱ्यांची म्हणून यादी प्रसिद्ध झाली आहे, त्यांत धुळगांव, माविनकट्टे, भालेवाडी, डंगराळी वगैरे शाळांच्या कामगिऱ्या दाखल केल्या आहेत. याप्रमाणें बऱ्याचशा शाळा बांधण्याचें काम सुरू होऊन आतांपावेतों निम्मी अधिक कामें झालेलीही आहेत. त्या तशाच अपुऱ्या राहाव्यांत असें आम्हांस वाटत नाहीं. मार्च महिन्या-मध्यें पाऊस पडावा अशी आमची इच्छा आहे. त्यादृष्टीनें पाऊस पडल्यास अपुऱ्या कामगा-ऱ्यांची स्थिती काय होईल याची आपणच कल्पना करा. या खात्यांतील आतांपर्यंत सुरू झालेल्या कामगाऱ्या करावयाच्या नाहींत असें ठरविलें तर जास्तीत जास्त शिकस्त करूनही १३००० चे आसपास बचत होईल असें वाटतें. ग्रामोद्धाराचे खर्चाची दुसरी गोष्ट; हा खर्च १७००० रु. दाखल आहे. तो झाला नाहीं तर ती बचत होईल असें ना. सभासदाचें म्हणणें आहे. जरी हा खर्च झाला नाहीं तरी त्याची संस्थानचे जमेला, ज्याला इमर्जीत आपण

रोव्हिन्यू म्हणतो त्याला, कांहींहिं मदत होणार नाहीं. समजा, ही बचत झाली तर ती रक्कम फारफार तर ग्रामोद्धारफंडामध्यें जमा होणारी आहे. त्यांनीं जमेच्याही कांहीं बाजू सांगितल्या. टगार शुगर वर्क्स, रेल्वे, आणि इन्कमटॅक्स वगैरे बाबींचा त्यांनीं प्रामुख्यानें उल्लेख केला. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिति काय होईल याचें भविष्य आजच सांगतां येण्यासारखें नाहीं. शिवाय या पुरवणी बजेटांत जमेला स्थानच नाहीं, असें एका नामदारांनी म्हटलें होतें. त्यांनीं जर मथळ्याकडे दृष्टी टाकली असती तरीसुद्धां त्यांना त्यावर लिहिलेल्या स्वच्छ शद्बावरून यांत जमा कोठेंही दिसणार नाहीं हें ध्यानीं आलें असतें. आतांपर्यंत मी केलेल्या विवरणावरून ते म्हणतात तितकी बचत खास होणार नाहीं असें माझेप्रमाणें त्यांना ही कबूल करावें लागेल. ना. कुलकर्णी, लीडर ऑफ् दि ऑपोझिशन् यांनीं समतोलपणाचें व उपयुक्त असें मत प्रदर्शित केलें आहे. सप्लाय व स्टोअर डिपार्टमेंटमध्यें "आमूलाग्र फरक" करून हे जे शब्द होते, ते काढून काटकसरीनें खर्च व्हावा असें प्रतिपादलें. या त्यांच्या वृत्तीशी मी पूर्ण सहमत आहे. माझा स्वतःचा काटकसरीविषयीं अत्यंत दुर्लौकिक आहे. माझ्या समजुतीनें याबाबतींत सरकारपक्ष त्यांना खास हार जाणार नाहीं. असो. हें कांहींही असलेंतरी त्यांचे सूचनेचा अवश्य विचार केला जाईल असें मी त्यांना अश्वासन देतो. ना. फडके यांचे भाषणानंतर मी आतां माझे मंगळवेढ्याचे सन्मान्य मित्र ना. करंदीकर यांचे भाषणाकडे वळतो. त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणेंच त्यांनीं सांगितलें कीं या बजेटमध्यें शेतकऱ्यांकारितां कांहीं नाहीं. त्यांनीं आपली अशी समजूत कां करून घेतली आहे, हें मला समजत नाहीं. मी त्यांची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न करीत आहे. पोलीस, कोर्टें, शाळा, पाणीपुरवठा, दवाखानें या सर्व गोष्टी कोणांकरितां आहेत? यांचा उपयोग शेतकऱ्यांना नाहीं असें निदान मला तरी वाटत नाहीं. या सर्व गोष्टी केवळ शहराकारितांच नाहींत. खेडें संरक्षण कमिटीचा खर्च कोणाकरतां आहे! शेतकऱ्यांकारितांच आहे ना! शेतकऱ्यांचेकरतां कांहीं नाहीं असें कायम टसानें त्यांनीं म्हणावें व आम्हीं तें ऐकावें हें आमचें आम्ही दुर्दैव समजतो. शास्त्रीय दृष्ट्या स्टोअर डिपार्टमेंटच्या तरतुदीबाबत एक गोष्ट मांडली, व सरकारला त्यांनीं रक्कम काढावयाची दुर्बुद्धी कां व्हावी, असा त्यांनी प्रश्न केला. बरोबर आहे; मी म्हणतो, खजिन्यामध्यें शिल्लक आहे. खजिन्यांत शिल्लक किती आहे या संबंधीचें देणेंदेणेंचे पत्रक दरसाल आम्हीं त्यांना पुरवितो, तें आपण वाचतांच. तरीही आपण टीका कां करावी हें कळत नाहीं. त्यावरून जो हिशोबी १८०००० आंकडा त्यांचे समजुतीप्रमाणें शिल्लक आहे, तो केवळ ट्रेझरीमध्यें पडून आहे असें कां त्यांना म्हणावयाचें आहे! त्यांना ही एवढेंच सांगतो कीं ही सर्व शिल्लक सरकारी कर्जरोख्यामध्यें गुंतलेली आहे. साडेतीन टक्यांचाच नोटांचा भरणा अधिक असल्यानें

त्याचाच विचार आदण करूया. या नोटा निरनिराळ्यावेळी ७५ ते ८० या दरानें विकत घेतलेल्या आहेत. म्हणजे यावर सर्वसाधारणपणें ५ टक्केतरी व्याज मिळूं शकतें हें सोडून अडीच टक्याचें व्याज मिळवावयाचें. हा युक्तिवाद, मला वाटतें, त्यांनासुद्धां हें कळल्यानंतर पटणार नाहीं. आणखी एक गंमतीचा प्रश्न त्यांनीं उत्पन्न केला. तो म्हणजे चिल्लर नाणें होय. त्यांचें म्हणणें कीं सरकार याबाबतींत कांहींही सोय करीत नाहीं, असें दिसतें. चिल्लर नाण्याचा प्रश्न अखिल हिंदुस्थानचा आहे. तो प्रश्न सांगली संस्थाननें सोडविण्याच्या कुवतीबाहेरचा आहे; त्याकरतां बजेटमध्यें काय तरतूद करावयाची हें निदान मला तरी समजत नाहीं. पोलीसखात्याबद्दल त्यांनीं एक लहानशी तक्रार केली. एखादें विशिष्ट उदाहरण त्यांनीं सांगितलें असतें तर बरें झालें असतें. पोलीस खातें झालें तरी तें सर्वसाधारण वृत्तीला अपवाद आहे असें नाहीं. समजा एखाद्या व्यक्तीकडून एखादा प्रकार घडला असला तरी त्यावरून सर्व खात्याला दोष देणें योग्य होणार नाहीं. ना. सौ. साठे यांनीं काटकसरीच्या धोरणाबद्दल कांहीं सूचना केल्या व विशेषत: फिरतीभत्याबद्दल त्यांनीं टीका केली. खेडोपाडीं हिंडण्याचा अनुभव मला आहे. त्यावरून माझें असें मत झालें आहे कीं, आम्हीं जो प्रवास करतो आहे तो कमी पडतो आहे. जितका प्रवास जास्त तितकी त्या खात्याची कार्यक्षमता वाढते. तपासणी अम्मलदार फिरतीस निघाले कीं, अधिक कालपर्यंत ज्या गोष्टी पडल्या असतील त्या दुरुस्त होतात. या हेतूनें ही त्यांची टीका अस्थानीं आहे. तूट भरून काढण्याचा त्यांनीं एक तोडगा म्हणून सुचविला आहे, तो म्हणजे मोठ्या पगाराचे लोकांचे पगारांत कपात करणें हा होय. ८ रु. पासून तो ७५ रु. पर्यंत व ७५ पासुन १५० रु. पगार असणाऱ्यांची दैन्यावस्था सध्याचे स्थितींत काय आहे, व त्याबाबतींत कपात करणें किती निर्घृण आहे हें कोणासहि दिसेल. त्यांनीं केवळ नगारें म्हणून महागाई भत्ता दिला आहे. १०० चे वरील अवघे ३४ लोक आहेत व त्यांच्या पगाराची रक्कम जास्तींत जास्त ५००० रु. आहे. या पगारावर शें. १० टक्के कपात केल्यास ती जास्तींत जास्त ५०० रु. होईल, बारा महिन्यांत ६००० रु. होईल. मग एवढ्यानें दोन लाख रुपयेचा खड्डा भरून काढण्यास हा उपाय कितपत उपयोगी पडेल हें मला तरी निदान सांगतां येत नाहीं. पोलिटिकल् कॉन्फरन्सिसबद्दल एका नामदार सभासदांनीं संताप व्यक्त केला. बजेटमध्यें जी तरतूद आहे त्याची जरूरी किती आहे व त्याचे फायदे किती होतात, हें मी स्वत:चे अनुभवानें सांगतो. धान्य मिळविण्याच्या हेतूनें हैद्राबाद संस्थानांत जाऊन जनताजनार्दनाची अल्पशी सेवा करण्याची जी मला संधी मिळाली त्यावरून मी असें म्हणेन कीं, पोलिटिकल् खात्यांतील लोकांनीं परस्पराशीं जे ऋणानुबंध उत्पन्न केले आहेत व संबंध जोडले आहेत, त्याचाच उपयोग झाला. एरवीं माझ्या केवळ खटपटीचा उपयोग होता ना. मंगळवेढे

पंढरपूर रस्त्यावरील माणनदीवरील पुलाचीच बाब घ्या. या पुलाच्या झालेल्या खर्चापैकी ½ रक्कम सरकारकडून मिळाली आहे. हें या पोलिटिकल खात्याचेंच फळ आहे. या ऋणानुबंधाचा व मैत्रीचा नफा प्रत्यक्ष पैशांत जरी सांगतां येणेसारखा नसला तरी त्याचा अप्रत्यक्ष फायदा फार आहे, यांत शंका नाहीं. ना. गोडबोले यांचे टीकेबद्दल मला फारसें बोलावयाचें नाहीं. त्यांतील जीवनस्वर पाहिला तर हें अधिवेशन सरकारी धोरणाला अनुकूल असल्यामुळें भरविलें गेलें आहे, व केवळ करवसुलीकरतांच त्याचा उपयोग केला जात आहे एवढाच दिसून येईल. दाबावतीत अधिक खुलासा करण्याचें कारण आहे असें मला वाटत नाहीं, वस्तुस्थिती सर्वांचेपुढें आहेच. मागील बजेट अधिवेशनाचे वेळीं एटरटेनमेंट टॅक्स बसवतांना माझे मित्र ना. मल्लेवाडीकर यांनीं "डोंगर पोखरून उंदीर कां काढतां? ९–१०००० मिळतील असें कांहीं तरी करा" असें त्यानी सुचविलें होते. जरुरी लागेल तेव्हांच सरकार कर बसविते. सध्यां जें एक अनिश्चित वातावरण निर्माण झालेलें आहे, तें कोणाच्याही आवाक्याबाहेरचें आहे. सरकार कर बसविते तें त्यांचे वाढलेले खर्च चालू जमेतून भागण्यासारखें नाहींत असें त्यास आढळतें तेव्हांच बसविते. तूट भरून येण्याकरितां केवळ कष्टानें व नाइलाजानेंच हा कर बसवावा लागत आहे. सप्लाय-स्टोअर खात्याबद्दल बोलतांना एका सभासदांनीं सांगितलें कीं अगोदर डिव्हेलपमेंट ऑफिसरची नेमणूक करणेंची आवश्यकताच नव्हती. परंतु मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं ती पूर्वीच करणें जरूर होतें. कोणच्याही गोष्टी नवीन करण्याच्या झाल्यास त्याला ऑर्गनायझेशन् करावें लागतें व ती कोणीतरी केली पाहिजेच. कोणत्या तजविजी कराव्यात, त्यांतील व्यवहार्य किती, त्या कशा पार पाडाव्यात, याबद्दल कोणी तरी स्वतंत्र मनुष्य पाहिजे होता, व म्हणूनच ही नेमणूक केली आहे. कालाचे ओघानें धान्य पुरवठ्याचा प्रश्न अतिशय निकडीचा झाल्यानें त्यांचेकडे हें काम सोंपविलें आहे. सांगली बँक रिझर्व्ह बँकेशीं संलग्न करणेबद्दल ना. लॉमेंबरनीं जरूर तो खुलासा आपलें भाषणांत केलेला असल्यानें मी आतां कांहीं सांगत नाहीं.

---

ना. प्रेसिडेंट :—आतां यापुढील काम म्हणजे पुरवणी अंदाजपत्रकांतील मागण्या सभागृहापुढें मांडणें व त्यावरील कपात सूचनांचा विचार करणें हें आहे. तरी सरकारतर्फे आतां सभागृहापुढें motions मांडाव्यात.

ना. रा. ब. मा. ह. लिमये :—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी ह्या सभागृहाला असें कळवितो कीं खातें नंबर ९ – संस्थान बंगले - याकरितां सन १३९२ च्या पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ३९० ची जरूरी असलेनें ते दाखल केले आहेत.

(सदर खात्यावर कोणाचीहि कपातीची सूचना नसल्यानें वादविवाद झाला नाहीं.)

ना. शा. रा. बेटमंगलकर:—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी ह्या सभागृहाला असें कळवितो कीं, खातें नंबर ७ – संस्थानच्या धार्मिक बाबी – याकरितां सन १३९२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ८९५ ची जरूरी असलेनें ते दाखल केले आहेत.

( सदर खात्यावर कोणाचीहि कपातीची सूचना नसल्यानें वादविवाद झाला नाहीं. )

ना. रा. ब. मा. ह. लिमये:—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी ह्या सभागृहाला असें कळवितो कीं, खातें नंबर ८ – पागा खातें – याकरितां सन १३९२ फ.चे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये १८८०३ ची जरूरी असल्यानें ते दाखल केले आहेत.

( सदर खात्यावर कोणाचीहि कपातीची सुचना नसल्यानें वादविवाद झाला नाहीं. )

ना. रा. ब. मा. ह. लिमये :—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी ह्या सभागृहाला असें कळवितो कीं, खातें नंबर ९ – संस्थान थट्टी कुरणें – याकरितां सन १३९२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ४७७ ची जरूरी असल्यानें ते दाखल केले आहेत.

( सदर खात्यावर कोणाचीहि कपातीची सुचना नसल्यानें वादविवाद झाला नाहीं. )

ना. शा. रा. बेटमंगलकर:—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी ह्या सभागृहाला असें कळवितो कीं, खातें नंबर १० - पोलिटिकल् कॉन्फरन्सीस यांकरितां सन १३९२ चे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ९०० ची जरूरी असलेनें ते दाखल केले आहेत.

ना. प्रेसिडेंट :—Motion before the house is :

"खातें नंबर १० – पोलिटिकल् कॉन्फरन्सीस याकरितां सन १३९२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ९०० ची जरूरी असलेनें ते दाखल केले आहेत."

ह्या खात्यावर दोघां नामदारांकडून कपातीच्या सूचना आलेल्या आहेत. तरी त्यांपैकी ना. फडके यांची सूचना प्रथमची असलेनें ती त्यांनी सभागृहापुढें मांडावी.

ना. स. ग. फडके:—" खातें नं. १० रु. पोलिटिकल कॉन्फरन्सीस - या खात्यास दाखल असले रकमेमधून १०० रु. कमी करणेंत यावेत " अशी माझी कपातीची सूचना आहे.

मे. प्रेसिडेंट:—Motion before the House is :

" खातें नं. १० - पोलिटिकल कॉन्फरन्सीस - या खात्यास दाखल असले रकमेमधून १०० रु. कमी करणेंत यावेत. "

ना. स. ग. फडके:—ही कपातीची सूचना सुचविण्यांत माझा एवढाच उद्देश आहे कीं, संस्थानच्या अधिकाऱ्यांनीं दिल्लीस जाऊन, प्रजेच्या धान्य पुरवठ्याच्या व इतर बाबतीत कांहीं उपयोग होत नाहीं; तेव्हां या अधिकाऱ्यांचा भत्ता वगैरेचा खर्च कां मंजूर करावा ? चेंबर ऑफ प्रिन्सेसकडून या अधिकाऱ्यांनीं धान्य मिळविण्याचे बाबतीत कांहीं तरी मदत मिळविण्याचे प्रयत्न करावेत; तरच त्यांच्या दिल्लीस जाण्याचा लोकांना फायदा होईल.

ना. शा. रा. बेटमंगलकर:—सदर खर्चांत सरकारी अधिकाऱ्यांकडून शक्य तितकी काटकसर केली जातेच. धान्य पुरवठ्याचे बाबतीत सरकारकडून काय काय तजविजी केल्या गेल्या आहेत याबद्दलची माहिती आम्ही परवांचे दिमशी भरणाऱ्या Conference मध्ये सांगणार आहोतच; तथापि नामदारांनीं केलेल्या सूचनेचा अवश्य विचार केला जाईल.

ना. स. ग. फडके:—सरकारकडून खुलासा करणेंत आला आहे तरी मी माझी कपातीची सुचना परत घेतो; तशी परवानगी असावी.

The motion was, with leave of the House, withdrawn.

प्रेसिडेंट:—आतां ना. गोडबोले यांनीं आपली सूचना मांडावी.

ना. म. ह. गोडबोले:—"खातें नं. १० पोलिटिकल कान्फरन्सीस यास दाखल असले रकमेमधून १०० रु. कमी करावेत." माझ्या या कपातीचा हेतु हा आहे कीं, संस्थानबाहेरील संस्थानी प्रजेची परिस्थिती व त्या खालील प्रयत्न याबाबत मी थोडेसें बोलणार आहें. ही तक्रार मी या सभागृहापुढें पुष्कळ वेळां केली आहे. सांगली संस्थानची स्थिती इतर संस्थानचे मानानें मागासलेली आहे, असें म्हणावें लागतें. ब्रिटिश हद्दींतील निरनिराळ्या शिक्षण संस्थांतून उदाहरणार्थ बी. टी. बी. ई. ॲगिकल्चरल् वगैरे सारख्या कॉलेजमध्यें संस्थानचे प्रजाजनांना प्रवेश मिळत नाहीं, व मिळाल्यास दुप्पट फी द्यावी लागते, याविषयीं सरकारनें कांहीं प्रयत्न केलेला नाहीं. निदान केला असल्यास आम्हांसतरी समजला नाहीं. अशा प्रयत्नाचे बाबतींत पोलिटिकल् खात्यामार्फत प्रयत्न करणें शक्य आहे. तसा जर प्रयत्न त्यांचेकडून होत नसेल तर एका अर्थानें या कॉन्फरन्सीस व्यर्थ होय असें म्हणणें भाग पडतें. ब्रिटिश हिंदुस्तानचे रहिवासी म्हणून ज्या सोई त्यांना मिळतात, त्याच संस्थानी प्रजेलाही मिळाल्या पाहिजेत. तसें होणें शक्य असेल तरच हा जो जादा खर्चाचा बोजा संस्थानी प्रजेवर पडतो तो संस्थाननें सोसण्याची तजवीज करावी, एवढेंच मला सुचवावयाचें आहे.

प्रेसिडेंट:—Motion before the House is: "खातें नं. १० पोलिटिकल् कॉन्फरन्सीस यास दाखल असले रकमेमधून १०० रु. कमी करावेत."

ना. मिनिस्टर:—सांगली संस्थानचे जे विद्यार्थी स्पेशल् कोर्सकरितां ब्रि. हद्दींतील सरकारी कॉलेजांत शिक्षणास जातात त्यांना जास्त फी पडते ही गोष्ट खरी आहे. त्या बाबतींत कांहीं प्रयत्न झाले आहेत; परंतु त्या प्रयत्नांना यश येईलसें दिसत नाहीं. संस्थानचे संबंध अलीकडे हिंदुस्थान सरकारशीं जोडले गेले असल्यानें व अशा शिक्षण संस्था मुख्यत्वें प्रांतिक सरकारकडून चालविल्या जात असल्यानें, हें एक कारण असण्याचा संभव आहे. तथापि अलीकडे या बाबतींत आणखी एक प्रयत्न झाला आहे. मुंबई सरकारनीं ना. जयकर यांचे अध्यक्षतेखालीं नेमलेल्या महाराष्ट्र युनिव्हर्सिटी समितीपुढें साक्ष देण्याकरितां संस्थानचे विद्याधिकारी श्री. डी. एल्. गोखले यांना साक्षीकरितां पाठविलें होतें. त्यांनीं साक्ष देतांना इतर बाबींबरोबर ही बाब प्रामुख्यानें मांडलेली आहे. शिवाय संस्थानतर्फे जें लेखी म्हणणें दिलें आहे त्यांतहि या अडचणीचा उल्लेख केला आहे. कदाचित् महाराष्ट्र युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यावर त्या संस्थेखालीं जीं कॉलेजीस निघतील त्यांत बरोबरीचे तत्त्वावर या बाबतींत विचार होईल, अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं. त्या कमिटीचा रिपोर्ट बाहेर आल्यानंतर याबद्दल अधिक स्पष्टता होणारी आहे.

ना. म. ह. गोडबोले:—समितीपुढें साक्ष देण्याकरितां संस्थानचे अधिकाऱ्यांना पाठवून ही बाब मांडली यामुळें अल्पसें कां होईना समाधान होत आहे. वास्तविक महाराष्ट्र युनिव्हर्सिटी स्थापन होऊन त्या संस्थेकडून कॉलेजिस् निघतील तोंपर वाट पाहणें भाग आहे असें नाहीं; तथापि संस्थानच्या पोलिटिकल् खात्याकडून याबाबत जोरदार प्रयत्न केला जावा अशी सूचना करून मी माझी कपातीची सूचना परत घेतो. तरी तशी परवानगी असावी.

The Motion was, with leave of the House, withdrawn.

ना. रा. ब. मा. ह. शिंदे:—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी ह्या सभागृहाला असें कळवितो कीं खातें नंबर १५ संस्थान छावणी याकरितां सन १३५२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ७२ ची जरूरी असल्यानें ते दाखल केले आहेत.

[ सदर खात्यावर कोणाचीहि कपातीची सूचना नसल्यानें वादविवाद झाला नाहीं ]

ना. रा. ब. मा. ह. शिंदे:—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी ह्या सभागृहाला असें कळवितो कीं खातें नंबर १६ — इतर खातें — याकरितां सन १३५२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ३५२६ ची जरूरी असल्यानें ते दाखल केले आहेत.

प्रेसिडेंट:—Motion before the House is:

" खातें नंबर १६ इतर खातें याकरितां सन १३५२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ३५२६ ची जरूरी असल्यानें ते दाखल केले आहेत. "

ನಾ. ಮ. ಫ. ಡಬಾಲಿ:—ಮೆ. ಅಧ್ಯಕ್ಷ ಮಹಾರಾಜ ಮತ್ತು ನಾ. ಸಭಾಸದರೆ, ಖಾತೆ ನಂ. ೧೬(ಅ)(೨) ಇದರೊಳಗೆ ೧೬೦೦ ರೂ. ಛಾಪಖಾನೆಯ ಸಲುವಾಗಿ ಕಾಗದ ಖರ್ಚು ಅಂತಾ ಹಾಕಿರುತ್ತದೆ. ಅದರಲ್ಲಿ ೧೦೦ ರೂಪಾಯಿಯ ಕಪಾತಿಯ ಸೂಚನೆ ನಾನು ಮುಂದೆ ತರುವವನಿದ್ದೇನೆ. ನಮ್ಮ ಸಾಂಗಲಿ ಸಂಸ್ಥಾನದ ಆರು ತಾಲೂಕಿನ ಪೈಕಿ ಮೂರು ತಾಲೂಕುಗಳಲ್ಲಿ ಕನ್ನಡ ಭಾಷಾ ಮಾತಾಡುತ್ತಾರೆ ಅಲ್ಲಿಯ ಜನರಿಗೆ ಮರಾಠಿ ಓದಬರಿಯುವದು ಬರುವದಿಲ್ಲಾ ಅವರಿಗೆ ಸಂಸ್ಥಾನದ ಗ್ಯಾಝೇಟು, ಲೆಜಿಸ್ಲೆಟಿವ್ಹ ಅಸೆಂಬ್ಲಿಯ ಅಹವಾಲು, ವಟ್ಟು ಹುಕುಮು, ಕಾಯದೆ ಮತ್ತು ಯುದ್ಧಪತ್ರಿಕೆ ವಗೈರೆ ಮಜಕೂರು ಕನ್ನಡ ಭಾಷೆಯಲ್ಲಿ ಛಾಪಿಸಿದಹೊರತು ತಿಳಿಯುವದಿಲ್ಲಾ. ಆ ಮಜಕೂರು ಮರಾಠಿ ಹಾಗೂ ಇಂಗ್ರಜಿಯಲ್ಲಿ ಮಾತ್ರ ಛಾಪಿಸಲಿಕ್ಕೆ ಕಾಗದದ ಪುರವಠೆ ಆಗುತ್ತದೆ ಪರಂತು ಅದೆ ಮಜಕೂರು ಕನ್ನಡದಲ್ಲಿ ಛಾಪಿಸಲಿಕ್ಕೆ ಕಾಗದ-ಖರ್ಚು ಹಾಕಬೇಕು, ಅದಕ್ಕಾಗಿ ನಾನು ೧೦೦ ರೂ. ಯ ಕಪಾತಿಯ ಸೂಚನೆ ಮಾಡಿರುತ್ತೇನೆ.

ना. डॉ. बी ए. बोगार:—सन्मान्य अध्यक्ष महाराज, ना. डबाली यांनी जी कपातीची सुचना आणली आहे तिला माझा दुजोरा आहे. याच खात्यावर ह्याच उद्देशासाठी मीहि एक कपातीची सूचना दिली आहे. गॅझिट वगैरे कानडींतून छापणेस कागदाची अडचण आहे, हें उत्तर बरोबर होणार नाहीं. कागदाचा प्रश्न अन्नाइतकाच महत्वाचा आहे. संस्थानची निम्मि लोकसंख्या कानडी भाषा वापरणारी आहे, ही निम्मि प्रजा या दृष्टीनें भुकेली राहूं नये. ह्मणून व समानतेच्या दृष्टीनेंहि गॅझिट वगैरे कानडीमधून प्रसिद्ध केली जावीत व कांहीं दिवसांपूर्वी ज्याप्रमाणें अंदाजपत्रकामध्यें हेडींग्ज इंग्रजींतून घातलीं होतीं तीं हेडींग्ज आतां कमी केलीं असल्यानें आतां तीं कानडींतून छापावींत ह्मणजे बरें होईल.

ಇತರ ಎಲ್ಲ ಸಾಧಿಸುತ್ತಿದ್ದು ಇದೇ ಒಂದು ಯಾಕೆ ಸಾಧಿಸಬಾರದು. ಆ ಭಾಷಾ ಮಾತಾಡುವ ಪ್ರಜಾಜನರಿಗೆ ಈ ಸವಲತ್ತು ಕೊಡುವದು ಅವಶ್ಯಕವಿದೆ.

ना. रा. ब. मा. ह. लिमये:—डॉ. बोगार यांनीं अन्नाचे बरोबरीचें स्थान कागदास दिलें आहे. त्यांचा हा विचार सुंदर आहे. ज्या वेळीं पोटांत भरपूर अन्न असेल त्या वेळींच वाचण्याचा विचार सुचेल. टाइम्स ऑफ इंडियामध्यें कागदाची किंमत अन्नापेक्षांहि अधिक आहे, अशासारखे विचार कांहीं correspondents नीं प्रदर्शित केले, त्याबद्दल मोठें अलंकारिक व मार्मिक विवेचन Leader मध्यें केलें आहे. पण सध्यांच्या परिस्थितींत जितका पैसा वांचवून अन्नाकडे देतां येईल तितका देणें जरूर आहे. डॉ. बोगार यांची सुचना मान्य करावयाची झटल्यास आमच्या बिकट परिस्थितींत कानडी टाइप खरेदिण्याकरितां चवदा-पंधराशें रुपये तरी लागतील. शिवाय निदान तीन कानडी कंपॉझिटर्स नेमावे लागतील. त्यांचा दरमहाचा खर्च २० रु. पगार धरल्यास त्याकरितां सालिना ७२० रु. खर्च येईल. कागद शाई मिळून १४००–२१०० रु. खर्च करावा लागेल. अशा कष्टाचे दिवसांत अशी आर्थिक जबाबदारी सरकारनें घेणें बरोबर होणार नाहीं. जरूर लागणारा कागद मिळण्याचीहि पंचाईत आहे.

हिंदुस्थान सरकारनें शे. ९० टक्के कागद आपण घेऊन फक्त १० टक्के कागद इतरांना देऊं असें जाहीर केलें आहे. हल्लींची परिस्थिती जेव्हां सुधारेल तेव्हां या सूचनेचा आम्ही अवश्य विचार करूं. इतकें आश्वासन आम्ही देण्यास तयार आहोत. यापेक्षां जास्त आम्ही कांहीं करतां येणार नाहीं तेव्हां ही कट-मोशन परत घेण्यांत यावी.

ना. म. फ. डबाली: -ಸರಕಾರತರ್ಫೆಯಿಂದಾ ಕೊಟ್ಟ ಖುಲಾಸೆ ಅಸಮಾಧಾನಕಾರಕವದೆ. ಎಲ್ಲ ಮಜಕೂರು ಮರಾಠಿ ಮತ್ತು ಇಂಗ್ರಜಿಯಲ್ಲಿ ಹೀಗೆ ಎರಡು ಭಾಷೆಯಲ್ಲಿ ಛಾಪಿಸುತಿದ್ದು ಫಕ್ತ ಕನ್ನಡದಲ್ಲಿ ಛಾಪಿಸಲಿಕ್ಕೆ ಕಾಗದದ ಟಂಚಾಯಿ ಅಥವಾ ಅಡಚಣೆ ಯಾಕೆ ಬರುವದು? ಆಯಾ ಜನರಿಗೆ ಮರಾಠಿ ಅಥವಾ ಇಂಗ್ರಜಿ ಬರುವದಿಲ್ಲಾ ಅವರಿಗೆ ಅವರ ಭಾಷಾಯಲ್ಲಿ ಮಜಕೂರು ತಿಳಿಯುವದು ಜರೂರ ಅದೆ."

प्रेसिडेंट:—नामदार सभासद आपापली सूचना परत घेणार आहेत काय?

ना. म. फ. डबाली:--माझी कपातसूचना सभागृहाच्या मतास टाकावी अशी विनंति आहे.

ನನ್ನ ಕಪಾತ ಸೂಚನೆ ಸಭಾಗ್ರಹರ ಮುಂದೆ ಇಡಬೇಕು ಅಂತೆ ನನ್ನ ವಿನಂತಿ ಅದೇ.

मे. प्रेसिडेंट:—दोघांहि नामदारांनीं एकांच खात्यावर एकांच उद्देशानें कपातीच्या सूचना दिलेल्या आहेत. ना. डबाली यांनीं मांडलेल्या सूचनेस ना. डॉ. बोगार यांनीं दुजोरा दिलेला आहे. तेव्हां ना. डबाली यांचीच कपातीची सूचना फक्त मतास टाकली असतां काम भागणार आहे. तरी सभागृहापुढें अशी सूचना आहे कीं "खातें नं. १६ स्टेशनरी खातें यांस दाखल असलेल्या रकमेमधून १०० कमी करण्यांत यावेत," व ह्या सूचनेवर ना. सभासदांनीं मतें द्यावयाची आहेत.

( मतें मोजून )

मे. प्रेसिडेंट:-सदर कपातीची सूचना बहुमतानें नामंजूर झाली असल्याचें जाहीर करतों.

ना. शा. रा. बेतमंगलकर:—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी ह्या सभागृहाला असें कळवितो कीं, खातें नंबर १७ – जमीनबाब याकरतां सन १३५२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ३०० ची जरूरी असल्यानें ते दाखल केलें आहेत.

( सदर खात्यावर कोणाचीहि कपातीची सूचना नसल्यानें वादविवाद झाला नाहीं. )

ना. शा. रा. बेटमंगलकर:—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी ह्या सभागृहाला असें कळवितो कीं खातें १८ – कायदा व न्यायखातें याकरितां सन १३५२ चे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम ५७५० ची जरूरी असलेनें तें दाखल केले आहेत.

ना. प्रेसिडेंट:—Motion before the House is: "खातें नंबर १–कायदा व न्यायखातें याकरितां सन १३५२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ५७५० ची जरूरी असलेनें ते दाखल केले आहेत."

ना. स. ग. फडके:—सन्मान्य अध्यक्ष, सभागृहापुढें मी अशी सूचना आणतो की—

"खातें नं. १८ पैकीं ९ ड - संस्थानच्या दाव्यांकरितां लागणारा खर्च यासदरीं दाखल असले रकमेमधून १०० रुपये कमी करणेंत यावेत."

ना. प्रेसिडेंट:—Motion before the House is :

"खातें नं. १८ पैकीं ९ ड संस्थानच्या दाव्याकरितां लागणारा खर्च या सदरीं दाखल असले रकमेमधून १०० रुपये कमी करणेंत यावेत."

ना. स. ग. फडके:—ही कपात-सूचना सुचविण्याचा हेतू हा आहे की, संस्थानतर्फेच्या कज्जांतून परहद्दींत माहिती देण्याकरितां वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवूं नये; पोस्टानें अगर इतर नोकर हें काम सहज करूं शकतील. हा प्रेस्टिजचा प्रश्न आहे. या कपातीच्या सूचनेनें मला एवढेंच सुचवावयाचें आहे कीं पुण्यास संस्थानचें कांहीं लिटिगेशन् चालूं आहे, व त्याकरितां या कज्जांतून माहिती देण्याकरितां सांगली संस्थानचे हायकोर्ट जज्ज नेहमीं जातात. मी अशा कज्जाची संख्या व किती खेपा झाल्या वगैरे डिटेल्स काढलीं नाहींत परंतु ज्यांनीं वरिष्ठ न्यायाधिकारी म्हणून सांगलीस काम करावयाचें त्यांनीं एखादे वकिलास माहिती देण्याकरितां म्हणून पुण्याच्या खेपा करावयाच्या हें संस्थानच्या इभ्रतीच्या दृष्टीनें बरें नव्हे. अशा कामीं खालसा जिल्ह्याप्रमाणें सॉलिसिटरसारखी हायकोर्ट रजिस्ट्रार यांच्या सारख्यांनीं वकिलांना माहिती दिल्यास कांहीं मोठी विपरीत गोष्ट घडेल असें नाहीं. जसें इभ्रतीच्या दृष्टीनें याकडे पाहावयाचें तसेंच खर्चाच्या दृष्टीनेंही दरबारनें याकडे पाहिलें पाहिजे. आपल्या निरनिराळ्या कोर्टांतून सरकारी दाव्यांत मुलकी अधिकारी यांना सरकारतर्फे माहिती देण्याकरितां जावें लागतें, परंतु अशा वेळीं चीफ रेव्हिन्यू ऑफिसर हें जातीनें न जातां शिरस्तेदार यांना पाठवून सर्व माहिती देतात. त्याचप्रमाणें या कामीं रजिस्ट्रार हायकोर्ट अगर अन्य अधिकारी यांनीं व्यवस्था करणें योग्य होईल. मुद्दा हा कीं आमच्या हायकोर्ट जज्जांनीं तेथें जातीनें जाऊं नये.

ना. वि. का. खाडिलकर:—ना. मूल्हर यांनीं आतां कपातीची सूचना आणली व ती आणतांना वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं माहिती देण्यास गेल्यास त्यामुळें संस्थानच्या इभ्रतीस कमी-पणा येतो असें सांगितलें. परंतु असा कमीपणा येईल असें वाटत नाहीं. वस्तुतः हायकोर्ट जज्ज हे हायकोर्ट जज्ज या नात्यानें तेथें जात नसून त्यांच्याकडे न्यायमंत्रि या नात्यानें जीं अन्यकामें आहेत त्यांत जरूर ती माहिती व सल्ला देण्याकरितां जाणें जरूर असतें. पुरातन

पासून पुण्यास सरकारची स्थावर इस्टेट आहे. त्यांतील कांहीं हक्कासंबंधी दावे चालू आहेत. अशा दाव्यांतील संस्थानतर्फेची जरूर ती माहिती संस्थानच्या कायदेपंडीतांनींच तेथें जाऊन देणें इष्ट असते. हुजूर पागा या नांवाची एक जागा पुण्यास आहे. त्यासंबंधी एक शिष्टमंडळ श्रीमंत सरकार स्वारीकडे आलें होतें. त्याबाबतींतील मुद्दे ठरविण्याचे कामीं शिरस्तेदारासारख्या एखाद्या मनुष्यानें जाणेंपेक्षां संस्थानचे हितानहित कायद्याचे दृष्टीनें पाहणेंसाठीं न्यायमंत्री यांनीच जाणें जरूर होतें. आतां अशा प्रसंगी त्यामुळें थोडासा खर्च जास्त होतो हें खरें, परंतु जरुरीमुळें तो करणेंखेरीज गत्यंतर नाहीं. जरूरीच्या प्रसंगींच फक्त ते तिकडे गेलेले असल्यानें त्याबाबतींत शक्य तितकी काटकसरहि त्यांनीं केलेली आहेच.

ना. स. ग. फडके:—सरकारतर्फे आलेलें उत्तर कांहीं समाधानकारक नाहीं. इस्टेटींतील कांहीं हक्कासंबंधीचे दावे चालू असल्याचे सांगणेंत आलें, परंतु माझ्या माहितीप्रमाणें खिडकीच्या इजमेंटबद्दल एक दावा चालू आहे. आणि अशा दाव्याकरितां हायकोर्ट जज्जासारख्या अधिकाऱ्याच्या तेराचौदा खेपा पुण्यास व्हाव्यात ही गोष्ट तितकीशी समाधानकारक नाहीं. या खेपेस मी हा प्रश्न अधिक धसास लावूं इच्छीत नाहीं; परंतु पुढील अधिवेशनापर्यंत या संबंधांत कांहीं सुधारणा झाली नाहीं तर मात्र मला पुन्हां कपातीची सूचना आणावी लागेल. एवढें सांगून मी माझी कपातीची सूचना मागें घेतो. तरी तशी परवानगी असावी.

The motion was, with the leave of the House, withdrawn.

ना. स. ग. फडके:—सन्मान्य अध्यक्षमहाराज, त्याच कायदा व न्याय खात्यावर माझी दुसरी एक कपातीची सूचना आहे, ती अशी "खातें नं. १८ यांतील दिवाणी दप्तरखाना या सदरीं दाखल असले रकमेमधून १०० रुपये कमी करणेंत यावेत."

मे. प्रेसिडेंट—Motion before the House is :

"खातें नं. १८ - कायदा व न्याय यांतील — दिवाणी दप्तरखाना, यासदरीं दाखल असले रकमेमधून १०० रुपये कमी करण्यांत यावेत."

ना. स. ग. फडके:—मिल्हिल् रेकॉर्ड एकदां बाहेर नेलें व पुन्हा आंत त्याच जागीं जादा खर्च करून परत आणलें अशा प्रकाराची पुनरवृत्ती होवूं नये या हेतूनें मी ही कपातीची सूचना मांडली आहे. प्रथमतः हें रेकॉर्ड बाहेर नेणेस नको होतें. ज्या जागीं हें रेकॉर्ड नेलें गेलें, ती जागाहि चांगली नसून अपुरी व अयोग्य होती, हें माहित असूनही पूर्ण विचार न करतां रेकॉर्ड तिकडे नेलें गेलें. आणि आतां सार्वजनिक खळबळीचें (Public agitationचें) कारण दाखवून तें पुन्हा पूर्वीच्या जागीं आणलें जात आहे. पूर्वीची रेकॉर्डाची जागा जवळ जवळ ११०० रु. खर्च करून म्यूझिअम् ठेविण्याच्या उपयोगी म्हणजे सर्व भिंतीस सीलिंग

करून पौसुद्धां तयार केलें. शाहिस्त या बागेंतील शिड्या नवीन बागेंत बसत नाहीं म्हणून बनवाव्या गेल्या. आतां त्यांच पुन्हां पक्या बांधून या बागेंतच उभ्या केल्या गेल्या आहेत. अद्यापतरी त्या आहेत त्या स्थितींत पुनः हलतील की नाहीं, याची देखील आम्हांस शंका वाटते. पूर्वी जर अशा बाबतींत बाहेरच्या जनतेचा सल्ला घेतला गेला असता तर हे सर्व झालेले पैसे वांचले असते. एकंदरीत संस्थानची प्रगति कशी चालू आहे, याचें हें एक उदाहरण म्हणजे नमुनेदार द्योतक आहे. कोल्हापूर येथील रंकाळ्याच्या नंदीप्रमाणें एक गहूं पुढें व एक तीळ मागें अशा म्हणीप्रमाणें आमची येथील प्रगति होत आहे. Sir, I move.

प्रेसिडेंट:—The Motion before the House is.

"खातें नं. १८ यांतील ठिकाणी दप्तरखाना सदरीं दाखल असलेल रकमेंतून १०० रु. कमी करणेंत यावेत.

ना. डॉ. अ. गो. जोशी:—याबाबतींत थोडासा खुलासा करणें जरूर आहे. म्यूझिअमकरितां १९१९ इसवीचे अखेरीस पूर्वीची सिव्हिल रेकॉर्डची जागा मोकळी करून देण्याचें ठरलें. १९४० इ. च्या जूनपर्यंत हें रेकॉर्ड डिस्ट्रिक्ट कोर्टच्या नजिकच्या बागेंत नेलें. मला जी माहिती आहे, त्यावरून हें मी आपणास सांगतो. कारण त्यावेळीं रेकॉर्ड हलविण्याचा मूळ हुकूम झाला त्यावेळीं मी येथें नव्हतो. म्यूझिअम् कोठें ठेवावें याचा विचार दरबारपुढें पुष्कळ दिवसपर्यंत होता व त्याबद्दल तज्ज्ञांचें मत घेऊन तें ज्या ठिकाणीं रेकॉर्ड पूर्वी होतें तेथें ठेवावें असें ठरलें व म्हणूनच रेकॉर्ड बाहेर नेलें. रेकॉर्ड नेते वेळेस सर्व रेकॉर्ड तेथें मावेल अशी कल्पना असल्यानें व रेकॉर्ड परत आणावें लागणार नाहीं असें त्यावेळचे परिस्थितीवरून वाटल्यानें पूर्वीच्या रेकॉर्डच्या जागेवर म्यूझिअम् ठेवण्याचे दृष्टीनें कांहीं खर्च केला. परंतु पुढें नवीन नेलेल्या बागेंत रेकॉर्ड मावत नाहीं असें अनुभवास येऊं लागलें, व त्याकरितां एक नवीन इमारत बांधावी अशीहि कल्पना निघाली. १९४२-४३ चें बजेट झालें त्यावेळीं या नवीन इमारतीकरितां किती खर्च येईल याचें एस्टिमेट झालें. त्या एस्टिमेटप्रमाणें ७००० रु. खर्च करून ती इमारत करावी अशी त्यावेळची परिस्थिति नव्हती. सांगण्याचा मुख्य हेतु हा की ना. सुब्हेदार यांना वाटतें त्याप्रमाणें कोणतेंही विशिष्ट धोरण या सरकारी रेकॉर्ड हलविण्यांत नव्हतें; फक्त रेकॉर्ड डिस्ट्रिक्ट जज्ज ऑफिसजवळ न्यावें, एवढाच हेतु होता. परंतु हल्लीच्या युद्धजन्य परिस्थितीमुळें रेकॉर्ड जाळणें, कोर्टावर हल्ले करणें, अशासारखे प्रयत्न अलिकडे ब्रिटिश डिस्ट्रिक्टमध्यें सुरू आहेत. त्याच्या लाटा कांहीं अंशानें संस्थानात पोंचत आहेत. अशावेळीं कांहीं गृहस्थांनीं हल्लीच्या ठिकाणाहून रेकॉर्ड काढावें अशी सूचना केली, व त्यास अनुसरूनच तें रेकॉर्ड परत पूर्वीच्या

भारी आणावें लागलें. आतां पूर्वीच्या इमारतीस लाकडी पॅनल लावण्यामध्यें थोडा खर्च झालेला आहे, तथापि रेकॉर्ड हें चांगल्या स्थितींत राहिल्याशिवाय दाखले मिळणार नाहींत, व आतां रेकॉर्डची व्यवस्था उत्तम झाली आहे. म्हणून झाली ही गोष्ट कांहीं वाईट उद्देशानें झालेली नसून केवळ परिस्थितीमुळें असे बदल करावे लागले आहेत. एवढें सांगितल्यानें आपलें सर्वांचें समाधान होईल असें वाटतें.

ना. स. ग. फडके:—सरकारतर्फे करणेंत आलेला खुलासा मोठासा समाधानकारक आहे असें नाहीं. ही गोष्ट अधिक धसास लावूनहि रेकॉर्ड हलविण्याच्या बाबतींत निष्कारण खर्च झालेले ३००० रु. परत येणार आहेत अशांतलाहि भाग नसल्यानें मी माझी कपातीची सूचना परत घेतो; तरी तशी परवानगी असावी.

The motion was, with the leave of the House, withdrawn.

ना. रा. ग. करंदीकर:—"खातें नं. १८ यांतील ७ (इ)—फौजदारी दाव्यांत देण्याचा साक्षीभत्ता—या सदरीं दाखल असल्या रकमेमधून १०० रु. कमी करण्यांत यावेत." अशी माझी कपातीची सूचना आहे.

फौजदारी दाव्यांतील साक्षीदारांना दिला जाणारा भत्ता नियमितपणें व वेळेवर मिळत नाहीं; पांचसहा हेलपाटे त्यांनीं घालावेत व तक्रार करावी म्हणजे मग त्यांना साक्षीभत्ता दिला जातो. तेव्हां असें न होतां याबाबतींत सुधारणा व्हावी या हेतूनें मी ही कपातीची सूचना आणली आहे.

ना. वि. का. खाडिलकर:—ज्या हेतूनें ही कपातीची सूचना आणली आहे त्यासंबंधीं सरकार अवश्य विचार करील.

ना. रा. ग. करंदीकर:—मी माझी कपातीची सूचना परत घेतो तरी तशी परवानगी असावी.

The motion was, with the leave of the House, withdrawn.

ना. शा. रा. बेतमंगलकर:—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी ह्या सभागृहाला असें कळवितो कीं, खातें नंबर १९—तुरुंग—याकरतां सन १३५२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये १६८१ ची जरुरी असलेनें ते दाखल आहेत.

प्रेसिडेंट:—The matter before the House is:

"खातें नंबर १९-तुरुंग-याकरतां सन १३५२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये १६८१ ची जरुरी असलेनें ते दाखल केले आहेत."

ना. म. ह. गोडबोले:—सन्मान्य अध्यक्ष, "खातें नं. १९—तुरुंग यांतील १ (ड) १ सामान खरेदी दुरुस्ती या सदरीं दाखल असेले रक्कमेमधून १०० रुपये कमी करण्यांत यावेत" अशी माझी कपातीची सूचना आहे.

ना. म. ह. गोडबोले:—सन्मान्य अध्यक्षसाहेब, हल्लीं अखिल भरतखंडभर ज्या कांहीं चळवळी चालू आहेत, त्यांचा कांहींसा परिणाम संस्थानवर होत आहे. शहापूरचीं कांहीं तरुण मुलें व विद्यार्थी यांचा अशा चळवळींशीं संबंध असल्याचे संशयावरून सांगली सेंट्रल जेलमध्यें त्यांना अटकेंत ठेविलें आहेत. त्यांना अंडरट्रायल कैदी म्हणून तेथें ठेविलें आहे कां डिटेन्यू म्हणून ठेविलें आहे याबद्दल संशय आहे. सरकारजवळ पुरावा असेल तर त्यांनीं खटले करून योग्य न्यायासनापुढें त्यांची चौकशी करून घ्यावी, व तो मार्ग जास्त प्रशस्त आहे. जर ते राजबंदी असतील तर तशी त्यांची व्यवस्था ठेवावी. ब्रिटिशमध्यें अशा बंदींना इतर कैद्यांपेक्षां अधिक सोई व चांगली वागणूक मिळते, तशीच व्यवस्था व सोई येथें करून देण्यांत याव्यात. त्यांना नातलगांच्या भेटी होऊं देणें व त्यांना पत्रव्यवहाराला मुभा ठेविणें हें उपयुक्त आहे. या विषयाची विशेष माहिती नसतांना मला बोलावें लागत आहे. ज्या कांहीं हकीगती कानावर येतात त्या कितपत सत्यासत्य आहेत हें समजत नसल्यामुळें सरकारविरुद्ध विनाकारण गैरसमज होणेचा संभव असतो; तरी याबाबतींत जरूर तो खुलासा करून घेण्याकरितांच व त्यांची सुटका व्हावी म्हणून मी ही सूचना मांडली आहे.

ना. शा. रा. बेतमंगलकर:—I rise to a point of Order. डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टप्रमाणें ह्या कैद्यांच्या सुटकेची मागणी नामदारांना या सभागृहांत करतां येणार नाहीं. कारण या विषयाची चर्चा असेंब्लीच्या कक्षेंत येत नाहीं.

ना म. ह. गोडबोले:—आमची चर्चा ॲडमिनिस्ट्रेटिव्ह व्ह्यू पॉइंटने आहे. बंद्यांच्या सुटकेची मागणी करणें नियमबाह्य होत असल्यानें मी ती बाब सोडतो.

प्रेसिडेंट:—नामदारांनीं फक्त ॲडमिनिस्ट्रेशनबाबत चर्चा करावी; बंद्यांच्या सुटकेबाबत त्यांना बोलता येणार नाहीं.

ना. ना. र. कुलकर्णी:—सन्मान्य अध्यक्ष, ह्याच खात्यावर मीहि एक कपातीची सूचना दिलेली आहे. शहापुराहून लहान लहान मुलें पकडून आणलीं आहेत. त्यांना कशाकरितां पकडलें आहे कांहींच समजलें नाहीं. जेलमध्यें त्यांच्या भेटी घेण्यासही परवानगी मिळत नाहीं असें समजलें आहे. शिवाय त्यांपैकीं गोपाळराव नांवाच्या एका वृद्ध गृहस्थास पराो मारहाण

केली असेही कळतें. आम्ही त्यांच्या भेटीस गेल्यावेळी त्या कांही तक्रारी आमच्या कानांवर आल्या आहेत. तरी ह्या सर्व बंधाना राजबंदी समजणेंत येऊन त्याप्रमाणें त्यांना तुरुंगांत वागविलें जावें व राजबंदांच्या सर्व सवलती त्यांना मिळाव्यात.

ना. सौ. राधाबाई सराफ:—अध्यक्ष महाराज, ना. महादेवराव मोडबोले व ना. नारायणराव कुलकर्णी यांनी जी कट्मोशन आणलेली आहे त्याला दुजोरा देण्याकरितां मी उभी राहिले आहे. शहापूरहून जी दहा मंडळी सांगलीच्या सेंट्रल जेलमध्यें आणून ठेविली आहेत त्यांना आज सकाळीं आम्ही सर्व शहापूरचे सभासद व कवठ्याचे नवीनच नियुक्त झालेले सभासद असे भेटावयास गेलो होतो, व त्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. त्यांपैकीं कांहीं तक्रारी तर इतक्या रास्त व योग्य होत्या कीं, त्या शक्यतेवढ्या लौकर दुर केल्या पाहिजेत. त्यांचे मुख्य म्हणणें असें होतें कीं, आम्ही राजबंदी असल्याकारणानें खालसा मुलुखांतील तुरुंगांत जी वर्तमानपत्रें वाचावयास मिळतात तीं इकडे मिळावीत; सर्व राजबंदांना एकाच ठिकाणी ठेवावें; अन्न चांगलें द्यावें; खालसा हद्दीतील तुरुंगांतील 'बी' क्लासबंद्याप्रमाणें सकाळीं व दोनप्रहरीं चहा वगैरे द्यावा; चपाती व तूर द्यावें; हल्लीं तांदूळ देतात तो अगदींच वाईट असतो; महिन्यांतून एकदां तरी घरच्या मंडळींना भेटण्याची परवानगी द्यावी; वैद्यकीय मदत चांगली योग्य वेळच्यावेळीं मिळावी. यांपैकीं त्यांची कोणतीहि मागणी अयोग्य आहे असें मला तरी वाटत नाहीं. मला या सभागृहापुढें एकच मुद्दा मांडावयाचा आहे व तो सरकारच्या कानांवर घालावयाचा आहे तो एवढाच कीं, या मंडळींपैकीं रा. गोपाळराव शिवकामत या नांवाचे एक गृहस्थ आहेत. त्यांचें वय अजमासें सत्तर वर्षांचें आहे. त्या गृहस्थांचा गुन्हा काय तर ज्या घरीं गंधक व कांहीं मिरच सांपडले त्या घरचे ते मालक आहेत. परंतु खरी स्थिती अशी आहे कीं, ते नुसते नांवाचे मालक असून घरचा सर्व व्यवहार त्यांचीं मुलेंच पहात असतात. तेव्हां त्यांना सोडून देण्याची सरकारनें तजवीज करावी. सांगावयास दुःख व लाज वाटतें कीं, त्यांच्या ६५-६६ वर्षें वयाच्या सौभाग्यवतींनीं आपल्या पतिदेवाला भेटावयाची (व तीहि पंधरा मिनिटें मिळाली तरी चालेल) परवानगी मागितली असतां त्या माउलीला स्पष्ट नकार देण्यांत आला. यावरून आमचें सरकार किती निष्ठुरपणानें वागतें हें दिसून येईल. खालसामध्यें अशा भेटी मिळूं शकतात. बेळगांव जेलमध्यें तरी गांठीभेटी होतात हें मला पक्कें माहित आहे. तरी या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून सर्वांना सोडावें अगर चांगली ट्रीटमेंट द्यावी. इतकें बोलून मी या कपातीच्या सूचनेस पूर्ण दुजोरा देते.

ना. शा. गो. अनगोळकर:—

मे. अध्यक्ष महाराज, ना. गोडबोले यांनी जी कपात सुचविली आहे त्यास मी अनुमोदन देत आहे. भारत संरक्षण कायद्याखालीं जी मुलें अटकेंत आहेत त्यांनीं ता. २-९-४३ रोजी अर्ज देऊन तक्रारी कळविल्याचें समजतें. वास्तविक त्यांचे तक्रारीचा खुलासा आज-पर्यंत न करणें हे अधिकारीवर्गांना न शोभणारें आहे. त्यांच्या लहान वयाकडे पाहून व त्यांचे शिक्षणाकडे लक्ष देऊन त्यांना सोडून देणें योग्य होईल. कारण त्यांना स्थानबद्ध केल्यानंतर यापुढें गुन्हे होणार नाहीत अशी समजूत अधिकारीवर्गाची होऊन त्यांना उत्तर देणेंत आलें असावें असें दिसतें. त्यांना रोजचें खाणें चांगलें मिळत नाहीं. राजकीय कैद्यांना ब्रिटिशमध्ये ज्या-प्रमाणें अन्न दिलें जातें त्याप्रमाणें देणें योग्य आहे व वर्तमानपत्रें देणें जरूर आहे. त्यांना असेंच अजुनी किती दिवस डांबून ठेवणार तें जाहीर करावें. कांहीजणांना खानावळीचें जेवण मिळणेची त्यांचे मालकाकडून सोय करणेस परवानगी दिली आहे. आम्ही आज शहापूरचे व इतर ना. मंडळी तुरुंगास भेट देऊन व्यवस्था पाहिली. स्वयंपाकाच्या भांड्यांना कल्हई नाहीं. तुरुं-गांतील आजारी माणसांना डॉक्टर तपासुन गेले म्हणजे लगेच औषध मिळत नाहीं; दुसरें दिवशीं औषध मिळतें व दिवाबत्तीची सोय बरोबर नाहीं. तरी जरूर सर्व सुधारणा व्हाव्यात असें आमचें म्हणणें आहे.

मे. शा. रा. बैतमंगलकर:—ऑर्डिनन्सप्रमाणें स्थानबद्ध म्हणून हे कैदी तुरुंगांत आहेत. त्यांना मिळणाऱ्या सवलती सरकारी नियमाप्रमाणें योग्य प्रकारें मिळत आहेत. ज्यांना घरांतून अन्न देण्याची इच्छा असेल त्यांना तसें अन्न घेतां येतें, व तसा फायदा कांहीं लोकांनी घेतला आहे. नुकतीच तिमाही कमिटीची बैठक झालेवेळीं मी जेलमध्यें गेलो होतो. माझेबरोबर डॉ. देसाई व इतरही बिनसरकारी अधिकारी होते. आम्ही त्यांच्या कांहीं तक्रारी आहेत काय असें विचारिलें असतांना त्यांनीं कांहीं तक्रारी नसल्याचें सांगितलें., हें सर्वांना माहित आहे. वर्तमानपत्रांची जी मागणी आहे, त्याबद्दल योग्य तो विचार होईल. भेटीबद्दलसुद्धां नियमाप्रमाणें वरचेवर भेटी देतां येत नाहीत. तथापि आजच सकाळीं मी आपल्यापैकीं कांहीं नामदार सभासदांना भेटीची परवानगी दिलेली होती. मारल्याबद्दलची हकीकत खोटी आहे.

ना. म. ह. गोडबोले:—ही कपात सुचना मांडण्याचा माझा बराचसा हेतू साध्य झालेला आहे. भेटीस परवानगी मिळत नाहीं याबद्दल बरींच गाऱ्हाणीं आलेलीं आहेत. भेट देण्यामध्यें better discretion वापरावें. नवऱ्यास भेटण्यास बायकोनें परवानगी मागितली तर प्रथम द्यावी. आई, बाप, बहीण, भाऊ व इतर स्नेही असा क्रम ठेवावा. सहानुभूतीनें व उदारतेनें या बाबतींतील प्रश्नांचा दरबार विचार करील अशी आशा करून मी माझी कपात सूचना परत घेतो. परवानगी मिळावी.

The motion was, with the leave of the House, withdrawn.

ना. ना. र. कुळकर्णी:—मीहि माझी कपातीची सूचना परत घेतो तशी परवानगी असावी.

The motion was, with the leave of the House, withdrawn.

ना. शा. रा. बेतमंगलकर:—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी या सभागृहाला असें कळवितो की, खातें नंबर २० पोलिस याकरितां सन १३९२ फसलीच्या पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ८९८७ ची जरुरी असल्यानें ते दाखल केले आहेत.

ना. प्रेसिडेंट:—" खातें नंबर २० पोलिस याकरतां सन १३९२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ८९८७ ची जरुरी असल्यानें ते दाखल केले आहेत."

ना. आ. आ. मुळे:—सन्मान्य. अध्यक्ष, " खातें नंबर २०—पोलिस—या खात्यास दाखल असले रकमेमधून १०० रु. कमी करणेंत यावेत. "

ना. प्रेसिडेंट:—The motion before the House is :—

" खातें नं. २० - पोलीस - या खात्यास दाखल असले रकमेमधून १०० रुपये कमी करणेंत यावेत. "

ना. आ. आ. मुळे:—.

खेड्यांचें संरक्षण दरबारकडून नीट रीतीनें होत नाहीं अशी आमची तक्रार आहे. खेड्यांतून शस्त्रांचा पुरवठा नसल्यामुळें जनतेची कुचंबणा होते., व त्याचा फायदा दरोडेखोर घेतात. ५०—५०,१००-२००-२०० हत्यारांनिशीं लोक दरोडे घालतात. याबद्दल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे अर्ज करून एखादा रायफल पोलीस, निदान पोलीस स्टेशन असेल त्या गांवीं तरी मिळावा अशी मागणी केली असतां तसें पोलीस देतां देणें शक्य नाहीं असें सांगण्यांत येतें. मी सदर बाबतींत माहिती आणविली आहे, त्यांत बारा बोअरगन्स १५० रुपयांत मिळतात असें अळतें. तेव्हां त्या विकत आणून त्यांचा पुरवठा करावा अशी माझी सूचना आहे. याप्रमाणें व्यवस्था न झाल्यास हत्यारी व विनहत्यारी यांचेमध्यें युद्ध होतें असल्याची स्थिती होते. नजीकच्या कवलापूर गांवावर चार वेळ दरोडा आला असतां येथील लोकांनीं निःशस्त्र प्रतिकार करून तो परतवला आहे. एकदां माझे पहाणेंत असें आलें कीं, दरोडेखोरांनीं फेकलेल्या गोफणीच्या दगडांनीं एका इसमाजवळच्या कुऱ्हाडीचें टोक तुटून गेलें. अशीकडून लांबून असा प्रकारें गोफणीनें दगड फेकले जात असतांना स्वस्थ बसण्याखेरीज कांहींहि करतां आलें नाही. अशा वेळीं बंदुका असत्या तर असा प्रसंग आला नसता. शेजारच्या मळ्यांतील धान्य चोरटे लोक कापून नेत आहेत तें राखण्याकरितां शेतकऱ्यांना शेतांत वस्ती पडावें लागतें आहे.. अशा वेळीं त्यांना एखादी बंदूक दिली तर बराच उपयोग होईल. Sir, I move.

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णी ( पो. सु ):—ना. मुळे यांनीं आतांच जी सूचना मांडली आहे त्याबद्दल मी थोडक्यांत असा खुलासा करतो कीं प्रत्येक खेड्यांतून पोलीस देणें शक्य नसतें. एका पोलिस पोस्टाच्या हद्दींत सातआठ गांवें असतात. प्रत्येक खेड्यांतून व्हिलेज गार्ड्स् नेमण्याची व्यवस्था झालेली असून त्यांना प्रत्येकांना भाला पुरविणेची व्यवस्था झालेली आहे. आतांपावेतो एकंदर तीनशेहे भाले दिले गेले आहेत. मंगळवेढ्याला सोळा भाले देणेंत आले आहेत. हत्यारी पोलीस वाढविण्यांत आले आहेत. आजवरची लोकप्रतिनिधींची अशी मागणी आहे कीं, "आम्हांस विश्वासांत घ्या" तिचाच पुनरुच्चार करून मी असें म्हणतो कीं, "पोलिसांना विश्वासांत घ्या व त्यांचेशी सहकार्य करा." खेड्यांतील दंगादरोड्याची माहिती आमचेकडे येतांच आम्ही कित्येक वेळां त्या त्या ठिकाणीं गेलो आहे. इतरांचे मानानें आम्ही फार सुरक्षित आहों. पोलिसांना विश्वासांत घ्या अशी मागणी मी पुन्हां करतो.

ना. आ. आ. मुळे:--खेडेगावांतून जीं पोलिसस्टेशन्स असतात त्यांतील पोलिसांना बंदुका दिल्या जाव्यात असें मी सुचविलें होतें, त्याच्यासंबंधांत कांहींच खुलासा करणेंत आलेला नाहीं. दरोडेखोर जे गांवांत शिरतात ते पोलिस स्टेशनजवळूनच शिरतात असा अनुभव आहे! अशा वेळीं एखादी तरी बंदूक त्यांनीं जवळ बाळगली तर दरोडेखोरांना तेवढीच दहशत बसेल. तरी अशा बंदुका देण्यास कां अडचण यावी समजत नाहीं! पोलिसांस विश्वासांत घेण्यास आम्ही तयार आहों. दरोडेखोरांकडून गोफणींनें दगडांचा वर्षाव होवूं लागल्यास बंदुकीसारखा भाल्याचा उपयोग होत नाहीं. लांब पल्ल्यावर असल्यास बंदुकीचाच उपयोग जास्त होतो. तेव्हां त्या दृष्टीनें आश्वासन मिळाल्यास बरें होईल.

ना. रा. सा. रा. ना. कुलकर्णी:—ज्या पोलिस स्टेशनवर आर्म्ड पोलिस असतो तेथें त्या पोलिसजवळ बंदूक असतेच. आडहत्यारी असल्यास मात्र त्याचेजवळ बंदूक असत नाहीं. शिवाय नामदार सभासद म्हणतात त्या बंदुका, माझे माहितीप्रमाणें सध्यां मिळत नाहींत.

ना. आ. आ. मुळे:—तशा बंदुका मिळतात अशी माझी माहिती आहे.

ना. रा. सा रा. ना. कुलकर्णी:—माझी माहिती त्याचे उलट आहे.

ना. म. ह. गोडबोले:—एखाद्यानें तशी बंदूक आणल्यास त्यास लायसेन्स देण्याची तजवीज होईल काय?

ना. सा. रा. रा. ना. कुलकर्णी:-तशी बंदूक आणल्यास लायसेन्स देण्याची तजवीज होईल.

ना. आ. आ. मुळे:—हें आश्वासन देणेंत आलें असल्यानें मी माझी कपातीची सूचना परत घेतो. तरी परवानगी असावी.

The motion was, with the leave of the House, withdrawn.

ना. मिनिस्टर:—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी या सभागृहाला असें कळवितो की, खातें नंबर २४ - शिक्षणखातें याकरतां सन १३५२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये २११७ ची जरूरी असल्यानें ते दाखल केले आहेत. तरी सभागृहानें सदर रक्कम मंजूर करावी.

प्रेसिडेंट:— The motion before the House is:-

"खातें नंबर २४ - शिक्षणखातें याकरतां सन १३५२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये २११७ ची जरूरी असल्यानें ते दाखल केले आहेत. तरी सभागृहानें सदर रक्कम मंजूर करावी."

ना. रा. ग. करंदीकर:—या खात्यावर मी एक कपातीची सूचना दिली आहे; परंतु सदर खात्यांतील जे गैरव्यवस्थित प्रकार होते त्यांत सुधारणा होत आहे असें समजून आल्यानें मी माझी कपातीची सूचना मांडूं इच्छित नाही.

ना प्रेसिडेंट:—ठीक आहे.

ना. म. फ. हवाली:—ಶಾಲಾವಯಸ್ಕರ ಜನರು ಧಾರವಾಡ ವಗೈರೆ ಕಡೆಗೆ ಟ್ರೇನಿಂಗ ತೆಗೆದು-ಕೊಳ್ಳುವದಕ್ಕಾಗಿ ಹೋಗುತ್ತಾರೆ. ಅವರಿಗೆ ಅಲಾಉನ್ಸ ಕೊಡುವದಕ್ಕಾಗಿ ಇದರಲ್ಲಿಯ ೮೦೦ ರೂ. ಕಡಿಮೆ ಮಾಡಬೇಕು ಎಂಬಾ ಸೂಚನೆ ಮಾಡಿ ನಾನು ನನ್ನ ಕಪಾತಿಯ ಸೂಚನೆ ಪರತ ತೆಗೆದು-ಕೊಳ್ಳುತ್ತೇನೆ.

ना. डॉ. बी. ए. बेगार:—मला देखील माझी कपातीची सूचना मांडणेची नाही.

प्रेसिडेंट:—ठीक आहे. खातें नं. २४ खास रक्कम रुपये २११७ ची करणेंत आलेली मागणी सभागृहानें मंजूर केली आहे असें मी जाहीर करतो.

ना. मिनिस्टर:—हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचे आज्ञेवरून मी या सभागृहाला असें कळवितो की खातें नं. २६ —दवाखाना— याकरितां सन १३५२ चे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ३५६६ ची जरूरी असल्यानें ते दाखल केले आहेत. तरी सभागृहानें सदर रक्कम मंजूर करावी.

ना. प्रेसिडेंट:— The motion before the House is :-

"खातें नं. २६ - दवाखाना- याकरितां सन १३५२ फसलीचे पुरवणी अंदाजपत्रकांत रक्कम रुपये ३५६६ ची जरूरी असल्यानें ते दाखल केले आहेत. तरी सभागृहानें सदर रक्कम मंजूर करावी."

ना. स. ग. फडके:—सदर खात्यावर मी कपातीच्या सूचना दिल्या आहेत; परंतु दवाखान्याकडील फीचें घोडधूल दुरुस्त होऊन प्रसिद्ध करणेंत आलें असल्यानें मी माझी कपात-सूचना मांडू इच्छित नाहीं.

ना. सौ. इंदिराबाई साब्ये:--सन्मान्य अध्यक्ष महाराज, " खातें नं. २६ ड - सूतिकागृह या सदरीं दाखल असले रकमेमधून १०० रुपये कमी करण्यांत यावेत. " अशी माझी कपातीची सूचना आहे.

ना. प्रेसिडेंट:—The Motion before the House is:-

" खातें नं. २६ ड - सूतिकागृह - या सदरीं दाखल असले रकमेमधून १०० रुपये कमी करण्यांत यावेत. "

सूतिकागृहावर जबाबदार व शस्त्रक्रियानिपुण लेडी-डॉक्टर नसल्यानें या सूतिकागृहाची व्यवस्था ठीक नाहीं व म्हणून या खात्यावर होत असलेल्या खर्चांतून १० रु. कमी करावेत.

मला सांगण्यास दुःख वाटतें कीं, दरबारनें स्थापन केलेल्या या उपयुक्त संस्थेवर योग्य स्त्री-अधिकारी एम्. बी. बी. एस्. अगर तत्सम शिक्षण घेतलेली लेडी-डॉक्टर नेमलेली नाहीं. संपूर्ण शिक्षण घेतलेल्या अनुभवी नर्सेसुहि नाहींत, व या कारणानें या सूतिकागृहाविषयीं दिवसें-दिवस लोकमत कलुषित होऊं लागलें आहे. गांवांतील डॉक्टरसुद्धां बाळंतपणासाठीं इकडे केसिस् पाठविण्यास थोडेफार कचरतात. बाळंतपणासाठीं गेलेल्या स्त्रियांना योग्य ती सहानुभूतीची ट्रीटमेंट दिली जात नाहीं. कोणाच्या नजरेस या गोष्टी आणाव्यात तर वर अधिकारीच नाहींत. एक दोन वर्षें ट्रेनिंग घेतलेल्या एक दोन नर्सिस् आहेत. त्यांना दवाखान्याचें कंपौंडांत राहण्यास क्वॉर्टर्स नाहींत. घालण्यास युनिफॉर्म नाहींत. धोबी अलौंस नाहीं. बाळंतिणीचे कपडे धुण्यास पुरेसा साबण मिळवून देण्यासाठीं मला खटपट करावी लागली. कपडे वाळत घालण्यास जागा नसल्यामुळें पुढील व्हरांड्याचे कठड्यावर हे घाणेरडे कपडे वाळत घातले जात असतात. चादरी चोरीला गेलेल्या, स्टोव्ह नादुरुस्त, टाकी फुटलेली — अशी ही सूतिकागृहांतील व्यवस्था ! लेडी-डॉक्टर चांगली नेमण्याबाबत कसोशीनें प्रयत्नच केले गेले नाहींत. ९० रु. पगारावर लेडी-डॉक्टरसाठीं अर्ज फक्त एकदांच जाहीरांत देऊन मागविले होते. आज तुम्हांला या पगारावर कधींच चांगली लेडी डॉक्टर मिळणार नाहीं. निदान १५०-२०० रु. पगार तरी देण्याचें धाडस करा व चांगली अनुभवी व निष्णात लेडी डॉक्टर नेमून तिचे ताब्यांत ही उपयुक्त संस्था देऊन स्त्रीवर्गाला सोसाव्या लागणाऱ्या नैसर्गिक यातना हलक्या करण्याचा प्रामाणिक प्रयत्न

करा. ज्या सप्लिमेंटरी बजेटांत नुसत्या भत्यापायी २१०००रुपये उडविण्यांत येतात त्या सांगली सारख्या प्रगमनशील ह्मणविणाऱ्या संस्थानचे बजेटांत तुह्मांस ३०००-४००० रुपये सांपडूं नयेत ही नामुष्कीची गोष्ट आहे. आमचे मित्र नामदार मिनिस्टरसाहेबांनीं चिकाटीनें ही गोष्ट घडवून आणली पाहिजे. संस्थानांत सुरुं करून दिलेल्या संस्था आज रडत कढत कशातरी बेवारशी मुलासारख्या चालल्या आहेत व नवीन नवीन विकास मंडळें स्थापन करण्यासाठीं मोठमोठ्या शद्बांचे अधिकारी टेबऱ्यांत येऊन बसूं लागले आहेत. आधीं जन्माला घातलेल्या बालकाचा ( या सूतिकागृहाचा ) विकास करा व मग इतर विकासांच्या गोष्टी बोला नाहीं तर या संस्थेला कुऱ्हाड टोका व मोकळे व्हा! मॅटर्निटी होम ह्मणजे स्त्रियांना बाळंत होण्यासाठीं आडोशाची जागा अगर धर्मशाळा-ही कल्पना आतां राहिली नाहीं. ४००८० वस्तीचें शहर झालें आहे व अशा शहरांत ही एक नमुनेदार संस्था कारणे हें दरबारचें कर्तव्य आहे. ही स्त्रीसमाजाची नड भागवून त्याचा दुवा संपादन करावा परमेश्वरकृपेनें श्री. सौ. युवराज्ञी महाराजांना पुत्ररत्न झाल्याचा हर्ष सर्व जनतेला झाला आहे. अशा आनंदाचे प्रसंगीं तरी या स्त्रियांच्या संस्थेला सढळ मदत देऊन कार्यक्षम करा अशी आमची श्रीमंत हुजूरना कळकळीची प्रार्थना आहे.

ना. डॉ. वा. ना. देसाई:—मीहि याखात्यावर एक कपात सूचना दिली आहे. स्टेट हॉस्पिटलमध्यें लेडीडॉक्टर नेमणेंसंबंधीची माझी सूचना आतां कंठाळी स्वरूपाची झाली आहे. ह्या बाबतींत दरबारच्या काय अडचणी आहेत तें तरी कळूंद्या! मी प्रत्येक वर्षी ही सूचना असेंब्लीमध्यें कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत मांडली आहे. ही संस्थाच अशी आहे कीं ती लेडीडॉक्टरकडून चालविली गेली पाहिजे. त्यांचेच हें लेजिटिमेट फील्ड आहे. पन्नास रुपयांवर लेडीडॉक्टर मिळणार नाहीं व मिळाली नाहीं अशी एक अडचण दरबारकडून सांगणेंत येते. परंतु हा पगार फार थोडा आहे. एखादी एल्. सी. पी. एस्. लेडीडॉक्टर आणल्यास सुमारें १०० रुपये व एखादी एम्. बी. बी. एस्. लेडीडॉक्टर नेमल्यास सुमारें १०० ते १५० पर्यंत पगार द्यावा लागेल. संस्थानांतून इतर ठिकाणी नेमणुका होण्यास पैशाची अडचण येत नाहीं, मग ह्या संस्थेपुरताच हा आर्थिक अडचणीचा प्रश्न कां ? निदान एवढ्यापुरता तरी हा प्रश्न मुळींच राहूं नये. ह्या संस्थेचा फंड शिल्लक असून त्याचें दरसाल सतरासेंहे रुपये व्याज येत आहे. त्याखेरीज फीचें उत्पन्न पांच हजार रुपये दरसालचें तें निराळेंच! ह्या उत्पन्नांतून एखादी क्वॉलिफाइड लेडीडॉक्टर तेथें नेमणे अशक्य आहे हें ह्मणणें योग्य नाहीं.

ना. डॉ. बी. ए. बोगार:—ह्या कपात सूचनेला माझा दुजोरा आहे.

ना. मिनिस्टर:—ना. सौ. साठ्ये यांनीं जें चित्र रंगविलें आहे तें इतकें बरोबर नाहीं. त्यांना इतका उव्देग कां आला आहे कळत नाहीं. मॅटर्निटी होमला कुलूप लावण्यापर्यंत त्यांनीं मजल नेऊन ठेविली. अलीकडे दरबारतर्फे जी हॉस्पिटल् अॅड्व्हायजरी कमिटी नेमिली आहे त्यावर सरकारतर्फे जे मेंबर्स नॉमिनेट करणेंत आलेले आहेत त्यापैकीं ना. सौ. साठ्ये या आहेत. त्या कमिटीतर्फे आतापर्यंत ज्या ज्या सूचना केल्या त्यातील कांहीं खात्यातर्फे मान्य केल्या आहेत त्याबद्दल त्या खात्याचे आभार मानतील अशी माझी अपेक्षा होती. नंबर कमी होत आहे अशी जी त्यांनीं तक्रार मांडली ती बरोबर नाहीं. तेथील स्टाफकडून जनतेला सहानुभूति दाखविली जात नाहीं याबद्दलची तक्रार मजकडे आल्यास मी तिचा अवश्य विचार करीन. मॅटर्निटीहोमकडे लेडी डॉक्टर नेमणेंचे बाबतींत आम्हीं स्वस्थ आहों असें मुळींच नाहीं. तशा लेडी डॉक्टर १९४२ च्या जून महिन्यापर्यंत होत्याच; परंतु त्यांनीं अलीकडे कांहीं कारणानें राजिनामा दिला आहे. त्यानंतर आम्ही जाहिरात देऊन अर्ज मागविले होते. परंतु जाहिरात देऊनही एकसुद्धां अर्ज आलेला नाहीं. परंतु शक्य तो लवकर लेडीडॉक्टर नेमण्याची व्यवस्था करीत आहोंत. कांहीं अधिक पगार द्यावा अशी जी एका ना. सभासदांची सूचना आहे तीहीं, जर या सभागृहाकडून रिॲप्रोप्रिएशन करण्यास परवानगी मिळत असेल तर तसें करून अधिक पगार देऊन शक्य तर नेमतां येईल. हा खुलासा झाल्यानंतर ही कपात सूचना परत घेतली जाईल अशी आशा करतो.

ना. सौ. इंदिराबाई साठ्ये:—मला उत्तर मिळालें आहे. स्वराज्याची तहान सुराज्यानें भागत नाहीं. दवाखाना उत्तम चालला असेलच, पण देवळांत देव नाहीं अशी मॅटर्निटीची स्थिती झालेली आहे. तथापि आतां ना. मंत्री यांनीं लवकरच विचार करतो असें आश्वासन दिल्यावरून मी ही कपात सूचना परत घेते, तशी परवानगी असावी.

The Motion was, with the leave of the House, withdrawn.

ना. प्रेसिडेंट:—ना. मिनिस्टर यांनीं केलेली मागणी मंजूर झाली असें मी जाहीर करतो.

यानंतर हुजूर हुकमाप्रमाणें मागण्या मतांस घालण्याची वेळ संपल्यामुळें राहिलेल्या मागण्या असेंब्लीपुढें मांडण्यांत येऊन त्या सर्व पास झाल्याचें ना. प्रेसिडेंट यांनीं जाहीर केलें.

---

ना. प्रेसिडेंट:—सन्मान्य सभासद, ह्या सभागृहानें ता. १९-२-४३ रोजीं, कै. श्रीमंत राजकुमार प्रतापसिंह महाराज यांच्या शोचनीय निधनासंबंधीं दुःखदर्शक ठराव पास करून तो, हिज हायनेस सरकार स्वारींचेकडे पाठविण्याबद्दल मजला अधिकार दिला होता. त्याप्रमाणें मी तो ठराव श्रीमंतांचेकडे सादर केला होता. सदर ठरावास श्रीमंतांकडून आलेलें उत्तर मी आतां आपणांस वाचून दाखवितो.

" चि. कै. राजकुमार ( पांडुरंगराव बाळासाहेब ) प्रतापसिंह यांचे गेले ता. २२ ऑगस्ट सन १९४२ रोजीं झालेले विमानअपघातांतील अकालिक निधनानें आम्हां उभयतांवर व आमचे कुटुंबीयांवर जो दुर्धर व शोककारक प्रसंग ओढावला आहे त्यानिमित्त. सांगली संस्थान विधिमंडळाचे सर्व सभासदांनीं तारीख १९ रोजीं अधिवेशनांत जो दुःखप्रदर्शनाचा ठराव पास करून नामदार अध्यक्ष यांचेमार्फत आमचेकडे पाठविला व त्यांत राजकुमारांचे अंगीं वसत असलेले गुणांचा त्यांनीं केलेला अभिमानपूर्वक उल्लेख वाचून आमचें उभयतांचें अंतःकरण अगदीं गहिंवरून येत आहे. सर्व सभासदांनीं सांगलीच्या राजघराण्याबद्दल ही जी आत्मीयता व सहानुभूती प्रदर्शित केली आहे त्याबद्दल आम्ही उभयतां नामदार अध्यक्ष व सर्व सभासद यांचे फार आभारी आहों. आमचेवर ओढवलेल्या दुःखद प्रसंगांत आमचे प्रिय प्रजाजन व असेंब्लीचे नामदार सभासद सहभागी आहेत या जाणिवेनें आमचे अंतःकरणास झालेले दुःखाची तीव्रता कांहींशी हलकी होणेस मदत होत आहे याचाहि उल्लेख केल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं."

आतां तारीख १६-२-४२ रोजीं सभागृहानें, श्रीमंत युवराजमहाराज यांना पुत्ररत्नाचा लाभ झाल्याबद्दल ठराव पास केला होता, त्याहि ठरावास श्रीमंतांकडून आलेलें उत्तर मी आपणास वाचून दाखवितो.

" चिरंजीव युवराज माधवराव रावसाहेब यांना तारीख २४ माहे ऑगस्ट सन १९४२ रोजीं पुत्ररत्नाचा लाभ झालेबद्दल सांगली संस्थान विधिमंडळाचे अधिवेशनांत नामदार सभासदांनीं अभिनंदनपर ठराव पास करून आपला आनंद व्यक्त केला व नूतन राजकुमार चिरंजीव परशुरामराव विजयसिंह यांना दीर्घ आयुरारोग्य लाभून उत्तरोत्तर त्यांचा उत्कर्ष व्हावा अशी सदिच्छा प्रदर्शित केलेला ठराव नामदार अध्यक्षांचे मार्फत इकडे आला तो वाचून आम्हां उभयतांना फार संतोष झाला व त्याबद्दल आम्ही सर्व नामदार सभासदांचे अत्यंत आभारी आहों.

राजघराण्यांतील आनंदोत्सवासंबंधीं नामदार. सभासदांनीं आत्मीयता, उत्साह व प्रेम दर्शवून राजपौत्रांचा जन्मोत्सव समारंभ संस्थानचे आजवरचे इतमामास व लौकिकास साजेसा साजरा करणेंत यावा अशी जी उत्कट इच्छा दर्शविली ती, आमचे प्रिय प्रजाजनांचे परंपरागत राजनिष्ठेस व लौकिकास साजेसीच आहे हें पाहून आम्हांस धन्यता वाटते."

---

## सुट्टीनंतर.

## इन्कमटॅक्स-बिल्-रेझोल्यूशन्.

ना. वि. का. खाडिकर:—सन्मान्य अध्यक्ष महाराज, हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब स्वारींचे आज्ञेनुसार इन्कमटॅक्स बाबतचा विलसंबंधी ठराव मी सभागृहापुढें मांडतो.

## BILL RESOLUTION.

This House recommends to His Highness the Raja Saheb of Sangli that Section 8 (1) of the Indian Finance Act, ( Act No. XII of 1942 ) fixing rates of Income-tax and Super-tax, should be made applicable to the Sangli State, *mutatis mutandis*, and so far as may be practicable, which for greater clearness and accuracy is described in the accompanying Table with effect from the 6th June 1942.

His Highness the Raja Saheb be pleased to apply to the Sangli State, the enactment, specified in the Table below in so far as the same may be applicable :

Provided that for the purpose of facilitating the application of the said enactment, any Court in the Sangli State, may construe the provisions thereof with such alterations, not affecting the substance, as may be necessary or proper to adapt it to the matter before the Court.

Provided further that the said enactment so applied shall be construed as part of the Income-Tax Act in force in the Sangli State and as if there were made therein further modifications and restrictions as set forth in the Table below :--

**TABLE.**

| Enactment. | Modificaions. |
|---|---|
| Indian Finance Act, ACt No. XII of 1942. Section 8(1)only. | 1. Omit the brackets, figures & words "Subject to the provisions of sub-sections (2) & (3)"<br>2. In the first line of clauses (a) & (b) read "from" for "for".<br>3. Substitute the words "6th day of June" for the words "1st day of April" wherever they occur in clauses (a) & (b).<br>4. Read the words "the annexed Schedule" for "Schedule II" wherever they occur in claues (a) & (b). |

5. Omit the words " sub-paragraph (b) of " in clause (a).
6. Omit the words " increased in the cases to which paragraphs A, B and C of that part apply by a surcharge " and also the words " at the rate specified therein in respect of each such rate of supertax " in clause (b).
7. Read the words " Sangli Government " for the words " Central Government " wherever they occur in clauses (a) & (b).

His Highness the Raja Saheb of Sangli be pleased to direct that the enactment in the above Table shall come into force in the Sangli State from the 6th June 1942.

## SCHEDULE.

### Part I-Rates of Income-tax.

A - In the case of every individual, Hindu undivided family, unregistered firm and other association of individuals not being a registered firm or a company —

| Grade of income | Existing rate in pies per rupee | Surcharge rate in pies per rupee |
|---|---|---|
| 1 When the total income is less than Rs 1,000. | Nil. | Nil. |
| 2 When the total income is Rs. 1,000 or upwards but is less than Rs. 1,200. | Three | Nil. |
| 3 When the total income is Rs. 1,200 or upwards but is less than Rs. 2,000. | Three | One. |
| 4 When the total income is Rs. 2,000 or upwards but is less than Rs. 2,400. | Five | One & two-third. |
| 5 When the total income is Rs. 2,400. or upwards but is less than Rs. 5,000. | Five | Two & one-half. |
| 6 When the total income is Rs. 5,000. or upwards but is less than Rs. 10,000. | Six. | Three. |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | When the total income is Rs. 10,000 or upwards but is less than Rs. 20,000. | Nine. | Four & one-half |
| 8 | When the total Income is Rs. 20,000. upwards but ir less than Rs. 30,000. | Twelve. | Six. |
| 9 | When the total income is Rs. 30,000 or upwards but is less than Rs. 40,000. | Fifteen. | Seven & one-half |
| 10 | When the total income is Rs. 40, 000 or upwards. | Eighteen. | Nine. |
| B— | In the case of every company and registered firm, whatever its total income— | Eighteen. | Nine. |

## Part II—Rates of Super-tax.

A.—In the case of every individual, Hindn undivided family, unregistered firm and other association of individuals not being a registered firm or a company—

| | Slab of income. | Rate per rupee. |
|---|---|---|
| 1 | On the first Rs. 15,000 of total income. | Nil. |
| 2 | On the next Rs. 20,000 of total income. | One anna. |
| 3 | On the next Rs. 30,000 of total income. | Two annas. |
| 4 | On the balance of total income. | Three annas |

B —In the case of every company —

On the whole of total income. One anna.

सन १९४२ चा नंबर १२ चा इंडियन् फिनॅन्स् अॅक्ट यांतील कलम ८ (१) ५.क. सांगली संस्थानास लागूं करणेबाबत हा बिलस्वरूपी ठराव आहे. ह्या कलम ८ (१) मध्यें काय काय दुरुस्त्या करणें जरूर आहेत त्या ठरावांतील Table मध्यें Modifications या सदरीं दाखविल्या आहेत. सदर बिलस्वरूपी ठरावाच्या प्रती नामदार सभासदांना पुरविणेंत आलेल्या आहेत त्यावरून सर्व दर ध्यानीं येणार आहेत; इन्कमटॅक्स सध्या ज्या दरानें आकारला जात आहे तेच दर याहीपुढें रहाणेंचे आहेत; मात्र सदर ठरावांतील Schedule मधील १ ल्या भागांत नमूद केल्याप्रमाणें यापुढें सरचार्ज आकारला जाईल. अखादी कंपनी अगर रजिस्टर्ड फर्मच्या बाबतींत मात्र असें ठरविणेंत आलें आहे कीं त्यांचें उत्पन्न कितीहि असलें तरी त्यावर सरचार्ज दर रुपयास नऊ पै दरानें आकारणेंत येईल. तसेंच Schedule मधील २ ऱ्या भागांत सुपरटॅक्सचे दर दिले आहेत. ( दर वाचून दाखविले. )

आतां हा कर बसविण्याचा उद्देश व कारणें काय आहेत, यासंबंधी विवेचन करणें जरूर आहे. पुरवणी अंदाजपत्रक ज्यावेळीं मी या सभागृहास सादर केलें त्यावेळीं यासंबंधी स्पष्टीकरण केलेंच आहे. या नवीन कर--वाढीची संस्थानला कशी आवश्यकता आहे तें नाम-दार सभासदांच्यापुढें मांडल्यानंतर हल्लीच्या जागतिक बिकट परिस्थितींत ही कर--वाढीची योजना सरकारला आणावी लागते हें ध्यानांत घेऊन ना. सभासद विचार करतील अशी आशा आहे. कर म्हटला कीं मनुष्य गरीब असो अगर श्रीमंत असो, तो त्याला जाचक होणारच असें प्रत्येकाला वाटणें मनुष्य स्वभावाला अनुसरूनच आहे. करवाढी संबंधींची कल्पना कानावर पडली तर ती जाचक वाटावी यांत आश्चर्य नाहीं. वैयक्तिक दृष्टीनें कर ह्मणजे एक जाचक गोष्ट असा विचार केला तर आज जे आपणांस इतके कर दिसत आहेत त्यांपैकीं कोणताच समर्थनीय ठरणार नाहीं. परंतु कर नाहीं ह्मणजे सरकारला उत्पन्नहि पण नाहीं. तेव्हां करवाढ केली जाऊं नये असें ह्मणणें अव्यवहार्य आहे. करवाढीची योजना ज्यावेळीं सरकारपुढें मांडली जाते त्यावेळीं साहाजिकच असा प्रश्न उत्पन्न होतो कीं उत्पन्नाचे सरकारचे इतर सर्व मार्ग खुंटले आहेत कीं काय, ज्या परिस्थितींत सरकारला ही योजना पुढें आणावी लागत आहे तिचा ना. सभासदांनीं विचार करावा. संस्थानच्या बजेटीं उत्पन्नाच्या बाबीपैकीं मोठी बाब ह्मणजे जमीन महसूल व या सदरीं ६२८००० रु. आह्मी धरले आहेत. शिवाय दरसाल मागील बाकी येणें ह्मणूनही आह्मी कांहीं वसूल करतोच. हा सारा शेतकऱ्यांना द्यावा लागतो. हल्लींच्या दिवसांत शेतकरी कितपत सुखी असतो, हें ना. सभासदांना मी नव्यानें सांगावयास हवें असें नाहीं. तेव्हां अशा शेतकऱ्यांवर कराचा पुन्हां बोजा लादणें हें कर बसविणारास व तो देणारा या दोघांसही दुःखदायकच आहे. कल्पना करा ! इतक्या करांचे ओझें सहन करणाऱ्या शेतकऱ्यावर आणखी कर लादणें शक्य आहे काय ? अर्थात् मला तरी तें शक्य वाटत नाहीं. तसेंच स्टँप, रजिस्ट्रेशन्, कोर्टफी वगैरे बाबींपासुनहि अधिक उत्पन्न काढतां येईल अगर कसें हें पाहिलें तर येथेंहि करवाढ अशक्य दिसते. कारण स्टँप खरेदी करणारे, खरेदी विक्रीचे व्यवहार रजिस्टर करणारे बहुतेक लोक शेतकरीच असतात. तेव्हां या बाबींवर करवाढ करणें ह्मणजे त्याची झळ गरीब शेतकऱ्यासच लागणार आहे. आणखी अशा कित्येक बाबी आहेत. त्यांतच अबकारीच्या उत्पन्नासंबंधीं नामदारांचे मनांत विचार येईल. अबकारीचें उत्पन्न १९८००० चें आहे. अबकारी ह्मणजे निशा उत्पन्न करणारें दारू, अफू, गांजा वगैरेसारख्या मादक पदार्थांपासुन येणारें उत्पन्न. हें उत्पन्न कोणत्या वर्गाकडून येतें हें पाहूं गेल्यास आपणांस असें दिसून येतें कीं, शेतभात कष्ट करणारा शेतकरी, काबाडकष्ट करून पोट भरणारा गरीब मजूर किंवा यासारखे इतर दुर्दैवी लोक यांच्याकडूनच हें उत्पन्न येतें.

अशा ह्या दरिद्री गरिबांवर हल्लीं जो बोजा आहे, त्यांत आणखी भर घालून त्यांचें जीवन अधिक खडतर करणें इष्ट आहे कीं काय याचा नामदारांनींच विचार करावा ! सैन्यांच्या परिस्थितींतील आपण इतर ठिकाणची उदाहरणें पाहूं. विशेषतः ब्रिटिश इंडियाचा अनुभव पाहिला तर सध्यांच्या बिकट परिस्थितींत इतर बाबींपेक्षां त्यांना इन्कमटॅक्सकडेच धांव घ्यावी लागली. इन्कमटॅक्सबद्दल अर्थशास्त्र सांगतें कीं, ज्यांना अगोदर उत्पन्न मिळतें व तें मिळाल्यानंतर त्या उत्पन्नावर कर वसूल केला जातो. म्हणूनच ज्यांना अगोदर उत्पन्न मिळतें अशा लोकांनींच हा भार उचलणें योग्य होणार आहे. व त्यांना तो झेपणारा आहे. मोठें ही गोष्ट विसरतां कामां नये कीं, इन्कमटॅक्स हा एक अपरिहार्य स्थितींतला अखेरचा आधार आहे. सध्याच्या परिस्थितींत त्यांत वाढ केल्याखेरीज दुसरा तरणोपाय दिसत नाहीं. कर बसवितांना, तो कर ज्यांना सहन करतां येईल, ज्यांना तें सामर्थ्य असेल त्यांच्यावरच बसविला जावा हा विचार तर्कशुद्ध आहे. शिवाय आणखी एक मौज अशी आहे कीं, इन्कमटॅक्समध्यें औषधी गूण आहे. ज्या वेळीं करवाढ विषम स्थितींत असते, त्यावेळीं इन्कमटॅक्ससारखें बेमालूम गुणकारी दुसरें औषध नाहीं असें मोठमोठे शास्त्रज्ञही कबूल करतात. आणि म्हणूनच हल्लीच्या आर्थिक अडचणीच्या परिस्थितींत ही योजना मदत म्हणून हातीं घेतली आहे. मनुष्य आर्थिक अडचणींत सांपडला कीं तो धनिक, वणिकांकडेच धांव घेतो, त्यावांचून त्याला गत्यंतर नसतें हें आपण नेहमींच्या साध्या व्यवहारात सुद्धां पाहतो. पुरवणी अंदाजपत्रक सभेस सादर करतांना मी सांगितलेंच आहे कीं २४०१७९ इतक्या रकमेचा बोजा पुढील सालच्या बजेटवर प्रथमच पडणार आहे. ही तूट भरून कशी काढावयाची हाच काय तो मुख्य प्रश्न आहे. नेहमींप्रमाणें रिॲप्रोप्रियेशननें अगर काटकसरीनें भरून निघण्यासारखी नाहीं. अशा दांत टोकरण्यांनीं फार झालेतर ८-१० हजार रु. भरून निघतील., आणि ही रक्कम आपल्याला भरून काढावयाच्या तुटीच्या रकमेच्या पासंगालाही पुरणार नाहीं ! अंदाजपत्रकांतील जमेच्या इतर बाबी म्हणजे स्टांप रजिस्ट्रेशन् कोर्टफी वगैरे. परंतु हे व्यवहार करणारे लोकच सध्यां ते करण्याचे परिस्थितींत नाहींत. तसेंच जमिनबाबीचें उत्पन्न ६२८००० अगर ७४०००० असें जरी दाखविले तरी त्यापैकीं सरकारच्या पदरांत किती पडेल याची शंकाच आहे. कर्जानें तूट भरून काढण्यासंबंधी मी अंदाजपत्रकावरील माझ्या भाषणांत खुलासा केलाच आहे. तेव्हां उरलासुरला करवाढीचा शास्त्रसंमत मार्गच आपणांस स्वीकारणें जरूर आहे, व तोच स्वीकारणें सरकारला श्रेयस्कर वाटल्यावरून देशाची कांहींतरी तरतूद करणें अवश्यक आहे असें वाटल्यावरून मी हा बिलस्वरूपी ठराव या सभागृहापुढें मांडला आहे. त्यास सर्व नामदार सभासदांनी संमति द्यावी अशी मी त्यांना विनंति करतो. Sir, I move.

ना. प्रेसिडेंट:—ना. फिनॅन्स मेंबर यानीं आतां जो बिलस्वरूपी ठराव सभागृहापुढें मांडला आहे त्यास विरोधी पक्षाच्या नेत्यांनीं दुरुस्त्या सुचविल्या आहेत. ह्या दुरुस्त्या त्यांनीं मांडाव्यांत म्हणजे जर त्या सभागृहास सम्मत असतील तर तो दुरुस्त ठरावच सभागृहापुढें आणणें सोईचें होईल.

ना. के. गो. कुलकर्णी:—सन्मान्य अध्यक्षमहाराज, ना. फिनॅन्स मेंबर यानीं मांडलेल्या बि. स्व. ठरावास मी आपल्या परवानगीनें माझ्या दुरुस्त्या सुचवीत आहे. ठरावांतील "This House recomends" पासून "6th June 1942".

येथपर्यंतचा मजकूर आहे तसाच ठेऊन त्यापुढें "and should remain in force only for the current Fasli year" हा मजकूर घालणेंत यावा. ही एक सूचना झाली. शेड्यूलमधील Grade of Income या सदरीं अनुक्रम नंबर १ मध्यें "when the Total income is less than 1000" यामधील 1000" च्या ऐवजीं 1500 असा फरक करण्यांत यावा. अनुक्रम नं. २ अजिबात गाळणेंत यावें. अनुक्रम नं. ३ मध्यें रु. १२०० ऐवजीं रु. १५०० अशी दुरुस्ती करण्यांत यावी. अनुक्रम नं ४ व ५ मध्यें ज्या ज्या ठिकाणीं रु. २४०० आंकडा आहे तेथें रु. ३००० दाखल करणेंत यावेत, ही दुसरी सूचना झाली व तदनुरोधानें हा अनुक्रम नंबराचा क्रम बदलावा म्हणजे नं २ हा गाळणेंत आला असतां पुढील अनुक्रम नंबर बदलणें जरूर आहे. असो ह्या ज्या दुरुस्त्या सुचविण्यांत आलेल्या आहेत त्या हा बि. स्व. ठराव मांडणेंतील सरकारचा उद्देश ध्यानांत घेऊनच सुचविण्यांत आलेल्या आहेत, व सरकारच्या हेतूस यामुळें कोणत्याही प्रकारचा बाध येईल असें वाटत नाहीं. केवळ इमर्जन्सीमुळेंच हा नवीन कर बसविला जाणार आहे हें उघड आहे. अर्थातच ही इमर्जन्सची परिस्थिती पालटतांच ह्या नवीन कराचीही जरूरी राहणार नाहीं. मी जी पहिली दुरुस्ती सुचविली आहे ती या दृष्टीनेंच सुचविली आहे. व याबाबतींत सरकारपक्ष माझ्याशीं सहमत होईल असें मला वाटतें. ना. फिनॅन्स मेंबर यानीं सांगितलें आहेच कीं सध्याच्या अपरिहार्य आर्थिक अडचणीमुळेंच ही करवाढ करावी लागत आहे. ना. सभासद जाणतातच कीं धान्यादि वस्तूंच्या किंमती भरमसाट वाढल्या असल्यातरी आवश्यक अशा बाबींवर सरकारला जरूर तेवढा खर्च करावाच लागतो. सर्वच खर्च कमी करून गव्हर्मेंट चालणार नाहीं. उदाहरणार्थ १३५२ च्या मूळ अंदाजपत्रकांत चंदी खरेदीसाठीं पागा खात्यांत ७००० रु. मंजूर असतां जादा रक्कम १५००० रुपयाची केवळ चारपांच महिन्याकरीतां मंजूर करावी लागली. हा खर्च दरबारच्या इभ्रतीसाठीं दरबारजवळ असलेल्या घोडीं वगैरे जनावरें जगविण्याकरितांच होणार आहे व तो अत्यंत आवश्यकही आहे आणि म्हणूनच वाढत्या भावांत देखील पडेल ती किंमत देऊनही चंदी

खरेदी करणें दरबारला जरूर आहे. हा खर्च होऊं नये असें तर म्हटलें घोड्यांची कांहीं तरी वाट लावावी लागेल. तेव्हां अशा प्रकारच्या अपरिहार्य कारणाकरितां होणाऱ्या खर्चाची रक्कम कर स्वरूपानेंच भरून काढणें जरुरीचें आहे. या विचाराशीं मी सहमत असल्यानें सदरचा बिल-स्वरुपी ठराव सभागृहापुढें मांडण्यातील सरकारचा हेतु नजरेपुढें ठेऊनच मी असें म्हणतो कीं हा करवाढीचा सरकारचा हेतु लांबणीवर टाकणें इष्ट आहे अगर कसें याचा नामदारांनींच विचार करावा. इमर्जन्सी काळांत होणाऱ्या जादा खर्चाची कांहीं तरी तजवीज होणें जरूर आहे. सध्यांच्या बिकट परिस्थितीतून पार पाडण्याची जबाबदारी ज्याप्रमाणें सरकारवर आहे त्याच-प्रमाणें ती आम्हां जनतेवर आहे हेंही सर्वांनीं घ्यानांत आणलें पाहिजे. सरकारपुढें निरनिराळ्या खर्चाच्या मागण्या मांडावयाच्या व हा खर्च कोठून करावयांचा असें विचारताच कानावर हात ठेवावयाचें हें शोभणार नाहीं. आपल्यावरील जबाबदारी दूर सारून आपणांस चालणार नाहीं, यासाठीं या जादा खर्चाकरितां कोठें व कसा कर बसवितां येईल याचा विचार आपण केला पाहिजे. पुरवणी अंदाजपत्रकावरील चर्चेच्यावेळीं लोकपक्षांतर्फे अंदाजपत्रकाच्या तोंडमिळवणीसंबंधानें कांहीं बाबी सुचाविण्यांत आल्यातर त्यांचा व हें बजेट डेफिसीट नाहीं असें जर सरकारास पटवून देण्यांत आले तर त्याचाहि सरकारनें अवश्य विचार केला पाहिजे. याच्या उलट जरूर तेथें काटकसर करून निरनिराळ्या खात्यांतील खर्चांत बचत केली तरीही हें डेफिसीट इतकें मोठे आहे कीं तें सहजा सहजीं भरून येणार नाहीं; गेल्या वर्षी हें डेफिसीट ८३००० होतें तर आतांचें दोन अडीच लाखापर्यंत आणार आहे, तेव्हां उत्पन्नापेक्षां हा जास्त होणारा खर्च भरून काढण्याकरितां कशी तजवीज करावी असा जर सरकारनें आपणांस प्रश्न टाकला तर आपणांसहि त्याचा विचार करावा लागेल व कांहीं विधायक सूचना सुचवाव्या लागतील. आपल्यावरीलहि मोठी जबाबदारी म्हणूनच मी असें म्हणतो कीं सरकारतर्फे सुचविणेंत आलेली ही करवाढीची योजना, सध्यांची युद्धजन्य आर्थिक अडचणीची परिस्थिती संपेपर्यंत होणाऱ्या जादा खर्चाची तरतुद करण्याकरितां जरूरच आहे. व तशी करवाढ करण्यास हरकत नाहीं. इमर्जन्सीसाठीं ही करवाढ करण्यांत येत आहे, इमर्जन्सी संपताच ही बंद झाली पाहिजे हें स्पष्ट आहे. नाहून आज फक्त इमर्जन्सीचें कारण पुढें करावयाचें व त्या पांघरुणाखाली हा बोजा जनतेवर कायमचा बसवावयाचा असा जर सरकारचा हेतु असेल तर आम्हांस त्याबद्दल चांगलाच विचार करावा लागेल. सुदैवानें पुढील चार पांच महिन्यांत रुप्याची परिस्थिती पालटेल अशी चिन्हें दिसूं लागलीं आहेत. यदाकदाचित् दुर्दैवानेंच सदर मुदतींत ही परिस्थिती पालटली नाहीं तर या सभागृहाच्या पुढच्या अधिवेशनाचे वेळीं या बि. स्व. ठरावाची मुदत वाढवून घेतां

येईल आणि ब्रिटिश इंडियातील विधिमंडळामध्यें चालू असलेल्या पद्धतिप्रमाणें त्यावेळच्या परिस्थितीस अनुसरून आमच्याही विधिमंडळास त्याचाही विचार करतां येईल. पुढें कशी परिस्थिती निर्माण होईल हें मी आजच सांगू शकत नाहीं. परंतु आपणापुढें मोठा प्रश्न आहे कीं सध्याच्या परिस्थितींत अवश्य करावा लागणारा हा खर्च कोठून भागवावयाचा ?

हिज हायनेस श्रीमंत सरकार स्वारींनीं सन १९३८ सालीं या विधिमंडळामध्यें जाहीर घोषणा केली. या घोषणे प्रमाणें आह्मी गेलीं चार वर्षे श्रीमंतांच्या आधिपत्याखालीं द्विदल राज्यपद्धति ( डायर्की ) राबवीत आहोंत. संपूर्ण स्वायत्ततेचें ध्येय जाहीर केल्यानंतर गेल्या चार वर्षांतील आमच्या कामगारीच्या अनुभवावरून आह्मांस ही डायर्की उत्तम तऱ्हेनें चालवितां येते याबद्दल श्रीमंतांची खात्री झालेलीच आहे., आणि अशी जर त्यांची खात्री झालेली असेल तर श्रीमंतांनीं संपूर्ण स्वायत्ततेची पुढची पायरीही आपल्या घोषणेप्रमाणें त्यांनीं आह्मांस दिली पाहिजे. लोक ह्मणतात, अडचणीच्या वेळीं आह्मी सरकारला फिनॅन्सिंग करावें पण सरकारनें घोषणेप्रमाणें केलें काय ! करवाढीचा विचार मनांत येतांच या करवाढीपासून प्रजेच्या पदरांत काय पडतें याचा आह्मास विचार करावा लागतो. आतांपर्यंत मी केलेल्या विवेचनावरून इमर्जन्सीमुळें ही करवाढ करावी लागते आहे हें आपण कबूल करालच. तेव्हां हें इमर्जन्सी डेफिसीट् भरून काढण्याकरितां सर्व दृष्टीनें विचार करून या सरकारी बि. स. ठरावास सम्मति द्यावयाची अगर नाहीं हें नामदारांनीं ठरवावें. ही करवाढ करण्यास मी सम्मति दर्शवितो याचा अर्थ पक्षपातीपणानें बोलतो असा कोणीही करूं नये. व्यापारी-बंधू व धनिक सावकारवर्ग यांच्यावरच फक्त कर बसवावा असाहि माझा हेतू नाहीं. सध्याची दरबारची अडचणीची परिस्थिती लक्षांत घेऊन ही करवाढ कोणता वर्ग सहन करूं शकेल याचा आपणच विचार करावा. आपल्या संस्थानांतील शेतकरीवर्ग हा कर सोसण्यास समर्थ आहे असें जर आपणांस वाटेल तर आधींच असलेल्या त्यांच्या हलाखीच्या परिस्थितींत त्यांच्यावर आणखी कराचें ओझें लादणें कितपत समर्थनीय होईल ? तेव्हां सर्व बाजूंनीं विचार करतां या इमर्जन्सीच्या काळांत करवाढीचे इतर मार्ग अयोग्य असून इन्कमटॅक्स ही एकच बाब या परिस्थितींत कर वाढीला योग्य आहे असें आपणांस दिसून येईल सध्यांच्या युद्धजन्य परिस्थितींत धनिक व्यापारीवर्ग अधिकाधिक आर्थिक अडचणींत येत आहे अगर त्यांना नफाच अधिक होत आहे याचा माझ्या व्यापारी बंधूंनी अंतर्मुख होऊन विचार केला तर हा कर सहन करण्याची कल्पना त्यांना जाचणार नाहीं. मी दरबारतर्फे बोलतो असा कोणीही गैरसमज करून घेऊं नये. ना. फिनॅन्स मेंबर यांनीं करवाढीचे बाबतींतील सांगितलेलें तत्व व ही करवाढ सहन करण्यास समर्थ असा वर्ग हे

दोन्हीही ध्यानांत आणून ह्या इमर्जन्सीच्या काळापुरती, परिस्थिती पालटेपर्यंत ही करवाढ करणें योग्य आहे असें मला वाटतें. आणि म्हणूनच मी, "It should remain in force for the current year only" अशी पहिली दुरुस्ती सुचविली. आणि हा माझा विचार आपण लक्षांत आणून ह्या बि. स्वं. ठरावास व मी सुचविलेल्या दुरुस्तीस माझ्या सर्व ना. मित्रांनीं सम्मति द्यावी अशी मी त्यांना विनंति करतो. सध्यां ब्रिटिश हिंदुस्थानांत लागू असलेले याच-बाबतीतील दर पाहिल्यास आपल्या सांगली संस्थानांत ते कितीतरी कमी आहेत व इन्कमटॅक्स देणाऱ्यांना फायदेशीरच आहेत.

आतां मी माझ्या दुसऱ्या दुरुस्तीकडे वळतो. सध्यां संस्थानांत प्रचलित असलेल्या कायद्याप्रमाणें दरसाल १००० अगर त्याहून अधिक उत्पन्न असेल तर इन्कमटॅक्स द्यावा लागतो. सरकारतर्फे मांडलेल्या ठरावांतहि तीच ग्रेड ठेविली आहे. दरसाल १००० ते १५०० पर्यंत उत्पन्नाचे लोक संस्थानांत बरेच आहेत. इतकें उत्पन्न असूनही हल्लीच्या युद्धजन्य महर्गतेच्या काळांत त्यांना आपला नेहमींचाही खर्च भागविणें जिकीरीचें होत आहे. आणि म्हणून मी ही किमान मर्यादा १००० चे ऐवजीं १५०० ची करावी अशी दुसरी दुरुस्ती सुचविली आहे. या माझ्या सूचनेप्रमाणें ठरावांतील अनुक्रम नं. १ चि ग्रेड आपोआपच नाहींशी होते. यानंतरच्या माझ्या सूचना म्हणजे १५०० ते ३००० रु. पर्यंत सरचार्जचा दर १ पै असावा आणि पुढें तो दर शेडयूलमध्यें दाखविला आहे त्याचप्रमाणें ठेवावा. अशा दुरुस्त्या मी सुचविलेल्या आहेत. या सर्वांचा विचार करून सर्व ना. सभासदांनीं त्यांत सम्मति द्यावी अशी मी पुन्हां एकवार विनंति करतो.

ना. म. ह. गोडबोले:—सन्मान्य अध्यक्ष, सरकारतर्फे पुढें आलेल्या ह्या करवाढीच्या योजनेवर मी आंता जें भाषण करणार आहे तें, सदर योजना-मांडणींतील सरकारचा हेतू मला मान्य असल्यामुळें सध्यांची बिकट जागतिक परिस्थिती नजरेपुढें ठेऊन मी करीत आहे. पुरवणी अंदाजपत्रकावरील सर्वसाधारण चर्चेच्यावेळीं मी या चा उपन्यास केला आहेच. सरकारला ज्यावेळीं पैशाची जरूरी लागतें त्यावेळीं सरकार प्रजेकडे निरनिराळे कर मागूं लागतें. अशा वेळींच सरकारकडून जास्त हक्क मागून घेण्याचा अधिकार प्रजेस असतो. तीच त्यांना संधी प्राप्त होते. माझे मित्र ना. कुलकर्णी, विरोधी पक्षाचे नेते, यांनीं या करवाढीसंबंधीं आतांचें भाषण करतांना जी विचारसरणी आपल्यापुढें मांडली ती खरोखरच लक्षांत घेण्यासारखी आहे. आपले अधिकार काय आहेत व ते आपणांस कसे प्राप्त होतील याबद्दल आह्मां प्रजाजनांस दीर्घकाळ विवंचना लागून राहून तत्प्रीत्यर्थ जे प्रयत्न करण्यांत आले त्याचें व

आमच्या सरकारच्या कृपेचें फळ म्हणूनच की काय आपणांस एक लोकानियुक्त मंत्री मिळाला आहे. असें म्हणण्यासाठीं हरकत नाहीं कीं, या हक्कप्राप्तीमुळें सरकारच्या अभेद्य बालेकिल्याला एक लहानसें खिंडार पडलेलें आहे. हें खिंडार असेंच वाढत जाऊन सर्व बालेकिल्ला आपणांस सर करतां येईल अशी अपेक्षा बाळगण्यास हरकत नाहीं. सरकारचे राखीव खात्याचे इतर मंत्री आपलीं कामें जितक्या जबाबदारीनें पार पाडतात तितक्याच जबाबदारीनें लोकानियुक्त मंत्रीहि आपलीं कामें पार पाडतात ही गोष्ट सरकारास अनुभावानें नाकबूल करतां येणार नाहीं. अशारीतीनें जबाबदारीनें राज्यकारभार हाकण्याची आपली लायखी आहे अशी सरकारची खात्री झाल्यानंतर प्रजेनें आपल्या विधिमंडळामार्फत आपले अधिकार वाढवून घेणें प्राप्तच असून त्यासंबंधीं प्रयत्न करणें जरूर आहे. सरकार आपल्याजवळ कररूपानें पैसा मागत आहे, याचवेळीं आपणहि सरकारजवळ आपले अधिकार वाढवून मागितले पाहिजेत. माझ्या म्हणण्याचा थोडक्यांत आशय..............

ना. प्रेसिडेंट:—गव्हर्मेंट् ऑफ् सांगली ॲक्टमधील कलम ३० कडे मी ना. सभासदांचें लक्ष वेधावें असें मला सुचविलें आहे. सभागृहापुढें असलेल्या मूळ ठराव अगर त्यावरील दुरुस्त्यांची सूचना या संबंधींच आपण बोलूं शकाल.

ना म. ह. नोडबोले:—मी आतां मुद्याकडेच वळणार आहे. ब्रिटिश इंडियांतील विधिमंडळापुढें चर्चिले जाणारे करवाढीचे ठराव आणि त्या कायदे मंडळाचे अधिकार लक्षांत ठेऊनच मी बोलतो आहे. सांगलीच्या विधीमंडळाचाहि या बाबतचा अधिकार व येथील प्रथा मी जाणतो आणि त्या प्रथेला अनुसरूनच मी भाषण करीत आहे. मला आठवतें, व सर्व नामदार सभासदांनाहि माहित असेल, कीं मे. डेसाहेब हे या विधिमंडळाचे अध्यक्ष असतांना संस्थानच्या वरील प्रथेला अनुसरून त्यावेळीं याचप्रमाणें एक पॉइंट निघाला होता व त्यावर त्यांनीं एक रूलींगहि दिलें होतें. सरकारनें सुचविलेली करवाढ प्रजेनें खुषीनें पत्करावी. ती तिचेवर लादली जाऊं नये यादृष्टीनें मी चार गोष्टी मांडणार आहे. या बि. स्व. ठरावांतील तत्व वाईट आहे असें माझें म्हणणें नाहीं, परंतु आज कर वसूल केला तर भविष्यकाली तरी निदान सरकारनें प्रजेला त्याचा मोबदला द्यावा. हा कर प्रजेनें खुषीनें पत्करावा अशी जर सरकारची इच्छा असेल तर सरकारनें या गोष्टीचा सहानुभुतिपूर्वक विचार करावा. अशा रीतीनें माझी पोझिशन् क्लीअर केल्यानंतर..........

ना. रा. ब. मा. ह. लिमये:—गव्हर्मेंट् ऑफ् सांगली ॲक्टमधील कलम ३० इतकें स्पष्ट आहे कीं त्याचें अधिक स्पष्टकरण करण्याची जरूरी आहे असें वाटत नाहीं. प

कलमांतील तरतुदींमध्यें बदल केल्याखेरीज नामदार सभासदांनीं इच्छा प्रदर्शित केल्याप्रमाणें प्रचलित कॉन्स्टिटयूशनमध्यें फरक करतां येणार नाहीं, व तो अधिकार हिज हायनेस यांचा आहे तेव्हां ॲक्टमधील तरतुदीस अनुसरूनच नामदारांनीं भाषण करावें.

ना. स. ग. फडके:—ॲक्टमधील तरतुदी बदलण्याचा येथें कांहींच प्रश्न नाहीं अमुक एक निश्चितपणें करा असें आम्ही सांगत नाहीं. ही एक फक्त आमची सूचना आहे.

ना. रा. ब. मा. ह. लिमये:—असेंब्लीमध्यें यासंबंधीं सूचना मांडून कांहीं उपयोग होणेसारखा नाहीं.

ना. ए. मो. जोशी ( डि. ज. ):—ना. रा. ब. लिमयेसाहेब यांनीं जो पॉइंट् ऑफ् ऑर्डर आणला आहे तो कायद्यासंबंधींचा असल्यानें त्यावर चार शब्द बोलण्याची मी सन्मान्य अध्यक्षांची परवानगी घेतो. ना. सभासदांच्या ज्या कांहीं राजकीय व इतर आकांक्षा असतील त्यांत हात घालावा अगर त्याला कांहीं आळा घालावा या हेतूनें हा पॉइंट् ऑफ् ऑर्डर आणला असावा असें दिसत नाहीं. प्रजेच्या हक्कांत वाढ व्हावी, जनतेला अधिक अधिकार मिळावेत. या हेतूनें ना. गोडबोले बोलत आहेत. ही त्यांची इच्छा रास्त आहे. सरकारहि योग्यवेळीं या मागण्याबद्दल विचार करील. परंतु हा प्रश्न या विधिमंडळाचे अधिकार कक्षेंतील नसून तो हिज् हायनेस् श्रीमंत राजेसाहेब यांचा खास हक्क आहे. हल्लीं राज्यघटनेसंबंधीं जो कायदा संस्थानमध्यें अस्तित्वांत आहे, त्यांतील कलम ९ (१) अन्वयें एक लोकनियुक्त मंत्री नेमण्याची तरतुद आहे, व हा एक प्रकारें संपूर्ण स्वायत्ततेचा पहिला हप्ताच होय. यावरून प्रजेच्या आकांक्षा थोड्या अंशानें कां होईना पुऱ्या झाल्या आहेत. ना. गोडबोले यांच्या बोलण्यावरून त्यांना या ॲक्टमध्यें केलेल्या तरतुदीपलीकडे कांहीं ज्यादा अधिकार हवे आहेत असें दिसतें, व असें असेल तर त्यांना त्या संबंधांत येथें चर्चा करतां येणार नाहीं. कारण सदर ॲक्टमधील कलम १० मध्यें पोटकलम एच् अन्वयें या कायद्याच्या तरतुदींबाबत असेंब्लीनें विचार करणें कायदेशीर होणार नाहीं. हिज् हायनेस् श्रीमंत राजेसाहेब यांच्या खास अधिकारांतील ही गोष्ट असलेनें त्याबद्दल या सभागृहांत चर्चा करणें नियमास सुटून आहे. अशा रीतीनें चर्चा करणेस जर परवानगी दिली गेली तर कायद्यांतील तरतुदीस बाध येईल असें वाटतें. म्हणून याबाबत बोलण्यास परवानगी देऊं नये अशी माझी सूचना आहे. अशी जर परवानगी एकदां दिली तर ॲक्टमधील कलम १० मध्यें एक्सक्ल्यूडेड् सब्जेक्ट्स् म्हणून जी यादी देण्यांत आली आहे, त्यांतील "Palace including the Privy Purse ......................" वगैरेसारख्या बाबींतहि ते आपल्या आकांक्षा प्रगट करण्याची इच्छा करतील.

ना. प्रेसिडेंट :—असल्या विषयासंबंधीं कोणतेंही Bill, amendment, motion, resolution or repsesentation विचारांत घेतां येणार नाहीं व त्याविषयावर प्रश्नही घालतां येणार नाहीं असें कलम ३० मध्यें म्हटलेलें दिसतें. असल्या विषयांस अनुलक्षून केव्हांही कांहींच बोलावयाचें नाहीं असा त्याचा अर्थ केल्यास ह्या असेंब्लींची उपयुक्तता अदमासाबाहेर मर्यादित होईल कीं काय हेंही ध्यानांत घेतलें पाहिजे. या कलमाच्या अर्थाचा विचार पूर्वीं कधीं झाला नाहीं काय ?

ना. स. ग. फडके:—याबाबतींत मे. डेसाहेब हे १९४१ मध्यें असेंब्लीचे प्रेसिडेंट असतांना त्यांनीं रूलिंग दिलें आहे. त्यासालचा अहवाल मजकडे आतां नाहीं; तथापि तो आणवून तें रूलिंग मी आपणांस दाखवूं शकेन.

ना. प्रेसिडेंट:—टीक आहे. ना. गोडबोले यांनीं आपलें भाषण चालू ठेवावें.

ना. म. ह. गोडबोले:—तेव्हां माझ्या बोलण्याचा उद्देश असा कीं सरकारनें आज आपल्यापुढें जी करवाढीची योजना मांडली आहे या करवाढीस संमति देण्यापूर्वीं आपल्या आकांक्षा काय आहेत याबद्दल सरकारपुढें रिप्रेझेंटेशन् केलें तर तें वावगें आहे असें मला वाटत नाहीं. जनतेनें हें रिप्रेझेंटेशन् करण्यापेक्षां असेंब्लीमार्फतच जर केलें तर तें जास्त बरें. या करवाढीस संमति देतांना आमच्या भावी आकांक्षा काय आहेत त्या या विधिमंडळापुढें बोलून दाखविण्याचा साधा हक्क आम्हांस आहे. ब्रिटिश इंडियांतील विधिमंडळांतूनसुद्धां लोकपक्षातर्फे आपल्या आकांक्षा प्रगट होतात व त्याहि अशा करवाढीच्या वेळेसच. गव्हर्मेंट् ऑफ् सांगली ॲक्टमध्यें केलेल्या तरतुदीस सोडून अन्यप्रकारच्या द्विदल राज्यपद्धतिची मागणी मी येथें करीत नाहीं. परंतु प्रजेवरील जबाबदारी वाढवा असें म्हणणें आम्हांस या सभागृहापुढें निःसंशय मांडतां येईल. लोकनियुक्त मंत्र्याला हल्लींपेक्षां अधिक जबाबदार करा असें आम्हांस म्हणतां येईल. मी बोलत आहे तें पार्ट ऑफ् दि रिप्रिझेंटेशन् नव्हे, तर सरकारनीं पुढें मांडलेल्या करवाढीच्या योजनेस लोकपक्षानें आनंदानें संमति देण्यासारखें सरकारनीं कांहींतरी करावें म्हणून बोलतो आहे. इमर्जन्सीच्या वेळीं प्रजेनें सरकारांस आपखुषीनें पैशाची मदत करावी, पण त्याबरोबरच सरकारनेंहि प्रजेवर तितकीच जबाबदारी टाकण्यास हवी. काल पुरवणी अंदाजपत्रकावरील सर्वसाधारण चर्चेच्या वेळीं माझे मित्र ना. फडके यांनीं ह्या अंदाजपत्रकासंबंधीं असमाधान व्यक्त केलें आहे. हेंच अंदाजपत्रक ना. फडके यांनीं तयार केलें असतें तर असें म्हणण्याची त्यांची छाती झाली नसती. जनतेवरील जबाबदारी वाढवावी अशीच प्रजापरिषदेचीहि मागणी आहे. अशी ही जबाबदारी वाढतांच सरकारवर होणारी टीका

आपोआपच कमी होईल. असेंब्लीचा सभासद केव्हांहि सरकारशीं सहकार्य करण्यास तयार असतोच. आमच्यापैकीं एकास मिनिस्टर नेमून त्यांचेवर जबाबदारी टाकतांच त्यांचेकडे सोपविण्यांत आलेल्या खात्यांवरील टीकेचा ओघ बदलून तो आतां रिझर्व्हड् खात्यांकडे वळला आहे हें आपण पहातच आहां. सरकारवर होणाऱ्या प्रजेच्या टीकेचें स्वरूप बोथट होण्याकरितां सरकारनें प्रजेवरच जास्त जबाबदारी टाकणें युक्त होय. सभागृहापुढील अंदाजपत्रकानें २४०१०९ रुपयांची तूट येत असल्याचें दाखविण्यांत आलें आहे. ही तूट भरून काढण्याकरितां करवाढीची योजना सरकारनें पुढें आणिली आहे. तेव्हां सदर करवाढीची आवश्यकता सरकारनें आम्हांस पटवून दिली पाहिजे. सुखसोयींच्या मोबदल्यांत कर वसूल केला जातो. तेव्हां कराची खरोखर जरूरी आहे अशी प्रजेची खात्री करून द्या, आमचेवर जबाबदारी टाका, मग दोन लाखच कां पांचलाखसुद्धां देऊं. बजेटांत येणारी तूट जेव्हां प्रजा स्वखुषीनें भरून काढण्यास तयार असेल तेव्हां या गोष्टी सुलभरीतीनें सोडवतां येतात. याबाबतींत प्रजापरिषदेच्या मँडेटप्रमाणेंच आपण करणें जरुर आहे. सरकार केव्हांहि अंधारांत राहूं नये. योग्य वेळीं सरकारला सल्ला देणें प्रजेचें कर्तव्यच आहे. प्रजेच्या सल्याचा सरकार विचार करील तर सरकारचाच फायदा होईल. आमच्या सरकारास विचार करण्याची बरीच संवय आहे. श्रीमंत राजेसाहेब यांनीं १९३८ सालीं कॉंस्टिटयूशनल् रिफॉर्म्ससंबंधीं केलेल्या घोषणेस अनुसरून लोकप्रतिनिधी अशा एक मंत्र्याचा एक्झिक्यूटीव्ह कौंसिलमध्यें समावेश केला. हा पहिला हप्ता प्रजेच्या पदरांत पूर्णपणें पडला आहे व प्रजेनें तो योग्य रीतीनें पचविला आहे अशी जर श्रीमंत राजेसाहेब यांची खात्री व समाधान झालें असेल तर त्यांनीं हळूं हळूं सर्व सत्ता लोकांच्या हातीं देवून पहावी. या बाबतींत ह्मणजे ही सत्ता मिळविण्यासाठीं प्रजेनें मोर्चे आणणें किंवा डेप्युटेशन् आणणें वगैरे कोणत्याही मार्गाचा अवलंब न करतां यापेक्षां अशा मार्गांनीं व गोडीगुलाबीनें आमच्या पदरांत कांहीं पडत असेल तर तें आह्मांस पाहिजेआहे. फलटण संस्थानचेंच उदाहरण घेतलें तर तेथें एक सरकारतर्फे दिवाण व दोन प्रजापक्षाचे मिनिस्टर आहेत. ही फलटण संस्थाननें अमलांत आणलेली गोष्ट सांगली संस्थानासही सुलभ आहे. हक्कानें मागणी करण्यापेक्षां सरकारनें स्वतःहोऊन दिलदारपणानें प्रजेला अधिकारदान करणें यांतच जास्त गोडी आहे. आतां दक्षिण महाराष्ट्रांतील इतर कोणत्याही संस्थानांपेक्षां सांगली संस्थानांत प्रजेला जास्त अधिकार व जबाबदाऱ्या देणेची प्रथा आहे, असा लौकिक आहे. ही प्रथा व हा लौकिक कायम ठेवून प्रजेकडून खुषीनें कर वसुल करणें सयुक्तिक होईल. तत्वाचे दृष्टीनें बोलायचें ह्मटलें तर कराबद्दल श्रीमंतांप्रमाणें गरीब शेतकऱ्यांचीही तक्रार असते. श्रीमंत लोकांचे व्हेस्टेड इंटरेस्टस् असल्यामुळें ते त्यांना सांभाळावयाचे असतात. तेव्हां कर द्यावा लागला तरी त्यांना वाईट वाटण्याचें कारण नाहीं.

श्रीमंत लोकांना आपल्या जीविताचें व वित्ताचें संरक्षण करून घ्यावयाचें असतें. तें साभाळावयाचें असतें. हा कर सर्व प्रजेकडून कायमचा वसूल केला तरी हरकत नाहीं. ब्रिटिश गव्हर्मेंट ज्याप्रमाणें दरसाल असेंब्लिमध्यें फिनॅन्स बिल पास करून घेतें त्याप्रमाणें येथेंहि या कराबद्दलचें बिल दरसाल असेंब्लिपुढें मांडलें जावें असें जें सुचविण्यांत आलें आहे ती सूचना मलाहि मान्य आहे. त्याचप्रमाणें १००० ऐवजी १५०० रु. ची सूचनाहि मला मान्य आहे. सध्याची युद्धजन्य महागाईची परिस्थिती लक्षांत घेतां ही दुरुस्ती योग्यच आहे. करितां ठरावास सुचविलेल्या दुरुस्तीस माझा दुजोरा आहे.

ना. स. ग. फडके:—थोड्या वेळांपूर्वी ज्या अहवालाचा आधार मी दिला होता तो आतां मजकडे आहे. सन १९४१ च्या असेंब्लीच्या अहवालांतील पान १४ वर छापलेल्या हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांच्या भाषणांत "I need hardly emphasise here that further extension of the reform will be regulated by the manner in which the Assembly will use the powers which the new constitution confers on it" असें म्हटलें आहे.

ह्याच अहवालाच्या पान २९९ वर श्रीमंत राजेसाहेब यांनीं ह्या दिलेल्या आश्वासनाबद्दल त्यांचे अभिनंदनाचा ठराव सभागृहापुढें आलेला छापणेंत आला आहे. तो मी आपणांस वाचून दाखवितो. ( वाचला ) तेव्हां हिज हायनेस ह्यांचें भाषण व ह्या अभिनंदनपर ठराव साइड बाय साइड वाचला असतां यांतच उन्नतीचीं बीजें कशीं पेरलीं गेलीं आहेत तें आपणांस दिसून येईल. गव्हर्मेंट ऑफ् सांगली ॲक्टमध्यें आम्ही कांहीं दुरुस्ती सुचवीत नाहीं. श्रीमंतांच्या सदरच्या आश्वासनास अनुसरूनच आम्ही आमची मागणीची इच्छा प्रकट केली होती. अशाच प्रकारचें एक उदाहरण दिल्ली लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें भाई परमानंद यांचे बाबतींत घडून आलें होतें. तें नेहमीं कम्यूनल् ॲवॉर्डचा प्रश्न उपस्थित करीत; त्यावर त्यांना बोलण्यास प्रतिबंध होत असे. शेवटीं त्यांनीं एकदां निक्षून असें सांगितलें कीं " ज्या मतदारसंघातर्फे मी निवडून आलो आहे त्यांच्या आकांक्षा न्याय्य व पद्धतशीर रीतीनें मांडणें माझें कर्तव्यच आहे. तेव्हां या बाबतींत मला कितीहि विरोध झाला तरी माझें कर्तव्य मी शेवटपर्यंत पार पाडणार " या दृष्टीनें आमच्या आकांक्षा आम्ही ह्या सभागृहापुढें मांडण्यास कांहींच हरकत मला दिसत नाहीं. मी आतां हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचा अभिनंदनपर ठराव वाचून दाखविला तो सभागृहानें एकमतानें मंजूर केला आहे. आतां " जादा कर व जादा हक्क " असें जें ना. गोडबोले यांनीं बोलून दाखविलें त्यासहि कांहीं हरकत नाहीं असें माझें मत आहे. श्रीमंत राजेसाहेब यांच्या सन १९३८ इ. च्या घोषणे-

नंतर गेलीं चार वर्षे डायर्की आम्ही राबविली आहे. व गेल्या चार वर्षांच्या अनुभवावरून आम्ही ही जबाबदारी पार पाडण्यास कार्यक्षम आहोत हेंहि सिद्ध झालें आहे. तेव्हां श्रीमंतांच्या वरील आश्वासनास अनुसरूनच आम्ही आकांक्षा बाळगल्या आहेत व त्याच येथें बोलल्या जात आहेत. हाच विषय ह्या ठरावांत आलेला आहे व हा ठराव सन १९४१ सालीं ह्या सभागृहानें पास केला आहे, अेवढेंच मला सांगावयाचें आहे.

ना. प्रेसिडेंटः—ना. फडके यांनीं जे आधार दाखविले त्यावरून पाहतां ह्या सभागृहाच्या सभासदांना आपल्या आकांक्षा सभागृहांत व्यक्त करण्यास हरकत आहे असें मला वाटत नाहीं. [ टाळ्या ] अशाच प्रकारची इंग्लंडमधील हाउस ऑफ् कॉमन्समध्यें घडून आलेली एक हकीकत मला आठवते. एक प्रख्यात आयरिश मेंबर टिस्टर हिमथी हीलि यांना नियमाप्रमाणें आयर्लंडबद्दल बोलूं देतां येईना. तेव्हां त्यांनी आफ्रिकेतील एका देशाबद्दल बोलून आपली आयर्लंडविषयीं आकांक्षा गर्भितार्थानें सुचविण्याचा प्रसंग आला व तसें त्यांनीं केलें, आणि सभासदांनीं हंसत हंसत ऐकूनही घेतलें. कलम ३० मध्यें आकांक्षा प्रदर्शनाउलट कांहीं नाहीं. या कलमाप्रमाणें Bill, amendment, motion, resolution or representation याचा विचार करितां येत नाहीं.—अर्थात् तें या कलमांत निर्दिष्ट केलेल्या विषयासंबंधीं असेल तर, व अशा विषयासंबंधीं प्रश्नही विचारावयाचा नसतो. पण वाजवीरीतीनें दुसरा एखादा विषय सभेपुढें असतांना त्या विषयाशीं संबंध असलेल्या आकांक्षा बोलून दाखविण्यास बाध आहे असा माझ्यामतें त्या कलमाचा अर्थ होत नाहीं.

ना. स. ग. फडकेः—सन्मान्य अध्यक्ष, मला जास्त बोलावयाचें नाहीं. माझे मित्र नामदार गोडबोले यांनीं शक्य तेवढे विचार या विषयासंबंधींचे प्रकट केले आहेत. श्रीमंत राजेसाहेब यांनीं आम्हांस सुधारणांचा पहिला हप्ता दिला त्याबद्दल त्यावेळींच आम्ही त्यांचा गौरव केला आहे. मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, हिज् हायनेस् यांच्या अपेक्षेप्रमाणें ही सभा यशस्वी रीतीनें आपलें कर्तव्य पार पाडीत आहे. सरकारनें पुढें आणलेल्या करवाढीच्या योजनेचेंहि महत्व सभागृहाला पटून त्यानें त्यास जवळ जवळ मान्यता दिलेलीच आहे. तेव्हां अधिक सुधारणा आम्हांस देण्यास आम्ही आतां लायख झालों आहोत व म्हणून जादा अधिकारदानाची वेळ आतां जवळ आली आहे एवढेंच मला सांगावयाचें आहे.

ना. शं. ग. गाडगीळः—सभागृहापुढें आलेल्या ठरावास मी दुजोरा देतो. परंतु सध्यां करवाढीची जरूरी काय आहे, असें जर विचारलें तर तात्पुरती जरूरी आहे असें म्हणतां येईल.

ना. प्रेसिडेंटः—आपण मूळ ठरावाला दुजोरा देत आहां की अॅमेंडमेंटला ?

ना. वि. का. खाडिलकरः—I think the Hon'ble Member is supporting the amendment.

ना. शं. ग. गाडगीळः—तेव्हां जोपर्यंत या कराची संस्थानला जरुरी आहे तोपर्यंत तो बसविर्णेत मला कांहीं गैर दिसत नाहीं.

ना. प्रेसिडेंटः—आपला गैरसमज झालेला दिसतो. आपल्यापुढें तीन गोष्टी (मॅटर्स) आहेत. मूळ ठराव एक व दोन अॅमेंडमेंटस्. आपण बोलावें, पण कोणत्या मुद्यावर बोलणार तें स्पष्ट करून बोलावें.

ना. स. ग. फडकेः—The Hon'ble Member is explaining. आमच्याप्रमाणेंच त्यांचें मत आहे.

ना. प्रेसिडेंटः—नामदारांनीं बोलणेस हरकत नाहीं.

ना. शं. ग. गाडगीळः—कर एकदां बसविला ह्मणजे तो कायमचा बसण्याची भीति असते तेव्हां जरुरी संपतांच दरबारनें तो रिपील करण्याचें आश्वासन द्यावें असें माझें ह्मणणें आहे.

ना. अ. स. राजमानेः—समान्य अध्यक्ष; हल्लीं महागाई झाल्यामुळें लोकांचे खर्चहि वाढले आहेत तेव्हां ३००० चें आंत पूर्वीचाच इन्कमटॅक्स कर मुळांत माफ व्हावा.

ना. प्रेसिडेंटः—आपण ठरावाच्या उलट आहांत कीं, अमेंड्मेंट्च्या ?

ना. अ. स. राजमानेः—मी सगळयाच्याच उलट आहे.

ना. प्रेसिडेंटः—आपण बोलावें.

ना. अ. स. राजमानेः—सांगलीस संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति हें बिल आणणेंपूर्वी सुरू करावी म्हणजे इंग्लंडचे पद्धतिवर राज्यपद्धति येथेंहि तावडतोब सुरू करावी. म्हणजे याबाबतींत असेंब्ली विचार करील. मागें ज्यावेळीं इन्कमटॅक्स सुरू करण्यांत आला त्यावेळीं कै. अभ्यंकर व कै. काळे यांनीं आश्वासन दिलें होतें कीं, सरकारचे खाजगी इस्टेटीवरहि इन्कम्-टॅक्स आकारणेंत येईल. परंतु सरकारची इस्टेट मोठी व उत्पन्नहि मोठें असतांनासुद्धां त्या करांतून सरकारनें आपलें उत्पन्न वगळलें आहे. त्यावर इन्कमटॅक्स घेणेंत आल्यावर ह्या बिलाचा विचार करावा. पूर्वीच्या इन्कमटॅक्समध्येंच अन्याय झालेला आहे. त्यांत घरखर्च उत्पन्नांत वजा धरला जात नाहीं, तो अगोदर वजा करणेबद्दल दुरुस्ती व्हावयास पाहिजे. कॉंग्रेस सरकार असतांना मुंबई इलाख्याचे मुख्य दिवाण ५०० रु. पगारावर काम करीत होते व मुंबई इलाख्याचें उत्पन्न १२ कोटीचें होतें. त्यामानानें सांगली संस्थानचें उत्पन्न १२ लाखाचें आहे. तेव्हां येथील खर्च भरून काढण्याकरितां बड्या अधिकाऱ्यांनीं आपला पगार निम्मा घ्यावा म्हणजे ही तूट भरून निघेल.

ना. प्रेसिडेंटः—आपण एखादी नवीन अमेंड्मेंट् मांडीत आहांत काय?

ना. अ. स. राजमानेः—ही माझी सूचना आहे. (हंशा)

ना. प्रेसिडेंटः—Order, Order.

ना. अ. स. राजमानेः—पूर्वी इन्कम्‌टॅक्स बसविण्यांत आला त्यावेळीं सदर बिल पास झालेनंतरचे सालाचा इन्कम्‌टॅक्स घेणेंत येईल अशी लोकांची समजूत होती, परंतु पूर्वीचेहि सालाचा कर घेणेंत आला. आपुले जवळच माधवनगर व जमसिंगपूर येथें कसलाहि इन्कम्‌टॅक्स नाहीं. व सदर टॅक्स ३० वर्षेपर्यंत घेण्यांत येणार नाहीं असें माधवनगर येथें जाहीर करण्यांत आलें आहे. शिवाय तेथें कर न घेतां राज्यकारभार होतो तर येथें कां होवूं नये? या बिल्-स्वरूपी ठरावाची प्रत काल लोकांना मिळाली आहे. तेव्हां याबाबतींत आपले मतदारसंघाशीं विचार विनिमय करून त्यांचें मत अजमावण्यास संधि मिळाली नाहीं, तरी हें बिल् पुढील अधिवेशनांत ठेवावें ह्मणजे याबाबतींत मतदारसंघाचें मत घेतां येईल.

ना. प्रेसिडेंटः—आणखी कोणास बोलावयाचें आहे काय?

ना. शा. रा. बेटमंगलकरः—सन्मान्य अध्यक्ष, सरकारतर्फे मांडणेंत आलेल्या मूळ ठरावाला विरोधी पक्षाकडून दुरुस्त्या सुचविण्यांत आल्या व सदर दुरुस्त्या मान्य असल्याबद्दल सदर पक्षांतील बऱ्याच नामदारांनीं संमती दर्शविली. ह्या मूळ ठरावास जी पहिली दुरुस्ती सुचविणेंत आलेली आहे ती "It should remain in force only for the current year." अशी आहे. चालू फसली साल संपण्यास आतां फक्त साडेतीन महिन्यांचा अवधि आहे. येत्या मे महिन्यापर्यंत जरी चालू दुष्काळी परिस्थिती पालटली तरी ह्या परिस्थितीचे परिणाम लौकर नाहींसे होणार नाहींत. करितां ही सुचविणेंत आलेली पहिली दुरुस्ती बदलून तिचेऐवजी "It should remain in force one year more after the emergency ends" हे शब्द घालावेत असें मला वाटतें. कोणास ठाऊक ही इमर्जन्सी आणखी किती दिवस चालणार आहे? ही चालू परिस्थिती येत्या मे अखेरच राहील असा निश्चित अंदाज बांधून त्याप्रमाणें तजवीज न करतां मी सुचविलें आहे त्याप्रमाणें दुरुस्ती केली असतां ही तडजोड अधिक श्रेयस्कर होईल असें मला वाटतें. इमर्जन्सी संपल्यानंतर हें टॅक्सेशन् अधिक दिवस रहाणार नाहीं असें मी नामदारांना अभिवचन देतो.

ना. रा. ब. मा. ह. लिमयेः—पहिली दुरुस्ती ज्या नामदारांनीं सुचविली आहे त्यांना जर ही दुरुस्ती मान्य असेल तर त्यांनीं आपली दुरुस्ती परत घ्यावी.

ना. म. ह. गोडबोले:—ब्रिटिश इंडियांत दरसाल असेंब्लीपुढें फिनॅन्स बिल् मांडलें जातें. त्याप्रमाणें येथेंहि पुढील सालच्या असेंब्लीपुढें हें बिल् मांडणेंत येईलच. तरी "for one year more after the emergency ends" याचें कांहींच कारण नाहीं; पुढील सालची असेंब्ली त्याजबद्दल काय तो विचार करील. चालू सालापुरताच फिनॅन्स बिलाच्या पद्धतीनुसार याचा अंमल व्हावा.

ना. शा. रा. बेटमंगलकर:—पहिल्या दुरुस्तींत मी सुचविल्याप्रमाणें फरक केल्यास सोयीचें होणार आहे. इमर्जन्सी संपल्यानंतर एक वर्षानें हें रद्द होईल याबद्दल मी आश्वासन देतो.

ना. के. गो. कुलकर्णी:—( ली. ऑफ् दि ऑपोझिशन् ) ह्या आश्वासनावरून मी माझी मुळची दुरुस्तीची सूचना परत घेण्यास आमच्या पक्षाची मला संमति नाहीं.

ना. शा. रा. बेटमंगलकर:—नामदारांनी जी दुसरी दुरुस्ती सदर बि. रन. रावाका सुचविली आहे ती सर्व आम्हांस मान्य आहे. पहिल्या दुरुस्तीसंबंधानें मी असें सांगतो कीं; इमर्जन्सी संपल्यानंतर एक वर्षानें ही वाढ अमलांत रहाणार नाहीं असें मी पुन्हां आश्वासन देतो.

ना. प्रेसिडेंट:—सरकारपक्षाचे पुढारी जर आश्वासन देत आहेत तर त्यांच्या ह्या आश्वासनाचा नामदार सभासदांनीं विचार करणेस हरकत नाहीं.

ना. स. ग. फडके:—या ठिकाणीं मला एक मागील असेंब्लीतील दाखला द्यावासा वाटतो. पूर्वी एकदां स्टेटचे दिवाण हेच ह्या विधिमंडळाचे अध्यक्ष होते. विधिमंडळांत ते दिवाण या नात्यानें खुलासा करूं लागले; तेव्हां त्यावेळचे एक सभासद ना. गणपतराव गोडबोले यांनीं Point of Order काढून ती पद्धत बंद केली. त्यावेळींहि अशीच कांहींशी परिस्थिति जमून आलेली असल्यानें तसें कांहीं होऊं नये एवढ्यासाठींच सूचना केली आहे.

ना. प्रेसिडेंट:—मी कांहीं तसें करीत नाहीं. सरकारपक्षांतर्फे जबाबदारी स्वीकारण्यास नामदार लीडर ऑफ् दि हाऊस तयार आहेत. म्हणून त्यांनीं दिलेल्या आश्वासनाचा विचार होणें योग्य आहे. याकरितां तो व्हावा असें मी सुचविलें. In order to avoid undue irritation, I made the suggestion.

ना. के. गो. कुलकर्णी:—I am sorry. आमच्या पक्षास ही सूचना संमत नाहीं.

ना. प्रेसिडेंट:—आतां याला उपाय म्हणजे काल ज्याप्रमाणें उभयपक्षाच्या नेत्यांनीं चेंबरांत जाऊन तडजोडीचा मार्ग काढला त्याप्रमाणें आजहि याकरितां करावें, व तोपर्यंत सुमारें १० मिनिटें सभेचें काम तहकूब रहावें.

( ना. लीडर ऑफ दि हाऊस व ना. लीडर ऑफ दि ऑपोझिशन् हे दोघे काबीत गेल्यामुळें सभेचें काम थोडा वेळ तहकूब राहिलें. )

ना. के. गो. कुलकर्णी:—सन्मान्य अध्यक्ष, सरकारपक्षाचे नेते व आम्ही यांच्या उभयतांच्या विचारें ह्या बिल्स्वरूपी ठरावांत जी दुरुस्ती करणेंत आली आहे ती मी सभागृहाला वाचून दाखवितो.

ही दुरुस्ती म्हणजे " from the 6th of June 1942 " याच्यापुढें " and shall remain in force until the 5th of june 1944" शब्द असे दाखल केले जावेत. ही तडजोड आह्मां उभयतांच्या विचारें झालेली आहे. तरी ह्या दोन्ही दुरुस्त्यांसह ह्या बिल्स्वरूपी ठरावास सभागृहानें सम्मती द्यावी अशी विनंती आहे.

ना. वि. का. खाडिलकर:—लीडर ऑफ दि हाऊस व लीडर ऑफ दि अपोझिशन् यांच्या सहकार्यानें मूळ बिलस्वरूपी ठरावांत ज्या दुरुस्त्या करणेंत आल्या आहेत त्या सरकारपक्षांतर्फे मूल्हर या नात्यानें मी मान्य करतो, आणि असें सुचवितो कीं, हा बिलस्वरूपी ठराव सभागृहानें पास करावा

प्रेसिडेंट:—सभागृहापुढें बिलस्वरूपी ठराव मांडणेंत आलेला आहे. ह्या ठरावाला दोन दुरुस्त्या सुचविणेंत आलेल्या आहेत. ह्यापैकीं पहिली म्हणजे दुरुस्त झालेली अमेंड्मेंट मी वाचून दाखवितो ( वाचली ) ह्यास कोणाचा विरोध आहे काय ?

ना. अ. स. राजमाने:—होय; माझा विरोध आहे.

( इतर सर्व सभासदांनीं संमति दिली. )

प्रेसिडेंट:—The fist amendment is carried by a majority.

आतां दुसरी अमेंडमेंट वाचून दाखवितो ( वाचली ) त्यास कोणाचा विरोध आहे काय?

ना. अ. स. राजमाने:—माझा विरोध आहे.

प्रेसिडेंट:—The second amendment is carried by a majority.

ना. वि. का. खाडिलकर:—Now, Sir, I move : " That the Bill Resolution as amended, be passed ".

प्रेसिडेंट:—The motion before the House is : " That the Bill-Resolution, as amended, be passed "

यावर कोणी बोलले नाहीं म्हणून प्रेसिडेंट यांनीं हा ठराव सर्वांस मान्य आहे असें म्हटल्यावर—

ना. आ. स. राजमाने:—मला हें अमान्य आहे.

प्रेसिडेंट:—I declâse that the Bill-Resulation,* as amended is carried by a majority.

*टीप:-सदर बिल-रेझोल्यूशनला हिज हायनेस स्वारींची नं. ७९/४३ ता. २२-२-४३ नें मंजुरी मिळाली आहे.

---

( ना. ढवळे, प्रेसिडेंट, यांना कांहीं जरुरीच्या कामाकरितां जावें लागल्यानें ना. बेटमंगलकर हे अध्यक्षस्थानीं आले. )

ना. रा. ब. मा. ह. लिमये:—सन्मान्य अध्यक्ष, आपल्या परवानगीनें मी ह्या सभागृहापुढें असा ठराव अणतो कीं;

" बिकानेर संस्थानचे अधिपती जनरल् हिज हायनेस राजाधिराज राजराजेश्वर नरेंद्र-शिरोमणी महाराजा सर गंगासिंग बहादुर हे तारीख २-२-४३ रोजीं कालवश झाले याबद्दल ह्या सांगली लेजिस्लेटिव्ह असेंब्लीस अत्यंत दुःख होत आहे. त्यांचे निधनानें बिकानेर संस्थानच्या प्रजेचेंच नव्हे तर अखिल हिंदुस्थानचें अपरिमित नुकसान झालें आहे. त्यांचे निधनानें यांच्य प्रजेस व राजकुटुंबास झालेल्या दुःखांत सहभागी असल्याचें ही असेंब्ली अत्यंत नम्रतेनें व आदारानें जाहिर करिते. ',

" हा ठराव ह्या विधिमंडळाचे अध्यक्ष यांनीं बिकानेर संस्थानचे हल्लीचे महाराज यांचेकडे सुपुर्द करावा अशी ही सभा ना. अध्यक्ष यांना आधिकार देत आहे. "

असा हा ठराव आहे. तरी सर्व नामदारांनीं उभें राहून हा ठराव पास करावा अशी विनंति आहे.

( सर्व सभासद उभे रहातात. )

ना. प्रेसिडेंट:—हा ठराव एकमतानें मजूर झाला असें मी जाहीर करतो.

ना. रा. ब. मा. ह. लिमये:—सन्मान्य अध्यक्ष, आपल्या परवानगीनें मी ह्या सभा-गृहापुढें असा ठराव आणतो कीं—

" कुरुंदवाड ज्यूनिअर संस्थानचे अधिपती राजेसाहेब श्रीमंत गणपतराव माधवराव उर्फ बापूसाहेब.पटवर्धन हे तारीख १० नोव्हेंबर १९४२ रोजीं कालवश झाले याबद्दल ह्या सांगली लेजिस्लेटिव्ह असेंब्लीस अत्यंत दुःख होत आहे, त्यांचे निधनानें कुरुंदवाड ज्यूनिअर संस्थानच्या प्रजेस व राजकुटुंबांतील मंडळीस झालेल्या दुःखांत सहभागी असल्याचें ही असेंब्ली अत्यंत नम्रतेनें व आदरानें जाहीर करिते. "

" हा ठराव ह्या विधिमंडळाचे अध्यक्ष यांनी कुरुंदवाड ज्यूनिअर संस्थानचे युवराज यांचेकडे सुपुर्द करावा अशी ही सभा ना. अध्यक्ष यांना अधिकार देत आहे."

असा हा ठराव आहे. सर्व नामदारांनी उभे राहून हा ठराव पास करावा अशी विनंति आहे.

( सर्व सभासद उभे राहतात. )

ना. प्रेसिडेंटः—हा ठराव एकमतानें मंजूर झाला असें मी जाहीर करतो.

ना. रा. ब. मा. ह. लिमयेः—सन्मान्य अध्यक्ष, आपल्या परवानगीनें मी ह्या सभागृहापुढें असा ठराव आणतो कीं—

"ग्वाल्हेर संस्थानच्या डॉवेजर महाराणीसाहेब हर हायनेस् महाराणी गजराराजे शिंदे या तारीख १२-१-१९४३ इसवी रोजीं कालवश झाल्याबद्दल सांगली लेजिस्लेटिव्ह असेंब्लीस अत्यंत दुःख होत आहे. त्यांच्या निधनानें हिज् हायनेस् महाराजासाहेब, राजकुटुंब व ग्वाल्हेरचे प्रजाजनांस झालेल्या दुःखांत, सहभागी असल्याचें ही असेंब्ली अत्यंत नम्रतेनें व आदरानें जाहीर करिते."

" हा ठराव ह्या विधिमंडळाचे अध्यक्ष यांनीं ग्वाल्हेर संस्थानचे महाराजसाहेब यांचेकडे सुपूर्द करावा अशी ही सभा ना. अध्यक्ष यांना अधिकार देत आहे."

असा हा ठराव आहे. तरी सर्व नामदारांनीं उभें राहून हा ठराव मंजूर करावा अशी विनंति करतो.

( सर्व सभासद उभे रहातात. )

ना. प्रेसिडेंटः—हा ठराव एकमतानें मंजूर झाला असें जाहीर करतो.

---

ना. म. ह. गोडबोलेः—सन्मान्य अध्यक्ष सभागृहापुढें मी असा ठराव मांडतो कीं—

" चालू अधिवेशनास सुदैवानें लाभलेले अध्यक्ष ना. एस्. बी. ढवळे यांनीं अध्यक्ष या नात्यानें निःपक्षपाताची बुद्धी दाखऊन जें यशस्वी काम केलें त्याबद्दल ही सभा ना. ढवळे यांचे अभिनंदन करीत आहे."

या अधिवेशनाची बैठक संपण्यापूर्वी या अधिवेशनास आपल्या सुदैवानें लाभलेले अध्यक्ष मे. ढवळेसाहेब यांनीं तीन दिवस अध्यक्ष या नात्यानें निःपक्षपाताची बुद्धी दाखवून यशस्वी काम

केलें याबद्दल त्यांचें कोणीहि अभिनंदन करील. तेव्हां या. सभागृहातर्फे त्यांचे आभार मानण्यासाठीं मी हा अभिनंदनपर ठराव मांडीत आहे. कटु कर्तव्यासाटीं आह्मी येथें जमतो. अडचणीची परिस्थिती निर्माण होते ह्मणूनच सरकारलाहि अप्रिय. असें जादा करासारखें काम याचवेळीं करावें लागतें. परिस्थिती खरोखरचं नाउमेद करणारी आहे. वातावरण अस्वस्थ आहे. लोक अन्नाशिवाय उपाशी राहात आहेत, आणि महात्माजी हें लोकावरील संकट टाळण्यासाठींच उपवास करीत आहेत. अशावेळीं आपल्या संस्थानावरील त्यामानानें आलेली आपत्ति घालविण्याच्या प्रयत्नांत पाटणा हायकोर्टाचे माजी नाणावलेले, हुशार असे न्यायाधीश आज आपणाला अध्यक्ष म्हणून लाभले ही खरोखरीच सुदैवाची गोष्ट आहे. श्रीमंत राजेसाहेब यांनीं ही जी निवड केली त्याबद्दल पसंति दर्शविण्याचे दृष्टीनें हा जो ठराव मांडला आहे त्यास सर्वांनीं संमति देऊन तो पास करावा अशी मी आपणांस विनंति करतो.

मे. स. ग. फडके:—ह्या ठरावाचे बाबतींत आम्ही सर्व सहमत आहोंत. सर्वांच्या वतीनें मी ह्या ठरावाला दुजोरा देतो.

ना. रा. ब. मा. ह. लिमये:—सरकारपक्षातर्फे मी ह्या ठरावास दुजोरा देतो. नामदारांनीं केलेल्या ठरावास आह्मीहि सहमत आहोंत.

मे. प्रेसिडेंट:—I declare that the Resolution is carried unanimously The Assembly stands adjourned SINE DIE.

---

समाप्त.

## ( परिशिष्ट १ )

### आकस्मिक खर्च १३५१ फसली

| तपशील | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| पोलीस ऑफिसर हेडक्वार्टर सांगली रिक्रूट भरती बद्दल | ६०५ | | |
| P. R. Kulkarni यांना मुंबईस कंट्रोलरकडे पाठविले त्याबद्दलचे बिल. | ७१ | ३ | ० |
| डी. ए. हरनाळ विमानतळाची पहाणी करण्याबद्दल. | १८० | | |
| बटलर कमिटी लिटरेचर कम्प्लीट सेट घेणे बद्दल. | ४०५ | १ | ० |
| व्हिक्टरी फ्लॅग प्रिंट करून घेणे बद्दल. | ५० | | |
| मि. के. एस्. व्यंकटरमणी यांचे स्टेटला व्हिजिट घेण्याबद्दल खर्चास दिलेले. | १०० | | |
| फणसोपकर यांनी लिहिलेल्या पुस्तकास मदतीबद्दल | ३० | | |
| इंडियन् रोड कॉंग्रेस यांचेकडे स्टेटची कॉंट्रिब्युशन् पाठविणे बद्दल. | २५ | | |
| हॉकी एक्स्कर्शन् पार्टीबद्दल. | २७ | | |
| दिवाण ऑफिस सांगली सर्वसाधारण खर्च | १८३० | ४ | ६ |
| ग्रामोद्धार कामगाऱ्या किरकोळ देणग्या | ५० | | |
| हायस्कुलास समारंभास खुर्ची भाड्याने आणलेबद्दल | ७ | १५ | ० |
| दवाणूर गांवी नवीन खिडक्या करून घेतलेबद्दल. | ३५ | ७ | ० |
| एकूण खर्च | ३४८० | ६ | ६ |

### आकस्मिक खर्च १३५२ फसली.

| | | | |
|---|---|---|---|
| रिक्रूट भरतीबद्दल | १२८ | १२ | |
| ग्रामोद्धार कामगाऱ्या आकस्मिक देणग्या | ६० | | |
| ग्रामोद्धार कामगाऱ्या किरकोळ देणग्या | ५० | | |
| एंटरटेनमेंट टॅक्सकरितां स्टँप ब्लॉक तयार करविणेबद्दल झालेले बिल | ८५ | ८ | ० |
| श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांच्या अस्थि आणणेबद्दल झाले खर्चाचे बिल | ५२९ | | |
| डी. बी. पाटणकर डिव्हेलप्मेंट ऑफिसर पगार | ८ | ६ | ० |
| आगळगांव तालमीस सामान खरेदी करणेस दिले रकमेचे बिल | ३१ | | |
| कॉंग्रेस चळवळीचे बंदोबस्ताकरितां वापरलेल्या मोटार भाड्याबद्दल | १०५ | ४ | ० |
| कवठे मल्लिकार्जुन देवालयाचा दरवाजा करणेबद्दल | १२५ | | |
| पोलीस सुपरिंटेंडेंट यांचा कोल्हापूर मोटार खर्च | ६० | २ | ० |
| माळ्यांळीवरील पोलिस लोकांना भाडे दिलेबद्दल | ६ | ८ | ० |
| एकूण खर्च | ११८९ | ८ | |

## ( परिशिष्ट २ )

सांगली रिलीफ फंडाकरतां ज्या लोकांकडून रकम मांडवल म्हणून देणेत आली त्या शेअर होल्डर लोकांची यादी.

| अ. नं. | इसमाचे नांव. | जमा तारीख. | रुपये |
|---|---|---|---|
| १ | सांगली दरबार मे. ट्रेझरी ऑफीसर मार्फत. | २१-७-४२ | २५००० |
| २ | मे. प्रेसिडेंट सांगली म्युनिसिपॅलिटी सांगली | २६-१०-४२ | १०००० |
| ३ | सांगली बॅन्क लिमिटेड | २५-७-४२ | ५००० |
| ४ | मे. पी. एन्. गाडगीळ | १७-७-४२ | १००० |
| ५ | " जी. एन्. जोग | " | ५०० |
| ६ | " गोविंदराम शोभाराम | " | २००० |
| ७ | " चंदूलाल गोविंदराम | " | ५०० |
| ८ | " हाजी दादाभाई हाजी आबू | " | १५०० |
| ९ | " आर. ए. देसाई | " | ५०० |
| १० | " चुनीलाल मलुकचंद | " | ५०० |
| ११ | " गोकुळदास मलुकचंद | " | ५०० |
| १२ | " जी. एन्. लाले | " | ३०१ |
| १३ | " अहंमद इब्राहिम | " | १००० |
| १४ | " याकुब अबदुल रजाक | " | ५०० |
| १५ | " परी हिरालाल मोतीलाल | " | २०१ |
| १६ | " जी. व्ही. हिंगमिरे | " | ३०१ |
| १७ | " श्रीमहावीर ऑईल मिल्, सांगली | " | ५०१ |
| १८ | " मुळचंद गोवर्धनदास | " | २५० |
| १९ | " व्ही. एस्. दांडेकर | " | १०० |
| २० | " एम् के. माळू | " | ३०१ |
| २१ | " मोहनलाल चतुर्भुज | " | ५०१ |
| २२ | " रामदास नारायण भाटे | " | २५० |
| २३ | " बाबाजी आबा शिरगुप्पे | " | १००० |
| २४ | " चुनीलाल दामोदर | " | ५०० |
| २५ | " रामचंद्र विनायक भिडे | " | २५० |
| २६ | " अनंत भाऊ आरवाडे | " | ७०१ |
| २७ | " रामचंद्र गणेश गाडगीळ | " | ५०१ |
| २८ | " जे. बी. आरवाडे व व्ही. बी. आरवाडे | " | ५०० |
| २९ | " एन्. डी. घोरे | " | २०१ |
| ३० | " के. एस्. दांडेकर | १९-७-४२ | २५० |
| ३१ | " डी. बी. व्होरा | " | ५०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | " महादेव शंकर शेण्गे | २१-७-४२ | २०० |
| ३३ | " हाजी लतिफ जान महमद | " | १००० |
| ३४ | " श्रीमंधर टी. आरवाडे | " | ५०१ |
| ३५ | " छगनलाल मावजी | २२-७-४२ | ५०१ |
| ३६ | " श्रीलक्ष्मी ऑईल मिल्स सांगली | २३-७-४२ | ७०१ |
| ३७ | " श्रीगजानन मिल्स सांगली | " | १००० |
| ३८ | " ईश्वरलाल हिरालाल | " | ६०१ |
| ३९ | " कालीदास गोंडीदास | " | २०१ |
| ४० | " भूपाल श्रीमंधर आरवाडे | २४-७-४२ | ५०१ |
| ४१ | " दादा आण्णा पाटील | " | २०१ |
| ४२ | " शंकर सदाशिव हिंगमिरे | २५-७-४२ | ३०१ |
| ४३ | " श्रीराम सादळाराम | " | ५०० |
| ४४ | " गुलाबचंद खेमचंद | " | ५०१ |
| ४५ | " हिरालाल नाथलाल | " | १५१ |
| ४६ | " गणोबा रावजी खोकले | २६-७-४२ | १००१ |
| ४७ | " रामचंद्र धोंडो कुलकर्णी | २८-७-४२ | ३५१ |
| ४८ | ,, दगडूलाल धनराज | " | २०१ |
| ४९ | " रामचंद्र नथमल | २९-७-४२ | ७०१ |
| ५० | " मणिलाल केशवजी | " | २०० |
| ५१ | " विष्णु श्रीधर साने | ५-८-४२ | १०१ |
| ५२ | " अनंत वासुदेव लिमये | ६-८-४२ | ३०० |
| ५३ | " आपा बाळापा रामचंद्रे | " | २५० |
| ५४ | " भरमापा आकापा आरवाडे | ८-८-४२ | ५०० |
| ५५ | " शिवरुद्र दानाप्पा घेवारी | १५-८-४२ | ५०१ |
| ५६ | " सावंतापा नरसिंगापा बोरगांवे | १९-८-४२ | १०० |
| ५७ | " एम्. एम्. सोमाणी | १-१०-४२ | ३०० |
| ५८ | " शिवजी पुंजा कोठारी | १५-१०-४२ | ५००० |
| | | | ७१५७६ |

एकूण अठ्ठावन शेअर होल्डर्स असून. एकूण एकाहत्तर हजार पांचशे शहात्तर रुपये जमा

# ( परिशिष्ट ३ )

१ (अ) तालुके शिरहट्टी व मंगळवेढे येथें धान्याच्या खरेदी चालू असून तें धान्य निरनिराळ्या दरानें खरेदी होत आहे. त्याचा सरसकट दर इतक्यांत निश्चयासारखा नाहीं. शिरहट्टी व मंगळवेढे येथून खरेदी झालेला माल अद्याप यावयाचा आहे.

ग्वाल्हेरहून २८०० पोतीं ज्वारी आणिली आहे, त्याचा सरासरी दर रु. १८ प्रत्येक पोत्यास येथें येऊन पडतो. तो माल दर पोत्यास १४-१५ या दरानें विकला जातो.

हैद्राबादेहून ३००० पोतीं ज्वारी व २००० पोती बाजरी अशी एकूण पोतीं ५००० खरेदी झालीं. त्यापैकीं १६०० पोतीं सांगलीस स्टोअरमध्यें व ८०० तालुकेनिहाय पाठविण्यांत आलीं आहेत. बाकीचीं पोतीं अद्याप यावयाचीं आहेत.

सदर माल सांगलीचे स्टोअरमध्यें येऊन पडण्यास प्रत्येकीं

ज्वारी दर पोत्यास १२४१०८९

बाजरी „ „ १७८८

वर जे दर दर्शविले आहेत त्यामध्यें प्रवास भत्ता व पुरवठा खात्याचा खर्च व इतर खर्च यांचा समावेश केलेला नाहीं. परंतु विक्रीचा दर ठरवितांना खर्चाचें मान लक्षांत घेऊन दर ठरविण्यांत येतो.

विक्रीचा दर ज्वारी दर पोत्यास १४।१५ व बाजरीचा दर १९।२० प्रमाणें आहे.

टीपः—सांगली शहरांत ज्वारीचा दर रु. १५ आहे. व सांगली पासून ५ मैलाचे बाहेरील खेड्यांत रु. १४ प्रमाणें.

त्याचप्रमाणें बाजरीचा दर सांगलीस रु. २० व बाहेरील रु. १९ आहे. हाच नियम सर्व तालुक्यांत लागू आहे.

# परिशिष्ट ४

## सांगली संस्थान लेजिस्लेटिव्ह असेंब्ली.

अधिवेशन तिसरें सन १९४३ इ.

कपातीच्या सूचना

| अ. नं. | खातें नंबर | खात्याचें नांव | कपातीची रक्कम | सूचक | कपातीचा हेतू |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ५ |
| १ | १० | पोलिटिकलकॉन्फरन्सीस | १०० | ना. पाडके | विल्कीस जाणेच्या प्रजेच्या पुरवठ्याबाबतीत कांहीं उपयोग होत नाहीं. |
| २ | सदर | सदर | १०० | ना. गोडबोले | संस्थानबाहेर संस्थानी प्रजेची परिस्थिति व याबाबत प्रयत्न |
| ३ | १६ (ब) २ | स्टेशनरी खातें छापखान्यासाठीं कागद | १०० | ना. इनामदार | गॅझीट, ले. असेंब्लीचे अहवाल वगैरे कानडीतून छापणें |
| ४ | सदर | सदर | १०० | ना. डॉ. बंगार | सदर |
| ५ | १८ ५ | कायदा व न्याय संस्थानच्या बाह्याकरितां लागणारा खर्च. | १०० | ना. पाडके | स्टेटतर्फेच्या कज्जातून माहिती देण्याकरितां बाहेर अधिकाऱ्यांना पाठवूं नये |
| ६ | १८(७) क (७) | दिवाणी दप्तरखाना विरवोळ | १०० | सदर | सिल्लक रेकॉर्ड हाल्ले तसल्या प्रकारची पुनरावृत्ती होऊं नये |
| ७ | १८ (७) ई | फौजदारी दाव्यांत देण्याचा साक्षीभत्ता. | १०० | ना. करंदीकर | साक्षीदारांना नियमितपणें साक्षीभत्ता मिळत नाहीं |
| ८ | १९ (१) ड (१) | तुरुंग सामानखरेदी दुरुस्ती | १०० | ना. गोडबोले | शहापूर येथील अटक झालेल्यांना अधिक सवलती देणें व त्यांची सुटका होणें |
| ९ | १९ (२) १ | तालुके तुरुंग कैदी पोटगी | १०० | ना. ना. र. कुलकर्णी | सदर |
| १० | २० | पोलिस | १०० | ना. मुळे | रेकॉर्डचे संरक्षण नीट रीतीनें होत नाहीं |
| ११ | २४ क (१) | शिक्षणखातें मास्तरपगार | १०० | ना. करंदीकर | शिक्षणखात्यातील गैरव्यवस्थित प्रकार |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १२ | २४ (ड) १० | शिक्षणखातें ट्रेनिंग कॉलेज अलाउन्स. | १०० | ना. डबाली | धारवाड वगैरे ठिकाणीं ट्रे. साठीं जाणेस कानडी उमेदवारांनां अलाउन्स मिळत नाहीं |
| १३ | सदर | सदर | १०० | ना. डॉ. बोगार | सदर |
| १४ | २४ आय् (३) | ग्रामोद्धार खाजगीशाळांना मदत | १०० | ना. करंदीकर | ग्रामोद्धारखात्यांतील असमाधानकारक काम |
| १५ | २६ब (४) अ | सांगली दवाखाना औषध-खरेदी | १०० | ना. फडके | फीचे शेड्यूल दुरुस्त करणें |
| १६ | २६ ड | सूतिकागृह | १०० | ना. सौ. साठ्ये | सूतिकागृहावर लेडीडॉक्टर नेमणें |
| १७ | सदर | सदर | १०० | ना. फडके | सदर |
| १८ | २७ | पब्लिकहेल्थ | १०० | ना. डॉ. देसाई | पब्लिक हेल्थ ऑफिसरची नेमणूक |
| १९ | २९ इ १ | पशुवैद्यक औषध खरेदी | १०० | ना. करंदीकर | मंगळवेढें ता. स. पशुवैद्यक औषधांचा समाधानकारक उपयोग होत नाहीं. |
| २० | ३२ (क) १ | पब्लिक वर्क्स नवीनकामें | १०० | ना. फडके | सिव्हिल रेकॉर्डसारखी विसाडघाई होवूं नये |
| २१ | सदर | सदर | १०० | ना. करंदीकर | असमाधानकारक काम |
| २२ | सदर | सदर | १०० | ना. गोडबोले | बुधगांव--मिरज रस्ता खराबीनें धोक्याची स्थिती |
| २३ | ४१ (१३) | इकॉनॉमिक इन्क्वायरी कमिटीखर्च. | १०० | ना. करंदीकर | कमिटीच्या रिपोर्टाची चर्चा होणें |
| २४ | सदर | सदर | १०० | ना. फडके | कमिटीच्या रिपोर्टास असेंब्लीची मान्यता मिळण्यापूर्वी डे. ऑ. ची नेमणूक करणें योग्य नव्हे |
| २५ | सदर | सदर | १०० | ना. गोडबोले | औद्योगिक बाबतीत नॉन्‌ऑफीशिअल मेंबर्सना सल्लामसलतींत न घेणेंचें धोरण |
| २६ | ४४ अ | युद्धकालीन तजविजी व अंतःस्वास्थ्य | १०० | ना. फडके | व्यवस्था जास्त पद्धतशीर, परिणामकारक व लोकहितवर्धक व्हावी |
| २७ | ४४ अ (२) | सांगे सबइन्स्पेक्टर ऑफीस | १०० | ना. फडके | ब्रिटिश सरकारकडून हा खर्च मिळावा |
| २८ | सदर | फौजदार पगार | १०० | ना. रं. कुलकर्णी | सदर |
| २९ | ४४ अ (३) | सामान खरेदी दुरुस्ती | १०० | ना. गोडबोले | सांगली बँकेकडे सरकारी तिजोरीचें काम सोंपविणें |
| ३० | ४४ अ (५) | महागाई भत्ता | १०० | ना. डबाली | तीस रु. पेक्षां कमी पगाराच्या नोकरांना ६ रु. महागाई भत्ता देणें |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ११ | ४६ (द) १ | मान्याय डिपार्टमेंट धान्य ल. | १०० | सदर | शिरहट्टी ताल्लुक्यास धान्यपुरवठा झाल्यावर इतरत्र धान्य न्यावें |
| १२ | सदर | सदर | १०० | ना मुळे | धान्य पुरवठा योग्य रीतीनें होत नाहीं |
| १३ | सदर | सदर | १०० | ना. रं. कुलकर्णी | व्याज आकारणेचें धोरणाबद्दल |
| | | | | सदर | सदर |
| १४ | सदर | सदर | १०० | ना. फडके | धोरणांत बदल करणें व लोकप्रतिनिधींना विश्वासांत घेऊन काम करणें |
| १५ | सदर | एस्टॅब्लिशमेंट पगार | १०० | सदर | संस्थानच्या नोकरांना भत्ता वगैरे देऊन काम करून घेणें |
| १६ | ४६ (द) १ | अलाउन्स व फि. भत्ता | १०० | सदर | हा खर्च अनाठाई आहे |
| १७ | ४६ (द) २ | स्टोअर डिपार्टमेंट एस्टॅ. प. | १०० | सदर | स्वतंत्र खातें न ठेवतां ना. मंत्री यांच्या अध्यक्षतेखालीं फूड ॲडव्हायजरी कमिटी नेमणें |

K. A. Kabe,
असेंब्ली सेक्रेटरी, सांगली.

सांगली, }
१६-२-४१ }